

२९९८

REFBK-0023981

…क

# सावरकर

भा. कृ. केळकर

संदर्भ निबंध
२९९७
२३९८१
२८५८३

# समाजसुधारक सावरकर

REFBK-0023981

भा. कृ. केळकर

अस्मिता प्रकाशन,

☼
मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ
पुणे ४११००२

☼
प्रकाशन : १ ऑगस्ट १९८३ :
सावरकर जन्मशताब्दी वर्ष

☼
© :
सौ. शैलजा केळकर

☼
मुखपृष्ठ :
सालकर

☼
प्रकाशक :
ग. वा. बेहेरे
अस्मिता प्रकाशन, ४५८।२ सदाशिव पेठ, चित्रकुटी
पुणे ४११०३०

☼
मूल्य :
पंचवीस रुपये

# भूमिका

स्वातंत्र्यवीर सावरकर हे आधुनिक भारतातील अत्यंत विवाद्य व्यक्तिमत्त्व होते. साठ वर्षे अनेक क्षेत्रांत मूलगामी परिवर्तनाचे-क्रांतिकारक विचार त्यांनी मांडले. परिवर्तन घडविणाऱ्या चळवळी केल्या, आयुष्याचा प्रारंभ सशस्त्र क्रांतीची शपथ घेऊन केला. हे शस्त्रांचे व शस्त्रसामर्थ्याचे आकर्षणं सावरकरांना आयुष्याच्या अखेर-पर्यंत होते. पण या शस्त्रवेडाबरोबरच सावरकर शास्त्रवेडेही होते. आज ज्या वैज्ञानिक वृत्तीची राष्ट्रीय उपासना व्हावयास हवी असे भारतीय विचारवंत म्हणत आहेत त्या राष्ट्रीय दृष्टिकोनाचा पुरस्कार सावरकरांनी शस्त्रवादाइतकाच ५० वर्षांपूर्वी केला. सावरकरांचा शस्त्रवाद आणि शास्त्रवाद यांचे उद्दिष्ट राष्ट्रीय उत्थान हेच होते. हिंदु समाज किंवा हिंदुत्व हेच त्यांनी आपले कार्यक्षेत्र केले होते, सावरकरांच्या सर्व जीवनात केवळ शुष्क चर्चा किंवा पंडिती प्रबंध यांचे आकर्षण त्यांना कधीही नव्हते. तत्त्वाला कृतीची जोड दिली पाहिजे हे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे सावरकरविचारही स्वप्नरंजन वा गूढगुंजन करणारा नाही. तो कृतीची प्रेरणा देण्या-साठी, समाजाला प्रत्यक्ष कृतीची गरज पटविण्यासाठी, मूलगामी क्रांतीची दिशा दाखविण्यासाठी मांडलेला विचार आहे. त्यामुळे सावरकरांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने वाङ्मयाचे सर्व प्रकार जरी हाताळले असले तरी सर्वांगीण परिवर्तन करून भारत हा शक्तिशाली व समर्थ राष्ट्र म्हणून जगात पुढे यावा हेच त्या वाङ्मयांचे उद्दिष्ट होते.

म्हणून सावरकर समजून घ्यावयाचे असतील तर त्यांच्या व्यक्ति-त्वाचे मूलघटक, त्यांची स्वप्ने, श्रद्धास्थाने, सर्व क्षेत्रांतील त्यांची परिवर्तनवादी, क्रांतिकारक विचारसरणी, त्यांनी केलेल्या चळवळी यांचा एकत्रित अभ्यास केला पाहिजे. सावरकरांचे व्यक्तित्व

बहुरंगी असले तरी एकसंध होते. भावनेची उत्कटता हे त्याचे वैशिष्टच असले तरी त्याची बैठक तर्कनिष्ठ, बुद्धिवादी होती. अभ्यासकाने ती अभ्यासली पाहिजे. सावरकरांच्या विचाराला ज्या मर्यादा होत्या त्या त्यांनी स्वतः घालून घेतल्या होत्या हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून सावरकरांनी तरुणपणी जे विचार मांडले तेच ते अखेरपर्यंत पुनः पुन्हा सांगत राहिले. बौद्धिक व्यासंगाची आवड व क्षमता असूनही सावरकर स्वप्नरंजक व आदर्शवादी तत्त्वज्ञानाच्या किंवा सामाजिक, आर्थिक पुनर्रचनेच्या विविध विचारप्रणालींचा अभ्यास करताना किंवा त्यावर टीकाटिप्पणी करताना लोकांना दिसले नाहीत. हा एकांगीपणा स्वतः होऊन स्वीकारलेला होता. पण सावरकर एकांगी होते हे वादापुरते मान्य करूनही राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी त्यांनी जे मूलगामी विचार मांडले, जी आंदोलने केली त्यातच त्यांचे द्रष्टेपण आहे. या द्रष्टेपणाचा, दूरदर्शित्वाचा सावरकरांना अहंकार होता. त्यांच्या व्यक्तित्वाचा तो अविभाज्य भाग होता. आपण म्हणतो तेच खरे ठरेल असा त्यांना आत्मविश्वासही होता. त्यामुळे त्या अहंकाराची बैठक स्वतःच्या विचारसरणीबद्दलचा आत्यंतिक आत्मविश्वास ही होता. गेल्या ६० वर्षांच्या भारतीय इतिहासाने सावरकरांच्या बाजूने निर्णय दिला आहे हे मान्य केले पाहिजे. पण सावरकरांविषयी पूर्वग्रह, गैरसमज समाजात इतके बद्धमूल झालेले आहेत की सावरकरांना न्याय देण्याची बौद्धिक उदारता आपल्यात नाही हेच आपण सिद्ध केले आहे.

हिंदुत्ववाद हे एक विचारपीठ आहे आणि सावरकर हे त्याचे दार्शनिक आहेत हे आता भारताच्या राजकीय समीक्षकाला नाकारता येणार नाही. पण सावरकरांचे हिंदुत्व हे वेगळे आहे–ते अधिक बुद्धिवादी, ऐहिक पण अस्तित्ववादी, विजिगिषु आहे. ते राष्ट्रनिष्ठ असले तरी आधुनिक विज्ञाननिष्ठ विश्वसंस्कृतीला अधिक जवळचे आहे. 'हिंदू' एवढी एकच जात सावरकर मानतात. हिंदुबंधुत्वाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न सावरकरांनी रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत केला. सावरकरांच्या सामाजिक विचारांचा व कार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे.

१९५२ साली 'सावरकरदर्शन' हे माझे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्या निमित्ताने झालेल्या अनेक भेटीत सावरकरांचे विचार समजून घेण्याची त्यावर चर्चा करण्याची दुर्मिळ संधि मला मिळाली होती.

त्यानंतरही झालेल्या भेटीगाठीत चर्चा होत आहे. या सर्वांचा उपयोग हे पुस्तक लिहिताना झाला आहे.

८०० पानांच्या सावरकर वाङ्मयातून निवडून सावरकरांचा सामाजिक विचार या पुस्तकात दिला आहे. शक्य तेथे त्याची मीमांसाही केली आहे. तरीही काही विषय सुटले असण्याची किंवा फारच संक्षिप्त झाले असण्याची शक्यता आहे. सावरकरांच्या सामाजिक विचारप्रणालीची ओळख करून देणं व हिंदू समाज प्रबोधनात सावरकरांचे स्वतंत्र स्थान आहे हे सोदाहरण दाखविणे हाच या पुस्तकाचा हेतू आहे. तो साध्य झाला तर मला समाधान होईल.

वस्तुतः सावरकरांच्या वैयक्तिक संग्रहातील कात्रणे, त्यांचा पत्रव्यवहार व रत्नागिरीच्या वास्तव्यातील सावरकरांच्या आठवणी व त्या काळी सावरकरांनी केलेल्या कार्याचे महाराष्ट्रातील व अन्यत्र उमटलेले वृत्तपत्रीय पडसाद, सरकारी दप्तरखान्यातील त्या काळचे कागदपत्र या सर्वांचा अभ्यास करून हा ग्रंथ लिहिण्याची माझी इच्छा होती. पण माझ्या दिल्लीतील वास्तव्यामुळे व प्रकृतीत आलेल्या असमर्थतेमुळे हे जमू शकले नाही. आपले सामाजिक विचार लोकांनी विसरू नये ही सावरकरांची इच्छा होती. ते विचार माझ्या आकलनाप्रमाणे एकत्रित रूपात लोकांपुढे जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध होत असलेल्या या पुस्तकाद्वारे मी मांडले आहेत. समग्र सावरकर वाङ्मयाचा व श्री. बाळाराव सावरकर यांनी लिहिलेल्या चरित्राचा या पुस्तकासाठी साधार उपयोग केला आहे. ह्या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याचे काम श्री. श्याम नाईक यांनी केले याबद्दल त्यांचा आभारी आहे. ह्या पुस्तकाचे प्रकाशन करण्याची जबाबदारी श्री ग. वा. बेहेरे यांनी घेतली व अत्यंत देखणे पुस्तक काढले याविषयी मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

सावरकरांच्या सामाजिक विचारांची तौलनिक मीमांसा करणारे अनेक ग्रंथ निघावेत हीच इच्छा आहे.

**भा. कृ. केळकर**

नवी दिल्ली, १ ऑगस्ट १९८३

# संदर्भ ग्रंथ


१. समग्र सावरकर वाङमय खंड २, ३, ४, ५, ६, ७
प्रकाशक महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणे
प्रथमावृत्ति—१९६४

२. हिंदु समाजसंरक्षक वीर सावरकर—रत्नागिरी पर्व
ले. बाळाराव सावरकर

३. वीर सावरकर—अखंड भारत पर्व
ले. बाळाराव सावरकर

४. सावरकरांचे जातिभेदोच्छेदक निबंध—आवृत्ती १९५०
सौ. कमल राजाराम बापट
विश्वास प्रकाशन—मुंबई ४

५. सावरकर स्मृति—
मो. वि. दामले, रत्नागिरी, नोव्हेंबर १९८२

६. महाराष्ट्र ज्ञानकोश प्रस्तावना खंड—
डॉ. श्री. व्यं. केतकर

७. सावरकरांच्या सहवासात भाग १ व २
अ. ग. साळवी, रत्नागिरी

८. हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व—
ज. द. जोगळेकर

९. स्वातंत्र्यवीर सावरकर—
धनंजय कीर
(मराठी अनुवाद) पॉप्युलर प्रकाशन ऑगस्ट १९७२

१०. सावरकर दर्शन भा. कृ. केळकर
परचुरे प्रकाशन

११. रत्नागिरी हिंदुसभेचे प्रतिवृत्त (१९२९, ३०, ३१)
प्रकाशन : अच्युत एकनाथ मलूष्टे १९३७

## अनुक्रम

१. सावरकरांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाची बैठक / ८
२. पुरोगामी हिंदुत्वाचे तत्त्वचिंतक / ३१
३. सावरकरांचा विज्ञानबोध / ४५
४. आधुनिकतेचे बुद्धिनिष्ठ प्रचारक / ६८
५. धर्मभोळेपणास तिलांजली / ७७
६. जात्युच्छेदक समाजरचना / ८८
७. धर्मांतर व शुद्धीकरण / ११४
८. कर्ते सुधारक / १३८
९. पुरोगामी हिंदुत्वाचा बीजविचार / १६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०००७
ग्रं. क्र. २३९८१
निबंध २८।१।८२
संद. शाखा (स्थळ प्रत)

# १. सावरकरांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाची बैठक

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांची विचारसृष्टी बहुरंगी आहे. प्रत्येक विषयाचा मूलगामी व स्वतंत्र विचार हे सावरकरांचे विचारवैशिष्टय आहे. याचे मुख्य कारण सावरकरांचे स्वतंत्र व्यक्तित्व हे आहे. ते व्यक्तित्व बहुरंगी, डोळे दिपवणारे असले तरी वैज्ञानिकाला त्यांतील स्थायी रंग दिसतात. सामान्य माणसाला जे व्यक्तित्व त्याच्या बहुरंगीपणाने मोहविते तसे शास्त्रज्ञाचे होत नाही. आता सावरकरांच्या व्यक्तित्वाचा व विचारांचा अभ्यास व्हावयास हवा तो वैज्ञानिकाच्या व समाजशास्त्रज्ञाच्या वृत्तीने. काळाने राग, लोभ, पूर्वग्रह व मत्सर बोथट झाले असावेत व सावरकर दिसतात ते एखाद्या लख्ख मूर्तीसारखे. स्वत: सावरकर जेव्हा मृत्यूला सामोरे गेले तेव्हा त्यांची मन:स्थिती कृतार्थतेची होती. ते म्हणत, 'मी पूर्वी जे जे पेरले ते आता उगवत आहे. त्याला आता फळे येत आहेत. माझ्या आयुष्यातला हा फलऋतू आहे. झाले हे अपेक्षेपेक्षा किंवा कल्पनेपेक्षा पूर्ण झाले आहे. उरेल ते काम पुढच्या पिढीचे आहे. तिला मार्गदर्शन हवे, तर माझ्यापुरते मी ग्रंथरूपाने देऊन ठेवले आहे. ते वाचणे, नि त्याला अनुसरून वागणे किंवा न वागणे हे त्यांचे काम आहे.'

(महायोगी सावरकर–ले. बाळाराव सावरकर, पान ३१).

स्वत: सावरकर स्वमताचे आग्रही असले तरी प्रत्येक पिढीचे प्रश्न वेगळे असतात असे ते मानत. वरवर दिसणाऱ्या त्यांच्या आग्रही व अहंकारी व्यक्तित्वाचा गाभा विनयशील होता. आजची पिढी मागच्या पिढीच्या खांद्यावर उभी असते, त्यामुळे तिला पुढचे जास्त दिसते असे सावरकर मानत. जुन्या पिढीबद्दल कृतज्ञ असावे एवढेच ते म्हणत. म्हणून पुण्याला 'अभिनव भारता'च्या सांगता–समारंभात

(मे १९५२) भाषण करताना सेतू बांधताना खारीने केलेल्या कामा-इतके क्षुल्लक समजलें जाणारे काम करणाऱ्या देशसेवकांचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य सावरकरांनी कृतज्ञपणे गौरवले होते. एकदा स्वतंत्र-भारतात कालगणना करताना भारतात होऊन गेलेल्या महापुरुषांची नावे प्रत्येक महिन्याला द्यावीत अशी सूचना एकाने केली तेव्हा सावरकर म्हणाले होते, ' हिमालयाची जशी अगणित गगनचुंबी शिखरे आहेत अशी भारताची स्थिती आहे. इतके उत्तुंग व्यक्तित्वाचे स्त्री-पुरुष त्यांत होऊन गेलें आहेत. आणि भारताचा इतिहास किमान पाच हजार वर्षांचा आहे.' तेव्हा आतून नम्र, पण कणखर, बुद्धिवादी, पण प्रत्यक्षनिष्ठ असे त्यांचे व्यक्तित्व होते. ते ज्ञानमार्गीच होते, पण ते ज्ञान राष्ट्राच्या उत्थानासाठीं वापरावयाचे हा तरुणपणा-पासूनचा निर्धार होता. 'वक्तृत्व वाग्विभवही तुज वाहियेले' असे 'तुजसाठी मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण, ' असे स्वतंत्रतादेवीला सांगितले ते याचसाठी. हिंदूंचे उत्थान व देशाचे स्वातंत्र्य ही सावरकरांच्या जीवनाची दोन ध्येये होती. त्यांचा विज्ञानवाद, आधुनिकता, अद्यतनी वृत्ती, बुद्धिवादी विचारसरणी, इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास, हे सर्व त्याच्या पूर्तीसाठी होते. सामाजिक पुनर्रचनेचा बीजविचार, समाजस्थितीची बुद्धिवादी समीक्षा व भविष्यवेधी विचारप्रतिपादन ही सावरकरांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाची तीन वैशिष्टचे आहेत. पण सावरकर नुसते बोलके सुधा-रक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. त्यांचा सुधारकी विचार व त्यांचा आचार यांत एकात्मता होती. त्यांच्या व्यक्तित्वाचा पीळच सुधारकी होता. व्यक्तित्वाचा कंद पुरोगामित्वाचा होता. मन पोलादी होते, न वाकणारे होते. जे पटेल, जे खरे असेल ते बोलणार, मग त्यासाठी कितीही किंमत द्यावी लागली तरी चालेल, हा त्यांनी मनाशी केलेला निश्चय होता. म्हणूनच 'वरं जनहितं ध्येयम्' हे सूत्र त्यांनी आचारसूत्र केले. ' सुधारणा म्हणजेच अल्पमत, रूढी म्हणजेच बहु-मत' हे सावरकरांचे मत असल्याने आपण एकाकी आहोत, अल्पमतात आहोत याची त्यांना काळजी नव्हती. म्हणून मूलगामी व परिवर्तन-वादी विचारवंतांना लागणारे कणखर, न वाकणारे व्यक्तित्व त्यांच्या-जवळ होते. म्हणून त्यांच्या आयुष्यात त्यांचा विचार आणि त्यांचा आचार यांत कधीही विसंगती दिसली नाही.

लहानपणीच आपल्या जिज्ञासेचा उगम कसा झाला याचे वर्णन

सावरकरांनी स्वतःच आत्मचरित्रात केले आहे. 'लहानपणापासून माझी भावना जितकी उत्कट तितकी माझी बुद्धीही तर्कट पडल्यामुळे दोघ्या सख्ख्या पण छटेल बहिणींप्रमाणे परस्परांचा पाणउतारा करण्यासाठी टपून बसण्यातच त्यांच्या परस्पर प्रेमाची करमणूक चाललेली.' सावरकर लहानपणी निस्सीम देवीभक्त होते. तेराव्या-चौदाव्या वर्षापासून त्यांना ही देवी आईसारखी ममताळू आणि वत्सल वाटे. दिवसानुदिवस देवघरांतील देवीच्या मूर्तीपुढे बसून सावरकर साधना करीत असत. पण सावरकरांच्या या निस्सीम भक्तिभावनेच्या सहज आनंदाच्या ह्या शुद्ध दुधात संशयाच्या मिठाचा पहिला खडा टाकला. सावरकर त्यांच्यात झालेल्या या बदलाविषयी म्हणतात, 'माझ्या धार्मिक विचारात उडत चाललेल्या या खळबळीमुळे अर्थातच माझी पूजाअर्चा पूर्वीच्याच अल्लड उत्कटतेने होईनाशी झाली. तत्त्वाच्या पोलादी ठिकाणाचे अभंग अधिष्ठानही तिला सापडावयाचे होते. पण त्याआधी कराव्या लागणाऱ्या संशयाच्या अग्निप्रवेशाच्या भीषण अग्निदिव्यातून ती अजून पार पडली नव्हती. पण संशयाच्या या अग्निकल्लोळात पहिल्या भोळ्या भावनेच्या भुसांचा पाय सापडण्याचा हा सूतोवाच होत असतानाच माझ्या निष्ठेला लवकरच मिळणाऱ्या वर उल्लेखिलेल्या तत्त्वाच्या भक्कम पायाचाही सूत्रपात झाला. तत्त्वविचारांचा उदय माझ्या मनात करणारा गुरु म्हणजे माझे ज्येष्ठ बंधू होत. पण तो माया शब्दाचा काथ्याकूट आणि त्याहून त्या ब्रह्मशब्दाचा ब्रह्मघोटाळा त्या वयात मला त्या विषयापासून अधिकच दुराविण्यास काय तो उपयोगी पडला. पण ती दुराविणे असलेली बंधने तोडून नव्हे तर प्रबळ जिज्ञासेची व संस्कारांची नवीन अतूट साखळी माझ्या बुद्धीच्या गळ्यात पक्केपणी बांधून.' (माझ्या आठवणी-पान ६१-६३).

लहानपणी जागृत झालेली सावरकरांची ही चिकित्सक वृत्ती व बुद्धिनिष्ठा हे त्यांच्या बुद्धिवादी सामाजिक समीक्षेचे मूळ आहे. त्यातही अभ्यासूपणा, मुळातून सारे जुने वाङमय वाचून स्वतःची मते पक्की करण्याची व ती प्रचारण्याची त्यांची वृत्ती शेवटपर्यंत होती. सावरकर तत्त्वाचे पक्के व निग्रही सुधारक होते. पण त्यात फरक होता. ते स्वतः सत्यनारायण करीत नसत पण सत्यनारायण कोणी केला तर त्याची चेष्टा करीत नसत. किंबहुना झुणकाभाकर सत्यनारायणसारख्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास

उपयुक्त ठरणाऱ्या चळवळीचा सावरकरांनी पुरस्कार केला. सावरकरांच्या पत्नी माई सावरकर यांचे निधन झाल्यावर सावरकरांनी जो सुधारकी मनाचा पीळ दाखवला त्याबद्दल त्यांचे वैयक्तिक कार्यवाह बाळाराव सावरकर यांनी लिहिले आहे. (माईच्या स्मरणार्थ) पिंडदान आदी अनावश्यक विधी न करण्याचा निश्चय थत्ते प्रभृतींनी दाराशी सत्याग्रह, निदर्शने केली तरीही तात्यांनी पार पाडला. मृत्यूनंतर पिंडदान, कावळा शिवणे, आदि धार्मिक रूढाचार आपण पाळलेच पाहिजेत असा आग्रह जवळच्या आप्तांनी धरला. हे विधी कसे निरर्थक आणि अनावश्यक हे तात्यांनी त्यांना समजवून सांगितले. ' मी माईबरोबर चाळीस वर्षे संसार केला. तिच्या काही इच्छा अपुऱ्या राहिल्याच असल्या तर त्या कळायला मध्ये कावळा कशाला? तिचा आत्मा मलाच येऊन सांगेल.' (महायोगी सावरकर-पुस्तिका पान १७).

सावरकरांनी स्वतःचे मृत्युपत्र ऑगस्ट ६४ मध्ये लिहिले. तेच त्यांच्या सुधारकी वृत्तीचे व मनाचे प्रतीक आहे. स्वतः मृत्यूबद्दल इतका विदेही वृत्तीने विचार करणे आधी कठीण आणि त्यातही सुधारकी मनाने मरणोत्तर क्रियाची नोंद हे तितका घट्टपणा असल्याविना जमणारे नाही. १९५१ साली काहीतरी कारणाने चर्चेत हा विषय निघाला असताना सावरकर म्हणाले होते, 'माझे प्रेत वाहण्यासाठी साधी हातगाडी आणा. हरताळ, काम बंद वगैरे प्रकार नकोत.' (लेखकाशी झालेली चर्चा) तेव्हा बोले तैसा चाले या परंपरेतले सावरकर होते.

पण व्यक्तित्वाची सुधारकी घडण जी १३–१४ व्या वर्षी झाली ती अखेरपर्यंत टिकली हे समाजसुधारणावादी नेता म्हणून सावरकरांचे वैशिष्टच होते.

## सुधारणेची संघटना

पण सावरकरांचे आणखी एक वैशिष्टच आहे. ते असे की समाजसुधारणेचा व्यवहार रत्नागिरीसारख्या पुराणमतवादी समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यात त्यांनी संघटित केला. समाजसुधारणेचा त्या काळचा तो आदर्श प्रकल्प ठरला. सरकारी अवकृपेची व बंधनांची टांगती तलवार असताना १४ वर्षे सावरकर हे कार्य करीत होते हे लक्षात घेतले म्हणजे त्याचे महत्त्व अधिकच वाटते. लोकांचा विरोध, उपहास, सामाजिक बहिष्कार हे सर्व असताना सावरकरांनी स्वतःचे कार्यकर्ते उभे केले, कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांचा संच उभा

केला. हिंदू समाजाला आधुनिकतेचा, सामाजिक समतेचा, बंधुत्वाचा, रूढींच्या व जन्मजात जातिश्रेष्ठत्वाच्या संकल्पनेच्या निर्मूलनाचा संदेश दिला. पतितपावन मंदिरासारखी समाजक्रांतीचे प्रतीक ठरलेली कल्पना साकार केली. केवळ रत्नागिरी जिल्ह्यात नव्हे तर इतरत्र त्याचे पडसाद उमटले. अस्पृश्यतानिवारण व शुद्धीकरण या चळवळींनी सर्व हिंदू समाजापुढे समाजपरिवर्तनाचा विचार व तो साध्य करण्याचा मार्ग सावरकरांनी दाखविला. तेव्हा सुधारणावादाचे विचारवंत म्हणूनच केवळ नाही तर त्यासाठी कार्यवाहक संघटना उभी करणारे संघटक म्हणून सावरकरांचे जे दर्शन झाले ते चिरस्मरणीय व स्फूर्ती देणारे ठरणारे आहे.

## सावरकरांच्यात सुधारणावादाचे बीज

सावरकरांच्या चिकित्सक, बुद्धिनिष्ठ वृत्तीचा उगम जसा त्यांच्या लहानपणी दिसला तशा त्यांच्या सुधारकी दृष्टीचे प्रत्यंतर लहानपणीच आले. १९०२ साली सावरकरांनी रचलेल्या 'बालविधवा दुःस्थिती कथन' या कवितेत हिंदु समाजातील विधवांचे दुःख वर्णिलेले होते. सावरकरांना या कवितेबद्दल पारितोषिक मिळाले होते विधवांची दुःस्थिती हा त्या काळचा एक सामाजिक विषय होता. 'सुज्ञान सुविचारे स्थित्यनुरूपे स्वधर्म सुधरावा' असे या कवितेत म्हटले असून यात जहालनेमस्त सर्वांनी विधवांची दुःस्थिती नाहीशी करण्यासाठी एक व्हावे अशी सूचना तरुण सावरकरांनी केली आहे.

'माझ्या आठवणी' या सावरकरांच्या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडातील नाशिकच्या मित्रमेळ्याच्या आठवणी आहेत. त्यांतही स्वातंत्र्यकवी आबा दरेकर यांच्यासंबंधी आठवणी आहेत. आबा जातीने शूद्र होते. त्यांनी चोखून टाकलेली उसाची चुलटी ओलांडून जाणे हेही निषिद्ध मानले जाई. त्याविषयी सावरकरांनी लिहिले आहे: 'इतकी त्या काळी विटाळवेडी परमावधी समाजात चालू होती. ही विटाळवेडाची मूर्ख, पण मारक रूढी तोडण्याच्या आम्हा सुधारकांच्या पुरत्या स्वातंत्र्यात त्यांनीही लुडबूड करू नये असा माझा सक्त कटाक्ष असे.' तेव्हा त्या काळचे काही क्रांतिवादी तरुण राजकारणाच्या जहालपणात टिळकांबरोबर असले तरी सामाजिक सुधारणेच्या बाबत आगरकरांबरोबर होते हेच सावरकरांच्या या आठवणीवरून सिद्ध होते.

## समाजपरिवर्तनाची सूत्रे

सावरकरांच्या दोन ध्येयांपैकी हिंदूंचे उत्थान हे प्रमुख होते. स्वातंत्र्य हे महत्त्वाचे असले तरी तत्त्वतः तात्कालिक होते. पण त्या स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच सावरकरांचा हिंदुत्वविचार प्रबळ होता. ' मूर्ति दुजी ती' या अंदमानात रचलेल्या कवितेत 'मी न काय एक जरी क्षुद्र डहाळी, तरी त्याची प्रतिमा अश्वत्थ तरूची, हिंदूंच्या वंशाच्या, तेचि बीज, आचरता तरी शिरात या तेचि बीज जीवनाते मृतिका' ही– म्हणजे स्वातंत्र्यासाठी लढत असतानाही हिंदुत्वाचा विचार बीजरूपाने सावरकरांच्या अंतःकरणात होता, पण त्यांचे मन प्रगतिशील पाश्चात्त्य विचाराने अंतर्मुख झाले. १९०४–५ च्या सुमारास मिल, स्पेन्सर यांच्या ग्रंथांनी त्या वेळची तरुण पिढी भारलेली होती. सावरकरांनी याविषयी आपल्या आत्मचरित्रात उल्लेख केला आहे. कॉलेजमध्ये मिल, स्पेन्सर सावरकरांनी वाचला होता. पण पुढे विलायतेस गेल्यावर मूळ इंग्रजीतून त्यांनी स्पेन्सर वाचला. इंग्लंड-मध्ये याविषयी चर्चा करण्याची संधी सावरकरांना मिळाली. पण त्या-आधी मराठीतून वाचलेल्या पुस्तकांनी सावरकरांच्या मतांची घडण झाली होती, किंबहुना सावरकर हे उपयुक्ततावादाचे प्रचारक बनले होते. सावरकरांनी या विषयावर त्यांच्या गुप्त संस्थेत अनेक व्याख्याने दिली. आधी भारतात, नंतर इंग्लंडमध्ये सावरकरांनी याविषयी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे: ' ज्या नीतिशास्त्राच्या पायावर व सूत्राधारे आपल्या क्रांतिकारक आंदोलनास उभारले पाहिजे आणि समर्थिले पाहिजे ते हे ' युटिलिटी' हेच नीतिशास्त्र, हीच क्रांतीची मनुस्मृती असे मी म्हणे, असे मी मानी आणि महाभारतातील कृष्णाच्या अनेक प्रसंगींच्या भाषणांवरून मी सिद्ध करी की उपयुक्त-तावादाचा श्रीकृष्ण हाच पहिला प्रणेता नव्हे, आचार्य होता. त्याने तो आचरून दाखविला. त्याच्या सर्व आचारांचे सर्व समर्थन त्याने याच तत्त्वावर केले.' (माझ्या आठवणी–पान १७०).

सावरकरांच्या या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाशी जुळणारी त्यांची तत्त्वे म्हणजे सुधारणाकार्यातील त्यांची प्रत्यक्ष निष्ठा व बुद्धिवाद. सावरकरांचा सर्व सामाजिक विचार म्हणजे प्रत्यक्ष निष्ठा व बुद्धि-वाद यांनी केलेली हिंदु आचार–विचाराची समीक्षा आहे.

याला आनुषंगिक अशी विज्ञानवादी दृष्टी व पोथीमुक्ती यांचा पुरस्कार सावरकरांनी केला. युरोपने गेल्या २०० वर्षांत मुसलमानां-

१२।१३

वर, हिंदूंवर मात केली याचे कारण बायबलच्या दोन पुठ्ठयांच्या आत ते अडकून पडले नाही म्हणून. सावरकर फ्रेंच राज्यक्रांतीविषयी म्हणतात, 'अकस्मात एक स्फोट झाला तो फ्रेंच राज्यक्रांतीचा नव्हे तर फ्रेंच बुद्धिक्रांतीचा.' 'फ्रेंच राज्यक्रांती हा त्या बुद्धिक्रांतीचा अध्याय होता. एक अपरिहार्य परिणाम होता. फ्रेंच राज्यक्रांतिकारकांनी अक्षरशः अनेक जुन्या देवता नाकारून नवी देवता घडविली नि पॅरिसच्या रस्त्यातून ती मिरविली. बुद्धीची– द गॉडेस् ऑफ रीझनची. त्या स्फोटाने सारे युरोप बायबलच्या बंदीतून बाहेर फेकले गेले. त्याने साऱ्या एष धर्मः सनातनांना विज्ञानाचे, बुद्धीचे, सद्यःस्थितीचे कसोटीस लावले आणि युरोप आकाशात उंच उंच भरारू लागले. विज्ञानाच्या नव्या नव्या शस्त्रांनी युरोपने हिंदूंवर मात केली. आज सारेच मुस्लिम देश युरोपच्या टाचेखाली आहेत. (सावरकर खंड ३ पान २२९). याच बुद्धिवादाच्या सूक्ष्मदर्शी यंत्रातून सावरकरांनी हिंदुपरंपरा तपासली. हिंदू समाजाच्या सामाजिक मनाविषयीचे आपले अंदाज बांधले व सुधारणाकार्यास व विचारप्रवर्तनास सुरुवात केली. म्हणून सावरकरांचे सामाजिक विचार प्रक्षोभक ठरले व त्याने हिंदु समाजाच्या आधुनिकीकरणाचा पाया घातला.

## सुधारणावादाचे ध्येय व तत्त्वप्रणाली

धर्मभोळेपणा, रूढी, आंधळी परंपराप्रियता हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे शत्रू असतात. या सर्वांचा आधार म्हणजे आमच्या पोथ्या. सावरकरांनी या पोथीनिष्ठेवर पहिला हल्ला चढविला. सावरकरांच्या दृष्टीने पोथीमुक्ती हे समाजसुधारणेचे पहिले पाऊल आहे. सावरकर म्हणतात–

'...त्या अर्थी आम्हा सुधारकांना हे कळून चुकले आहे, की आमच्या हिंदुराष्ट्राच्या गळ्यातच तात देणाऱ्या ह्या पोथीजात जातिभेदाचा निःपात केल्यावाचून हिंदुराष्ट्राचं अभ्युत्थान नि उज्जीवन होणे सर्वस्वी असंभाव्य होय; ज्या अर्थी आम्हा बुद्धिनिष्ठ विज्ञानवादी सुधारकांनी सर्व प्रकारचे धार्मिक भाबडेपण नि लुच्चेगिरी, मग ती वैदिक असो, बायबली असो, कुराणीय असो वा पुराणीय असो, तिच्या कचाटयातून सोडवून मानवी बुद्धीला मुक्त करणे हेच आमचे पवित्र धर्मकृत्य होय, ह्यातच मानव्याचे, अवघ्या मनुष्यजातीचे कल्याण असे वाटत आहे, त्या अर्थी ते सत्य प्रचारण्यात आणि त्या सुधारणा स्वतः आचरण्यात आम्ही हिंदुसंघटक, सुधारक कोणाच्याही

'धर्मभावना' दुखवीत नाही. अधर्मभावना दुखावल्या गेल्या तर त्याला उपाय नाही. आम्ही कोणाचाही बुद्धिभेद करीत नाही, दुर्बुद्धिभेद हा केलाच पाहिजे. आमची जी मते तुम्हांस चुकीची वाटतील त्यांच्या विरुद्ध तुम्हीही प्रचार करा. आम्ही काही आमच्या धर्मभावना दुखवू नका म्हणून रडकुंडीस येणार नाही. आम्ही तर उलट असेच म्हणतों की सुधारकांना जर सुधारणा करण्याचा अधिकार आहे, तर समाजासही सुधारकांवर बहिष्कार घालण्याचा आहे. जो सुधारक बहिष्कारास पुरून उरेल, सुधारकचा सुधारक उरेल, तेच नाणे खरे. (समग्र सावरकर खंड ३-पान ४१९).

## विज्ञानवादी दृष्टिकोन

समाजाला पोथीमुक्त केल्यानंतर जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी त्याला दिली पाहिजे याची जाणीव सावरकरांना होती. म्हणून आधुनिकतेची जी जननी त्या विज्ञानवादाचा प्रचार त्यांनी केला. त्या दृष्टीने धर्म, समाजातील रूढी, परंपरा, व्रतवैकल्ये, जातीसारख्या सामाजिक संस्था किंबहुना सर्व मानवी जीवन यांचा विचार कशा तऱ्हेने केला पाहिजे हे सांगितले. त्यामुळे विज्ञान हा सावरकरांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा पाया झाला व नव्या युगातील प्रगतीचा तो दीपस्तंभ आहे हे त्यांनी साधार व सोदाहरण सांगितले.

## विज्ञानाची दृष्टी व साधने

सावरकरांच्या विज्ञानबोधाची दोन महत्त्वाची अंगे आहेत. एक म्हणजे समाजाला विज्ञाननिष्ठेची दीक्षा देणे व त्यासाठी आधुनिकतेचे, अद्यतनी वृत्तीचे महत्त्व पटवून देणे आणि दुसरे म्हणजे जी विज्ञानाची साधने आहेत त्यांचा प्रचार करून त्याला अनुकूल अशी समाजमनाची घडण करणे. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ विचारांची अशी विभागणी केली तर त्यांचे सामाजिक महत्त्व समजेल. येथेही सावरकरांचा उद्देश स्पष्ट आहे. ते सनातनी व सुधारक यांना सांगतात, आपणा दोघांचे ध्येय एकच आहे–ते म्हणजे हिंदुराष्ट्राचा उद्धार. हे स्पष्टीकरण करताना सावरकर म्हणतात–

'वादाच्या भरात ज्या एका गोष्टीचा विसर मनुष्यास सहजी पडतो त्याविषयी केव्हातरी आपणा सर्वांना असे आश्वासिणे आवश्यकच आहे, की कर्तव्य काय ह्याविषयी आपल्यामध्ये कितीही मतभेद असला तरी आपणा सर्वांचे ध्येय एकच आहे. आपणा सर्वांना प्राणाहून प्रिय असलेल्या स्वदेशास नि स्वराष्ट्रास आजच्या पतित

वस्थेतून उद्धारून त्यांनी जगातील इतर राष्ट्रांच्या तुलनेत लेशभरही हीन ठरू नये असे संघटित, सशक्त नि प्रगत करावे. आणि मानवाच्याही हितार्थ झुंजण्याची योग्यता नि बळ त्यामध्ये यावे. हेच आमच्या हिंदुसंघटक पक्षाचे सांप्रतचे ध्येय आहे. आणि ह्या हिंदुराष्ट्राच्या नि हिंदुधर्माच्या परित्राणार्थ नि संस्थापनार्थ आमच्या सनातनी पक्षाचेही अंतःकरण तीळतीळ तुटत असलेच पाहिजे. किंबहुना आम्ही हे स्पष्टपणे सांगण्यासही कचरत नाही, की हिंदुराष्ट्राचे अत्यंत एकनिष्ठ असे अनुयायी त्यांना शक्ती असो वा नसो, युक्ति असो वा नसो, पण हिंदुत्वाचा एकनिष्ठ अभिमान नि हिंदुत्वाच्या विजयाची उत्कट इच्छा ज्यांच्या अंतःकरणात खरीखरी रसरसत आहे असे धर्मबंधू आम्हांस शोधावयाचे तर आम्ही आमच्या वेदशाळा, शास्त्रशाळा नि सनातनमंडळे यांतच प्रथमतः जाऊ. आपण एकाच मायभूमीची लेकरे आहोत, एकाच राष्ट्राचे, एकाच धर्माचे, एकाच संस्कृतीचे आपण संतान आहोत. सनातनी वा संघटक–हिंदुमात्र तितका धर्मबंधू आहे, राष्ट्रबंधू आहे.' (समग्र सावरकर साहित्य खंड–३, पान ४२४)

याचा अर्थ स्वतः सावरकरांची खात्री अशी होती की विज्ञानवादी हिंदुसमाज हाच भारत आधुनिक व समर्थ करील. त्यांनी ही आधुनिकतावादी विचारसरणी त्यांच्या दोन शब्दात दोन संस्कृती आणि यंत्राविषयींच्या विविध निबंधांत मांडली. आता भारत हे जगातील दहावे औद्योगिक राष्ट्र झाले आहे व तंत्रविज्ञानात तो अग्रेसर झाला आहे. उद्योगप्रधान पाश्चात्त्य राष्ट्रांनीही भारताची औद्योगिक प्रगती मान्य केली आहे. पण सावरकरांच्या या निबंधाचा काळ ६० वर्षांपूर्वीचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. गांधी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी यंत्रविरोधी विचार मांडत होते. भारत आधुनिक न होता जुन्या जीवनपद्धतीला पसंत करील, निरक्षर भारत औद्योगिक दृष्टचा मागासलेला राहील अशी भीती त्या वेळी आधुनिक विचारवंतांना वाटत होती. सावरकरही त्यांतलेच एक होते. ऐन तारुण्यात सावरकरांनी पाश्चात्त्य संस्कृतीने यंत्रबळाने व इहवादी, विज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून स्वतःचा कसा उद्धार केला हे पाहिले होते. सावरकरांच्या आधुनिकतावादाची ही पार्श्वभूमी आहे. आजही त्या वेळचे सावरकरांचे विचार महत्त्वाचे आहेत, कारण भारतीय तरुणही आता महत्त्वाकांक्षी, विज्ञानवादी व आधुनिक व्हावयास हवा आहे. त्यासाठी आधुनिकता व विज्ञानवादी दृष्टी ही आधुनिक

प्रगतीची व संस्कृतीची गरज आहे. ती मनाची प्रवृत्ती आहे. सावरकर हिंदूंचे मानसिक आधुनिकीकरण करू पाहत होते. आधुनिक साधने वापरणारे मनही पुराणमतवादी असू शकते याचा अनुभव मुसलमान राष्ट्रांतील परिवर्तन पाहता येतो. म्हणून मानसिक आधुनिकीकरणासाठी सावरकरांचे विचार आजही मननीय ठरतील. सावरकरांनी अद्यतनी पाश्चात्त्य संस्कृतीचा गौरव करताना म्हटले आहे, 'खरोखर, या अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्मग्रंथांनी हजारो वर्षांच्या अडाणीपणास अमर करून ठेवले आहे. यास्तव हिंदुराष्ट्रास ह्या काळाच्या तडाक्यातून वाचवायचे असेल तर ज्या ह्या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या बेडीने कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत ती तोडली पाहिजे. आणि ती सुदैवाने अगदी आणि सर्वस्वी आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण ती बेडी मानसिक आहे. युरोप चार शतकांपूर्वीच धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झालेला होता—आणि त्यापायी आपल्यासारख्याच दुर्गतीस पोचला होता. पण त्याने बायबलास दूर सारून विज्ञानाची कास धरताच, श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची बेडी तोडून अद्ययावत बनताच, अप्–टु–डेट बनताच, युरोप गेल्या चारशे वर्षात आमच्या पुढे चार हजार वर्षे निघून गेला. त्रिखंडविजयी झाला. तसे आमच्या भारतीय राष्ट्रासही होणे असेल, तर 'पुरातनी' युगाचा ग्रंथ मिटून, ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादी शासने गुंडाळून आणि केवळ ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयात सन्मानपूर्वक ठेवून विज्ञानयुगाचं पान उलटले पाहिजे. त्या ग्रंथांचा 'काय काय झालं ?' इतकेच सांगण्यापुरता अधिकार, आज काय योग्य ते सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम विज्ञानाचा.' (स.सा. खंड ३–पान ३६३)

विज्ञानाची दृष्टी देणारे मानसिक आधुनिकीकरण व अद्यतनी मनोवृत्ती यांच्याबरोबरच सावरकरांनी यंत्रयुगाचा निस्संदेह पुरस्कार केला. यंत्राविषयीच्या भारतीय मनात असलेल्या विविध किल्मिषांचे, भीतीचे, संशयाचे निराकरण करण्याचा तो प्रयत्न होता. सावरकरांचे आधुनिकताप्रिय व प्रगतीस उत्सुक मन त्यात दिसते. यंत्र हे युगांतराचे प्रतीक होते. विज्ञानवादी युगाची नांदी या दृष्टीने सावरकर त्याकडे पाहत होते. अर्थशास्त्रीय नवयुगाचा प्रारंभ यंत्रापासून होईल अशी त्यांना आशा होती. औद्योगिक क्रांतीची पायाभरणी करणाऱ्या यंत्राचे महत्त्व सावरकर विशद करून सांगत होते. या दृष्टीने त्या काळी लिहिलेल्या यंत्रविषयक लेखांना सामाजिक व

आर्थिक महत्त्व आहे. यंत्रयुगाने बेकारी वाढेल याला उत्तर देताना अर्थरचनेचा तो दोष आहे हे सावरकरांनी सांगितले आहे. येथेही जगात सुरू असलेल्या शर्यतीत आपले राष्ट्र मागे राहू नये ह्याच उद्देश आहे. आर्थिक मागासलेपणा हा मानसिक मागासलेपणापासून येतो, पुरातनी मानसिक प्रवृत्तीतून येतो हा सावरकरांचा सिद्धांत आहे आणि म्हणूनच आधुनिकतेचे प्रतीक असलेल्या यंत्रांचा सावरकर पुरस्कार करतात.

## यंत्रयुगाची महती

यंत्राविषयीच्या आपल्या निबंधात सावरकर म्हणतात, 'आपला देश आज ज्या युगात प्रवेशू लागला आहे, ते युग युरोपमध्ये दोनशे वर्षांपूर्वी चालू झाले. म्हणजे युरोपच्या दोनशे वर्षे आपण मागे पडलेले आहोत. ह्या युगाचे अर्थशास्त्रीय नाव यंत्रयुग. युरोपमध्ये हे यंत्रयुग दोनशे वर्षांपूर्वी जेव्हा बाष्पशक्तिप्रभृति शोधांमुळे आविर्भवले तेव्हा त्या यंत्रप्रभावाच्या धक्क्यासरशी तिकडेही त्या वेळच्या रूढ विचारांना नि आचारांना चक्कर आल्यासारखे होऊन गेले. मनुष्यजातीवर हे यंत्रयुगाचे भयंकर संकट आले आहे. त्यामुळे मनुष्य माणुसकीसच मुकल्यावाचून राहणार नाही, धर्माचे वाटोळे होणार, मनुष्याचे जीवन यंत्रासारखेच हृदयशून्य, कृत्रिम नि कलाहीन होऊन त्याचे शरीरदेखील दुबळे नि परतंत्र बनणार, फार काय, ज्या आर्थिक संपन्नतेच्या नि सुखसोयींच्या लालसेने मनुष्य यंत्राच्या मागे लागला, ती आर्थिक लालसाही यंत्राच्या चाकात सापडून चूर होईल, या यंत्रामुळे मनुष्य पोटभर खाऊपिऊ न लागता उलटा भिकेस लागेल. अशी एकच कोल्हेकुई त्या वेळच्या पुराणप्रिय स्थितीतील नि धर्मभोळ्या अशा वर्गाने साऱ्या युरोपात चालू केली होती. 'बॅक टु नेचर' हे त्यांचे सूत्र होते. यंत्रामुळे बेकारी वाढते आणि मनुष्य भिकेस लागतो, असे बुद्ढे अर्थशास्त्री ओरडले. 'यंत्र ही सैतानाची युक्ती. देवाच्या थोरवीस कमीपणा आणणारी ही रावणी हाव.' धर्मशास्त्री किंचाळले. (स. सा. भाग–३, पान–३८०).

## देवभोळेपणाच्या ठिकऱ्या

धर्मशास्त्रीय भोळेपणाच्या डोलाऱ्याचे नि देव्हाऱ्याचे एका ठोकरीसरशी ठिकऱ्या ठिकऱ्या उडविण्याचे सामर्थ्य यंत्रात आहे असा त्याचा महिमा सांगून सावरकरांनी विज्ञानाची व्यष्टी, व्याप्ती म्हणजे यंत्र असे त्याचे वर्णन केले आहे. विज्ञानाच्या नियमांची

घनीभूत मूर्ती म्हणजे यंत्र अशी सावरकरांची व्याख्या आहे. विज्ञानाचे एक साधन म्हणून सावरकर यंत्राकडे पाहतात. युरोप आमच्यासारखे देवभोळे व धर्मभोळे होते तोवर ते दुबळेच होते. पण दोनशे वर्षांपूर्वी जसजसा त्यांचा देवभोळेपणा हटत चालला तसतसे त्याचे बळ, संपत्ती वाढत चालली. या ऐतिहासिक घटनेकडे सावरकरांनी आपल्या पुराणप्रिय समाजाचे लक्ष वेधले आहे.

## बुद्धिप्रामाण्यता व इहवादी दृष्टिकोन

सावरकरांच्या सामाजिक विचाराची जातकुळी चार्वाकाची आहे. प्रत्यक्ष चार्वाकमताचा उल्लेख किंवा चर्चा त्यांच्या सामाजिक निबंधात आढळत नाही, पण प्रत्यक्ष हेच प्रमाण, वेद, पुराणे, जैनागम, त्रिपिटिक वगैरे कोणतेही ग्रंथ प्रमाण नाहीत, प्रत्यक्षनिष्ठ अनुभवजन्य, लोकप्रसिद्ध अनुमाने मानायला हरकत नाही. ही जी चार्वाक मताची काही सूत्रे सांगितली आहेत. (प्रा. सदाशिव आठवले—चार्वाक इतिहास व तत्त्वज्ञान पान ९) ती पाहिली व इहलोक आणि केवळ इहलोकच मानणारा, व्यक्तीचे व समाजाचे हित पाहण्यासाठी दंडनीती मानणारा चार्वाक यांचा विचार करता व सावरकरांची बुद्धिवादी सामाजिक मते पाहता त्यांचे विचारकुळ चार्वाक संप्रदायाचेच आहे असे वाटते. उदाहरणार्थ, सावरकरांनी १९३५ साली डॉ. आंबेडकरांच्या संभाव्य धर्मांतरासंबंधी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले होते, 'पाहिजे तर आंबेडकरांनी एखादा बुद्धिवादी संघ काढावा.' या पत्रकात सावरकरांनी या बुद्धिवादी संघाची आधारतत्त्वे कोणती असावीत हे स्पष्ट करताना म्हटले होते, 'आजच्या परिस्थितीत लोकहितास प्रत्यक्ष साधणारे नियम हाच ज्याचा आधार, तर्कनिष्ठ आणि प्रत्यक्षागत तत्त्वज्ञान हीच ज्याची उपनिषदे आणि विज्ञान हीच ज्याची स्मृती असा बुद्धिवादी संघ स्थापावा आणि त्याच्या अनुयायास अंधश्रद्धेच्या आणि भाकडकथेच्या पिंजऱ्यातून सोडून एका झटक्यासरशी अद्ययावत 'अशा बुद्धिस्वातंत्र्याच्या उच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणात सोडावे हेच इष्ट आहे.' (स. सावरकर खंड–३ पान–५७१). याच पत्रकाच्या प्रारंभी धर्म सोडण्यामागची भूमिका बुद्धिवादी असली पाहिजे हे ध्वनित करताना सावरकरांनी म्हटले आहे की ज्यात काही जुनाट आणि आजच्या परिस्थितीत निरर्थक नव्हेत तर अनर्थकही झालेले आचार आणि संकेतही जे असतातच, त्यांना लोकहितासाठी सुधारणे हे ज्यांना

आपलें कर्तव्य वाटते आणि पारलौकिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टींवरही जे प्रत्यक्षनिष्ठ तर्कांच्या पलीकडे जाऊन विश्वासू इच्छित नाहीत, अशा पॉझिटिव्हिस्ट किंवा रॅशनॅलिस्ट प्रभृति बुद्धिवाद्यांनी एखादा धर्म सोडला तर त्याचे कारण सहज ध्यानात येते. त्याअर्थी जर डॉ. आंबेडकर हे हिंदुइझम सोडीत असतील तर त्यात काही मोठेसे दिसत नाही.' याचा ध्वनित अर्थ असा की अशा बुद्धिनिष्ठ भूमिकेत सावरकरांना आक्षेपार्ह असे दिसत नव्हते किंबहुना याच बुद्धिवादाचा किंवा विज्ञाननिष्ठेचा स्वीकार करून त्यांनी हिंदुधर्माची, सामाजिक रूढींची समीक्षा केलेली होती. म्हणून बुद्धिप्रामाण्य व प्रत्यक्षनिष्ठा ही सावरकरांच्या सामाजिक विचाराची महत्त्वाची सूत्रे आहेत.

## ऐहिक व मानवी हिताचा दृष्टिकोन

सावरकरांची सामाजिक दृष्टी इहवादी होती. किंबहुना विश्वाचा विचारही त्यांनी मानवी हिताच्या दृष्टीनेच केलेला आढळेल. 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या त्यांच्या निबंधात जे विचारमंथन आहे त्याचा हाच निष्कर्ष आहे. 'ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ?' यातही त्यांचा राष्ट्रीय इहवादी दृष्टिकोन व्यक्त झालेला आहे. सावरकरांनी म्हटले आहे की 'मनुष्याचे सारे व्यवहार, नीति, रीती, निर्बंध हे त्यास या जगात हितपर आहेत की नाहीत या प्रत्यक्षनिष्ठ कसोटीनेच करविले पाहिजेत, पाळले पाहिजेत, परिवर्तले पाहिजेत.' (स. सा. खंड–३ पान ३१६).

## नीति–अनीतीची मानवी व्याख्या

विश्वातील मानवी व्यवहाराची नैतिक कसोटी मानवी सुख हीच असली पाहिजे हे स्पष्ट करताना सावरकर म्हणतात, 'ती विश्वाची आद्यशक्ती' ज्या काही ठराविक नियमांनी वर्तते आहे ते तिचे नियम समजतील ते समजून घेऊन त्यांतल्या त्यात आपल्या मनुष्यजातीच्या हिताला नि सुखाला पोषक होईल तसा त्यांचा साधेल तितका उपयोग करून घेणे इतकेच मनुष्याच्या हातात आहे. मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल ते चांगले, प्रतिकूल ते वाईट, अशी नीति–अनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे. देवास आवडते ते चांगले आणि मनुष्यास जे सुखदायी ते देवास आवडते ह्या दोन्ही समजुती खुळचट आहेत, कारण त्या असत्य आहेत. विश्वात आपण आहोत, पण विश्व आपले नाही, फार फार थोड्या अंशी ते आपणांस अनुकूल आहे,

फार मोठ्या अंशी आपणांस ते प्रतिकूल आहे– असे नीटपणे, धीटपणे समजावून घेऊन त्याला बेधडकपणे तोंड देणे हीच खरी माणुसकी आहे. आणि विश्वाच्या देवाचीं खरी खरी तीच पूजा.' (स. सावरकर खंड–३ पान–२९७).

## राष्ट्रीय ऐहिकता

हे जसे मानवी व्यवहारासंबंधीचे सावरकरांचे विचार स्पष्ट आहेत तसे ऐहिक हितासंबंधीचे राष्ट्रीय विचार सावरकरांनी सांगितले. भारताच्या आध्यात्मिक परंपरेसंबंधीचा गौरव फारसा त्यांच्या सामाजिक वाङ्मयात आढळत नाही. 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे' या वचनावरच सावरकरांचा विश्वास होता. परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' याची त्यांनी चेष्टाच केली आहे. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाचा काढलेला निष्कर्ष असा, 'ज्यांना ज्यांना आपल्या आपल्या चळवळीत ऐहिक यश हवे, त्याने त्याने आमच्या पक्षास न्याय आहे, आमच्या पक्षास देव आहे, सत्य आहे यास्तव आमचा पक्ष विजयी होणारच अशा वल्गना करण्याचे आणि अंधळ्या निष्ठेंत निश्चिंत राहण्याचे सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादी न लागता 'सामर्थ्य आहे चळ-वळीचे । जो जो करील तयाचे,' इतकेच काय ते खरे मानावे आणि वैज्ञानिक सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा ऐहिक साधनांनी विपक्षा-हून वरचढ होण्याचा यत्न करावा. ऐहिक विजयाचा मार्ग हाच. अन्यायी, परोपद्रवी व्हावे असे नव्हे, तर न्याय झाला तरी तो 'समर्थ' नसेल तर व्यर्थ होय. समर्थ अन्याय त्याच्यावर कुरघोडी केल्यावाचून राहणार नाही. दुर्बल पुण्याईही पंगू होय, हे .विसरू नये. नुसत्या एकशेआठ तर काय, पण अकराशेआठ सत्यनारायणांच्या पूजा केल्या, तरी ऐहिक यश मिळणार नाही. कारण ते चळवळीच्या भौतिक सामर्थ्यावरच काय ते अवलंबते. असत्यनारायणाचे पूजकही ह्या जगात वारंवार यशस्वी होतात. फार काय, सारे जग निर्देव करू निघालेला रशिया आज ऐहिकदृष्ट्या परम बलिष्ठ म्हणून यशस्वी झालेंला आहे की नाही ? 'निर्देव' म्हणून त्यांचे वैभव टिकणार नाही म्हणाल तर ते 'सदेव' अशाही कोणाचे टिकले नाही. श्रीकृष्णाची द्वारका समुद्रात बुडाली, प्रत्यक्ष मदिनेतील मशीद घोडशाळा बनली, 'जेहोवा'चे सुवर्णमंदिर तडकले. जीझसला रोमने फाशी दिले– क्रुसि-फाय केले. 'अस्पृश्यता काढता म्हणून बिहारचा भूकंप झाला' म्हण-

णारा सनातनी समज आणि 'अस्पृश्यता ठेवता म्हणून भूकंप झाला' असे बजविणारा सुधारकी ढोंगीपणा हा जितका खुळचट आहे तितकाच कोटी रामनाम जपाने वा नमाजपढाईने राष्ट्रावरील भौतिक सर्वारिष्ट शांत करू निघालेला भाबडेपणा खुळचट आहे. रामास हराम समजणारेही ऐहिक सामर्थ्यास संपादून वैज्ञानिक बळाने जे ऐहिक यश मिळवू शकतात ते ऐहिक यश ज्यास हवे, त्याने ते अद्ययावत वैज्ञानिक सामर्थ्य संपादावे. चळवळीत ते सामर्थ्य असले तर भगवंताच्या अधिष्ठानावाचून काही अडत नाही. ते सामर्थ्य नसले तर भगवंताच्या अधिष्ठानासाठी कोटी कोटी जप केले तरी ऐहिक यश मिळत नाही, हाच सिद्धांत.' (स. सावरकर खंड– ३ पान–३०६).

सावरकरांच्या हिंदुत्वाची जी ऐहिक बाजू आहे तोच त्यांच्या हिंदुत्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. हिंदू आध्यात्मिकतेचे सावरकरांना आकर्षण नाही. मात्र हिंदूंच्या शौर्याच्या व हौतात्म्याच्या परंपरेचे आहे. सावरकर अध्यात्म नाकारीत नाही, पण तो वैयक्तिक अनुभूतीचा प्रश्न आहे. समाजाची रचना त्याच्यावर होऊ शकत नाही. त्यासाठी उपयुक्ततावादी नीती हवी असे त्यांचे म्हणणे आहे. सावरकरांनी १९३७ साली किर्लोस्करमध्ये लिहिलेल्या लेखात हा मुद्दा स्पष्टपणे आढळतो. त्यांत म्हटले आहे, युरोपियनांना प्रबळ करणारा एकच ग्रंथ कोणता ? बायबल नव्हे. त्याच्या अगदी उलट त्यांनी बायबल मिटले आणि त्यांचे डोळे उघडले. रशियाने तर बायबल फाडूनच टाकले. रशियाने आपल्या समाजसंस्थेचा पाया कोणत्याही धर्मग्रंथावर न रचता विज्ञानग्रंथावर रचला. म्हणून आपण मुसलमानांच्या पोथीनिष्ठतेचे अनुकरण न करता हिंदूंनी त्या विज्ञाननिष्ठतेचेच केले पाहिजे. धर्मग्रंथावर समाजसंस्था उभारण्याचे दिवस गेले. सुदैवाने आपल्या हिंदुदर्शनात कोणत्याही एका धर्मग्रंथाच्या पिंजऱ्यात न अडकण्याची तत्त्वज्ञानबुद्धीची जी स्वतंत्र भरारी आढळून येते तेच आपले भूषण आहे. वेद, गीतोपनिषदादी ग्रंथ पूज्य आहेत, आदरणीय आहेत, तेवढेच पुरे. ते परमप्रमाण नसावेत.

या विज्ञानयुगात समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष ऐहिक नि विज्ञाननिष्ठ अशाच तत्त्वावर केली पाहिजे. तीं वाट चोखाळता इंग्लंड, रशिया, जपान ही राष्ट्रे बलवान झाली तसेच आपले हिंदुराष्ट्रही झाल्यावाचून राहणार नाही. (स. सावरकर खंड-३ पान-६५३).

सावरकरांच्या सामाजिक निबंधात व अन्य ठिकाणी मुसलमानांचे धर्मवेड, धर्मजात मागासलेपणा, हिंदूंचा धर्मभोळेपणा किंवा धर्म-भावनेचे दास्य यांचा धिक्कार आहे, पण धर्म या विषयावर सखोल व सर्वांगीण चर्चा कोठेही केलेली आढळत नाही. पण ते हिंदूंना सांगतात, ' राष्ट्रहितास अत्यंत हानिकारक अशा ज्या ज्या धार्मिक रूढी तुम्हांस व आम्हांस लोकविकृत वाटतात त्यांचा त्यांचा उच्छेद करण्यासाठी झटणे हेच तुमचे वा आमचे राष्ट्रीय कर्तव्य होय – राष्ट्रधर्म होय.' (स. सावरकर–खंड–३, पान–४१०). पण सावरकर आणि गांधीजी यांची रत्नागिरी येथे मार्च १९२७ मध्ये भेट झाली असता जी चर्चा झाली त्यात धर्म हा बुद्धिगम्य विषय नसून भावना-मय असल्याचे गांधीजी म्हणाले होते त्या वेळी सावरकरांनी हिंदु-धर्मासंबंधी आपले मत सांगितले होते. ती त्यांची हिंदू धर्मविषयक भूमिका निश्चितच होती असे मानले पाहिजे. त्या वेळी सावरकर म्हणाले होते, ' हिंदू धर्म आपणा दोघांचा धर्म आहे. या आणि इतर धर्मांत काही महत्त्वाचा फरक आहे. त्या फरकांचा विचार करता हिंदुधर्म हाच सत्य आणि आत्मिक कल्याणाचा श्रेष्ठ मार्ग आहे असे प्रामाणिकपणे वाटले तर त्यास त्या सत्याचा उपदेश आणि प्रचार करण्याचा अधिकार असलाच पाहिजे.' धर्माच्या बुद्धिगम्यतेविषयी सावरकर म्हणाले, ' आपण बुद्धिगम्यतेविषयी म्हणालात ते माझ्या धर्मविषयक विचारांशी जुळत आहे. परंतु धर्माच्या ज्या अंगाविषयी मी बोलतो ते केवळ भावनामय भागाविषयी नसून जो बुद्धिगम्य भाग आहे त्याविषयी होय. माझी धर्ममते मी केवळ बुद्धिगम्य सिद्धांतावर उभारलेली नसून ती इतकी भावनानिरपेक्ष आहेत की आपणही चमकून उठाल. पण तो विषय बाजूला ठेवून इतकेच म्हणतो की हिंदूधर्माचे तत्त्वज्ञान बुद्धिगम्यच आहे आणि हिंदुधर्माचा एक व्यावहारिक धर्म म्हणून भाग आहे त्यास मघा मी हिंदू संस्कृती म्हणून म्हटले. इतर धर्मांचेही असे भाग असून अशाच संस्कृती आहेत. त्या संस्कृतींमध्ये आणि बुद्धिगम्य तत्त्वज्ञानामध्ये हिंदू संस्कृती आणि तत्त्वज्ञानच श्रेष्ठ होय. (वीर सावरकर आणि गांधीजी–लेखक बाळाराव सावरकर पान–२३–२४).

धर्मविज्ञानाच्या दृष्टीने कुराण व बायबल यांचा अभ्यास करून सावरकरांनी डॉ. आंबेडकरांना असे कळविले होते, 'काही झाले तरी बुद्धिवादाच्या दृष्टीने पाहताना एकंदरीत पाहता सर्व धर्मांत ग्राह्य-

तम असेल तर तो हिंदूधर्म होय. (जात्युच्छेदक निबंध पान-२२२). पण हा निष्कर्ष काढताना सावरकरांची दृष्टी चिकित्सक व बुद्धिनिष्ठच होती. धर्माचा अभ्यास करताना ममत्व व आदरबुद्धी बाळगावी असे सावरकरांनी म्हटले आहे. जुलै-ऑगस्ट १९३५ च्या किर्लोस्करमध्ये त्यांनी जे दोन लेख प्रसिद्ध केले होते त्यात त्यांनी दोन मूलतत्त्वे मांडली होती. ती अशी की प्रत्येक धर्मात प्रचलित केलेली धर्ममते ही मानवजातीची मालमत्ता आहे व प्रत्येक धर्ममतात जे जे चिरंतन सत्य असेल ते स्वीकारण्यात मानवाचे हित आहे. जो समाजाची ऐहिक व पारलौकिक धारणा करतो तो धर्म, ही धर्माची व्याख्या सावरकरांनी ग्राह्य मानली आहे. ती सुसंगत व बुद्धिनिष्ठ आहे असे त्यांचे मत आहे. पण सावरकर असाही इशारा देतात की त्या काळी जे सत्य भासले ते विज्ञानाच्या शोधज्योतीच्या झगझगीत प्रकाशात मनुष्यहितास बाधक होत असेल तर त्याचा त्याग केला पाहिजे. तर्कशुद्ध बुद्धिवादाची कसोटी लावणे हे महत्वाचे आहे. याच दृष्टीने पाहता वेद, पुराण, वा बायबल हे ईश्वरप्रणीत ग्रंथ आहेत असे मानता कामा नये, याचे कारण यांतील प्रत्येक ग्रंथ आपण तेवढे ईशप्रेषित म्हणन परमप्रमाण मानतो व बाकी सारे पाखंड आहेत असे त्यांचे म्हणणे असते. हा ग्रंथ ईशनिर्मित मानला तरी त्याचे अर्थ लावणारी पुरुषबुद्धीच असते. आणि हा अर्थ एकसासारखा नसतो. म्हणून बुद्धिस्वातंत्र्य ठेवून या सर्व ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे असे सावरकरांचे म्हणणे आहे. असे असले तरी समाजसंस्थेची पुनर्रचना कोणत्याही धर्मग्रंथाच्या आधारे होऊ नये हे सावरकरांनी स्पष्टपणे सांगितले. ज्या समाजाने ज्या धर्मग्रंथास जखडून घेतले तो ग्रंथ सहस्रावधी वर्षांनी जुना तितक्या सहस्रावधी वर्षांनी तो समाज मागासलेला राहिलाच पाहिजे हा निष्कर्ष सावरकरांनी जून १९३७ मधे किर्लोस्करमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखात काढला आहे (जात्युच्छेदक निबंध, पान ३४५).

सारांश, सावरकरांचा हिंदू धर्मविचार जास्त बुद्धिगम्य आहे. तार्किक दृष्टया ते अध्यात्म मानतात, पण ते प्रामुख्याने अज्ञेयवादीच आहेत.

## अज्ञेयवादाशी साम्य

'अज्ञेयाचे रुद्ध द्वार' नावाची सावरकरांची एक कविता आहे. त्या कवितेचा उल्लेख करून सावरकर एकदा म्हणाले होते, 'शंकरा-

चार्यांच्या 'कस्त्वं वा कुत आयातस्त्वम्' या दोन प्रश्नातच सगळे तात्त्विक प्रश्न आले आहेत. मी अंदमानात होतो त्यावेळी आत्महत्येचे विचार मनात येत. पण लगेच वाटे या आयुष्याचा अंत होणार ही एक कल्पनाच नाही का ? पुन्हा जीवनमरणाचे चक्र चालू राहिले तर आत्महत्येचा काय उपयोग ? म्हणून 'अज्ञेयाचे रुद्ध द्वार' यात मी एक कल्पना मांडली आहे. सगळे लोक इकडे तिकडे भटकून शेवटी आतून बंद असलेला तुझा दरवाजा ठोठावण्यासाठी येतात. शेलेने अशीच उपभोगवादी माणसावर कविता केली आहे. त्यातील नायक सुंदर पत्नी व दारू यांना घेऊन दूर एकटा राहाण्यासाठी जातो पण दारू संपते सुंदर पत्नीच्या सौंदर्याचे आकर्षण कमी होते. तेव्हा माणसाचे आयुष्य हे असे आहे. त्याला शेवटी समाधानीच वृत्ती पत्करावी लागते. ती नसेल तर दुःखच आहे.

असे असताना समाजाची रचना करताना नीतीचा, सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीनेच विचार केला पाहिजे. मी अध्यात्म मानतो. पण समाजाच्या भौतिक जीवनाची आणि अध्यात्माची गल्लत थांबविली पाहिजे. हिंदू धर्म हा नुसता आध्यात्मिक नाही. शांतिस्पुष्टीस्तुष्टी' हा मंत्र त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. इंद्रियांच्या उपभोगांनाही मर्यादा आहेत हे भौतिकवाद्यालाही पटू शकते. मी स्वतः भौतिकवादी आहे. तरीही समाजाला शेवटी तुष्टीवादावरच यावे लागेल असे माझे मत आहे. उपभोगाच्या मर्यादा मी जाणतो. असे असले तरीही मी हिंदूच आहे.' (लेखकाशी 'सावरकर दर्शन' या पुस्तकाच्या वेळी १९५१ साली झालेली चर्चा).

## समाजसुधारणेचा व्यापक व्यास

सावरकरांनी आपल्या सामाजिक विचारात मुख्यतः हिंदूंच्या सामाजिक दोषांची चिकित्सा व चर्चा केली असली तरी भारतीय राष्ट्राचे एक घटक म्हणून मुसलमानांनीही आपले सामाजिक आत्मपरीक्षण करावे व आपल्यातील धर्मवेडेपणा, रूढी, यांचा उच्छेद करावा असे त्यांना सांगितले आहे. याबाबत तुर्कस्तानच्या कमालपाशाचा गुणगौरव त्यांनी केलेला आहे. सावरकर भारतीय मुसलमानांना सांगतात, 'मुसलमानांची धर्मविषयक प्रकृती कशी आहे त्यावर मर्मभेदक प्रकाश पाडणाऱ्या आणि याच चालू महिन्या दोन महिन्यात बाहेर आलेल्या माहितीपैकी अगदी दोनतीनच घटना पहा. मुसलमानांतील धर्मवेडेपणासही विज्ञानाच्या धारेचं पाणी चाखविल्यावाचून

हिंदुस्थानच्या काय किंवा एखाद्या मानवी संस्कृतीच्या काय, प्रगतीस धोका पोचल्यावाचून आणि आजवर त्या आततायीपणाने केली तीहूनही अधिक हानि झाल्यावाचून कशी राहणार नाही.ही आवश्यकता तुम्हा आम्हा मुसलमान नसलेल्यासच नव्हे तर ज्ञानाने नि विज्ञानाने ज्यांचे डोळे उघडले आहेत त्या मुसलमान तुर्कांना का वाटली, जे जे धर्मवेडं रानटीपण आहे त्याची बेडी तोडूनच आपले राष्ट्र अद्यावत विज्ञानाच्या पायावर उभारणे का भाग पडले, असे त्या प्रत्यक्ष खलीफाच्या नि सुलतानाच्या अत्यंत पुढारलेल्या मुसलमानी गाजीस, त्या केमाल आतातुर्कास नि त्याच्या साऱ्या तुर्क राष्ट्रास– ते या फुटकळ घटनांच्या 'क्ष' किरणशलाकांच्या उजेडात पटकन एकदम आले.' (स. सावरकर खंड ३–पान १५८).

'आपल्या हिंदू राष्ट्रातील आजच्या वैज्ञानिक युगात टाकाऊ असणाऱ्या खुळचट रूढी, व्रते, मते ही त्यांनी सोडावी हे वारंवार सांगणे हे जसे आमचे कर्तव्य आहे तसेच हिंदुस्थानी राष्ट्राचे आज अपरिहार्य उपांग असलेल्या मुसलमानी समाजासही आमचे सांगणे हेच की तुमचा समाजही ज्या धर्मवेडाच्या रानटी समजुतींनी नि क्रूर आचारांनी बुजबुजला आहे ते उपद्रवी आचार तुमच्या अहिताचे आहे. एका जुनाट मागासलेल्या संस्कृतीलाच चिकटून बसाल तर विज्ञानाच्या टाचेखाली तुम्हीही निःसंशय चिरडून जाल. मुसलमान अद्यावत बनल्यावाचून त्यांचा स्वतःचा नाश होणार आहे. म्हणून आता विज्ञाननिष्ठ बना.' (समग्र सावरकर खंड ३, पान १६०).

विज्ञान हे धर्मवेडाची नांगी ठेचू शकते, तेव्हा हिंदूंनी मुसलमानांच्या धर्मवेडाचे अनुकरण करू नय हे सांगताना सावरकरांनी पुन्हा भारतीय मुसलमानांना सांगितले आहे, आमची मनापासून अशी इच्छा आहे की हिंदी मुसलमानांनीही पोथीनिष्ठ प्रवृत्ती सोडून विज्ञाननिष्ठ बनावे. देवभोळेपणा व धर्मवेड यांच्या खोड्यातून त्यांची बुद्धी मोकळी व्हावी आणि त्यांचा समाजही शिक्षित, प्रगत आणि अभ्युन्नत व्हावा. त्यांच्या जर ध्यानात येईल की विज्ञान बळापुढे अज्ञानी धर्मवेडाचा टिकाव केव्हाही लागणार नाही, तर तेही तुर्कांचा मार्ग स्वीकारतील आणि आज युरोपियन शक्तीपुढे जी त्यांची धूळदाण उडत आहे ती थांबेल. मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यात हिंदूंचेही कल्याण आहे, हिंदी मुसलमानांचे तर थोर कल्याणच आहे. (स. सावरकर खंड ३, पान ६४८).

## धर्मनिरपेक्ष हिंदुत्वाची संकल्पना

सावरकरांच्या सामाजिक विचाराचा गाभा म्हणजे त्यांची हिंदुत्वाची धर्मनिरपेक्ष संकल्पना. हिंदू कोणाला म्हणावे हा आधुनिक हिंदूसमाज विज्ञानाचा विवाद्य प्रश्न. सावरकरांनी या प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे तो त्यांचा बीजविचार आहे. (याची अधिक चर्चा दुसऱ्या प्रकरणात आहे.)

या हिंदुत्वाच्या संकल्पनेचा उपयोग जातिभेदातीत व पंथनिरपेक्ष असे सामाजिक बंधुत्व निर्माण करण्यासाठी होता हे सावरकरांनी रत्नागिरी जिल्ह्यात सिद्ध केले. पतितपावन मंदीर हे या जातिभेदातीत बंधुत्वाचे प्रतीक झाले. सावरकरांनी रचलेले 'तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधू बंधू' हे हिंदूंचे एकता गीत हिंदु संघटनेच्या चळवळीचे गीत झाले. जातींनी, पंथांनी भंगलेल्या आपल्या हिंदु समाजात हिंदुत्व ही एक एकजिनसी समाज संघटित करण्यास उपयुक्त ठरणारी व्यवहार्य संकल्पना आहे. सावरकर त्या संकल्पनेचे जनक आहेत व तिची सामाजिक उपयुक्तता वादातीत आहे.

तेव्हा हिंदुत्ववादी चळवळीस आवश्यक असलेले सामाजिक बंधुतेचे व एकतेचे तत्त्वज्ञान सावरकरांच्या हिंदुत्वानेच दिले.

## 'हिंदु' शब्द हा महामंत्र

'हिंदु' हा एकीकरणाचा, हिंदु एकतेचा महामंत्र आहे हे स्पष्ट करताना सावरकरांनी म्हटले आहे, 'कोणत्याही राष्ट्रास जितक्या तत्त्व बंधनांनी एकजीव केले नसेल तितक्या रक्तबीज, जाती, भाषा, भूमि प्रभृती स्नेहरज्जूंनी आपले हे हिंदु राष्ट्र एकजीव झालेले असता ते राष्ट्रदेहाचे जुळलेले सांधे नुसत्या वैषम्याच्या कुऱ्हाडीने तोडून तुकडे तुकडे पाडून मुठीमुठींचे भिन्न समाज होऊन आपणा प्रत्येकाचे बळ नि संख्या क्षीण करून घेत आहोत हे तुमच्या कधी ध्यानी येईल? काही झाले तरी आपण हिंदू वीस कोटी आहोतच. त्या आपल्या संख्याबळास अधिकाधिक संघटना बळाने दिवसेंदिवस अधिक बळकट करावयाचे सामर्थ्य कशात असेल तर या एका 'हिंदू' शब्दातच आहे. आर्य, अनार्य, गोंड, वैदिक, जैन, शैव, शाक्त, शीख कोणत्याही एका शब्दात हे आपले समान पितृभू आणि समान पुण्याभू असलेले विशाल राष्ट्र एक करण्याचे सामर्थ्य नाही. ते सामर्थ्य एका हिंदू शब्दात आहे. 'हिंदू' ह्या दोन अक्षरात वीस कोटी लोकांचे राष्ट्र

सामावलेले आहे. आपल्या राष्ट्रीय नि सांस्कृतिक जीवनाचा नि उज्जीवनाचा ' हिंदू' हा एक शब्दच काय तो अनन्य महामंत्र आहे' (केसरी २३ व २६ ऑगस्ट १९४९, समग्र सावरकर खंड ३, पान ७२०).

याच अनुषंगाने ' हिंदू' राष्ट्राचा हिंदी राष्ट्राशी संबंध काय आहे याचे स्पष्ट मार्गदर्शन सावरकरांनी 'स्वराज्यासाठीच संघटन' हवे या श्रद्धानंद मधे २–६–२७ च्या अंकात प्रसिद्ध केलेल्या लेखात केले होते. सावरकर म्हणतात, 'हिंदुस्थानचा हिंदू राष्ट्र हा मुख्य पाया आहे हिंदुस्थानचाच नव्हे तर हिंदी राष्ट्राच्या जीवन गंगचा मुख्य ओघ हिंदु–जाती हा आहे, जसा तुर्कस्तानचा तुर्क आणि अमेरिकेचा अँग्लो–सॅक्सन. मुसलमान, पार्शी इत्यादी आमच्या देशबंधूंच्या सस्कृतांचे ओघ पुढ तिला मिळतात, पण ती त्या जीवनगंगची उपाग आहेत. त्यांच्या मिळण्यापूर्वी आणि ते सुकल्यानंतरही हिंदू जती हीच हिंदुस्थानी राष्ट्रगंगचे मुख्य जीवन होते–आहे–राहील.

(स. सावरकर खंड ३, पान ५९)

## ऐहिक अदभ्युयाचा ध्यास

सारांश, सावरकरांच्या सामाजिक विचारामागे हिंदु समाजाच्या एहिक अभ्युदयाचा व भौतिक विकासाचा ध्यास आहे. लोकमान्य टिळकांच्या काळी राजकारण की समाजकारण असा जो पेच होता तो सावरकरांच्या मनात कधीही नव्हता. अगदी तरुणपणीही सावरकर सुधारकी विचाराचे व मूलगामी भावपिंडाचे होते. तरुण पणी आगरकरांप्रमाणच मिल्ल-स्पेन्सर यांच्या उपयुक्ततावादी नीतींची पकड त्यांच्या मनावर होती. त्यामुळे सावरकरांचे हिंदुत्व हे धर्मनिष्ठ झाले नाही. इहवादी, राष्ट्रीय व विज्ञानवादा, सामाजिक परिवर्तन वादी झाले हिंदु धर्माची आध्यात्मिक बाजू त्यांनी अभ्यासली पण मनाचा कल भौतिकवादी व विज्ञाननिष्ठच होता. त्यामुळ सावरकरांनी राज्यक्रांती व समाजक्रांती या संकल्पनांचा संगम आपल्या तत्त्वज्ञानात केला. सावरकरांनी केलेली सामाजिक समीक्षा या त्यांच्या निश्चित सामाजिक तत्त्वज्ञानावर उभी आहे. त्यामुळे सावरकरवाद असे जरी म्हणण्यात येत असले तरी सावरकर हा एक रूढ भंजनाचा, विज्ञान-निष्ठ समाजरचनेचा आधुनिक दृष्टीकोन होता. त्याला राष्ट्रीयत्वाचे अंग होते. १९५२ साली सावरकर रत्नागिरीला गेले होते. त्या-

वेळीही त्यांनी एकजिनसी समाज निर्माण करणे हे आपले आता ध्येय असले पाहिजे असेच सांगितले. अशा एकात्म, विज्ञाननिष्ठ हिंदू समाजासाठी आधुनिक व राष्ट्रनिष्ठ दृष्टी सावरकरांनी दिली हेच त्यांचे कार्य आहे. अशा सामाजिक पुनर्रचनेसाठी लागणारे सर्वांगीण तत्त्वज्ञान सावरकरांनी दिलेले नाही हेही तितकेच खरे आहे. पण प्रत्येक पिढीचे प्रश्न वेगळे असतात. ह्या पिढीने जुन्या पिढीस कृतज्ञ राहून आपले प्रश्न सोडविण्यासाठी विचार करावा असे सावरकरांचे म्हणणे असे. पण ते करण्यापूर्वीही सावरकरांच्या सामाजिक दृष्टीकोनाचा व सिद्धांताचा तपशीलवार अभ्यास आवश्यक आहे. ◻

# २. पुरोगामी हिंदुत्वाचे तत्त्वचिंतक

सावरकर अंदमानातून सुटले तेव्हापासून त्यांच्या आयुष्यातील हिंदुप्रबोधनाचा व हिंदुसंघटक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा कालखंड सुरू झाला. सशस्त्र क्रांतिकारक व स्वातंत्र्यवीर ही त्यांची भूमिका परिस्थितीच्या व राजकीय बंधनामुळे गौण झाली आणि हिंदुत्वाचा नवा अंकुर दिसू लागला. सावरकरांनी 'माझ्या अ ठवणीत' त्या काळच्या क्रांतिकारकांच्या मनोवृत्तीविषयी म्हटले आहे, 'स्वातंत्र्य मिळाल्यावाचून राष्ट्राची इतर कोणत्याही दिशेने खरी उन्नती होणे हे हातपाय बांधून टाकलेल्या व्यक्तीची प्रगती ती बंधने तोडल्यावाचून जसे दुर्घट तसे होय, हे लोकमान्य टिळकांचे म्हणणे सर्वथैव सत्य मानीत असूनही आम्ही त्यांतल्या त्यात शक्य ती औद्योगिक नि सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीलाही उपकारक आहे हे आगरकर प्रभृतींचे म्हणणेही अनुवादू राजकारणात टिळक, चिपळूणकर हे आमचे गुरू, समाजकारणात रानड-आगरकर आमचे गुरू. त्या उभयतांचा यथाशक्य समन्वय हे आमचे धोरण. म्हणून त्या काळी राष्ट्रीय प्रगतीस अडविणाऱ्या रूढींचे उच्छेद, विधवाविवाह, वेदोक्त स्वातंत्र्य, स्त्री-शिक्षण, विटाळवेडाचा नायनाट, परदेशगमनस्वातंत्र्य, धार्मिक अवडंबरांचे उच्चाटन प्रभृती सुधारणांचे आम्ही सक्रिय पक्षपाती होतो. ह्या आणि अशाच अंध रूढीभंगाच्या विषयावर संस्थेत अनेकदा कडाक्याचे वाद होत आणि त्याचा बुद्धिपूर्वक निर्णय सुधारणास अनुकूल असाच होई. (समग्र सावरकर खंड–१ पान–२५९–२६०) सारांश, समाजसुधारक सावरकरांची मानसिक घडण १९०४ ते १९१० या काळातच झाली होती.

अंदमानमध्ये गेल्यावर हिंदुत्वाचा विचार सुरू झाला. याचे मुख्य किंवा तत्कालिक कारण मुसलमान बंदिवानांचे हिंदूंना बाटविण्याचे चाललेले प्रयत्न. सावरकरांनी 'माझी जन्मठेप' मध्ये ह्या सर्व इतिहास दिला आहे. याची चर्चा पुढे शुद्धीविषयीच्या प्रकरणात केली आहे.

पण येथे त्यांनी काढलेला निष्कर्ष सांगणे उपयुक्त ठरेल. सावरकर म्हणतात, 'हिंदुसंघटन व शुद्धी ही हिंदुमुसलमानांच्या शाश्वत विरोधाची नव्हेत तर शाश्वत एकीची महत्त्वाची साधने आहेत. ह्याच दृष्टीने आम्ही अंदमानात असताना त्यांचा अंगीकार केला होता. १९१३ व्या वर्षी आम्ही शुद्धिकार्यात पहिले भांडण हाती घेतले. तेव्हापासून १९२०–२१ वर्षापर्यंत अंदमानात, नंतर हिंदुस्थानच्या तुरुंगात आणि १९२४ वर्षी सुटकेनंतर आजपर्यंत संघटनाच्या आणि शुद्धीच्या कार्यात ह्याच न्याय्य आकांक्षेने आम्ही झटत आहोत. (समग्र सावरकर खंड १ पान–५११).

तेव्हा समाजसुधारणा, हिंदुसंघटन व शुद्धी ही कार्यक्षेत्रे व विचारप्रतिपादनाचे विषय हे सावरकरांनी १९२४ मध्ये हाती घतले. त्याची मुळ पूर्वीपासून होती हे आपण पाहिले. म्हणज १९०८ चे सावरकर वेगळ आणि १९२४ चे हिंदुसंघटनवादी सावरकर वेगळे हा विचार त्यांच्या भूतकाळास धरून नव्हता. सावरकर-विचार हा एकात्म होता. फक्त त्याचे प्रकटीकरण परिस्थितीनुसार कमीजास्त झाले एवढेच. पण हिंदू समाजाचे पुनर्घटन, संघटन व राजकीय स्वातंत्र्य या त्यांच्या संकल्पना परस्पर संलग्न होत्या (व आहेत) ही सावरकरांची पक्की धारणा होती. त्यातूनच त्यांचा हिंदुत्वविचार जन्मला आहे.

सावरकर १९२४ साली सुटले तेव्हा आणि अजूनही हिंदुत्वापुढे तीन समस्या होत्या व आहेत. पहिली हिंदुत्वाची व्याख्या करणे, दुसरी ज्याला सावरकर भ्रांत राष्ट्रीयत्व म्हणत त्याचे समाजमानसातून उच्चाटन करून राष्ट्रीय हिंदुत्वाची पुन:स्थापना करणे व तिसरी हिंदुसमाजाच्या पुनर्रचनेचे मार्गदर्शक सिद्धांत निश्चित करून त्याला आधुनिक बनविणे. यांपैकी दुसऱ्या समस्येशी राजकारणाचा संबंध येतो आणि राजकारणात भाग न घेण्याचे बंधन त्या वेळी सावरकरांवर असल्याने सावरकरांनी याबाबत प्रत्यक्ष कार्य केले नाही. अप्रत्यक्ष हिंदुविचारप्रवर्तन केले. शुद्धी व संघटनेची चळवळ हा त्याचाच एक भाग होता.

## सावरकरांची हिंदुत्वाची व्याख्या

सावरकरांनी हिंदुत्वाच्या व्याख्येसंबंधी १९५० मध्ये भाषण करताना म्हटले होते की, 'सर्व पंथांना एकत्र करून आचार-विचारभेद न मानता ह्या भूमीला पितृभू व पुण्यभू मानणारे ते हिंदू' अशीच

३१।३२

माझी बौद्धिक व्याख्या आहे. माझ्या बौद्धिक व्याख्येहून हिंदुत्वाची श्रेष्ठ व्याख्या दुसरी नाही. रक्तात सापडते ती भावना हीच खरी व्याख्या. हिंदुत्व मानीत नसला तरीही ती येतेच. जीवनापेक्षाही या भावनेवर आमचे प्रेम आहे.' (क्रांतिघोष-वि. दा. सावरकर, पान ३८–३९).

पण सावरकरांनी १९२३ साली 'हिंदुत्व' या आपल्या प्रबंधात हिंदूंची व्याख्या केली व तिचाच पुढे प्रचार केला. हिंदुसभेने ती स्वीकारली. ही व्याख्या जितकी ऐतिहासिक तितकीच आजच्या वस्तु-स्थितीला धरून आहे.

'हिंदू म्हणजे काय ? हा प्रश्न अनेक वेळा उपस्थित झाला आहे. त्याची व्याख्या करण्याचेही अनेक प्रयत्न झाले. प्रत्येक व्याख्या ही तर्कशास्त्राच्या तंत्रात बसत नसे. वैदिक धर्म मानणारा तो हिंदू असे म्हटले तर अवैदिक अहिंदू ठरतात. हिंसेने दुःख होते तो हिंदू म्हटले तर हिंसेवर विश्वास ठेवणारे हिंदू ठरत नाहीत, अध्यात्म मानणारा तो हिंदु असे म्हटलें की अध्यात्मवाद न मानणारे त्यांतून गळतात,– तेव्हा हिंदुत्वाची व्याख्या हा एक कूट प्रश्न होऊन राहिला होता. हिंदु धर्मात अनेक पंथ असल्यामुळे त्या धर्माची व्याख्या जशी कठीण झाली तशीच हिंदु समाजाची विकसनाची पद्धती अनेक जातींचे सांस्कृतिक ऐक्य घडवून आणण्याची असल्यामुळे त्याची व्याख्या करणे कठीण होऊन बसले आहे. पण तरीही हिंदू शब्दाला अर्थ आहे. एखाद्या शब्दाचे,-नि तो शब्द ज्या वस्तूला लावला जातो त्याचे-साहचर्य वाढत जाते तसतसा तो शब्द ही एक सजीव कल्पना होऊ लागतो, आणि तो शब्द उच्चारताच ती कल्पना पुढे येते. जसे एखादी महान् व्यक्ती गेली तरी तिचे गुण लक्षात येतात,–बुद्ध गेला तरी बुद्ध म्हटला की एक गुणसमुच्चय डोळ्यापुढे येतो,–तसेंच हिंदु या शब्दाचे आहे. हे या शब्दाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सावरकरांनी 'हिंदुत्व' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या अनेक वर्षांच्या विचारमंथनातून निघालेला तो बीजविचार आहे. सावरकरांची व्याख्या अशी:

(आसिंधुसिंधु भारत देश ही ज्याची पितृभूमि, नि पुण्यभू आहे तो हिंदु.) आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारत भूमिका पितृभू पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः !

यांतील पितृभू नि पुण्यभू या शब्दांचा कोणत्याही व्याख्येत योज-लेल्या शब्दांना असतो तसा, थोडासा पारिभाषिक अर्थ आहे. पितृभू

म्हणजे जीत आपले आईबाप तेवढेच निपजले ती, असा अर्थ नव्हे, तर प्राचीन कालापासून ज्या भूमीत परंपरेने आपले जातीय नि राष्ट्रीय पूर्वज निवसत आले ती, असा अर्थ आहे. आजच्या हिंदूंनी साऱ्या पृथ्वीवर जरी उद्या वसाहती स्थापल्या तरी त्यांच्या प्राचीन व परंपरागत, जातीय नि राष्ट्रीय पूर्वजांची पितृभू अशी ही भारतभूमीच असणार. पुण्यभूचा अर्थ इंग्लिश होली लॅन्ड ह्या शब्दांतील अर्थ होय. ज्या भूमीत एखाद्या धर्माचा संस्थापक, ऋषी, अवतार वा प्रेषित (पैगंबर) प्रकटला, त्या धर्मास उपदेशिता झाला, त्याच्या निवासाने त्या धर्मक्षेत्राचे पुण्यत्व ती त्या धर्माची पुण्यभू अशा अर्थाने हा पुण्यभू शब्द वापरलेला आहे, नुसता पवित्र भूमी या अर्थी 'नव्हे.'

हिंदुत्वाची ही व्याख्या जितकी ऐतिहासिक तितकीच आजच्या वस्तुस्थितीला अगदी धरून आहे. ती जितकी सत्य तितकीच इष्ट आहे, जितकी व्यापक तितकीच व्यावर्तकही आहे. या व्याख्यांप्रमाणे वैदिक, जैन, शीख, आर्यसमाजी, भारतीय बौद्ध हे सर्व पंथ हिंदूच ठरतात. पण मुसलमान–ख्रिस्ती–ज्यू यांच्यापैकी कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमी ही भारतभूमीच असली, तथापि त्यांचे धर्म अरबस्थान, पालेस्टाइन प्रभृति भारतबाह्य देशात उपजल्यामुळे ते त्या भारतबाह्य देशांनाच आपली पुण्यभू मानणार.ही भूमी त्यांची पुण्यभू नाही. म्हणून ते हिंदू नाहीत. तसेच चिनी, जपानी, सयामी प्रभृतीही धर्माने जरी हिंदू (बौद्ध) असले, म्हणजे भारतभूमी ही जरी त्यांची पुण्यभू असली तरी भारतभूमी ही त्यांची पितृभू नाही. त्यांचे आमचे धर्माचे नाते, ते हिंदू राष्ट्राचे अंगभूत राहणार नाहीत. शुद्धीकृतांचा प्रश्नही या व्याख्येने तसाच सोडविला जातो. जे भारतीय पूर्वी हिंदू होते ते शुद्ध होताच पूर्णपणे हिंदुत्वाचे अधिकारी बनतात. परंतु अमेरिकन, इंग्लिश प्रभृति परराष्ट्रीय हिंदुधर्म स्वीकारताच धर्माने ते हिंदू होतील, पण राष्ट्रीय दृष्ट्या निराळे राहणारे असल्यामुळे ते संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होणार नाहीत. कारण त्यांची पुण्यभू भारत झाली तर पितृभू दुसरीच असणार. त्यांच्यापैकी जे कोणी शरीरसंबंधाने आमच्यांशी विवाहबद्ध होतील, म्हणजेच वंश, जाती, राष्ट्र या दृष्टीने आमच्यांत रक्तबीजांनी एकवटून जातील, किंवा हिंदुस्थानचे नागरिकत्व संपादून त्याला पितृभू मानतील ते मात्र पूर्णपणे हिंदुत्वाचे अधिकारी होतील. साऱ्या जगभर हिंदुधर्माचा प्रसार करण्यास ही व्याख्या कोणतीही आडकाठी आणीत

नाही.

सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या या व्याख्येत ऐतिहासिक, तार्किक दृष्टचा दोष नाहीत हे तिचे वैशिष्टय आहे. त्यामुळे अति-व्याप्ती व अव्याप्ती हे व्याख्येत आढळणारे दोष यात नाहीत; उलट आजच्या हिंदू समाजाच्या बहुरंगी स्वरूपाला सामावून घेणारी अशी ती यथायोग्य व्याख्या आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी त्या व्याख्येला अत्यंत सावधगिरीने व काळजीपूर्वक केलेली व्याख्या–असे आपल्या पाकिस्तानवरील ग्रंथात म्हटले आहे (पृष्ठ १३०) यात हिंदुत्वाला सावरकरांनी हिंदुधर्मापासून मुक्त केले असल्यामुळे ती व्याख्या धर्म-निष्ठ झालेली नाही. त्यामुळे संदिग्धता व वस्तुस्थितीशी विसंगती या दोन्ही दोषांपासून ती मुक्त झाली आहे. पण या व्याख्येत हिंदू धर्मापासून हिंदुत्वाला वेगळे करण्याचा केलेला प्रयत्न विवाद्य आहे. कारण 'पुण्यभू' हा या व्याख्येतील शब्द धर्माशी निगडित आहे. त्यामुळे ती व्याख्या धर्माशी संबंध असलेलीच होते. आणि याच व्याख्येवर जर हिंदू राष्ट्रवाद आधारला तर त्यालाही धार्मिक स्वरूप येते. हा आक्षेप सोडला तर सावरकरांची ही व्याख्या बरीचशी वस्तु-स्थितीशी मिळणारी व हिंदुत्वाच्या विकासाला अडथळा न आणणारी आहे.

## हिंदू हे राष्ट्र आहेत

सावरकरांनी या हिंदुत्वाच्या व्याख्येच्या अनुषंगानेच राष्ट्रवादाच्या सर्व आवश्यक घटकांचा विचार करून हिंदू हे राष्ट्र आहेत हा आपला सिद्धांत मांडला आहे. 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या करण्याचे प्रयत्न पाश्चात्त्य राज्यशास्त्रज्ञांनी केले आहेत, पण त्यात त्यांना यश आलेले नाही. किंबहुना राष्ट्र ही भावना मानवी भावनांशी निगडित असल्या-मुळे तिची व्याख्या करणे म्हणजे मानवाच्या संस्कारक्षम अंतःकर-णाच्या मर्यादा ठरवून टाकणे आहे. राष्ट्रत्वाच्या भावनेचा विकास हा एखाद्या सरळ रेषेप्रमाणे होत नाही किंवा त्याची निर्मितीही एखाद्या संस्थेप्रमाणे करता येत नाही. ऐतिहासिक काळात निर्माण झालेल्या समान परंपरा एका क्षणात निर्माण होत नाहीत.म्हणून मनुष्य नागरि-कत्व बदलू शकतो, राष्ट्रीयत्व नाही. अंगावरील कपडयाप्रमाणे ही परंपरा झटकताही येत नाही, आणि मनाला वाटेल तेव्हा ती निर्मा-णही करता येत नाही. तेव्हा राष्ट्रत्वाची एखादी मुद्देसूद व्याख्या करून त्याप्रमाणे जगातील समाजाचे राष्ट्रत्व ठरविणे कठीण आहे. कारण

राष्ट्रत्वाची निर्मिती व विकास अनेक कारणांमुळ झालेला आढळतो. कोठे भाषा, कोठे प्रदेश, कोठे समान संकट, कोठे धर्म, आणि कोठे समान शत्रूविरुद्ध द्वेषही. या विविध प्रकारांनी राष्ट्रत्व निर्माण झाले आहे. आणि त्याची निर्मिती कोणत्याही कारणामुळे झालेली असली तरी त्याचा विकासही तितकाच अनियमित दिशांनी झाला आहे. त्यामुळेच राष्ट्रत्वाची व्याख्या ठरवून त्याप्रमाणे राष्ट्रीयत्वाचा विचार करणे म्हणजे वाहत्या प्रवाहाला फळीने अडविण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

एकराष्ट्रत्व निर्माण व्हावयाचे तर परंपरा, हित व ध्येयवाद या तीन गोष्टी आवश्यक असतात.परंपरा ही राष्ट्राला भूतकाळाशी जोडते, समानहितत्व वर्तमानकाळाचा विसर पडू देत नाही, आणि ध्येयवाद हा भविष्यकाळात घेऊन जातो. सावरकरांचा राष्ट्रवाद या तिन्ही गोष्टी विचारात घेतो, म्हणूनच तो केवळ स्वप्नाळू झाला नाही. हिंदू राष्ट्रवादाचा विचार याच दृष्टीने केला पाहिजे.

(सावरकर दर्शन, भा. कृ. केळकर, पाने १८२–१८८)

## परधर्मीयांचा तिरस्कार नाही

'हिंदू' हे राष्ट्र मानणारे सावरकर धर्मप्रसाराचे लोकशाहीत अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य धार्मिक अल्पसंख्याकांना नाकारतात काय? त्यांचा तिरस्कार किंवा द्वेष करतात? हिंदी राष्ट्रवादाबद्दल त्यांचे नेमके काय मत आहे ? हिंदू दृष्टिकोणातून सावरकर इतिहासाकडे पाहतात तेव्हा त्या इतिहासाविषयी त्यांची विचारसरणी काय ? सावरकरांचा राष्ट्रवाद व त्यांचे हिंदुत्वाचे राजकारण हे स्वतंत्र चर्चेचे विषय आहेत. पण येथे हिंदुत्वाच्या सावरकरी संकल्पनेशी निगडित अशा वर उपस्थित केलेल्या तीन प्रश्नांसंबंधी सावरकरांचे नेमके विचार काय आहेत?

धार्मिक अल्पसंख्याकांविषयीचे आपले विचार ठिकठिकाणी वा वेगवेगळ्या प्रसंगी सावरकरांनी मांडले आहेत, परंतु शुद्धीकरणासंबंधी 'माझी जन्मठेप' मध्ये जे विवेचन आहे तेथे सावरकर म्हणतात, आपापल्याला जो धर्म सत्य वाटतो त्याचा प्रचार बुद्धिवादाने करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मुसलमानांतील प्रचारकांचा दोष म्हणजे हा की ते हा प्रचार गुंडगिरी, घातपात, नीचता, कत्तली, बलात्कार अशा राक्षसी साधनांनीही करावयास कधी कचरत नाहीत,...मुसलमान बंधूंचा, ख्रिश्चन बंधूंचा किंवा मनुष्य जातीतील

कोणत्याही रानटीतल्या रानटी जातीचादेखील आम्ही द्वेष करीत नाही. त्यातील ज्या व्यक्तींची, व्यक्तीसंघाची अत्याचारी प्रवृत्ती दृष्टीस पडते तिचा त्या प्रवृत्तीपुरता प्रतिरोध करतो. कारण आमची अशी आशा आहे की या शुद्धीच्या रूढीनेच हिंदु-मुसलमानांच्या शाश्वत आणि लाभदायक ऐक्यास साहाय्य मिळणारे आहे. (समग्र सावरकर खंड-१, पान ५१०-५११).

'स्वराज्यासाठी संघटन हवे' या लेखात सावरकर म्हणतात, मुसलमानहो, एकी हवी असेल, तुम्हांस हवी असेल तर या. स्वत्व-रक्षण ज्यात होऊ शकेल-तुमचे आणि आमचे दोघांचेही-त्या स्वराज्यास स्थापूया आणि एकी करू या. (श्रद्धानंद-५ मे १९४७ हिंदुत्वाचे पंचप्राण पान- ६७).

सावरकर 'हिंदुत्व' या आपल्या प्रबंधात म्हणतात, 'कदाचित पुढे मागे हिंदू म्हणजे हिंदुस्थानचा केवळ नागरिक आणि अन्य कोणीही नाही अशाप्रकारची गोष्ट घडून येणार नाही असे नाही. परंतु तो दिवस तेव्हाच उगवेल की जेव्हा आक्रमक आणि स्वार्थी अशा प्रभुत्व वृत्तीचे हात बळकट करणारे जातीय आणि सांस्कृतिक दुरभिमान गळून जातील आणि सारे धर्म हे जेव्हा आपला संकुचितपणा सोडून देऊन विश्वाच्या बुडाशी असलेल्या सनातन तथ्यांच्या विचारांचे सर्वांचे असे एक जागतिक पीठ निर्माण करतील. आणि हे सारे मानवकुटुंब एकाच शासनाखाली वैभवाने नांदावयास पाहिजे असेल तर असल्याच प्रकारच्या भेदाभेदशून्य भक्कम पायाची आवश्यकता आहे. परंतु इतक्या सोत्कंठ आतुरतेने अपेक्षिलेल्या त्या परमोच्च विकासाचा एकही किरण अद्याप क्षितिजावरसुद्धा दिसत नाही तो-पर्यंत कठोर सत्य परिस्थितीकडे डोळेझाक करणे मूर्खपणाचे ठरेल.' (हिंदुत्व-मराठी अनुवाद-पटवर्धन-पान ८०).

सावरकरांच्या 'हिंदूत्व' संकल्पनेत धार्मिक संकुचितपणा नाही. ती विश्वात्मक ऐक्याकडे जाऊ इच्छिणारी, प्रसरणशील कल्पना आहे आणि धार्मिक अल्पसंख्याकांनी आपले सांप्रदायिक व सांस्कृतिक दुर-भिमान सोडले तर हिंदुत्वाची सर्वसमावेशक कल्पना व्यवहारात येऊ शकेल हाच सावरकरांच्या विवेचनाचा अर्थ आहे.

## हिंदी राष्ट्रवाद आणि सावरकर

सावरकरांच्या हिंदुत्वाला किंवा हिंदू राष्ट्रवादाला भारतीय राज-कारणात ब्रिटिश राजवटीबरोबर आलेली हिंदी राष्ट्रवादाची कल्पना

मान्य आहे काय ? सावरकरांनी हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून १९३७ मध्ये अहमदाबाद (कर्णावती) येथे जे भाषण केले त्यात आणि 'पूर्वपीठिका' म्हणून त्यांच्या आत्मचरित्राचा जो भाग आहे त्यातील हिंदी राष्ट्रवादासंबंधीचे उल्लेख या दृष्टीने पाहू यासारखे आहेत. सावरकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते, 'हिंदु राष्ट्र हे संयुक्त हिंदी राष्ट्राच्या शक्यतेचा मार्ग बंद करण्याचा विचार स्वतःच्या हिताकडे पाहूनच कधीही मनात आणीत नाही. मात्र ते संयुक्त हिंदी राष्ट्र व न्यायाच्या आणि समानतेच्या पायावरच उभारले असले पाहिजे. हिंदू समाज देशात प्रचंड प्रमाणात बहुसंख्य असताही स्वतःसाठी कोणतेही विशेष अधिकार अथवा स्वतंत्र सवलत मागण्याचा आपला अधिकारही सोडून देईल.' लोकशाही रिवाजानुसार हिंदी राज्य निर्माण होत असेल तर हिंदुसंघटनवादी आपली निष्ठा त्या राज्याला प्रथम अर्पितील असेही सावरकरांनी त्या वेळी सांगितले. मतभद झाला तो काँग्रेसने अल्पसंख्याकांच्या मनधरणीचे धोरण स्वीकारले म्हणून. पुढे सावरकरांनी जेव्हा आपल्या आत्मचरित्राची पूर्वपीठिका लिहावयास सुरुवात केली तेव्हा पाकिस्तान स्थापन झाले होते. त्या निमित्ताने काँग्रेसच्या जन्मानंतरचा इतिहास अभ्यासताना सावरकरांना आढळले की काँग्रेसच्या हिंदू पुढाऱ्यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसच्या हिंदी राष्ट्रैक्याच्या पायाभरणीतच मुस्लीम पायधरणीचा कालध्वम (टाइम बॉंब) अजाणतेपणे ठेवून दिला. काँग्रेसी हिंदू पुढाऱ्यांनी मुसलमानांना काय सांगावयास हवे होते हे सावरकरांनी सांगितले आहे. ते म्हणतात, 'अखंड भारत हा आमचा देश, तेच आमचे राष्ट्र. त्यातील सर्व नागरिकांना जाति-धर्म-प्रांत निर्विशेषपणे ह्या भारतीय राष्ट्रसभेत, ह्या इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये येण्याचा अधिकार आहे. मग तो धर्माने हिंदू आहे की मुसलमान की पार्शी की ख्रिश्चन अशी विचारणा करणेसुद्धा ह्या आमच्या काँग्रेसच्या मूलभूत प्रतिज्ञेविरुद्ध आहे. काँग्रेसमध्ये जे हिंदू, हिंदू आहेत असे तुम्ही म्हणता तोसुद्धा आमच्या दृष्टीने वदतोव्याघात आहे. कारण काही ब्रिटिश नागरिक सोडता काँग्रेसमध्ये ज हिंदी लोक आहेत ते हिंदी आहेत. 'इंडियन' आहेत इतकेच आम्ही जाणतो. ज्याला न्याय्य धर्मस्वातंत्र्य देण्यापलीकडे या भारतीय राष्ट्रसभेचा धर्माशी काहीही संबंध नाही. काँग्रेसने मुसलमानासंबंधी कोणती भूमिका घ्यावयास हवी होती असे सावरकर म्हणतात तोच

खरा निधर्मी राष्ट्रवाद होता. सावरकरांना तो मान्य होता. असाच या उताऱ्याचा अर्थ आहे. पुढे काय झाले हे आता सर्वांना आहे. हिंदुत्ववादी सावरकर हे विचार मांडतात हे येथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

## इतिहासाचा हिंदू दृष्टीकोणातून मागोवा

सावरकरांनी आपला हिंदुत्ववाद सिद्ध करण्यासाठी इतिहासाचा त्या दृष्टीने अभ्यास करून तो लोकापुढे पुन्हा मांडला. भारतीय इतिहासाचे विश्लेषण वा अभ्यास मार्क्सवादी सिद्धांतानुसार करणे हे पुरोगामीपणाचे लक्षण मानले जाते. इतिहासाचे हे वर्गनिष्ठ विश्लेषण इतिहासकालीन घटनांवर वेगळा प्रकाश टाकते हे खरे. पण मार्क्सवाद हे एक विचारपीठ आहे. ते निर्णायक सत्य नव्हे. ती एक इतिहासमीमांसा आहे एवढेच. स्वतः सावरकरांनी हिंदुत्ववादाच्या दृष्टिकोणातून इतिहासाची मांडणी केली. तीही एक इतिहासमीमांसा समजणे योग्य ठरेल. सावरकरांनी 'हिंदु संघटकांनी आपल्या राष्ट्राचा इतिहास कसा लिहावा नि वाचावा' हा लेख लिहिला होता. (समग्र सावरकर, खंड २, पान ४२७-४३६) त्यांत त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे, 'इतिहासाच लिहावयाचा तर तो अगदी इति-ह-आस असाच लिहावा. त्याचे वर्तमानकाळावर काय परिणाम होतील ह्याची तो इतिहास लिहिते वेळी त्याने मुळीच चिंता बाळगू नये ऐतिहासिक संशोधनाने अद्ययावत म्हणून ठरलेली त्या त्या कालखंडाची माहिती अगदी सत्य तशीच लिहावी.' सावरकरांच्या इतिहासलेखनात ज्या उणीवा व चुका असतील ते दाखविण्याचा नव्या संशोधकांना अधिकार आहे. पण या देशाचा इतिहास हिंदु दृष्टीकोणातून लिहिणे हे कल्पनानिष्ठ लेखन असू शकत नाही. 'हिंदूंचा इतिहास हा पराभवाचा इतिहास आहे.' असे डॉ. आंबेडकरांनी म्हणताच हिंदूंच्या इतिहासातील विजयाच्या घटना एका लेखात लगेच सावरकरांनी लोकांपुढ मांडल्या. डॉ. आंबेडकरांचे हे विधान इतिहाससिद्ध नाही हे सांगितले. पण सावरकरांची इतिहासदृष्टी केवळ हिंदुगौरवांची नाही. रूढींमुळे हिंदू समाजाचे कसे नुकसान झाले हेही त्यांनी अत्यंत भेदक शब्दांत सांगितले आहे. त्यांनी सांगितलेला मलबारमधील मोपल्यांचा सामाजिक इतिहास हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. भक्तिचळवळीमुळे भगवंताचे अधिष्ठान मराठ्यांना मिळाले याचाही प्रतिवाद सावरकरांनी केला आहे. सावरकरांच्या इतिहासमीमांसे-

विषयीं तपशिलाचे मतभेद होऊ शकतात. पण हिंदुत्ववादी इतिहासमीमांसा ही त्यांनी सुरू केली हे महत्त्वाचे आहे. त्यातील अनैतिहासिकता कल्पनारम्यता किंवा सत्य दडपण्याची उदाहरणे शुद्ध इतिहासवादी दृष्टीने तपासली पाहिजेत. असे कोणी केले तर त्याचे स्वागतच करावयास हवे.

सारांश, सावरकरांच्या हिंदुत्वविचारात हिंदुत्वाची निधर्मी व्याख्या, त्यांचे हिंदी राष्ट्रवादासंबंधीचे विचार व हिंदुत्ववादी इतिहासमीमांसा हे तीन महत्त्वाचे घटक आहेत.

## हिंदुत्वाची पुनर्घटना

सावरकरांची तिसरी समस्या हिंदू समाजाला सामाजिक पुनर्रचनेची मार्गदर्शक तत्त्वे सांगण्याची होती. भारताची समाजसुधारणा धर्मनिष्ठ होती. भारतात धर्म हे सामाजिक अनुशासनाचे माध्यम असल्याने हिंदुधर्मपरंपरेत सुधारणा झाली तर समाजसुधारणा होईल या कल्पनेने एकोणिसाव्या शतकात धर्मसुधारणेस किंवा समाजसुधारणेस शास्त्राधार शोधण्याचे प्रयत्न झाले. ब्राह्मो समाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे चळवळी झाल्या. त्यांचे स्वतंत्रपंथ संप्रदाय झाले पण संपूर्ण हिंदुसमाजाच्या मानसिक प्रवृत्ती बदलण्याच्या चळवळी झाल्या नाहीत. युरोपने विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या आधारे आपल्या जीवनात सामाजिक व आर्थिक क्रांती केली. भारत त्या क्रांतीला मुकला. येथे विज्ञानाचे वर्चस्व वाढले नाही. फक्त आगरकरांच्या विचारात बुद्धिवाद होता पण त्यांच्याखेरीज बाकीचे सुधारक धर्मनिष्ठच होते. सावरकरांनी सुधारणावादाची दिशाच बदलली. बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठा, प्रत्यक्षनिष्ठा व उपयुक्ततावाद यांच्या आधारे सामाजिक विचार मांडले. हिंदुत्वाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंच्या रूढींची, सामाजिक संस्थांची बुद्धिवादी मीमांसा करून समाजाचे मानसिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. स्वतःचा संप्रदाय किंवा पंथ स्थापन न करता रूढीप्रिय समाजाला धक्के देण्याचा प्रयत्न केला. रत्नागिरी जिल्हा हा जणू सावरकरांच्या कल्पनेतील सामाजिक क्रांतीचा मार्गदर्शी प्रकल्प (पायलट प्रॉजेक्ट) झाला.

## सावरकरी समाजक्रांतीची सूत्रे

या सावरकरी सामाजिक क्रांतीची पुढील सूत्रे आहेत.

१) सावरकरांनी धर्माचा पारलौकिक भाग बाजूला ठवून समाजाचे ऐहिक प्रश्न सोडविण्यासाठी हिंदुधर्म व हिंदुत्व यांची फारकत केली. एका अर्थाने सावरकर हे ऐहिक हिंदुत्वाचे दार्शनिक होते.

२) अशा ऐहिक हिंदुत्वाच्या पायावर उभा राहणारा हिंदू समाज हा सामाजिक समतेचे मूल्य स्वीकारणारा असेल. म्हणून हिंदू एवढीच एक जात म्हणणारा हिंदू निर्माण करून त्याला समाजसंघटनेच्या सूत्रात बसविणे हीच हजारो जाती असलेल्या आणि जातिमत्सर, जातिस्पर्धा असलेल्या हिंदू समाजात फार मूलगामी क्रांती आहे.

३) अशा मानीव उच्च–नीचतेच्या भावनेला तिलांजली देणारा माणूस म्हणून समानता आणणारे सामाजिक हिंदूबंधुत्व निर्माण करणे हे या सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट आहे. 'तुम्ही आम्ही सकल हिंदू बंधु बंधु' हे हिंदूंचे सावरकरांनी रचलेलें एकतागीत हे क्रांतिगीत आहे. एखाद्या सामाजिक संकल्पनेचे क्रांतिकारकत्व ज्या समाजात, ज्या पार्श्वभूमीवर ती जन्माला येते त्याच्यावर अवलंबून असते. सामाजिक विषमता जोपासणारे जातिभेद ज्या समाजात आहेत त्या समाजात 'हिंदु या संकल्पनेला ऐहिक व असांप्रदायिक अर्थ देऊन हिंदुबंधुत्व जोपासणे हाच फार मोठा महत्त्वाकांक्षी सामाजिक संकल्प होता. म्हणूनच सावरकरांचा सामाजिक संकल्प हा मूलगामी परिवर्तन सुचविणारा नव्या समाजरचनेचा मार्गदर्शक सिद्धांत आहे.

४) सावरकरांचे हिंदुत्व, सामाजिक बंधुत्व आणि उच्च–नीच जातिभेद यांना जशी तिलांजली देते तशीच या जातिभेदांचा आधार, असलेली अंधश्रद्धा जोपासणारी पोथीनिष्ठा किंवा धर्मग्रंथनिष्ठा याचाही नाश झाला पाहिजे असे मानते. कारण जातिभेदांच्या किंवा त्याभोवती गुंफलेल्या अनेक रूढी पोथीजात आहेत असा सावरकरांचा सिद्धांत आहे. म्हणून पोथीनिष्ठेचा व धर्मभोळेपणाचा त्याग केल्याविना सामाजिक समता स्थिर होणार नाही हे ठामपणाने सावरकरांचे हिंदुत्व सांगते. म्हणून ते क्रांतिकारक आहे.

५) सावरकरांचे हिंदुत्व श्रृति–स्मृति–पुराणोक्ताच्या हिंदू समाजमनाला जखडून बसलेली बेडी तोडून अद्यावतपणाचे व्रत या समाजाने स्वीकारले पाहिजे असे सांगते व 'पुरातन' हिंदुमनाला अद्यतन व आधुनिक करू इच्छिते हे त्याचे क्रांतिकारकत्व आहे. ते विधायक आहे विज्ञानवादावर आधारलेल्या नव्या विश्वसंस्कृतीशी जोडणार तो सेतु आहे. परलोकवाद, अध्यात्मवाद कोणत्याही प्रकारे न स्वीकार

णारे, १ण आदरणीय मानणारे सावरकरांचे विज्ञानवाद व आधुनिकता यांचा निकष लावणारे हिंदुत्व हेच पुरोगामी हिंदुत्व आहे.

६) सावरकरांनी हिंदू समाजाच्या पुनर्रचनेचे मार्गदर्शक ठरणाऱ्या हिंदुत्वाचा जसा जन्मभर प्रचार केला तसाच आत्मटीका करून हिंदु समाजाला त्यांचे दोषही कोणते ते परखडपणे सांगितले. उदाहरणार्थ राष्ट्राने स्वहिताचा विचार करताना केवळ ऐहिक दृष्टी ठेवली पाहिजे असा आग्रह धरला. किंबहुना व्रते–वैकल्ये–सत्यनारायण आदींचा उपयोग समाजासाठी कसा होईल ते पाहूनच ती केली पाहिजेत असे सुचविले.

७) तसेच सावरकरांनी हिंदूंनी जे सद्‌गुण म्हणून आतापर्यंत जपले त्यांचाही पुनर्विचार केला पाहिजे असे सांगितले. उदाहरणार्थ परधर्मसहिष्णुता. सावरकर याविषयी म्हणतात, ‘परधर्म सहिष्णुता हा सदगुण आहे. हे बोधामृत प्रत्येक हिंदूला अगदी आईच्या दुधासहच पाजलेले असते. परंतु त्या वाक्याचे मर्म मात्र त्याला कोणी विशद केलेले नसते. जर तो परधर्म आपल्या स्वधर्मीशीही सहिष्णुतेने वागणारा असेल तर तशा परधर्माशी आपणही सहिष्णुतेने वागणे, हा सदगुण होऊ शकेल. परंतु हा देशकालपात्राचा विवेक न करिता, हिंदुधर्माचा निर्दय विनाश, काफरांचा भयानक उच्छेद हाच आमचा धर्म होय, असे म्हणणाऱ्या मुस्लिमांच्या किंवा ख्रिश्चनांच्या धर्मास ती परधर्मसहिष्णुतेची व्याख्या लागू पडत नाही. तिथे त्या ‘परधर्माचा’ त्याच्या असहिष्णु कृत्यांचा प्रतिकृत्याने आणि अत्याचारांचा प्रत्याचाराने प्रतिशोध घेणारी संक्रुद्ध असहिष्णुता हाच खरा सद्‌गुण होय. (स. सावरकर खंड–५, पान -७२१).

## मनुष्यदया की भूतदया

आणखी हिंदुमनाला भुरळ पाडणारा दुसरा सद्‌गुण म्हणजे भूतदया. सावरकर म्हणतात, मनुष्यसमाजाचे स्थैर्य नि प्रगति, सुखसमाधान नि शोभा, ज्या काही अत्युदार भावनांवर अवलंबतात त्यांच्यात दया मुख्य होय. मुलाला जशी आई तशीच समाजाला दया. तिच्या दुधावर तो जगतो. तिच्याच ममतेच्या मांडीवर वाढतो. यासाठीच संतसज्जनांनी म्हटले आहे, ‘दया धर्मका मूल है.’

मनुष्याने मनुष्यावर दया करावी हा माणुसकीचाच धर्म आहे दया ही मनुष्याची एक अत्युदार अशी नैसर्गिक प्रवृती आहे, अत्युच दार अशासाठी की, देशकालपात्रविवेकाने त्या भावनेचा सदुपयोग

मनुष्य करीत गेला तर मानवी समाजाचे त्यात कल्याणच आहे. या बाबतीत धर्मग्रंथांची कसोटी एकंदर भूतदयेच्या प्रकरणी निकामी आणि टाकाऊ असल्यामुळे भूतदया वा अहिंसा किती, कशी नि कोठे आचरावी, याची त्यांतल्या त्यात अधिक बुद्धिग्राह्य आणि स्पष्ट अशी कसोटी उरते. ती म्हणजे ऐहिक मानवी हितास जी पोषक तितकीच भूतदया आचरणीय, इष्ट. त्यापलीकडे भूतमात्रांवर दया करण्याची मनुष्यास जी सोय नाही, मनुष्याच्या हितास अवश्य तेव्हा हिंसा जी केलीच पाहिजे, तिचा दोष मनुष्यावर नाही. तो दोष असलाच तर सृष्टीचा, निसर्गाचा. इच्छा असलीच तर प्रभूची. (स. सावरकर खंड–३ पान २३९).

गोरक्षण, यज्ञ आदीसंबंधीचे सावरकरांचे विचार असेच समाजाचे मानसिक आधुनिकीकरण करणारे, प्रत्यक्षनिष्ठ व विज्ञानवादी आहेत. त्यांची चर्चा पुढे एका प्रकरणात केली आहे. सारांश हिंदुबंधुत्व, हिंदुमनाचे आधुनिकीकरण हे सावरकरांच्या हिंदुत्वाचे सामाजिक उद्दिष्ट आहे.

## एकजिनसी हिंदुत्वाची अहंता

सावरकर हे उत्क्रांत, एकजीव झालेल्या व विजिगीषु हिंदुत्वाचे प्रतीक म्हणून वावरले. 'हिंदू' अहंतेचे ते प्रतीक सगुण होते. याचे वर्णन त्यांनी स्वतः केले होते. एकजीव झालेल्या हिंदुत्वाची ऐतिहासिक प्रक्रिया सावरकरांनी सांगितली होती.

आपल्या ह्या वेदपूर्वकालीन नि वेदकालीन आरंभापासून तो आजवर ह्या वर उल्लेखिलेल्या आर्य, अनार्य, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच, शक, यवन, हूण प्रभृति प्राचीन नि अनेक अर्वाचीन परकीय वा स्वकीय जातींची अत्यंत कौशल्याने नि एकजीव परिणती झाली आहे ती जगाच्या इतिहासातील मानवी संघटनाचे एक अत्यंत आश्चर्यकारक उदाहरण आहे. भरतखंडातील नाना लहान–मोठ्या नदनद्या, भिन्न दिशांनी वाहत वाहत शेवटी जशा सिंधुसागरापासून तो गंगासागरापर्यंत विस्तारलेल्या हिंदुमहासागरात एकजीव झाल्या आहेत त्याचप्रमाणे वैदिक युगापासून तो आजपर्यंतच्या नाना जाती, उपजाती, धर्मपंथ, प्रांत एकत्र होत होत, एकमेकांत मिसळत मिसळत आमच्या वैदिक पूर्वजांनी जे ध्येय आखले होते ते शेवटी गाठून आजच्या आमच्या ह्या 'हिंदू' राष्ट्रात एकजीव झाले आहेत. आसिंधुसिंधु भारतभूमिका हीच ज्याची पितृभू आणि पुण्यभूही आहे तो

तो हिंदु. पूर्वी आम्ही कोणी आर्य असू वा अनार्य, गोंड असू वा भिल्ल, ब्राह्मण असू वा शूद्र, वैदिक असू वा अवैदिक, जैन असू वा बौद्ध, सारस्वत असू वा द्रविड, शैव असू वा वैष्णव, आज आम्ही सर्व राष्ट्रीय अर्थाने 'हिंदू' आहोत. हे आमचे एकजीवन आज ज्या एकाच शब्दात वरील व्याख्येप्रमाणे व्यक्तविता येते तो अनन्य शब्द आहे 'हिंदू.'

या शब्दाच्या हिंदू या दोन अक्षरांत अगस्तीच्या अंजलीत जसा मह्रासागर तसे तीस कोटी लोकांचे राष्ट्रचे राष्ट्र सामावलें आहे. (स. सावरकर खंड-२, पाने ४२८-४२९).

सावरकरांनी आपले सर्वस्व हिंदुत्वाला वाहिले. मनावर, विचारावर त्यांनी भाषिक, जातीय, प्रादेशिक, संकुचित भावनेचे प्रभुत्व कधीही होऊ दिले नाही. भविष्याची चिंता केली ती हिंदुत्वाच्या, इतिहासातील सोनेरी पाने पाहिली ती 'आसिंधू सिंधू' पसरलेल्या हिंदू जगताची.

## राजकीय सामर्थ्याची उपासना

असा हा हिंदू समाज राजकीय दृष्टया दुर्बल व भ्रांत तत्त्वज्ञानाच्या मागे जाणारा, आत्मसंतुष्ट, जगातील राजकीय व्यवहाराचे भान नसलेला आहे ही सावरकरांची खंत होती. हा समाज राजकीय दृष्टया संघटित झाला पाहिजे. हिंदुत्व ही राजकीय शक्ती झाली पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते. १९३७ नंतरचे सावरकरांनी हिंदुत्वाचे राजकारण केले. त्यात त्यांना अपयश आले. त्याची कारणमीमांसा हा स्वतंत्र विषय आहे. पण त्यांनी जे राजकीय स्वप्न पाहिले त्याचा उल्लेख केला पाहिजे. त्यातील शब्द येणाऱ्या पिढयांना आवाहन करीत राहतील.

' वटवृक्षाचे बीज मोहरीहूनही लहान असते, पण त्या बीजात जी स्फूर्ती असते, जी वल्गना असते, जे वाढता वाढता तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्याखाली गाई, खिल्लारे विसावा घेतात, उन्हाने श्रांत झालेल्यांना तो वटवृक्ष सावली देतो.

मलाही एक वल्गना करू द्या. माझे गाणे मला गाऊ द्या.

या जगात जर आपणास हिंदुत्वाचे मानाचे राष्ट्र म्हणून जगवयाचे असेल तर, तसा आपला अधिकार आहे, आणि ते राष्ट्र हिंदुध्वजाखालीच स्थापन झाले पाहिजे. या नाही तरी पुढच्या पिढीत ही वल्गना खरी ठरेल.

माझी ही कल्पना खोटी ठरली, तर वेडा ठरेन मी.

माझी ही कल्पना खरी ठरली, तर मी प्रॉफेट ठरेन.
माझा हा वारसा मी तुम्हांला देत आहे.

(पुणे येथील भाषण, १ ऑगस्ट १९३९).
(समग्र सावरकर खंड–४, पान ५३१).

# ३. सावरकरांचा विज्ञानबोध

सावरकरांच्या सामाजिक विचाराचा अभ्यास करताना प्रथम ठळकपणे दिसतो;तोत्यांचा विज्ञानवादी दृष्टिकोन. सावरकरांनी म्हटले आहे, ' समाजकारणात विज्ञानाचे वर्चस्व स्थापिले पाहिजे. तसेच आपल्या अर्थकारणातही त्याच विज्ञानाची मूर्ती जे यंत्र, त्या यंत्राचे वर्चस्व स्थापिले पाहिजे. ' (यंत्र–समग्र सावरकर खंड– ३, पान ३८७) याचबरोबर ' विज्ञानवादाच्या राष्ट्रीय प्रचाराची सूत्रे विज्ञाननिष्ठांनी आपल्या ताब्यात घेतली पाहिजेत ' असे सावरकरांनी सुचविले आहे. धर्मभोळेपणा, पोथी व पोथीजात रूढी ही प्रज्ञाघातक असतात. म्हणून सावरकरांनी विज्ञानवादाच्या प्रचाराचा एक भाग म्हणून या तिन्हींवर हल्ले केले. त्या हल्ल्यामागे बुद्धिवादी दृष्टी होती. अशा बुद्धिवादी प्रचाराचे महत्त्व सांगताना सावरकर म्हणतात :

' बुद्धिवादाचा भडिमार दुप्पट उत्साहाने चालवून धर्मभोळेपणाची ही अजूनही मधूनमधून मुसंडी मारू पाहणारी उचल पुन्हा दाबून टाकली पाहिजे. हेटाळणीने नव्हे; रागाने नव्हे, गंमत म्हणून नव्हे, द्वेषाने तर नव्हेच नव्हे, पण आपल्या राष्ट्राला धार्मिक अज्ञानाच्या तमोयुगातून आजच्या पुढारलेल्या विज्ञानयुगात आणून सोडणे हे आपले अत्यंत पवित्र असे कर्तव्य आहे, हाच एक खरा धर्म आहे. आपल्या ह्या आजही पुरातनांचीच पूजा करीत बसलेल्या सनातनी बंधूंनासुद्धा आपल्या बुद्धिवादाने आज ना उद्या नवग्रहशांती प्रभृति भाबड्या धर्मकल्पनांचे फोलपण पटवून देऊन त्यांनाही आजच्या परिस्थितीत जो आपल्या हिंदुराष्ट्रास उद्धारक होईल, जो वैज्ञानिक सत्यावर उभारलेला आहे, जो इथे लोकहितकारक आणि म्हणूनच परत्रीदेखील निःश्रेयस्कर झालाच पाहिजे असा आचारच आजचा खरा धर्माचार ठरणार आहे, अशाच मताचे करून सोडू अशा निष्ठेने आपण त्यांच्याशी पुनःपुन्हा विचारविनिमय केला पाहिजे. त्या भाकड

कर्मकांडाचा फोलपणा पुनःपुन्हा उघडकीस आणला पाहिजे. आज जे प्राचीन धर्मविधी, समज, निष्ठा धडधडीतपणे खोटया व वायफळ ठरलेल्या आहेत, त्यांच्यावरील मनुष्यजातीचा उरलासुरला विश्वास ही साफ नाहीसा होईतो सत्याचा प्रचार सारखा प्रमाणशुद्ध प्रयत्नांनी करीत राहिले पाहिजे. हिंदुसमाजातीलच नव्हे, तर भाकड धर्मवेडाने ग्रासलेल्या ख्रिस्ती-मुसलमानादिकांतील लक्षावधी अडाणी लोकांतूनही ही अज्ञानाची रोगट साथ जी फैलावली जात आहे ती हटवून त्यांनासुद्धा विज्ञानाच्या शुद्ध वातावरणात नेऊन सोडणे बुद्धिवाद्यांचे कर्तव्य आहे. कारण गावामध्ये कोणत्याही भागात रोगाणू जोपासले गेले की त्यांचा उपद्रव साऱ्या गावाचे आरोग्य संकटात पाडल्यावाचून सहसा सोडीत नाही. ' (स. सावरकर खंड-३, पान ३०२).

हा बुद्धिवादी प्रचार केवळ हिंदू धर्मकांडापुरता, धर्मविधीपुरता मर्यादित न ठेवता ख्रिस्ती, मुसलमान आदींना विज्ञानवादी केले पाहिजे ही सावरकरांची भूमिका होती. ही निखळ विज्ञाननिष्ठ समाजसुधारणेची भूमिका आहे.

## वैज्ञानिक मूलतत्त्ववाद

सावरकरांनी जो मूलतत्त्ववाद हिंदूंसाठी सांगितला त्याचे वर्णन ' वैज्ञानिक मूलतत्त्ववाद' असे करता येईल. (सायंटिफिक फंडामेंटॅलिझम)

पारंपरिक समाजाचे परिवर्तन आधुनिक समाजात करण्यासाठी तो सांगितला आहे. विज्ञानग्रंथ हा यापुढे भौतिक समाजरचनेचा आधारस्तंभ झाला पाहिजे हा सावरकरांचा अट्टाहास होता. सावरकरांनी त्यासाठी मौलिक सिद्धांत प्रतिपादन केले होते. 'सनातन धर्म कोणता' या निबंधात सावरकर म्हणतात, शाश्वत नियम, अपरिवर्तनीय, जे बदलू नयेत इतकेच नव्हे तर जे बदलणे मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे असे अबाधित जे धर्म असतील, नियम असतील त्यासच सनातन धर्म ही पदवी यथार्थपणे .देता येईल. हे लक्षण सृष्टिनियमांस तंतोतंत लागू पडते. प्रत्यक्ष अनुमान आणि त्यांना सर्वस्वी विरुद्ध न जाणारे आप्तवाक्य या प्रमाणांच्या आधारे सिद्ध होऊ शकणारे आणि ज्याविषयी कोणताही यथाशास्त्र प्रयोग केला असता त्या त्या कार्यकारण भावाच्या कसोटीस जे पूर्णपणे केव्हाही उतरू शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यात जे जे सृष्टिनियम आणि जी जी

वैज्ञानिक सत्ये आज आलेली आहेत त्यांस त्यांसच आम्ही आमचा सनातनधर्म समजतो. निःशेष परिगणनास्तव नव्हे तर दिग्दर्शनार्थ म्हणून खालील नामोल्लेख पुरे आहेत: प्रकाश, उष्णता, गणित, गणितज्योतिष, ध्वनी, विद्युत, चुंबक, रेडियम, भूगर्भ, शारीरवैद्यक, यंत्र, शिल्प, वानस्पत्य, जैव, आणि तत्सम जी प्रयोगक्षम शास्त्रे (सायन्सेस) आहेत त्यांचे जे प्रत्यक्षनिष्ठ आणि प्रयोगसिद्ध नियम आज मनुष्यजातीस ज्ञात झालेले आहेत तोच आमचा खरा सनातन धर्म होय.

'तो नियम आर्यांसाठी वा अनार्यांसाठी, मुस्लिमांसाठी वा काफरांसाठी, इस्राईलांसाठी वा हीदनांसाठी अवतीर्ण झालेले नसून ते सर्व मनुष्यमात्रास निःपक्षपाती समानतेने लागू आहेत. हा खरा सनातन धर्म आहे. इतकेच नव्हे तर हा खरोखर मानवधर्म आहे, हा केवळ कृते तु मानवो धर्मः नाही तर त्रिकालाबाधित मानवधर्म आहे म्हणूनच त्यास सनातन हे विशेषण निर्विवादपणे लागू पडते. सूर्य, चंद्र, आप, तेज, वायू, अग्नी, भूमी, समूद्र प्रभृति पदार्थ ह्या, कोणी लोभाळ्या लहरीप्रमाणे प्रसन्न वा रुष्ट होणाऱ्या देवता नसून ह्या आमच्या सनातन धर्माच्या नियमांनी पूर्णपणे बद्ध असणाऱ्या वस्तू- आहेत. ते नियम जर आणि ज्या प्रमाणात मनुष्याला हस्तगत करता येतील तर आणि त्या प्रमाणात ह्या सर्व सृष्टिशक्तींशी त्याला रोखठोक आणि बिनचूक व्यवहार करता आलाच पाहिजे—करता येतोही.' (स. सावरकर खंड–३, पान–३१०–११).

## धर्मग्रंथ सनातन नाहीत

कोणताही धर्मग्रंथ सनातन व अपरिवर्तनीय नाही. पारलौकिक जीवनाविषयीचे जे तत्त्वज्ञान असते ते प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांच्या कसोटीस उतरलेले नाही. याविषयींचे विवेचन करताना सावरकर म्हणतात, 'ईश्वर, जीव, जगत यांच्या स्वरूपाचे नि परस्परसंबंधाचे अस्तिरूप नास्तिरूप किंवा काही त्रिकालाबाधित नियम असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे जन्म, मृत्यू, पूर्वजन्म, स्वर्गनरक यांविषयींही जी कोणती वस्तुस्थिती असेल ती निश्चितपणे सांगणारे ज्ञानही त्रिकालाबाधित म्हणून घेण्यास पात्र असणारच. यास्तव या पारलौकिक प्रकरणीचे सिद्धान्तही सनातन धर्म म्हणजे शाश्वत, अपरिवर्तनीय धर्म होत यात शंका नाही.

'परंतु त्या प्रकरणी जी माहिती नि नियम मनुष्यजातीच्या हाती आज असलेल्या यच्चयावत धर्मग्रंथांतून दिलेले आढळतात, त्यांतील

७४/३४

एकासही सनातन धर्म, अपरिवर्तनीय, निश्चित सिद्धांत असे म्हणता येत नाही. निश्चित झालेल्या वैज्ञानिक नियमांप्रमाणे धर्मग्रंथातील हे पारलौकिक वस्तुस्थितीचे वर्णन प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांच्या कसोटीस मुळीच उतरलेले नाही. त्यांची सारी भिस्त बोलून-चालून एक्या शब्दप्रामाण्यावर, आप्तवाक्यावर, विशिष्ट व्यक्तींच्या आंतर अनुभूतीवर अवलंबून असते. शब्द प्रमाण असेल तर ह्यांचा त्या त्या विशिष्ट वस्तुस्थितीचा अनुभव एकच असला पाहिजे. पण पारलौकिक आणि पारमार्थिक सत्याचे जे स्वरूप आणि जे नियम ते प्रत्येकी सांगतात ते प्रत्येकी भिन्नच नव्हेत तर बहुधा प्रत्येकी परस्परविरुद्ध असतात.

यास्तव प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द यांपैकी कोणत्याही प्रमाणाने पारलौकिक वस्तुस्थितीचे आज उपलब्ध असलेले वर्णन हे सिद्ध होत नसल्यामुळे त्यास सनातन धर्म त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय सत्य, असे म्हणता येत नाही. तशा कोणत्याही विधेयास असे सिद्धान्तस्वरूप येताच तेही आमच्या सनातन धर्माच्या स्मृतीत गोवले जाईलच, पण आज तो विषयच प्रयोगावस्थेत आहे आणि आप्तांची वा अपौरुषेय ग्रंथांचीही तद्विषयक विधाने सिद्धान्त नसून क्लुप्ती (हायपॉथेसीज) आहेत, फार तर सत्याभास आहे, पण सत्य आहे. ते जाणण्याचा प्रयत्न यापुढेही व्हावयास पाहिजे. तथापि त्याविषयी शक्य त्या क्लुप्ती योजून ते स्वर्गीय ऋत आणि अनृत प्राप्त करून घेण्यासाठी इतका अतिमानुष प्रयत्न करून जितक्या दिशांना तरी त्यांचा पत्ता लागत नाही हे सिद्ध केल्याविषयी आणि आपल्या देवतुल्य अवतारांनी अखिल मानव जातीचा कुसवा धन्य केल्याविषयी नचिकेतापासून तो नानकापर्यंतच्या या पुण्यश्लोकांचे आणि प्रेषितांचे, या श्रुतींचे आणि या स्मृतींचे, आम्हा मानवांवर जे नानाविध उपकार झालेले आहेत ते मात्र केव्हाही फेडता येणार नाहीत, ही कृतज्ञ जाणीव येथे व्यक्तविल्यावाचून आम्हांस पुढचे अक्षर लिहवतच नाही.' (स. सावरकर खंड-३, पान-३१२).

## सर्वत्र हीच स्थिती

'ही विसंगती सर्व धर्मांत अगदी परस्परविरुद्ध असणाऱ्या विधिनिषेधांस आणि सिद्धान्तांस सनातन धर्म हाच शब्द लुंगेसुंगे भाबडे लोकच लावतात असे नसून आपल्या साऱ्या स्मृतिपुराणांतील सनातन धर्मग्रंथांतूनच ही परंपरा पाडलेली आहे. वरील

प्रकारच्या साऱ्या मोठ्या, धाकट्या, व्यापक, विक्षिप्त, शतावधानी, क्षणिक आचारविचारांच्या अनुष्टुपाच्या अंती अगदी ठसठशीतपणे ही एकच राजमुद्रा बहुधा ठोकून दिलेली असते की, 'एष धर्मस्सनातनः'

'आपल्या धर्मग्रंथांतच ही अशी खिचडी झालेली नसून जगातील इतर झाडून साऱ्या अपौरुषेय म्हणविणाऱ्या प्राचीन आणि अर्वाचीन धर्मग्रंथांचीही तीच स्थिती आहे. हजारो वर्षांपूर्वीच्या मोझेस पैगंबरापासून तो अगदी आजकालच्या अमेरिकेतील मोर्मन पैगंबरापर्यंत सर्वांनी, मनुष्याच्या उठण्याबसण्यापासून, दाढी-मिशा-शेंडीच्या लांबीरुंदीपासून वारसाच्या, दत्तकांच्या, लग्नाच्या निर्बंधापासून तो देवाच्या स्वरूपापर्यंत आपल्या साऱ्या विधानांवर 'एष धर्मस्सनातनः' हीच राजमुद्रा आणि तीही देवांच्या नावाने ठोकलेली आहे. हे सारे विधिनिषेध देवाने साऱ्या मानवांसाठी अपरिवर्तनीय धर्म म्हणून सांगितले आहेत. सर्व मानवांनी सुंता केलीच पाहिजे हाही सनातन धर्म आणि त्रैवर्णिकांनी तसे भलतेसलते काही एक न करता मुंजच करावी हाही सनातन धर्मच. लाक्षणिक अर्थीच नव्हे तर अक्षरशः ह्या साऱ्या अपौरुषेय, ईश्वरी धर्मग्रंथांत एकाचे तोंड पूर्वेस तर एकाचे पश्चिमेस वळलेले आहे. आणि तेही अगदी प्रार्थनेच्या पहिल्या पावलीच. सकाळीच पूर्वेकडे तोंड करून प्रार्थना करणे हाही सनातन धर्म आणि सकाळीदेखील प्रार्थना म्हटली की ती पश्चिमेकडेच तोंड करून केली पाहिजे हाही मनुष्यमात्राचा सनातन धर्मच. एकाच देवाने मनूला ती पहिली आज्ञा दिली नि महंमदाला ही दुसरी दिली. देवाची अगाध लीला, दुसरे काय ! हिंदुमुसलमानांचे दंगे करवून आपण अंग राखून दुरून मौज पाहत बसण्याचा आरोप शौकतअल्लीवर उगीच करण्यात येतो. हा खेळ चालू करण्याचा पहिला मान त्यांचा नसून असे अगदी परस्परविरुद्ध प्रकार अपरिवर्तनीय सनातन धर्म म्हणून त्या दोघांसही सांगून त्यांची झुंज लावून देणाऱ्या गमती स्वभावाच्या देवाचाच तो मान आहे. ही मूळची त्याची लीला. आणि त्याची नसेल तर त्याच्या नावावर हे ग्रंथ चापून लादून देणाऱ्या मनुष्याच्या मूर्ख श्रद्धेची.

'सारे रोम जळत असताना सारंगी वाजवीत ती गंमत पाहणारा असा देवाला कोणी नीरो समजण्यापेक्षा मानवी मूर्खपणावरच वरील विसंगतीचा दोष लावणे आम्हांस तरी सयुक्तिक वाटते. या साऱ्या विसंगत आणि परस्परविरुद्ध गोष्टींस सब घोडे बारा टक्के भावाने 'सनातन धर्म' ही एकच पदवी देण्यात मानवी बुद्धीच चुकली आहे.

१२।१९

सनातन धर्म ह्या शब्दाचा हा रूढ अर्थच विसंवादाला कारण झाला आहे.' (स. सावरकर खंड–३ पान ३०८–९).

तेव्हा पारलौकिक प्रश्नांविषयीचे ऋषीमुनींचे सिद्धांतही ते प्रयोग-सिद्ध नसल्याने ती केवळ आदरणीय अनुमाने आहेत. सनातन धर्म-तत्त्वात त्यांची गणना करता येणार नाही असा सावरकरांचा निष्कर्ष आहे.

## उपयुक्तता : प्रत्यक्षनिष्ठ कसोटी

सावरकरांच्या वैज्ञानिक मूलतत्त्ववादाचे तिसरे तत्त्व म्हणजे मनुष्याचे ऐहिक व्यवहार चालविण्यासाठी नीती कोणती असावी या-संबंधी आहे. सावरकरांचे म्हणणे असे, 'मनुष्याचे झाडून सारे व्यवहार, नीती, रीती, निर्बंध हे त्यास या जगात हितप्रद आहेत की नाहीत या प्रत्यक्षनिष्ठ कसोटीनेच ठरविले पाहिजेत, पाळले पाहिजेत, परिवर्तले पाहिजेत-परिवर्तिनी संसारे ते मानवी व्यवहारधर्म सनातन असणेच शक्य नाही, इष्ट नाही. महाभारतामध्ये म्हटले तेच ठीक की अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहारविधि नयेत.' (स. सा. खंड–३, पान–३०६).

## मानवनिष्ठ नीती

सावरकरांच्या विज्ञानाचा प्रचार करण्यासाठी लिहिलेल्या लेखात आक्रमकता असली तरी तर्कनिष्ठा, ऐतिहासिक सत्यनिष्ठा यांचे भान सुटलेले नाही. त्यांच्या विज्ञानबोधाचा आकृतिबंध या सर्व लेखनातून सिद्धांत शोधून काढून तयार करावा लागतो. समाजसुधारणेची त्यांची स्वतःची व्यूहरचना त्यांनी मनात निश्चित केली असली पाहिजे. त्यांनी प्रारंभ केला तो हिंदूंच्या पोथीपुरस्कृत धार्मिक विधी व संस्कारापासून यज्ञाची कुळकथा सांगितली ती त्यासाठीच. त्या काळी ठिकठिकाणी वेगवेगळ्या महाराजांनी यज्ञ सुरू करून समाजाच्या धर्मभोळेपणावर स्वतःचे प्रस्थ माजविले होते; म्हणून यज्ञसंस्थेचे वैयर्थ्य व काल-मृतता यांच्यावर सावरकरांनी हल्ले केले. दुसरे म्हणज गाय. हिंदूंच्या धर्मभोळेपणाचे हे प्रतीक 'गाय' हे सावरकरांनी निवडले व आपली उपयुक्ततावादी कसोटी लावून सांगावयास सुरुवात केली की गाय हा उपयुक्त पशू आहे, माता नव्हे.

त्याचबरोबर विज्ञानाची मूर्ती असलेले यंत्र त्याचा पुरस्कार केला. विज्ञानयुगाची तुतारी फुंकणारे यंत्रयुग यशस्वी व्हावयाचे असेल तर यंत्रशीलपणाचा स्वीकार केला पाहिजे. त्या काळी रशियन राज्यक्रांतीचे चे व रशियाच्या पुनर्रचनेच्या प्रयोगाचे सारे जग कौतुक करीत

होते. सावरकरांनी रशियाचा वस्तुपाठ लोकांपुढे मांडला आणि सांगितले की धर्मग्रंथावर समाजसंस्था उभारण्याचे दिवस गेले. रशियाने आपल्या समाजसंस्थेचा पाया कोणत्याही धर्मग्रंथावर न रचता विज्ञानग्रंथावर रचला.

## धर्मसंस्कारांचे स्वरूप

'धर्मसंस्कारात ज्या ज्या क्रिया धार्मिक म्हणून स्थायित्व पावतात, त्या त्या बहुधा त्या काळचा इतिहास असतात. भूगर्भित स्तरातून जशी त्या त्या काळची सृष्टी, स्थिती नि समाजस्थिती चिरेबंद करून टाकलेली असते, तसेच धार्मिक संस्कारांतून त्या त्या काळचे ज्ञान नि अज्ञान अस्थि–स्थिर (फॉसिल) चिरेबंद व चिरंतन करून टाकलेले असते,' असे इतिहासनिष्ठ विवेचन करून सावरकर विविध धार्मिक आचार व संस्थांची चिकित्सा करतात. याच अनुसंधाने अग्निहोत्र, यज्ञ या संस्थांची चिकित्सा सावरकरांनी केली आहे. सावरकर म्हणतात, ' प्राचीन समाजस्थितीचा सांगाडा प्राचीन धर्मसंस्कारांतील तंत्रातूनच बहुधा गाडलेला सापडतो, या नियमाच्या अनुसंधानाने अग्नीची युक्ती वैदिक आर्यांच्या अत्यंत प्राचीन पूर्वजांस कशी सापडली त्याचा पत्ता त्यांच्या अग्नीं चेतविण्याच्या पुरातन–धार्मिक तंत्रात म्हणजेच यज्ञविधीत सापडण्याचा पुष्कळ संभव असणारच. आणि ज्या अर्थी यज्ञातला पवित्र अग्नी म्हटला म्हणजे तो काष्ठावर काष्ठ घासूनच उत्पादावा लागतो, त्या अर्थी त्या यज्ञीय तंत्रास रचणाऱ्या प्राचीन युगात अग्नी चेतविण्याची उत्कृष्ट युक्ती काष्ठावर काष्ठ घासून ठिणगी पाडणे ही आणि हीच असली पाहिजे. आता त्याहून अनेक पटींनी सुधारलेली आगपेटी वा वीजबटने जरी निघाली आहेत, तरीही धार्मिक अग्नी, समंत्रक वैदिक अग्नी चेतविण्याचा मान ह्या अद्यतन साधनास केव्हाही मिळणार नाही. तो त्या पाच हजार वर्षांपूर्वीच्या, म्हणजेच पाच हजार वर्षांनी मागासलेल्या, काष्ठावर काष्ठ घाशीत बसण्याच्या रीतीलाच मिळणार. कोणतेही अज्ञान वा अपकृष्ट प्रघात त्यावर धार्मिक छाप पडला की कसे ' सनातन ' होऊन बसतात, पवित्र होऊन बसतात याची ही मननीय उदाहरणे होत. अद्यतन आगपेटीने पेटविलेला अग्नी जरी अग्नीच, तरी तो केव्हाही यज्ञीय पूज्यता पावणार नाही. यज्ञीय पूज्यतेला पात्र असा अग्नी म्हटला की तो ह्या पुरातन रानटी पद्धतीने काष्ठावर काष्ठ घाशीत बसूनच पाडला पाहिजे.' (स. सावरकर खंड–३, पान–३१८).

यज्ञ पेटविण्यास लागणारा अग्नी सारखा जिवंत ठेवण्यासाठी अग्नि-होत्र संस्था सुरू झाली, व तिलाच धार्मिक पावित्र्य देण्यात आले म्हणून सावरकरांचा अग्निपूजेबद्दलचा निष्कर्ष असा की प्रथम आवश्यकता, नंतर आवड नि शेवटी दैवीकरण अशा परंपरेने अग्निपूजा रूढ झाली व धार्मिक बनली. ' यज्ञ ' ही संस्था हिमप्रदेशातच उद्भवली गेली असल्याचा फार संभव वाटतो. (स. सावरकर खंड–३, पान–३२०)

## ऐतिहासिक आर्य

यज्ञसंस्थेचा आर्यसंस्कृतीला जो उपयोग झाला तो मान्य करताना सावरकरांनी म्हटले आहे, ' यज्ञसंस्थेने भूतकाळात आपल्या भारतीय आर्यांवर एवढी छाप जी पाडली त्याचे आणखी एक त्या काळी प्रत्यक्ष फलदायी वाटलेले नि काही प्रमाणात खरोखरीच तसे असलेले कारण हे होते की त्या यज्ञसंस्थेने आपल्या वैदिक काळच्या आर्य-राष्ट्राच्या संघटनेस, संस्कृतीस आणि दिग्विजयास फारच मोठे साह्य दिले होते. आर्यांच्या ज्ञानाचे, पराक्रमाचे, वाणिज्याचे, राज्याचे, आर्य-राष्ट्राचे नि राष्ट्रसंघाचे ही यज्ञसंस्था प्रत्यक्ष हृदयच झालेली असे पराजित राष्ट्रें अयज्ञीय, विजेते आर्यराष्ट्र यज्ञीय. या विरोधाने ज्या त्या आर्यांची भावना सहजच अशी झाली, असा कार्यकारणभाव ह्या साहचर्याने सहजच सुचला, की यज्ञ तिथे जय, जिकडे अग्नी तिकडे विजय, अर्थात आर्यांना जो विजय बहुधा हटकून मिळे, तो अग्नि-देवतेची कृपा होय, यज्ञाचा प्रताप होय, अशी भावना बळावली. यज्ञ तिकडे जय, अग्नी तिकडे विजय, हे साहचर्य त्या वैदिक काळी भारतीय आर्यांपुरते तरी एकंदरीत खरे होते. पण त्या काळच्या धार्मिक भावनामय युगात अनुभवाच्या अभावी त्यांच्या हे ध्यानात आले नाही वा येऊ शकणेच कठीण होते की यज्ञ तिकडे जय हे केवळ साहचर्य होते, कार्यकारण भाव नव्हे.' (स. सा. खंड–३, पान ३२५). अर्थात यज्ञाच्या या समर्थनामागे जशी सावरकरांची इतिहासनिष्ठ उपयुक्ततावादी दृष्टी आहे, तसाच त्यांच्या हिंदू अहंतेचाही भाग आहे. पण येथेही सावरकरांनी आर्यांना हे जय अग्निपूजेमुळे मिळत नव्हते तर त्या काळच्या आर्यांच्या शत्रूहून ते आर्य अधिक संघटित, सुसंस्कृत नि वीर्यशाली होते, ऐहिक शस्त्रास्त्रविद्या आदिभौतिक साधनांनी अधिक संपन्न होते हे नमूद करावयास सावरकर विसरत नाहीतच.'

सावरकरांनी पुढे सांगितले आहे की, ' आता अग्नीचा मनू संपला



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२११५७
ना.क्र. २३२८१
निवड १२८।१।८३

असून विद्युत रेडियमचे मन्वन्तर चालू आहे. अग्निपूजेने देव पावत नाही, अग्निनिंदेनेही पावत नाही. अग्निनिंदक व यज्ञध्वंसी नि कुराणा-नुयायी मुसलमानांसही पहिल्या बाजीरावाच्या तलवारीचा विळा कुरणासारखा सपासप कापीत गेला. अग्निहोत्रादी तो पूजीत होता म्हणून नव्हे, तर तलवारीची धार परजत होता म्हणून.' (स. सावरकर खंड–३, पान ३२७).

## संस्कृतिरक्षणाचा अर्थ

रूढीरक्षण करणे संस्कृतिरक्षण नव्हे हे स्पष्ट करून सावरकरांनी स्वतःची संस्कृतिरक्षणाची कल्पना याच 'यज्ञाची कुळकथा' या निबंधात सांगितली आहे. त्यांनी म्हटले आहे, 'संस्कृतिरक्षणाचा खरा अर्थ, प्राचीन काळी वेळोवेळी ज्या ज्या उलटसुलट प्रथा त्या काळच्या ज्ञानाज्ञानाप्रमाणे 'संस्कृत' वाटल्या त्या साऱ्यांची तशीच्या तशी पुनरावृत्ती करणे, त्या रूढी आज व्यर्थ वा विक्षिप्त वा विघातक ठरत असल्या तरीही त्या तशाच चालू ठेवणे, हा नव्हे. जी वेदकाळची रूढी किंवा आधारात्मक धर्म आज विज्ञानाच्या दिव्यतर प्रकाशात समाजघातक रोगाणूंनी लडबडलेला दिसतो ती ती रुढी वा आचार आजच्या संस्कृतीत न मोडता दुष्कृतीतच मोडला पाहिजे. मग तो प्राचीन काळीं लोकांना परवडला असो वा नसो, संस्कृत वाटला असो वा नसो, आज जे संस्कृत म्हणून अभिमानाने रक्षावयाचे ते, प्राचीना-तले आजही संस्कृत ठरणारे, मनुष्यास हितकारक असणारे, तेवढे तेवढेच काय ते होय.

'प्राचीनातले जे आजही उत्तम, अनुकार्य, उदात्त, अपेक्षणीय, प्रगत नि प्रबुद्ध ठरते ते ते आजचे संस्कृत, ते ते रक्षिणे म्हणजे खरे खरे संस्कृतिरक्षण होय. तसे प्राचीन संस्कृतिरक्षण हे आजचे कर्तव्य होय. प्राचीन दुष्कृतिरक्षण हे नव्हे.

' त्या संस्कृतिरक्षणाच्या कर्तव्याहूनही पुढचे कर्तव्य म्हणजे संस्कृति विकसन. प्राचीनातले जे आजच्या विज्ञानातही संस्कृत वाटते ते रक्षू-नच चालणार नाही तर त्यात नवीन सत्याची नि तथ्याची भर टाकून संस्कृतिवर्धन केले पाहिजे. ते मुख्य कर्तव्य. त्यास जे अडथळा करील, त्या कसोटीत जे हिणकस ठरेल त्यास त्यागिणे म्हणजे संस्कृति-रक्षण, संस्कृतिविकसन. (स. सावरकर खंड–३ पान३१३).

## भाकड धार्मिकतेवर हल्ला

सावरकरांच्या सामाजिक सुधारणेचे उद्दिष्ट समाजाच्या मनात

५२१५३

घर करून बसलेल्या भाकड धार्मिकतेचे, बुद्धिशून्य प्रवृत्तीचे, समजुतींचे निर्मूलन हे होते. एखादा समाज प्रगती करतो तो केवळ त्या समाजात संस्थात्मक बदल करून नव्हे, धर्मभावना धर्मग्रंथ यांच्यामुळे निर्माण होणारा धर्मभोळेपणा व विज्ञाननिष्ठ विचारांनी परिवर्तन घडवून आणणे ही महत्त्वाची सामाजिक सुधारणा आहे. सावरकरांची समाजसुधारणा समाजाची धर्मभोळी प्रवृत्ती बदलविणारी होती. म्हणजे विज्ञानवादी बुद्धीने समाजात दृढमूल झालेल्या अंधश्रद्धा सुधारणावादी विचारांनी हलविणे, त्यांचे मतपरिवर्तन करणे हे सावरकरांच्या लेखांचे उद्दिष्ट होते. या दृष्टिकोणातून यज्ञसंस्थेचा जसा त्यांनी विचार केला तसेच 'गाय' ह्या हिंदू मनाची अनन्य श्रद्धा असलेल्या प्रतीकावर टीकेची झोड उठविली.

## गाय– एक उपयुक्त पशू

सावरकरांनी हिंदूंना माता वाटणारी गाय हा एक फक्त उपयुक्त पशू आहे असे प्रतिपादन व्यक्त करून फार मोठे वैचारिक वादळ निर्माण केले. गाय हे हिंदूंच्या धर्मभोळ्या प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून सावरकरांनी निवडले व आमचा लढा त्या प्रवृत्तीविरुद्ध आहे असे प्रकटपणे सांगितले. धर्मभोळ्या भाबडेपणापायी आमची तारतम्यबुद्धी किती पंगू झाली आहे हे दाखवून हिंदूंच्या गबाळपणाविरुद्ध आघाडी उघडली. त्यात सावरकर यशस्वी झाले. कारण त्यांना हिंदूंच्या धर्मभोळ्या प्रवृत्तीस धक्का द्यावयाचा होता. अर्थात गाईचा प्रश्न अद्यापही सुटला नव्हता. पण सुधारकी विचारांचे एक व्यासपीठ या देशात निर्माण झाले. म्हणून गायीवरचे सावरकरांचे बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ विचार आजही प्रचाराला उपयुक्त ठरणारे आहेत. त्याचा सारांश येथे दिला आहे. सावरकर म्हणतात,

'गायीला आणि बैलाला देवता मानून पूजिण्याचे प्रघात केवळ आपल्या हिंदू धर्मातच आहेत असे नव्हे. प्राचीन काळी आपल्या राष्ट्राच्या महाभारतीय युगाशी समकालीन असणाऱ्या ज्या असीरियन, खाल्डियन, मिसर, इन्का प्रभृति मोठमोठ्या संस्कृती, धर्म नि राष्ट्रे होती, त्यांच्यातील कित्येकांत बैलांची आणि गायींची पूजा होत असे. ही गोपूजा आणि वृषभपूजा त्या प्राचीन काळच्या लोकांत जवळजवळ 'साऱ्या जगभर इतकी बद्धमूल झालेली होती आणि ह्या पशूंविषयीची पूज्य भावना कोट्यवधी हृदयांत इतकी बळावली होती की जेव्हाजेव्हा कोणी कोणी सुधारक एकेश्वरी मताचा प्रचार

करण्यासाठी आले तेव्हातेव्हा त्यांना, त्यांच्या अनुयायांस ह्या गोपूजेपासून नि वृषभपूजेपासून परावृत्त करण्याचे काम अत्यंत कठीण गेले.

'मनुष्याहून प्रगती–इच्छा–बुद्धी–शक्ती–ज्ञाती प्रभृति सर्व गुणांत हीनतर असणाऱ्या पशूस देव मानण्याची चालही यासाठीच आज जगातील यूरोप–अमेरिका प्रभृति बहुतेक प्रगत नि सभ्य राष्ट्रांस अत्यंत लाजिरवाणी करत आहे. आम्ही हिंदूंनी अजूनही त्या अपकृष्ट, तामस आणि माणुसकीस लाज आणणाऱ्या पशूपूजेस चिकटून राहावे ह्या रूढीचा केवढा प्रताप! उभ्या राष्ट्राचा बुद्धिभ्रंश 'धर्मा'चा छाप बसलेली रूढी कशी करू शकते त्याचे हे एक चटकदार प्रत्यंतर आहे.

'त्यातही बुद्धिविपर्यासाची गंमत ही की आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या धर्मविचाराच्या अत्युच्च पदाप्रत पोचल्यामुळेच आमच्या धर्मात हे पशुपूजेचे अत्यंत हिणकस वेड अजून टिकाव धरून आहे. प्रज्ञही त्या अज्ञतेचे असे कौतुक करीत आहेत की जर हे आब्रह्मस्तंभापर्यंत सारे चराचर विश्व त्या परमात्म्याचीच व्यक्ती आहे, तर पशूही त्या ब्रह्माचे प्रतीक का होऊ नये?'

## प्रश्नशून्य विश्वासशील धर्म की विज्ञान?

'कोणच्याही गोष्टीस तो धर्म आहे असे पोथीत सांगितले आहे म्हणूनच तसे डोळे मिटून मानण्याची पोथीनिष्ठ आंधळी भावना आता झपाट्याने मावळत आहे आणि ती मावळत जावी हेच आता मनुष्याच्या वैज्ञानिक प्रगतीस अत्यंत आवश्यक आहे. पाच हजार वर्षांपूर्वीच्या पोथ्यांत सांगितलेली प्रत्येक गोष्ट आता आम्ही जर अद्ययावत विज्ञानाच्या कसोटीवर पारखून न घेतली, प्रत्यक्षनिष्ठ ज्ञानाच्या ती विरुद्ध जाताच किंवा आजच्या परिस्थितीत आपल्या हिंदुराष्ट्राच्या हितास हानिप्रद ठरताच आम्ही तत्काळ टाकून न दिली, तर आपले हिंदुराष्ट्र नि हिंदुधर्मही पाच हजार वर्षांइतकाच मागासलेला राहून ह्या विज्ञानाच्या वैज्ञानिक टकराटकरीत आपण टिकाव धरू शकणार नाही. प्रश्न एका फुटकळ प्रकरणाचा नाही, तर एका सर्वस्पर्शी राष्ट्रीय प्रवृत्तीचा आहे. पोथीनिष्ठ की प्रत्यक्षनिष्ठ, पुरातन की अद्यतन, प्रश्नशून्य विश्वासशील 'धर्म' की प्रश्नशील प्रयोगक्षम 'विज्ञान'? ह्या दोन प्रवृत्तींपैकी अद्यतन, प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगसिद्ध विज्ञानच आजच्या परिस्थितीत नि आजच्या जागतिक

प्रतिस्पर्धेत आमच्या राष्ट्राचा वेद झाला पाहिजे. आणि ह्या प्रवृत्तीला जर तुमची गोपूजा न पटली तर ती टाकाऊच ठरली पाहिज. कारण तशा मूर्खपणास धर्म मानण्याची, केवळ पोथीत तसे आहे म्हणून धडधडीत बाष्कळपणास मान तुकविण्याची सवय राष्ट्रास लागण्याने त्याचे सर्वनाशी अहित होईल.'

## धेनुर्यस्य महामाता

'गायीच्या देवत्वाची भाबडेपणापायी झालेली जशी ही विटंबना पाहिली, तशीच आता आमच्या हिंदुत्वाचीही एका गोभक्ताने नकळत केलेली विटंबना पहा. हिंदुत्वाची व्याख्या एका देशभक्ताने अशी केली, 'धेनुर्यस्य महामाता.' हिंदु कोण ? तर ज्याची महामाता धेनू आहे तो. हे हिंदुत्वाचे एक मुख्य लक्षण? भाबडेपणाच्या लहरीत, ह्या 'भाला'कारांसारख्या देशभक्तांच्या ध्यानात आले नाही की, धेनू जर खरोखरच कोणाची महामाता असेल तर ती बैलाची होय. हिंदूंची नव्हे. ज्या हिंदुत्वास गायीच्या पायांवरच उभे राहावे लागते ते गायीच्या पायांसारखेच संकटाच्या पहिल्या झटक्यास मटकन खाली बसलेच पाहिजे. देवाचे गुण भक्तात उतरतात. गायीला देव मानता मानता, गायीची पूजा करता करता हिंदूंचे राष्ट्रचे राष्ट्र गाय होऊन गेले. त्याने दाती तृण धरले. आता जर कोणाच्या पायावर आपले हे हिंदुत्व उभारायचे असेल तर ते सिंहाच्या पायावर उभारले पाहिजे. मदोन्मत्त दिग्गजांची गंडस्थाने एका झेपेसरशी फोडून फाडून टाकणारी तीक्ष्ण नख ज्याची आहेत तो नृसिंह आता पूजला पाहिजे. हिंदुत्वाचे ध्येय ते, खूण ती; गायीचा खूर नव्हे.'

## धर्मभोळी गोभक्ती

'गोवध हे महापाप. सोशिकपणा त्यांच्या हाडीमासी खिळलेला. पण देशशत्रूंची नि धर्मशत्रूंची आततायी चढाई रोखणे हेच महापुण्य, ही शिकवण त्यास उत्कटत्वाने कोणी दिलेली नव्हती. गायी मरू नयेत म्हणून राष्ट्र मरू दिले. मुलतानचे सूर्यमंदिर आम्ही पाडून टाकू म्हणून मुसलमानांनी धाक घालताच हिंदू सेनेने हाती आलेले विजय सोडून ढाला परतविल्या. मुलतान मुसलमानांचेच हाती राहू दिले. काशी घेण्यासाठी पुढे याल तर तेथील देवळे उद्ध्वस्त करू, ब्राह्मणांची कत्तल करू म्हणून नवाबाने धमकी देताच काशीचे हिंदू, पेशव्यांनी काशीवर स्वारी करू नये म्हणून धरणे धरून बसले.

आणि शक्ती असताहीं पेशव्यांचा जो उत्कट मनोदय की, 'श्री सोडवावी.' काशी क्षेत्र म्लेच्छांचे हातून घेऊन स्वतंत्र करावे, तो विफल झाला. 'धर्म', शब्दनिष्ठ पोथीजात 'धर्म' म्हटला, की बुद्धी कशी आंधळी होते, किंबहुना बुद्धीचे डोळे काढून घेण्यासाठीच कित्येक वेळा 'धर्मा'चे सांडस तापवून हेतुतःच कसे घुसविले जातात, यांची ही 'ऐतिहासिक उदाहरणे केवळ चाचणी म्हणून सांगितली.'

## गोरक्षणाची आर्थिक बाजू

'अशा भाकड नि मूर्ख संस्कारांस आता चाट द्यावी हेच आपल्या धर्माच्या नि संस्कृतीच्या थोरवीस साजेसे होईल. गोरक्षणाचे दृष्टीनेही आजच्या वैज्ञानिक युगात पशूस देवता मानणारी ती खुळचट गोमाहात्म्ये सांगून भागणार नाही. तसली भाबडी प्रवृत्ती राष्ट्रात पसरविण्याचे सोडून जर आमचे गोरक्षक व्याख्याते ह्या कृषिप्रधान देशात या उपयुक्त पशूंचा आर्थिक उपयोग किती मोठा आहे, गाईंची नि, बैलांची वीण कशी वाढवावी, त्यांच्या मलमूत्रांची खते कशी करावी गाईच्या दूधतूपाचे संवर्धनाचे प्रयोगार्ह उत्कृष्ट प्रकार कोणते, गुण कोणचे, हे सर्व प्रयोगसिद्ध नि रसायनादिक घटकांसह प्रत्यक्षनिष्ठ भाषेत सांगतील नि गोशाळा प्रभृति संस्था गाईंच्या आणि बैलांच्या जोपासनेचा मनुष्यास अधिकात अधिक प्रत्यक्ष उपयोग कसा होईल याच ऐहिक दृष्टीने चालवितील, तरच आता गोरक्षणाचे महत्त्व लोकांस अधिक पटणार आहे. थोडक्यात म्हणजे गाय हा पशू उपयुक्त आहे म्हणून रक्षणीय आहे, अशा धोरणाने, गोरक्षणाचे धार्मिक स्वरूप सोडून, त्यास आर्थिक स्वरूप दिले कीं झाले. त्यायोगे गोरक्षण हवे त्याच प्रमाणात व प्रकाराने होईल. धार्मिक स्वरूपाने आजच्या युगात काही लाभ नसून उलट भाबडी प्रवृत्ती पसरविण्याची हानी मात्र आहे.

## धार्मिक दुष्टपणा नाही

'गोरक्षणास हिंदूंनी दिलेले धार्मिक स्वरूप कितीही भाबडेपणाचे असले तरी दुष्टपणाचे नाही. कारण मनुष्यास अत्युपयोगी अशा गाई–बैलांसारख्या पशूंचे रक्षण करण्याचाच, म्हणजे मानवी हिताचाच, त्यात हेतू असतो. पण ज्या कित्येक अहिंदूंचा 'धर्मच मुळी गोधन' आहे, त्याचे ते धार्मिक वेडेपण नुसते भाबडेच नसून दुष्टही आहे. त्यांना हिंदूंस हसण्याचा लवलेश अधिकार नाही. उलट हिंदूंनी स्वतःच्या धार्मिक भाबडेपणास सोडणे हे जितके अवश्य, त्याहूनही

देवास गायच मारिली तर आवडते, अमक्या दिवशी गाईचेच मांस खाणे पवित्र इत्यादी राक्षसी विश्वास उराशी बाळगणाऱ्या अहिंदूंच्या धार्मिक दुष्टपणास त्यांनी सोडून देणे अधिक अवश्य आहे, माणुसकीचे आहे. आर्थिक दृष्टीनेही जी गाय मनुष्यास उपयुक्त आहे, त्या शेकडो गाईंची कत्तल देवाच्या नावे करणे, ते धार्मिक कर्तव्य समजणे म्हणजे देवासच राक्षस बनविणे आहे.'

## खरा गोरक्षक हिंदू

'असा गोरक्षक हिंदू हवा. ते खरे गोरक्षण की जे राष्ट्ररक्षणाचे हत्यार होते. स्वतःच गाय होऊन दाती तृण धरून साऱ्या जगापुढे गयावया करीत ज्यांचे राष्ट्र हिंडत आहे, तो हिंदू केवळ गाईचे गोमूत्र गोमय पिण्यापुरताच जगला काय नि मेला काय सारखाच. तो गोरक्षक नव्हे, गयाळ. स्वतःच गाय होऊन सिंहाच्या तावडीतून कुणी सोडवील काय म्हणून अन्य रक्षकाची अपेक्षा करणारा. जो हिंदू राष्ट्रावर आक्रमण करणाऱ्या आतताई आपत्तींनाच दाती तृणी धरावयास लावतो, हिंदुशत्रूंना गाय करून सोडतो, तोच हिंदु राष्ट्ररक्षक, तोच हिंदू खरा गोरक्षक. जे राष्ट्ररक्षण तेच गोरक्षण.'

## गोपालन हवे, गोपूजन नको

'गाय देवता म्हटली, गोपूजन हे कर्तव्य म्हटले, की मनुष्य हा गाईसाठी आहे अशी श्रद्धा उत्पन्न होणारच होणार. पण मनुष्यास गाईचा उपयोग आहे म्हणून तिचे पालन करणे उचित इतकाच गोपालनाचा अर्थ स्पष्टपणे मर्यादिलेला असला की मनुष्यास उपयुक्त होण्याच्या ठायीं गाय ही राष्ट्रहानीस कारणीभूत होत आहे असे पाहताच अशा परिस्थितीत गोरक्षण हेच त्याज्य, निंद्य, पाप होणारे आहे हे न शिकविताही आपोआप समाजास समजत असते. गाय ही मनुष्यासाठी असून मनुष्य हा गाईसाठी नाही या सूत्राप्रमाणे मनुष्याचे, राष्ट्राचे एकंदर हित साधत असेल तर गोहत्याही करण्यास कोणीही कचरणार नाही'

'वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, मनुष्याला अधिकाधिक उपयोग ज्या योगे होईल अशा प्रकारेच गाईची जोपासना करावयाची असेल तर तो हेतू साधण्यास गोपालन हे राष्ट्राचे कर्तव्य होय असे सूक्त राष्ट्रापुढे ठेवले पाहिजे. गोरक्षण हा धर्म आहे, ते ऐहिक नि पारलौकिक पुण्य आहे, गाय ही देवता आहे, इतकेच नव्हे, तर तिच्यात एक सोडून तीस कोटी देवता राहतात प्रभृति बाष्कळ

कल्पनांवर अनुष्टुपे रचून गोपूजन हाच हिंदुधर्म आहे हे सूत्र राष्ट्रापुढे ठेवल्याने गाईचे रक्षण तर हवे तसे होत नाहीच, पण भाबडेपणाची प्रवृत्ती राष्ट्रात वाढून गोभक्तीपायी राष्ट्रभक्तींचेच खोबरे होते. मनुष्याच्या हिताचाच बळी गायीपुढे देण्यात येऊन गोरक्षणातील मूळ हेतूलाच धोका पोचतो. कितीही उपयुक्त असला तरी तो एक पशू. त्या गाईला देवता मानल्याने सामान्य लोक तिची जोपासना उत्कटपणे करतील म्हणून तिला देवता मानावी, गोपूजन हा धर्म मानावा, ही समजूत अशी खुळचट ठरते, समाजाच्या बुद्धिहत्येस कारणीभूत होते.'

## गोपालक अमेरिका

'तेव्हा आमची साऱ्या गोरक्षक संस्थांस अशी विनंती आहे की, त्यांनी गोपालक बनावे, वैज्ञानिक साधनांनी मनुष्यास त्या पशूचा अधिकाधिक उपयोग कसा करता येईल ह्याच काय त्या दृष्टीने तिची अमेरिकेसारखी सकस नि सुरेख वीण वाढवून, आरोग्य वाढवून जोपासना करावी, गोरक्षण करावे, राष्ट्रांचे गोधन वाढवावे. परंतु त्या नादात भाबडेपणाची भेसळ होऊ देऊन पशूला देव करून पूजण्याचा मूर्खपणा करू नये. गाईंचे कौतुक करायचे तर तिच्या गळ्यात घंटा बांधा– पण कुत्र्याच्या गळ्यात आपण पट्टा घालतो त्या भावनेने. देवाच्या गळ्यात आपण हार घालतो त्या भावनेने नव्हे. हा प्रश्न एका फुटकळ धर्मसमजुतीचा नाही. अशा धार्मिक छापाच्या ज्या शेकडो खुळचा समजुती आपल्या लोकांची बुद्धिहत्या करीत आहेत त्या भाकड प्रवृत्तींचा आहे. तिचे एक उपलक्षण म्हणून आम्ही गाईची गोष्ट तेवढी निवडली, (समग्र सावरकर खंड ३ मधील लेखावरून संकलित).'

धार्मिक भाबडेपणाचे एक प्रतीक म्हणून गाईच्या प्रश्नाची क्षकिरण चिकित्सा सावरकरांनी केली, तसेच रोगराई, नैसर्गिक संकटे यांची जी धार्मिक उपपत्ती लावली जाते– सावरकर तिला धार्मिक छाछू म्हणतात– तिचाही अंतर्भाव सावरकर अज्ञानयुगातच करतात आणि विचारतात, 'धार्मिक छाछूंचे अज्ञानयुग संपून भारतात विज्ञानयुग कधी उगवेल ?' या प्रश्नावर लिहिलेल्या लेखात 'धार्मिक छाछूंचे कार्यकारणभाव' यात बिहारमध्ये त्या काळी झालेल्या भूकंपाचे कारण अस्पृश्यता हे आहे असे गांधीजी म्हणाले होते त्याचा उल्लेख करून सावरकर म्हणतात, 'देश अजूनही धार्मिक छाछूच्या अज्ञान-

युगातच गुरफटलेले, सृष्टिनियम नि भौतिक कार्यकारणभाव समजून घेऊन त्यांच्या आधारे सृष्टीवर मनुष्यास शक्य ती सत्ता गाजविण्याचे सामर्थ्य देणारे विज्ञानयुग जेव्हा हिंदुस्थानात उगवेल, तेव्हा कोणी हिंदी वैज्ञानिक आमची सगळी मुले गोरीपानच हटकून कशी निपजतील याचा अमोघ उपाय खाडकन शोधून काढील, यात आम्हांस फारसा संशय वाटत नाही. कारण सृष्टीत तशी सोय आहे हे प्रत्यक्ष दिसत आहे.

'मानव जातीवर येणाऱ्या उत्पात–अपघातादिक संकटांपासून बचाव करण्याचे उपाय शोधण्यासाठी अज्ञानाच्या धार्मिक छाछूंची वाट सोडून विज्ञानाच्या कार्यकारणभावांची वाट चोखाळू लागताच त्यांना मनुष्यावर कोसळणाऱ्या एकेका अरिष्टावर कधीही न फसवणारा असा एकेक अमोघ उपाय सापडू लागतो पाहा.'

## पाण्यात न बुडणारी नौयाने

'आजवर महासागरात किंवा नद्यांमध्ये लहान–मोठ्या नौका, तारवे, प्रचंड बाष्पनौका बुडून कोट्यवधी माणसे पाण्यात तडफडत मेली असतील. समुद्रदेवतेला प्रसादण्यासाठी नारळ फेकून मचवे हाकारतात, पण तरीही तारू एकदा का फुटले की प्रार्थनांचे पर्वताएवढाले वोळे जरी त्यात कोंबले तरी ते भोक बुजत नाही, हा अनुभव मनुष्यास आज हजारो वर्षे सारखा येत आहे. समुद्रात तारवे बुडण्याचे बंद करणारा उपाय अज्ञानाच्या धार्मिक छाछूंत सापडला नाही तो नाहीच. परंतु ती झालेली दिशाभूल सुधारून समुद्रात तारवे बुडतात त्याची सृष्टिशास्त्रीय कारणे शोधण्यासाठी विज्ञानाची खरी दिशा धरताच तो उपाय मनुष्याच्या आटोक्यात आला.'

सावरकरांच्या विज्ञानबोधात यंत्र व यंत्रशील मनोवृत्ती यांना महत्त्वाचे स्थान आहे. भारतात गांधिजींची चळवळ १९२० साली सुरू झाल्यावर यंत्राबद्दल एक प्रकारचा तिरस्कार निर्माण होण्याची भीती सावरकरांना वाटत होती. यंत्रयुगाचे स्वागत करण्याऐवजी त्याला विरोध होईल, निदान मानसिक प्रतिकार होईल असे त्यांना वाटत होते. भारतीय मन हे धर्मभोळे व देवभोळे असल्याने अशा प्रकारच्या भोंगळ प्रवृत्ती सामाजिक मनाचा ताबा घेतील असे त्यांना वाटू लागले. भारताला औद्योगिक क्रांतीचे लाभ त्या वेळी मिळाले नाहीत. पण आता धर्मभोळ्या व देवभोळ्या वृत्ती जर प्रबळ झाल्या आणि त्यामुळे यंत्रद्वेष निर्माण झाला तर ती एक फार मोठी धोंड

ठरेल असे त्यांना वाटे. युरोप हा आधुनिक संस्कृतीने प्रबळ झाला म्हणून भारताने श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्कृतीचा मार्ग सोडून अद्ययावत बनले पाहिजे ही सावरकरांची भूमिका. म्हणून त्यांनी आपल्या सामाजिक निबंधांद्वारे यंत्रशक्ती, यंत्रविज्ञान, यंत्रशीलपणा यांचा तुफानी प्रचार सुरू केला. यंत्रावर घेतल्या जाणाऱ्या अनेक आक्षेपांना उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. सावरकर यंत्राला विज्ञानाची मूर्ती म्हणत होते. सावरकर समाजातील देवभोळेपणा कमी व्हावा यासाठी प्रचार करीत होते. कारण जसा देवभोळेपणा कमी होतो त्या मानाने समाजातील यंत्रशीलपणा वाढतो असा त्यांचा सिद्धांत होता. तो स्पष्ट करून सांगताना सावरकर म्हणतात– 'आपल्या लोकांत अजूनही यंत्रशीलपणा जो इतका कमी आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे आमच्या समाजातील देवभोळेपणा अजूनही उतास जात आहे हेच होय. दोनशे वर्षांपूर्वी युरोपही ख्रिश्चन धर्मानुसार असाच देवभोळा होता, तेव्हा त्यातही यंत्रशीलपणा नव्हता. लिस्बनला मोठा भूकंप अठराव्या शतकात झाला. तेव्हा त्याचे कारण; रोमन कॅथॉलिक धर्ममतांविरुद्ध उभारलेले प्रॉटेस्टंटाचे पाखंड हेच होय, असे युरोपियन लोकांच्या मोठमोठ्या धर्मगुरूंनी नि सामान्य जनतेने ठरविले. प्रॉटेस्टंट लोकांत भिक्षुणींनी लग्न लावली. पाद्री लोक बायका करतात, पोपचा शब्द अस्खलनीय (इनफॅलिएबल) नि शिरसावंद्य मानीत नाहीत, या 'पापा' मुळे भूकंप झाला असे निदान ठरवून त्या धर्मभोळ्या लोकांनी भूकंप होऊ नये म्हणून प्रॉटेस्टंटांचाच नायनाट हा उपाय शोधून काढला. अशा देवभोळ्या वृत्तीला भूकंपाची खरी भौतिक कारणे शोधण्याची बुद्धीच होणे दुर्घट. मग भूकंपाचे नियम समजावून घेऊन त्याचे धक्के कधी वा कुठे बसणार ते आगाऊ सुचविणारे भूकंपसूचक यंत्र बनविण्याचे काम जन्मोजन्मीदेखील सुचणेच शक्य नाही. यूरोपमध्ये ही देवलसी वृत्ती हाणून पाडणारी विज्ञानवृत्ती जेव्हा उगवली तेव्हाच काय ती त्या विज्ञानाच्या नियमांवर अधिष्ठिलेली यंत्रशीलता भरभराटू शकली. पण हिंदुस्थानात आजही अगदी राष्ट्राचे सर्वाधिकारी म्हणून गाजणारे गांधीजींसारखे अनेक पुढारीदेखील बिहारमधल्या भूकंपाचे कारण अस्पृश्यतेचे 'पाप' म्हणून 'आतल्या दैवी आवाजाच्या' शपथेवर सांगत आहेत, आणि क्वेट्टयाच्या भूकंपाचे कारण मनुष्यजातीचे कोणते पाप असावे ?

'जोवर युरोप असे आमच्यासारखेच देवभोळे होते, तोवर तेही आम्ही आज आहो तसेच दुबळे होते. दोनशे वर्षांच्या आगेमागे, त्याचा देवभोळेंपणा हटत चालला तसतसे त्याचे बळ, संपत्ती, साम्राज्य भरभराटत चालली. पण हिंदुस्थानच नव्हे, तर अवघा आशिया त्याच देवभोळेपणाच्या गुंगीत खिचपत पडला. त्यामुळे विज्ञानाची वाट त्यास सापडलीच नाही. युरोप सृष्टिशक्तींना आपल्या प्रगतीच्या रथास घोडयासारखे जुंपून भरधाव दिग्विजय करीत चालला असता आशिया त्या सृष्टिशक्तींना पूजीतच राहिला. त्यामुळे आशियात *यंत्रशीलपणा असा आलाच नाही* पाहा, गेल्या हजार वर्षांमध्ये हिंदूंत काय किंवा मुसलमानांत काय, एकंदरीत वैज्ञानिक शोध असा एकही लागलेला नाही, नवीन यंत्र असे, हत्यार असे, कळ अशी गेल्या हजार वर्षांत आम्ही जवळजवळ एकही उद्‌भवली नाही. साधी चाकी (सायकल), साधे घडयाळ, साधा शिळाछाप, साधे छायाचित्र– पण युरोपने शोधले तेव्हा सुचले, आम्हांस काही सुचले नाही. हिंदू धर्मभोळेपणाची नि मुसलमान धर्मवेडेपणाची नशा पिऊन झिंगून पडलेला. मुसलमानांच्या दिल्लीच्या बादशहाला शस्त्रवैद्य इंग्रजांकडून मागवावा लागला, तर एका पुलाखालचे पाणी आटवावयासाठी हिंदुपतीच्या फडणिसाला एक यंत्रशिल्पी, एक इंजिनिअर इंग्रजांकडून मागवावा लागला. मुसलमानांचे सारे देववेडे पीर, मुल्लाहकीम, गंडाताईत जी व्याधी बरी करू शकले नाहीत ती त्या इंग्रज शस्त्रवैद्याने बरी केली. अनुष्ठान जपतपांनी जो पुलाचा पाया हिंदूंना घालता आला नाही, तो त्या इंग्रज इंजिनिअरने घालून टाकला. पण तरीदेखील इंग्रजांच्या यंत्रशीलपणाने त्यांचे विज्ञान असे वाढत चालले आहे. त्यांची एकेक कळ त्यांचे बळ कसे दुर्जय बनविते आहे, आपणांस दुबळाविते आहे, हे त्या वेळी आमच्याकडे कोणाच्या लक्षात यावे तसे आले नाही. यंत्रविद्येचा ओनामादेखील शिकावयास कुणी युरोपमध्ये गेला नाही. जात जाते ना आमची समुद्र ओलांडण्याने !

' पण आमच्यात पूर्वी सामर्थ्य असताही आम्ही जगावर चालून गेलो नाही याचे प्रायश्चित्त आम्हांस देण्यासाठी जग आमच्यावर चालून आले. युरोपच्या अवाढव्य यंत्रबळाच्या कैचीत आमच्या राष्ट्राचा, स्वत्वाचा, आमच्या एका गोष्टीवाचून साऱ्या इतर गोष्टींचा चुराडा उडाला. एक गोष्ट तेवढी जी आमची म्हणून

टिकली आहे, तिला युरोपचे यंत्रबळही अजून चिरडू शकले नाही. ती म्हणजे आमचा धर्मभोळेपणा. भौतिक संकटे निवारण्याचे, सृष्टि-शक्तींना राबविण्याचे, भौतिक सामर्थ्य संपादिण्याचे साधन म्हणजे विज्ञान आणि यंत्र.

## देवभोळेपणा की यंत्रशीलपणा ?

' देवभोळेपणा म्हणजे प्रत्येक घटनेचे कारण देवाची लहर, राग वा लोभ. आणि त्या घटनांपैकी संकटघटना टाळण्याचा उपाय म्हणजे देवाला प्रसादविणे अर्थात त्याचे यंत्र म्हणजे प्रार्थना, पूजा, सत्य-नारायण, जपजाप्य, छाछू. परंतु यंत्रशीलपणा हा या सृष्टीतील भौतिक व्यापार व ठराविक सृष्टिनियमांचे फलित होय आणि जर हे घटक आपण त्या नियमाप्रमाणे जुळवून आणू शकलो तर ते कार्य घडलेच पाहिजे. विज्ञानजन्य निश्चिती ही यंत्रशीलपणाची जननी असते. यामुळेच लोकांतील देवाभोळेपणा ज्या मानाने घटतो त्या-मानाने विज्ञाननिष्ठ यंत्रशीलपणा त्यांच्यात वाढतो.

' धर्मभोळेपणाच्या अनुष्ठानाने जे भौतिक सृष्टिनियम असतात त्यांच्या व्यापारात लवलेशही फरक होत नाही. पण त्या नियमांची जी कळ त्यांना राबविणारे जे यंत्र, ती कळ दाबताच त्यांचे व्यापार हवे तसे चापून करून घेता येतात. देवाची इच्छा ही संज्ञा यंत्र-शास्त्राच्या कधीच खिसगणतीत नसते. यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धान्तच असा त्यांच्या पाठात ईश्वराच्या इच्छेचा वा धर्मशास्त्रीय पापपुण्याचा वा ज्योतिषी शकुनाचा कोणताही घटक दमडीच्या उधारीनेही गण-लेला नसायचा.

## यंत्र हे शाप की वरदान ?

' यंत्राचे साधन मनुष्याच्या हाती असल्यामुळे मनुष्याची हानी होत आहे, तो दुबळा बनत आहे, दुःखी बनत आहे, दरिद्री बनत आहे. यंत्र हा मनुष्यजातीला झालेला शाप होय, अशी यंत्राविरुद्ध जे ओरड करतात त्यांनी हे लक्षात ठेवावे की, यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शत-पटीने अधिक कार्यक्षम झालेले मनुष्याचे एकेक इंद्रियच आहे. कळ म्हणजेच इंद्रियाची वाढलेली कार्यक्षमता. हत्यार म्हणजेच हाता-हूनही दसहत्यारी असा आपला अेक जोडहात. यंत्रे म्हणजे आपल्या मूळच्या शक्तीपेक्षा लक्षपटीने शक्तिमान झालेली आपली बहिश्चर इंद्रिये. जर हत्यार, कळ, यंत्र नसते तर मनुष्य सृष्टिशक्तीवर आज चालवीत असलेली सत्ता चालवू शकता ना. इतके सांगणे म्हणजे

यंत्रशक्तीच्या उपयुक्ततेचे अगदी त्रोटक वर्णन होय. यंत्रावाचून, कळीवाचून मनुष्य जीवनकलहात जगूच शकता ना ! कोल्हा, कुत्रादेखील त्याला भारी होता, फाडफाडून खाता. मनुष्यास झालेल्या यंत्रबळाच्या साहाय्याविषयी असे म्हटले तरीदेखील अतिशयोक्ती होणार नाही की शरीराने पाहिले तर मनुष्य हा अत्यंत दुबळा, कळीनेच काय तो प्रबळतम ठरला.

## यंत्राने का बेकारी वाढते ?

'यंत्रामुळे बेकारी वाढते, साधी राहणी बिघडते, श्रीमंत भिकारी असा वर्गकलह पेटतो, सारी कामे यंत्रच करू लागले तर मनुष्य रिकामपणाने गंजून निकम्मा होऊन पडेल, काम करण्याच्या, निढळाच्या घामाने मिळविलेली भाकरी खाण्याच्या आनंदास अंतरेल, तो इंद्रियांचा दुबळा, मनाचा अनुदार, अंगाचा जरत्कारू बनेल, आणि यंत्राचाच दास होऊन पडेल, इत्यादी सारी ओरड पूर्णपणे असमंजसपणाची नि भेकडपणाची असून आजच्या समाजरचनेच्या विषमतेचे हे दोष केवळ साहचर्यामुळे हे भाबडे अडाणीपण यंत्रावर लादीत असते. घराचा आधारस्तंभ असा खांब, पण आचरटपणे किंवा आंधळेपणे डोक्यात धाडकन लागताच, चिडखोर मूल जसे तो दोष आपल्या अवखळ वर्तनाचा नसून खांबाच्याच मारक्या स्वभावाचा आहे असे समजते आणि खांबासच माझ्या डोक्यावर आपटलास काय ? म्हणून काठीने सडकू लागते, तसाच हा चिडखोर असमंजसपणा यंत्रांचा सदुपयोग न करता आल्यामुळे समाजरचनेतील विषमतेच्या दोषाने वर्गावर्गाचे चाललेले अर्थयुद्ध, निष्पीडन (इक्स्प्लॉइटेशन) सत्त्वशोषण, बेकारी, श्रमिकांची पिळणूक, दाटीची राहणी प्रभृती माणसांच्या दोषांचे खापर त्या दोषाशी कोणताही अपरिहार्यता अंगभूत संबंध नसलेल्या यंत्राच्या डोक्यावर फोडीत असतो. त्यातील हेत्वाभास ध्यानी घेऊन आपल्या राष्ट्राने लेशमात्र न बिचकता आता ह्या यंत्रयुगाचे मनःपूर्वक स्वागत करावे.

## रशियाचा वस्तुपाठ

'यंत्रापासून जो आहे तो तो लाभच आहे. यंत्राच्या दुरुपयोगास टाळून सामुदायिक सदुपयोग कसा करावा ह्याचा आर्थिक वस्तुपाठ रशिया आज स्वतःला नि जगाला देतच आहे. जर यंत्राने बेकारी वाढत असती नि मनुष्य दुबळावत असता, तर आज सामुदायिक यंत्रप्रयोगात प्रचंड प्रमाणावर ज्याचे सारे राष्ट्रीय बळ एकवटलेले

आहे, भांडवल गुंतविलेले आहे तो रशिया, साऱ्या जगातला भिकार, साऱ्या जगातील दुःखी नि दुबळा झाला असता. पण आज वीस वर्षांच्या प्रयोगानंतरही वस्तुस्थिती अगदी उलट आहे. यंत्रशक्तीमुळे रशिया हे आज जगातील प्रबळांतले प्रबळ, संपन्नांतील संपन्न, प्रत्येक-जणास काम, अन्नवस्त्र नि आनंद समतेने उपभोगू देणारे राष्ट्र झालेले आहे.' (समग्र सावरकर खंड–३, पान–३८०–४०१ यांतून संक्षिप्त)

## रशियातील जीवनक्रांती

रशियामध्ये बोल्शेव्हिक क्रांती झाल्यावर जी उलाढाल झाली ती काही इतर अनेक क्रांत्यांप्रमाणे केवळ राजकीय काय ती नव्हती किंवा इतर अनेक सामाजिक वा धार्मिक क्रांत्यांप्रमाणे निव्वळ धार्मिक वा सामाजिक कक्षेतच काय ती सामावलेली नव्हती. तिचे आनुवंशिक परिणामच नव्हते तर तिचा हेतूच तिचे सुस्पष्ट ध्येयच मुळापासून मनुष्यसमाजाची रचनाच नव्या पायावर करावयाचे होते. राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक– समाजाचे सर्व पैलू नव्याने पाडावयाचे काम त्या क्रांतीने हाती घेतले होते, तिला मानवी समाजाच्या जीवनाचीच दिशा बदलावयाची होती. ती एक नुसती राज्यक्रांती, एक नुसती धर्मक्रांती, एक नुसती अर्थक्रांती किंवा एक नुसती समाजक्रांतीच काय ती नव्हती, तर ती रशियन क्रांती होती एक जीवनक्रांती.

प्रत्येक क्रांती हा प्रयोग असतो. आजवरच्या साऱ्या क्रांत्यांमध्ये अधिक सर्वंकष नि मानवी जीवनच बदलू पाहणारी रशियन क्रांती ही त्याच कारणासाठी एक अत्यंत अपूर्व, सर्वंकष, जितक्या धाडसाचा तितक्याच धोक्याचा असा मनुष्यसमाजाने केलेला एक मोठ्यांतील मोठा सांघिक प्रयोग होता.

त्याच्या पंधरावीस वर्षांच्या अनुभवानंतर आता असे म्हणावयास हरकत नाही की, तो कल्पनेबाहेर यशस्वी झाला आणि अपेक्षेबाहेर फसला. दोन्हीपक्षी मनुष्याच्या ज्ञानात नि अनुभवात त्या प्रचंड प्रयोगाने अपूर्व नि अमूल्य भर टाकली.

## सावरकरविचाराचे मूलगामित्व

सारांश, विज्ञानवाद हे सावरकरांच्या सामाजिक विचारसरणीचे मूलभूत तत्त्व आहे. सावरकरांची हिंदू अहंता, त्यांचा हिंदू अस्तित्ववाद आणि विज्ञानवाद ही परस्पर निगडित आहेत. हिंदूंनी आपल्या

अभ्युदयासाठी समाजकारणात विज्ञाननिष्ठ दृष्टी अवलंबिली पाहिजे आणि अर्थकारणात यंत्राचे व आधुनिक तंत्रविज्ञानाचे वर्चस्व स्थापन केले पाहिजे ही सावरकरांच्या समाजक्रांतीची दोन मुख्य सूत्रे आहेत. सावरकर हिंदुराष्ट्रवादी होते. त्यांचा वैचारिक पिंड बुद्धिनिष्ठ व विज्ञानवादी होता. समर्थ व उन्नत हिंदुराष्ट्र हे त्यांचे स्वप्न होते· त्यांच्या डोळ्यासमोर जीवनक्रांती घडवून आणलेला रशियन होत, आणि धर्मग्रंथावर आपली समाजरचना यापुढे आधारता कामा नये· सर्व रूढींना, सामाजिक संस्थांना, आचारधर्मांना वैज्ञानिक दृष्टिकोणातून तपासून नवी हिंदुस्मृती तयार केली पाहिजे हा सावरकरांच्या विचारांचा रोख आहे. केवळ हिंदूंनीच नव्हे तर मुसलमान, ख्रिश्चन, आदी सर्वांनी धर्मवेड टाकून विज्ञानवेडे झाले पाहिजे हा सावरकरांचा व्यापक दृष्टिकोण आहे. सावरकरांची मांडणी किंवा त्याचे संबोधन हिंदूंना उद्देशून केलेले असलें तरी त्यांची ती संकुचित मर्यादा नव्हती, तर आखून घेतलेले कार्यक्षेत्र होते. सावरकरांचा विज्ञानवाद हा राष्ट्रनिष्ठ आहे. आणि त्याचा राष्ट्रीय प्रचार झाला पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. सावरकर हे विज्ञाननिष्ठ सामाजिक समीक्षक व विचारवंत होते. १९३७ नंतर त्यांनी जो हिंदुत्वाचा राजकीय पुरस्कार केला, हिंदुत्वामागे राजकीय शक्ती उभी करण्याचा प्रयत्न केला, हिंदुत्वाचे जे राजकारण केले त्यामुळे सावरकरांविरुद्ध सारे हिंदी राष्ट्रवादी उभे राहिले. सावरकरांचे विज्ञानवादी, ऐहिक अभ्युदयाचा, राष्ट्रीय सामर्थ्याचा ध्यास घेतलेले व्यक्तित्व राष्ट्रापुढे आलेच नाही. सावरकरांनीही १९३७ नंतर आपला समग्र सामाजिक विचार मांडला नाही. त्यामुळे हिंदुत्व ही एक प्रतिगामी, समाजाला मागे नेणारी संकल्पना ठरली. तिचे इहवादी, विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी सावरकरांना अभिप्रेत असलेले रूप समाजापुढे आलेच नाही. सावरकरांच्या राजकीय अपयशामुळे त्यांचे पुरोगामित्व विरोधकांनी कधी समजून घेतलेच नाही. सावरकरांच्या राजकीय शोकान्तिकेची चर्चाच झाली आणि एखाद्या नाटकातील धीरोदात्त, पण दुर्दैवी नायकाबद्दलची जी अनुकंपा वाटते तशा प्रकारच्या भावनेने सावरकरांना समजून घेऊ शकणारे विचारवंत बोलू व लिहू लागले. म्हणून सावरकरांचा विज्ञानबोध त्यांच्या लेखातच राहिला, जो समाजाला समजावून दिला गेलाच नाही.

पण कोणत्याही विचारप्रणालीचा विचार यश किंवा अपयश याचा

निकष लावून करता कामा नये. त्या विचाराचे मूलगामित्व व त्याची परिवर्तनासाठी असलेली उपयुक्तता हे दोन निकष लावूनच त्यांची फेरमांडणी करावयास हवी. बुद्धाचा विचार २५०० वर्षांनंतर पुन्हा तपासावा असे आजही सामाजिक व राजकीय विचारवंतांना व नेत्यांना वाटते यातच त्याची मौलिकता आहे. तीच गोष्ट सर्व परिवर्तनक्षम सामाजिक विचारांची आहे. सावरकरांचा सामाजिक विचार असाच पुन्हा तपासून पाहावयास हवा आहे.

भारताचा सामाजिक व भौतिक अभ्युदय व्हावयाचा असेल तर त्याला धर्मभोळेपणापासून, पोथीच्या वर्चस्वापासून मुक्त केले पाहिजे. हे कार्य नुसते वैचारिक नाहीं, प्रत्यक्ष समाजात मिसळून समाज बदलण्याचे आहे. म्हणून सावरकर म्हणाले होते, की हेटाळणीने नव्हे, रागाने नव्हे, तर परिवर्तन झाले पाहिजे या तळमळीने, समाजाच्या ओलाव्याने समाजसुधारणा घडवून आणली पाहिजे. म्हणूनच हिंदुत्वाचा अभिमान, हिंदुत्वाच्या अभ्युदयाची आकांक्षा आणि हिंदुसमाजसुधारणा या परस्पर सहायक असली पाहिजे असे सावरकरांचे मत होते व तेच त्यांनी आयुष्यभर आचरिले. ◘

# ४. आधुनिकतेचे बुद्धिनिष्ठ प्रचारक

सावरकर हे हिंदू समाजाला आधुनिक करू इच्छिणारे समर्थ प्रचारक होते. समाजसुधारणेचा त्यांचा विचार निश्चित दिशा दाखविणारा आहे. युरोपच्या ऐहिक वैभवाचे व सामर्थ्याचे प्रत्यक्ष रूप सावरकरांनी पाहिले होते. हिंदू समाजाची अवनती केवळ गुलामीमुळे झाली नसून त्याला मागे खेचणाऱ्या, पुढे जाऊ न देणाऱ्या 'पुरातना'च्या व त्यातून उद्‌भवलेल्या सात बेड्या प्रामुख्याने कारणीभूत झाल्या आहेत. केवळ हिंदूच नव्हे तर भारतीय मुसलमानही याच पुरातनाचे दास आहेत. म्हणून सावरकर विज्ञानयुगाचा प्रचार करू लागताच त्यांनी आधुनिकतेची तुतारी फुंकली. महाराष्ट्रात व भारतात न्या. रानडे यांनी आधुनिकतेची ही जाणीव ठेवून भारताच्या आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेचा विचार मांडला होता, पण भारतातील पहिले सर्व समाजसुधारक धर्मनिष्ठ होते. सावरकर मात्र पारलौकिकाचा, परमार्थाचा विचार बाजूला ठेवून धर्म हाच कसा भोळेपणा, अंधश्रद्धा, पुराणप्रियता निर्माण करण्यास कारणीभूत होतो हे परखडपणे सांगत. हाच इतर समाजसुधारकांमधे आणि सावरकरांमधे फरक होता. समाजाचा ऐहिक विचार ऐहिक मार्गांनीच केला पाहिजे हा सावरकरांचा सिद्धांत होता. म्हणूनच विज्ञान हा समाजाच्या पुनर्घटनेचा पाया झाला पाहिजे हे स्पष्ट सांगावयास सावरकरांनी सुरुवात केली.

'सनातन धर्म कोणता' याची चर्चा करताना धर्माची जी पारलौकिक, पारमार्थिक तत्त्वे म्हणून सांगितली जातात ती किती ठिसूळ व अविश्वसनीय पायावर उभी असतात याची चर्चा केली आहे. सावरकरांनी म्हटले आहे, 'मनुष्यजातीच्या हाती असलेल्या यच्चयावत धर्मग्रंथांतून जे नियम (पारलौकिक प्रकरणी) दिलेले आढळतात त्यांतील एकासही सनातन धर्म अपरिवर्तनीय, निश्चित सिद्धांत

असे म्हणता येत नाही. निश्चित झालेल्या वैज्ञानिक नियमांप्रमाणे धर्मग्रंथातील हे पारलौकिक स्थितीचे वर्णन प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगाच्या कसोटीस मुळीच उतरलेले नाही.' (स. सावरकर खंड–३ पान–३१२) म्हणून सावरकरांचा निष्कर्ष असा आहे की पारलौकिक वस्तुस्थितीचे प्रयोगसिद्ध ज्ञान अद्याप मुळीच झालेले नाही. म्हणून तो विषय अद्याप प्रयोगावस्थेत आहे असे समजून त्याविषयी आस्तिक वा नास्तिक काहीच मत करून घेणे अयुक्त आहे. पण मनुष्याचे जे ऐहिक व्यवहार पारलौकिक जगतात त्यास उपकारक ठरतीलसे वाटते, त्या पारलौकिक जगात त्याचे धारण करतील असे भासते तेही धर्मच मानण्यात यावेत.

पण सावरकरांनी स्वीकारलेली धर्माची व्याख्या समाजाची धारणा करू शकतो तोच धर्म हीच आहे. हीच कसोटी सर्व धर्मांना लावली पाहिजे असे त्यांचे ठाम मत आहे. तसेच ऐहिक आचार परिवर्तनीय असतात असा महाभारताचा दाखला देऊन सावरकर सांगतात, 'आचार, रूढी, निर्बंध हे सारे मनुष्यामनुष्यांतील ऐहिक व्यवहाराचे नियम परिस्थिती पालटेल तसे पालटीतच गेले पाहिजेत. ज्या परिस्थितीत जो आचार वा निर्बंध मनुष्याच्या धारणास आणि उद्धारास हितप्रद असेल तो त्याचा त्या परिस्थितीतील धर्म, आचार, निर्बन्ध. 'नहि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्तते तेनैवान्यः प्रभवति सो परो बाधते पुनः' (म. भा. शांतिपर्व)–' (स. सा. खंड ३ पान ३१५).

## आंधळी धर्मभावना टाका

सारांश, धर्माचा आचार हा जो भाग आहे तो परिवर्तनीय असून कालसापेक्ष आहे. सावरकरांचे म्हणणे असे की, प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादी शास्त्र ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयात सन्मानाने ठेवून आता विज्ञानयुगाचे पान उलटले पाहिजे. या ग्रंथाचा 'काल' काय झाले हे सांगण्यापुरताच अधिकार. 'आज' काय योग्य ते सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ अद्यतन विज्ञानाचा.

या अद्ययावतपणात मागच्या सर्व अनुभवांचे सारसर्वस्व सामावलेले असतेच... श्रुतिस्मृतिपुराणादी हे सारे ग्रंथ आम्ही अत्यंत कृतज्ञ आदराने सन्मानतो. पण ऐतिहासिक ग्रंथ म्हणून. अनुल्लंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे. त्यांचे सारे ज्ञान नि सारे अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्ही लावणार आणि नंतर राष्ट्रधारणास, उद्धारास, जे अवश्य वाटेल ते बेधडक आचरणार. म्हणजेच आम्ही अद्ययावत

बनणार, अप-टु-डेट बनणार... कालपर्यंतच्या सर्व ज्ञानाची कसोटी घेऊन आणि उद्याच्याही क्षितिजांचे दिसू शकेल तितके रूपरंग पाहून मग जे आज राष्ट्रहितास उपयुक्त ठरेल ते त्यास त्या जुन्या पोथ्यांचा शास्त्रार्थ सापडला नसला तरी, बेधडक आचरिले पाहिजे. प्रयोगांती जे आज सत्य वा उपयुक्त ठरते ते, अमक्या जुन्या पोथीत त्यास आधार नाही म्हणूनच केवळ टाकाऊ ठरू नये. तशी अट जो घालतो तो शास्त्राधार आम्हांस तेवढा नको आहे. पण ह्याचा अर्थ शास्त्रे पाहूच नयेत असा काढणे हे निवळ कुभांड होय.' (किर्लोस्कर, सप्टेंबर १९३४).

वरील उताऱ्यावरून हे स्पष्ट होईल की कालपर्यंतच्या जुन्यातील जे प्रयोगांती आजही उत्तम ठरते, विज्ञानाच्या कसोटीस टिकते, ते ज्ञान तर आम्ही टाका म्हणत नाहीच, पण ते जुन्यातील जे जे आजच्या विज्ञानाच्या कसोटीत अज्ञान ठरते तेही समाजशास्त्र नि मानसिक शास्त्रदृष्टया आम्हांस टाकाऊ वाटत नाही. त्या पुरातन सर्व बऱ्यावाईट अनुभवास जमा धरून आजच्या विज्ञानाच्या कसोटीने जे राष्ट्रधारणास आज उपयुक्त ठरते, तेच बेधडक आचरावे. उद्या बदलत्या परिस्थितीत वा वाढत्या वैज्ञानिक ज्ञानात जर तेही चुकीचे नि अहितकारक ठरेल तर तो आमचा आजचा विचार बदलण्यास 'उद्या' ही तसाच स्वतंत्र आहे. केवळ कालच्या पोथीच्या शब्दाने 'आज' बांधलेला नसावा. 'उद्या' तर नसावाच नसावा. या विज्ञाननिष्ठ मतासच आम्ही अद्ययावतपणा म्हणतो. अद्यतनी प्रवृत्ती ती हीच,' (समग्र सावरकर खंड ३, पान ३७६-३७७).

## कुराणीय सनातनी वृत्ती

सावरकरांनी हिंदूंना श्रुति-स्मृति-पुराणाची बेडी तोडून अद्यतन व विज्ञाननिष्ठ असे होण्यास सांगितले तोच सल्ला त्यांनी भारतीय मुसलमानांना दिला. सावरकरांनी सांगितले, 'आमच्या हिंदू राष्ट्रातील आजच्या वैज्ञानिक युगात टाकाऊ असणाऱ्या खुळचट रूढी, व्रते, मते ही त्यांनी सोडावी हे वारंवार सांगणे जसे आमचे कर्तव्य आहे, तसेच हिंदुस्थानी राष्ट्राचे आज अपरिहार्य उपांग असलेल्या मुसलमानी समाजासही आमचे सांगणे हेच आहे की, तुमचा समाजही ज्या धर्मवेडाच्या रानटी समजुतींनी नि क्रूर आचारांनी बुजबुजला आहे ते उपद्रवी आचार व क्रूर धर्मवेड तुम्ही शक्य तितक्या लवकर सोडणे तुमच्याच हिताचे आहे. हिंदूंवर उपकार करण्यासाठी नव्हे, हिंदू त्या

तुमच्या धर्मोन्मादास भितात म्हणून नव्हे, तर तुमच्या माणुसकीसच तो बट्टा आहे म्हणून, आणि विशेषतः एका जुनाट मागासलेल्या संस्कृतीलाच घट्ट बांधून घेऊन कालाच्या मार्गात आडवे पडाल तर विज्ञानाच्या टाचेखाली तुम्हीही निःसंशय चिरडून जाल म्हणून, तुम्ही ती कुराणास त्रिकालाबाधित ईश्वरोक्त अक्षर नि अक्षर अनुल्लंघनीय मानणारी सनातन प्रवृत्ती सोडून कुराणाचा योग्य तो सन्मान राखीतच पण त्यातील त्या कालच्या भांडणतट्यास नि अरबस्थानसारख्या त्या काळी मागासलेल्या नि आम्ही तुच्छलेल्या एका आकुंचित जमातीस ते बरे वाटले म्हणूनच काय ते ते निबंध त्रिकालाबाधित न मानता मनुष्यजातीच्या हितास जे आज उपयुक्त ते ते बेखटक आचरण्याची अद्यतन प्रवृती स्वीकारा. हिंदूंवर उपकार करण्यासाठी नव्हे, कारण औरंगजेबी धर्मोन्मादाचेही कंबरडे त्यांनी मोडलेले आहे तिथे ह्या आजकालच्या लुंग्यासुंग्या गुंडगिरीची काय कथा ? पण मुसलमान अद्ययावत बनल्यावाचून त्यांचा स्वतःचाही नाश होणारा आहे म्हणून आता विज्ञाननिष्ठ बना.' (स. सा. खंड–३ पान–१६०)

तेव्हा सावरकरांनी पुरस्कारिलेली आधुनिकता साध्य करण्यासाठी त्यांचा भर मुख्यतः पोथीमुक्ती व अद्यतन प्रवृत्ती यांवर होता. श्रुति-स्मृति–पुराणोक्त व अप–टु– डेट या 'दोन शब्दांत दोन संस्कृती' प्रतिबिंबित झालेल्या आहेत. हे त्यांनी याच शीर्षकाच्या उत्कृष्ट निबंधात सांगितले आहे. सुधारणा करू इच्छिणारे हिंदू मनही शास्त्राधार धुंडाळते आणि बदल करण्यास तयार नसलेले सनातनी मन शास्त्राधार घेऊन बदल टाळते. पाच हजार वर्षांचे आयुष्य असलेला हिंदू समाज या पेचात आहे. म्हणून सावरकर उद्वेगाने उद्‌गारतात, खरोखर या शब्दनिष्ठ धर्मग्रंथांनी हजारो वर्षांच्या अडाणीपणास अमर करून ठेवले आहे.'

'पोथीनिष्ठेची बाधा' या निबंधात सावरकरांनी पुरातनी व वैज्ञानिक मनोवृत्ती यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. त्यात म्हटले आहे, 'बायबल, कुराण हे सारे आदरणीय नि अभ्यसनीय पण निव्वळ मनुष्यकृत ग्रंथ आहेत असे ठाम मत देऊन, त्यांस इतर कोणत्याही मनुष्यकृत ग्रंथाप्रमाणेच सादर अभ्यासावे. त्यांच्यात जे जिथे आजच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरेल ते तेथून घ्यावे. जे आज मनुष्यहितसाधक ते आचरावे, जे अनुभवांती आज टाकाऊ, अडाणी, बुद्धिशून्य ठरते ते साफ सोडावे.

'विज्ञानालाही आज सृष्टीची भौतिक नि आत्मिक अशी अनेक गौप्ये कळणार नाहीत, कोडी सुटणार नाहीत. पण विज्ञान ती तशी आज मला सुटत नाहीत, कळत नाहीत म्हणून निःसंकोचपणे सांगते. ती सोडवण्याच्या प्रयोगात प्रत्यक्ष सिद्धी मिळताच त्याच्याविषयीची त्याची कल्पना, एक उपपत्ती, एक तर्क, एक सूचना म्हणूनच काय तो ते पुढे मांडील, पण काही करता ईश्वराने सहा दिवसांत जग रचले नि सातव्या दिवशी रविवारी सुट्टी घेतली म्हणून रविवार पवित्र, असल्या काहीच्या काहीच गोष्टी सिद्धांत म्हणून प्रत्यक्ष ईश्वराच्या नावे सांगून वर एक शापही देऊन ठेवणार नाही की, जो माझे अमक्या-तमक्या ईशप्रेषिताचे (प्रॉफेट–पैगंबर अवताराचे) हे देवदत्त अमके पुस्तक शब्द न् शब्द खरा मानणार नाही, त्या काफराचे ह्या लोकी डोके फोडा नि परलोकी नरकात ढकला.' (स. सा. खंड–३ पान–१७५).

आंधळ्या व हानिकारक धर्मभोळेपणाचा त्याग करणाऱ्या युरोपचा आदर्श पुढे ठेवा असे सावरकर सांगतात. धर्मभोळेपणाची हकालपट्टी आज जर कुठे प्रत्यक्ष भौतिक व्यवहारात झाली असेल तर ती त्यांतल्या त्यात युरोपात होय. धर्मभोळ्या घरभरणीवाचून घरे, नर-बळीवाचून पूल, बायबलातील जपजाप्यावाचून विवाह, मुहूर्तावाचून प्रमाणे, पूजेवाचून तोफा, शांतिपाठावाचून सुखप्रसूती, प्रत्यक्ष ऐहिक असे जे जे व्यवहार ते ते ऐहिक विज्ञानाच्याच प्रयोगसिद्ध सूत्रां-प्रमाणे, त्यात धार्मिक, शब्दनिष्ठ गडबडगुंडा मुळीच चालू न देता युरोपात बहुधा प्रचलू लागले आहेत. विज्ञानयुगात शब्दनिष्ठेला वावच नाही. अमक्या ग्रंथात आहे म्हणूनच अमुक खरे हे बोलणेच बंद. प्रयोगात प्रत्यक्षसिद्ध ते तेच टिकणार, पटणार. पण 'धर्म' म्हणजे शब्दनिष्ठा. त्या अर्थी जो धर्म त्याचे अर्थातच अशा विज्ञा-नाशी, तपनाशी तमाचे तसे साहचर्य केवळ अशक्यच असणार.' (स. सा. खंड ३ पान १७३).

## आधुनिकीकरणाचे विरोधक

सावरकर सुधारकी व विज्ञानवादी विचार मांडावयास लागताच सनातनी संतापले. रत्नागिरीत त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची तयारी सुरू झाली, पण 'गाय हा उपयुक्त पशू आहे, माता नव्हे, देवता नव्हेच नव्हे' यासारखे विचार मांडावयास सुरुवात करताच त्यांना वृत्तपत्रात व बौद्धिक पातळीवर विरोध सुरू झाला. साव-

करांच्या त्यागमय व देशासाठी अंदमानात गेलेल्या देशभक्तीपूर्ण जीवनामुळे या विरोधाला धार येऊ शकली नाही. महाराष्ट्राबाहेर हे सुधारकी प्रक्षोभक विचार पोहोचत होते. सावरकरांनी त्यांच्या विरोधकांचे दोन वर्ग कल्पिले आहेत. एक कट्टर सनातनी, दुसरा अर्धसनातनी. कट्टर सनातनी सावरकरांना तुम्ही सुचविता त्या सुधारणेला श्रुतिस्मृतींचा काही आधार आहे काय? जर असेल तर तो धर्म, नसेल तर तो अधर्म. आज ज्या रूढी चालू आहेत त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त असल्याच पाहिजेत. आज मानल्या जाणाऱ्या संस्कारांचे नि रूढींचे हा वर्ग समर्थन करतो व ते उपयुक्त वा अनुपयुक्त आहेत हा मुख्य प्रश्न न विचारू देता ते संस्कार श्रुतिस्मृतिपुरोणोक्त जाहेत म्हणूनच धर्म्यं असलेच पाहिजेत असे म्हणतो. ते याच एकमेव आधाराने. यालाच ते शास्त्राधार म्हणतात.

## अर्धसनातनी विरोधक

सावरकरांनी आधुनिकीकरणाचा दुसरा विरोधक कल्पिला आहे अर्धवट सनातनी लोकांचा. धर्माच्या नावाखाली चालू असलेल्या रूढींचे वैयर्थ. त्यांना पटते. पण कोणत्या तरी ग्रंथास शास्त्र म्हणून मानल्यावाचून, कोणतातरी शास्त्राधार घेतल्यावाचून त्यांच्या बुद्धीस केवळ स्वतःच्या बळावर त्या रूढीच्या वाटेस जाण्याची धमक नसते. एका अर्थी ते असहाय्य असतात रूढीचा प्रभाव एवढा जबरदस्त असतो, की स्वतःच्या मनाची समजूत घालण्यासाठी शास्त्राधाराची त्यांना गरज भासते. म्हणून सावरकर म्हणतात, हे शास्त्राधाराचे 'गुऱ्हाळ बंद करून टाकल्यावाचून गत्यंतर नाही. आजचे ज्ञान विज्ञानप्रयोगसिद्ध असतानाही ते शास्त्राच्या काळी ठाऊक नव्हते म्हणून नाकारावयाचे की काय? 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' त्या उपयुक्तांच्या मागे हात धुऊन लागले आहे. आणि म्हणूनच प्रत्यक्ष जे उपयुक्त ते बखटक आचरत जाणाऱ्यांनी बदलत्या परिस्थितीस तोंड देताना पटापट पवित्रे पालटीत राहणाऱ्यांनी 'अद्ययावती युरोपीय संस्कृतीच्या पुढे हतवीर्य नि हतबल होत्साते' शास्त्राधाराचा घोर लागून पडलेलो आहोत.' (स. सा. खंड–३ पान ३६९-७०).

'गुणाने ब्राह्मण नसला तरी जातीचा म्हणून त्यास ब्राह्मणाचे अधिकार मिळू नयत असेच ज प्रयोगांती उपयुक्त वा सत्य ठरते ते अमक्या, जुन्या पोथीत सापडत नाही व निषिद्ध आहे म्हणूनच केवळ टाकाऊ ठरू नये. याअर्थी ज्यास शास्त्राधार म्हणतात तो सावर-

करांना नको होता. शास्त्राधार मिळत नाही तेव्हा सुधारणाच नको, जुन्या रूढींनाच चिकटून बसण्याची भूमिका सावरकर घेत नव्हते. त्यांचे म्हणणे ही श्रुति–स्मृति–पुराणोक्ताची मानसिक बेडी प्रथम तोडा व जे उपयुक्त आणि विज्ञानमान्य त्याचे आचरण सुरू करा. म्हणून युरोपाचे उदाहरण वारंवार सावरकर देतात आणि सांगतात, त्या पार्थसारथ्याच्या शब्दांतच, ते अद्ययावत प्रवृत्तीचे समर्थक या कूपमंडूकतेच्या भंगड गुंगीत हतप्रभ झालेल्या हिंदुराष्ट्रास सांगणार. कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् सोडून दे त्या स्पर्शबंदीच्या पोथीजात जातमातीच्या पाच हजार वर्षांपूर्वीच्या भाकड भावना. तोडून टाक त्या तुझ्या कर्तव्याच्या पायात पडलेल्या ह्या शब्दनिष्ठ श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृतीच्या बेड्या. आणि जे जे हत्यार तुझ्यावर चढून आलेल्या आजच्या आपत्तींच्या उच्छेदास आज समर्थ होईल, उपस ते ते हत्यार. मग ते त्या तुझ्या पुरातनाच्या शस्त्रागारात सापडो वा ह्या नवीनाच्या शस्त्रागारातून छिनता येवो.' (स. सा. खंड–६)

## धर्मग्रंथांचे दास्य

'धर्मग्रंथांचे दास्य झुगारून द्या असे सांगणारे सावरकर व मनुस्मृती जाळणारे डॉ. आंबेडकर यांसारखे सुधारक यात एक महत्त्वाचा फरक आहे. सावरकरांची दृष्टी वैज्ञानिक संशोधकाच्या सूक्ष्मदर्शी यंत्रातून पाहण्याची, वस्तुस्थितीची छाननी करणाऱ्या विद्वान पंडिताची आहे. 'इति श्रुतिः' या शिफारशीला सावरकर घाबरत नाहीत, तर विचारतात, ज्या हिंदुस्थानात सहस्रावधी वर्षे शतावधी यज्ञांतून आणि अग्निहोत्रांत प्रत्यही खंडोगणती तूप जाळले जात आले आहे नि काही प्रमाणात आजही जळत आहे ती ही यज्ञपावन आर्यभूमी हिवताप, महामारी, प्लेग, देवी प्रभृति झाडून साऱ्या रोगांच्या प्रात्यक्षिक अभ्यासासाठी राखून ठेवलेले जगातील पहिल्या प्रतीचे संग्रहालय बनलेली आहे आणि यज्ञात पळीभरदेखील तूप गेल्या हजारो वर्षांत न जाळणाऱ्या ह्या यज्ञद्वेष्टच्या अनार्य युरोप अमेरिकादी राष्ट्रांतून आरोग्य नि आयुर्मान अतुलनीय उत्कर्ष पावत आहे. हे काय यज्ञातून तूप जाळणे हे आरोग्याचे अत्युत्कृष्ट, अपरिहार्य, उत्कृष्ट नि दिव्य साधन आहे हे सिद्ध करते ?

'वैदिक युगात तूप जाळल्याने हे रोग हटतात असा विश्वास असणे क्षम्य होते. पण आज तेच खंडोगणती तूप नि भाताच्या त्या राशी

नि तो मोहनभोग यज्ञाच्या त्या आगीत न ओतता ह्या भूक भूक करीत कासावीस झालेल्या आपल्या लक्षावधी धर्मबंधूंच्या पोटांतील आगीत ओतल्यानेच हे राष्ट्र निरोगी होण्याचा थोडाफार अधिक संभव आहे.' (स. सा. खंड–३ पान ३७५)

ज्या काळात हे प्राचीन धर्मग्रंथ लिहिले गेले त्या काळाच्या पुढे जाऊ न देणारे धर्मग्रंथांचे दास्य आधुनिकीकरणासाठी झुगारले पाहिजे असे सावरकरांचे सांगणे होते. प्रकृती आणि काळ धर्मग्रंथांचा चुराडा उडवीत आहेत त्याकडे दुर्लक्ष करून स्वत: होऊन घातलेली बेडी आता तोडण्याची गरज आहे हा सावरकरांच्या सांगण्याचा इत्यर्थ होता. पुरातनांच्या विहिरीतील ही बेडकाची वृत्ती आता सोडली पाहिजे. अद्यतन संस्कृतीच्या आड येणारी ही पुरातन वृत्ती पोसणारा दुसरा ग्रंथ म्हणजे अपौरुषेय म्हणून समजले जाणारे धर्मग्रंथ. शब्द-निष्ठ धर्माची दास्यता पत्करणाऱ्या एकाच प्रवृत्तीचे ते दुसरे नाव सावरकरांनी अपौरुषेय समजल्या गेलेल्या ग्रंथांची चर्चा करताना म्हटले आहे, 'जे जे धर्मग्रंथ अपौरुषेय म्हणून समजले गेले त्यांच्या त्यांच्यात सामावली गेलेली संस्कृतीही सहज व अपरिवर्तनीय समजली जाते. आणि जे लोक त्या धर्मग्रंथांची सत्ता आपल्यावर चालू देतात ते त्या श्रुतिस्मृतिपुरोणोक्ताचे, या पुरातनपणाचे गुलाम होऊन बसतात. हे धर्मग्रंथ जेव्हा प्रथम रचले जातात तेव्हा बहुधा कोणती तरी एक सुधारणा घडवून आणण्यासाठीच ते रचलेले असले तरी आपल्या स्वत:भोवती ईश्वरी आज्ञेची प्रभावळ मिरवून आपल्या शब्दांस अपरिवर्तनीय, कधीही न बदलणाऱ्या विधिनिषेधांचे स्वरूप ते देत असल्यामुळे ते लवकरच भावी सुधारणेचे कट्टर शत्रू बनतात. त्यांच्या दोन पुठ्ठ्यांच्या आत सारे विश्व नि सारा काल डांबून ठेवण्याचा वेडगळ अट्टाहास जरी ते करतात तरी सदा चंचल, सदा नवीन, अदम्य अशी अमोघ निसर्गशक्ती आणि कालगती त्या धर्मग्रंथाच्या आत थोडीच डांबून राहील ?'

येथेही सावरकर ख्रिश्चन, यहुदी, पारशी, मुसलमान आदींच्या अपौरुषेय मानल्या गेलेल्या धर्मग्रंथांचा उल्लेख करून उल्लेखिलेली क्षुद्र राज्ये, राजधान्या इतक्या तुच्छ वाटतात की त्यास गौरविणारे धर्मग्रंथ हास्यास्पद वाटावेत. सारांश, आपण ज्यांना अपौरुषेय ग्रंथ मानतो त्यांचा काल पाच हजार वर्षांचा धरला तरीही आजच्या मानाने पाच हजार वर्षे मागासलेला. जग पाच हजार वर्षे पुढे गेलेले.

आपण पाच हजार वर्षांपासूनच्या अडाणीपणास आजही कवटाळून बसणार काय हा सावरकरांचा प्रश्न आहे.

'मनुष्य मुळात पाहिले तर अंगाने दुबळा आहे. पण कशाच्या बळावर हा अगदी अत्यंत दुबळा माणूस इतका प्रबळ झाला ? कळीच्या, हत्याराच्या, यंत्राच्या. आज पृथ्वीतलावर तरी साऱ्या प्राण्यांचा राजा, शास्त्रजेता होऊन मिरवू लागला आहे. सृष्टि-शक्तीशी मल्लयुद्ध करण्यास दंड थोपटून उभा ठाकला. बाष्प, चुंबक, विद्युत, रेडियम यांना काही प्रमाणात तरी माणसाळून त्यांच्या अजस्र बळावर समुद्र, पृथ्वी, आकाश या मानवी जगताच्या तिन्ही खंडांत दिग्विजय करीत चालला आहे. (स.सा. खंड–३ पान–३८९), सावरकरांना आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण आहे याचे मुख्य कारण मनुष्य यंत्रबळाच्या व विज्ञानाच्या आधारे प्रबळ व सुखी होत चालला आहे.

हे सारे विचारमंथन ५०–५५ वर्षांपूर्वीचे आहे हे लक्षात घेतले तर मुक्त होताच भारत वैज्ञानिक क्षेत्रात झेप घेईल हे सावरकरांचे स्वप्न खरे ठरत आहे. भारताने अवकाशयुगात प्रवेश केला. शस्त्रास्त्र-निर्मितीत तो पुढे आहे. अणुविज्ञानात स्वावलंबी होण्याचा त्याचा प्रयत्न आहे. जगातील एक गणनीय औद्योगिक राष्ट्र म्हणून तो मान्यता पावला आहे. तंत्रविज्ञानातील भारताची प्रगती जगन्मान्य झाली आहे. आधुनिकीकरणाचा सावरकरांनी केलेला प्रचार यशस्वी झाला आहे. पण भारताचे मन आधुनिक झाले आहे काय हाच खरा आजचा प्रश्न आहे. सावरकरांना तोडावयाची होती आम्हांला मागासलेल्या संस्कृतीस जखडून टाकणारी श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची मानसिक बेडी. आधुनिकीकरणाचा अट्टहास त्यासाठीच होता.

# ५. धर्मभोळेपणास तिलांजली

देवभोळेपणा आणि धर्मभोळेपणा यांचे नाते सख्खे आहे. सावरकरांचा लढा देवाशी वा धर्माशी नव्हता. तर त्यांतील बुद्धी पंगू करणाऱ्या भाबड्या धर्मभोळेपणाशी होता. सनातनधर्म या संकल्पनेची मुद्रा ठोकून रूढीच्या बेड्या पायांत अडकवून या धर्मभोळ्या प्रवृत्तीने हिंदुत्वाचे जे नुकसान केले होते त्याने सावरकर अस्वस्थ होत. म्हणून पोथीनिष्ठा व त्यातून आलेला धर्मभोळेपणा या दोहोंवर आघात केल्याविना समाज सुधारणार नाही, विज्ञानवादी होणार नाही असे त्यांना वाटत होते. विज्ञानवाद हाच आधुनिकतेचा पाया आहे. ती आधुनिकता ही आपल्या समृद्धीची व नव्या समाजरचनेची कळ आहे हे सावरकरांचे मत होते. म्हणून धर्मभोळेपणा व पोथीनिष्ठा या आधुनिकतेच्या व विज्ञानवादाच्या प्रगतीस मारक ठरणाऱ्या विघातक असणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध सावरकरांनी शस्त्र परजले. सावरकरांची भूमिका अशी होती, 'आपल्या हिंदू राष्ट्रासही आजच्या विज्ञानयुगाशी टक्कर देऊन जर जगणे असेल, तरणे असेल, तर आपणही आता या ' एष धर्मः सनातनः 'च्या धर्मभाबड्या नि आचरट म्हणजे निरर्थक आचाराचे स्तोम माजविणारी ही प्रवृत्ती सोडून आपला पाच हजार वर्षांपूर्वी घडलेला वा जडलेला प्रत्येक आचार, प्रत्येक रूढी, प्रत्येक श्रद्धा, आजच्या विज्ञानाच्या प्रत्यक्षावगम्य कसोटीवर तासून, घासून, परीक्षून टिकेल तीच ठेवल्यावाचून, न टिकेल ती टाकल्यावाचून, ह्या नवीन परिस्थितीशी झुंजण्यास अवश्य ती नवी शस्त्रे परजल्यावाचून गत्यंतर नाही, अशी आमची बालंबाल निश्चिती पटल्यामुळे, आम्ही त्या धर्मभोळ्या प्रवृत्तीस विरोधिण्यास सज्जलो आहो. आमचा लढा त्या ह्यानिकारक प्रवृत्तीशी आहे. '

' त्या धर्मभोळ्या प्रवृतीचे एक उदाहरणच काय ते म्हणून आम्ही आमच्या गोपूजक गबाळपणास निवडले. नाही तर ती बिचारी गाय

आमचे काय खात होती ? मूठभर गवत नि थोडेसे ओखटपाणी.' (स. सा. खंड ३, पान २२९).

या पोथीजात धर्मभोळया वृत्तीने हिंदुत्वाचे कसे नुकसान केले हे सावरकर ऐतिहासिक घटनांची ऐहिक दृष्टीने समीक्षा करून सांगत होते. सामाजिक दोषांचा विचार करताना इतिहासातील घटनांची चिकित्सा करणे ही खास सावरकरी शैली आहे. इतिहासाचा केवळ हिंदुगौरवासाठी उपयोग न करता धर्मभोळेपणा किंवा पोथीजात अंधश्रद्धा यांनी हिंदू समाजाचे कसे नुकसान केले हे जनतेच्या मनावर ठसविणे आवश्यक होते व अजूनही आहे. 'वाराणशीने एकही हुतात्मा दिलेला नाही,' किंवा मुकटयापायी मुकुट दडविले. अशासारखी सावरकरांची वाक्ये हेच अप्रिय ऐहिक सत्य बोलतात की राष्ट्राच्या व्यवहाराची नीती पोथीनिष्ठ असता कामा नये, ती उपयुक्ततावादी असली पाहिजे. म्हणूनच सावरकर श्रीकृष्णाला पहिला उपयुक्ततावादी नेता मानीत असत. सावरकरांच्या या ऐहिक इतिहाससमीक्षेची दोन उदाहरणे नमुन्यासाठी येथे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

मुसलमान जेव्हा हिंदुस्थानावर चालून आले तेव्हा त्यांच्यातील कित्येक लुच्च्या सेनापतींनी मुसलमानी सैन्यापुढे गायींच्या कळपांचे गोल रचून चाल करावी. हिंदूंचे सैन्य त्यावर उलट चालून जाताच अकस्मात थबकावे, मागे मागे हटू लागावे. का ? हिंदूंचे हाती शस्त्रे नव्हती म्हणून वा ते रणात काटाकाटी करण्यास भ्याले म्हणून ? नव्हे. ती शस्त्रास्त्रे देशशत्रूच्या सैन्यावर सोडली तर प्रथम पुढे आलेले ते गायींचे कळपच मरतील म्हणून. म्हणून हिंदू सैन्याने शस्त्रास्त्रे उपसण्याचे साफ नाकारले. गोवध हे महापाप. सोशिकपणा त्यांच्या हाडीमासी खिळलेला. पण देशशत्रूंची नि धर्मशत्रूंची आततायी चढाई रोखणे हेच महापुण्य, ही शिकवण त्यास उत्कृष्टत्वाने कोणी दिलेली नव्हती. गायी मरू नयेत म्हणून राष्ट्र मरू दिलें. मुलतानचे सूर्यमंदिर आम्ही पाडून टाकू म्हणून मुसलमानांनी धाक घालताच हिंदू सेनेने हाती आलेले विजय सोडून ढाला परतविल्या. मुलतान मुसलमानांचेच राहू दिले. काशी घेण्यासाठी पुढे याल तर तेथील देवळे उद्‌ध्वस्त करू, ब्राह्मणांची कत्तल करू, म्हणून नबाबाने धमकी देताच काशीचे हिंदू पेशव्यांनी काशीवर स्वारी करू नये म्हणून धरणे धरून बसले. आणि शक्तो असतानाही पेशव्यांचा जो उत्कट मनोदय की, श्री सोडवावी, काशी क्षेत्र म्लेच्छाचे हातून घेऊन स्वतंत्र करावे, तो

विफल झाला. ‘धर्म,’ शब्दनिष्ठ पोथीजात ‘धर्म’ म्हटला की बुद्धी कशी आंधळी होते, किंबहुना बुद्धीचे डोळे काढून घेण्यासाठीच कित्येक वेळा धर्मांचे सांडस तापवून हेतुतःच कसे घुसविले जातात, याची ही ऐतिहासिक उदाहरणे केवळ चाचणी म्हणून सांगितली. याहूनही भयंकर नि असंख्य उदाहरणे आपल्या हिंदू समाजात घडली आहेत. आजही अस्पृश्यता, सिंधुबंदी, रोटीबंदी, जातीभेद प्रभृति, खुळचटे ‘धर्मा’पायी घडत आहेत मनुष्यास उपयुक्त म्हणून नि त्या प्रमाणातच गोरक्षण करावे असे स्पष्ट सांगितले असते, ती व्यावहारिक भावनाच काय ती असती, तर त्या हिंदू सैन्याने ते गायींचे कळप आपल्या स्वतःच्या तरवारीने चराचर चिरून लागोपाठ मुसलमानांच्या मुंडक्यांचाही ढीग रणांगणावर रचला असता, एकही मुसलमान न मारविता ती ती रणे मुसलमान जिंकू शकते ना, मुलतानचे एक सूर्यमंदिर धुळीस मिळाले असते, पण मुलतानहून मुसलमानांस मागे हटविल्याने हिंदू राज्य सुरक्षित राहते. काशीची दहा देवळे भंगती, पण हिंदूंचे धर्मछत नि राज्यछत्र जर अभंग राहते तर साऱ्या हिंदुस्थानची देवळे अभंग राहती, पण ते पटले नाही याचे कारण गोरक्षण, मंदिररक्षण हे व्यावहारिक कर्तव्य न ठरविता एकदम परिस्थितिनिरपेक्ष ‘धर्म’ करून टाकला–त्रिकालाबाधित, सनातन, अशंकनीय, अप्रतिवादार्ह ‘धर्म’. यास्तव तोच अधर्म झाला आणि ते गाईंचे चार कळप वाचवून लाखो गाईंची प्रत्यही कत्तल करणारे कसाईखाने साऱ्या हिंदुस्थानभर नित्याचे उभारून ठेवण्याचे पुण्य जोडले. एक देवाचे देऊळ पडू नये म्हणून देवाचे राज्यचे राज्यच बुडवू दिले.’ (स. सा. खंड–३, पान–१६८)

इ. स. १३०० ते १६०० च्या काळच्या महाराष्ट्राच्या इतिहासहासनिष्ठ घटनांचे वर्णन करताना सावरकर म्हणतात, ‘आज काय रेडा बोलला, उद्या दामाजीपंतांसाठी प्रत्यक्ष देवाने विठू महाराचा वेष घेऊन बादशहाच्या भरदरबारी दंडाच्या द्रव्याच्या राशीच्या राशी ओतल्या. तोच नवीन बातमी की, ते द्रव्य बादशहा स्पर्शू लागताच त्यांची फुलांची रास झाली. कधी देव रोहिदासाच्या घरी जोडे शिवीत आहेत, कधी एकनाथाच्या घरी पाणी भरीत आहेत, कधी जनाबाईंचे दळण दळीत आहेत, कधी नामदेवाबरोबर जेवीत आहेत, कधी पंढरीचे देऊळचे देऊळ गरकन फिरवत आहेत, आज चोख्या महाराच्या पंगतीत बसून पांडुरंग प्रेमभावाने मिटक्या मारीत

७८/७१

आहेत, उद्या चोख्याला गाडीला बांधून फरफटत ठार मारण्याची शिक्षा दुष्ट लोकांनी दिली असता स्वत: श्रीकृष्ण येऊन ते जू हातांनी धरून अडवीत आहेत. कोणाच्या दाराशी दत्तात्रेय आपली कुत्री घेऊन उभे आहेत तर कोणाच्या हाती ग्रंथ लिहिण्यास विठोबा लेखणी उचलून देत आहेत. मेलेली माणसे जिवंत होत आहेत, तर जिवंत माणसे जिवंतपणी पुरून घेऊन समाधिस्थ होत आहेत माणसामाणसांशी देव बोलत आहेत, हसत आहेत, जेवत आहेत मूर्तिमान प्रत्यक्ष रामचंद्र कथा ऐकत आहेत, मूर्तिमान हनुमान संतांमागे उभे राहून कथेस साथ देत आहेत. त्या काळची ही संतचरित्राची बाजू वाचीत असता असे वाटते की, ही महाराष्ट्र भूमी त्या काळी माणसांची भूमी नसून देवांचीच भूमी झालेली होती. महाराष्ट्र हेच त्या काळी देवांचे राहते घर झालेले होते, वैकुंठ नव्हते.

'परंतु पुण्यशील, जपतपयोगयागांनी पवित्र अलौकिक चमत्कारांचे जे युग, देवाच्या कृपेची जी छायाच, जे ईश्वराचे मूर्तिमंत अधिष्ठान अशी ही महाराष्ट्राच्या इतिहासातील ह्या पानाची सुवर्णाक्षरात लिहिलेली बाजू वाचून आपण जो त्याच पानाची दुसरी बाजू उलटतो तो काय आढळते ? भगवंताचे अधिष्ठान जर कशाचे वरील अर्थी असू शकत असेल तर ते त्या पुण्यतमकाळी महाराष्ट्रात होतेच होते. आणि जर भगवंताच्या अशा अधिष्ठानामुळेच राष्ट्राचे भौतिक सामर्थ्य, राज्य, स्वातंत्र्य ही यशस्वी होत असतील तर त्या काळच्या महाराष्ट्रीय स्वातंत्र्याची नि राज्याची प्रबळता अद्वितीय, दुर्धर्ष, अजिंक्य अशीच असावयास पाहिजे होती. पण सुवर्णाक्षराने लिहिलेली ही ह्या पानाची देवाधिष्ठित बाजू उलटताच दुसरी बाजू जी दिसते ती देवांच्या भौतिक विजयाची नसून राक्षसांच्या विजयाची होय. या देवांच्या अधिष्ठानाने सुसंपन्न काळातच महाराष्ट्राचे असलेले स्वातंत्र्य नि राज्य धुळीस मिळवून त्या देवाच्या अधिष्ठानावर राक्षसांच्या राज्याची टोलेजंग उभारणी झालेली आढळते. पुण्यशील अशा त्या देवांच्या लाडक्या लोकांवर जय मिळाला तो त्या पापी पण प्रबळ अशा मुसलमानी अत्याचारास.'

'हाय हाय. काय दुष्ट योगायोग पाहा. परमयोगी, ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरी लिहून आपली लेखणी खाली ठेवली न ठेवली, तोच अल्लाउद्दीन खिलजी अवघ्या दहा-पंधरा हजार सैन्यास घेऊन ह्या कोटयवधी हिंदूंनी गजबजलेल्या दक्षिणेत, बकऱ्यांच्या कळपात

वाघ घुसावा तसा घुसला. ज्ञानेश्वरांच्या भगवंताच्या अधिष्ठानाचा पूर्ण पाठिंबा असणाऱ्या त्यांच्या आश्रयदात्या रामदेवरायास अल्लाउद्दीन विंध्याद्री उतरून आल्याची बातमीदेखील पुरती कळली नव्हती तोच त्याने थेट देवगिरीवर चढाई केली नि रामदेवरावाच्या हरिभक्त अशा हिंदूंच्या अफाट सैन्याचा त्या हरिद्वेष्टयाने चक्काचूर उडविला. त्याचे हिंदुराज्य बुडविले, ते परत स्थापू निघालेल्या परमशूर शंकरदेवास जिते धरून अंगाचे कातडे सोलून ठार मारिले. ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपान, मुक्ता, नामदेव, गोराकुंभार प्रभृति संतमहंत घरोघर देवाशी हसत, जेवत, बोलत असता, भगवंताचे अधिष्ठानच काय, पण महाराष्ट्र भगवंताची प्रत्यक्ष राजधानी झालेली असता तिकडे बिहार–बंगाल–अयोध्या–काशीत हिंदू राज्यश्री मुसलमानांच्या घोडयांच्या टापाखाली तुडविली जात होती. रजपूत वीरांच्या झुंडी रणांगणात कत्तल केल्या जात होत्या. आज का उद्या एवढाच प्रश्न, पण विंध्याद्री उतरून तो मुसलमानी प्रलय दक्षिणेवर कोसळणार हे स्पष्ट झाले होते. ज्ञानेश्वरांच्यापुढे ऋद्धीसिद्धी हात जोडून उभ्या असता रेडयाच्या मुखे ते वेद बोलवू शकले, पण 'रामदेवराजा, अल्लाउद्दीन तुझ्यावर चालून येतो आहे बघ' म्हणून टपालवाल्यालाही जी सूचना देता आली असती ती मात्र ज्ञानेश्वरांना रेडयाच्या तोंडून वा स्वतःच्या तोंडून रामदेवरावास देता आली नाही. ज्ञानेश्वर निर्जीव भिंती चालवू शकले, पण सजीव माणसे आपल्या मंत्रबळे चालवून विंध्याद्रींच्या खिंडीत अल्लाउद्दिनाचा मार्ग रोखण्यासाठी उभी करू शकले नाहीत. सन १२९४ त अल्लाउद्दिनाने दक्षिणेत पहिला पाय टाकला आणि इतक्या त्वेषाने मुसलमानांनी रणांगणात हिंदूंना पिटले, त्यांच्या राजधान्य, राज्ये, सैन्य, देवदेवता उद्ध्वस्त करीत इतक्या दुर्धर्ष वेगाने ते पुढे घुसले की, १३१० च्या आत त्यांनी रामेश्वरापर्यंत सारे राज्य निर्हिंदू करून रामेश्वरला मशीद बांधली. इकडे विठूरायाची नगरी भगवंताच्या नामघोषाने दणाणतच होती, संतांचे जाळे गावोगाव पसरत होते, त्यांच्या घरात प्रत्यक्ष देव येऊन जोडे शिवीत होते. मडकी घडवीत होते. दळण दळीत होते. बादशहाची खंडणी भरीत होते. जपजाप्य, व्रतेवैकल्ये, योगयाग, नामसप्ताह, स्नानसंध्या यांचा नुसता पर्वकाळ गजबजला होता. तिकडे मुसलमानांच्या एक सोडून पाच पादशाह्या हिंदूंच्या उरावर नाचत होत्या. हिंदूंच्या घरातून देवलदेवी रावण पळवीत बाटवीत

१८०७

होते. पण प्रत्येक देवास दोहोंपेक्षा जास्त हात असूनही त्यांपैकी एकानेही अल्लाउद्दिनाचा वा मलिकंबराचा हात धरला नाही. बादशहाची खंडणी भरली, पण 'हरिद्वेष्टच्या, माझ्या हरिभक्तांपाशी खंडणी मागणारा तू कोण?' म्हणून गर्जत दाढी ओढून त्यास हिंदू सिंहासनावरून खाली खेचले नाही.'

'मुसलमानी धर्माच्या उदयासरशी अरब लोकांस आश्चर्यकारक विजय एकामागून एक मिळत गेले. ते मिळाले ते त्यांच्या 'चळवळी'-च्या सामर्थ्याने, भौतिक सामर्थ्याने आणि त्यांच्या शत्रूच्या भौतिक दुर्बलतेने.'

(समग्र सावरकर खंड–३, पान–३००–३०२)

## धर्मजात बावळटपणा

सावरकरांचा युक्तिवाद बिनतोड आहे. हिंदुमनाला जी नैतिकतेची भीती वा भुरळ असते व त्यामुळे जी विसंगती त्याच्या जीवनात दिसते, हा नीतिमूल्यांचा मौलिक प्रश्न आहे. सावरकरांचे त्याला उत्तर स्पष्ट आहे की हा धर्मजात भोळेपणा व बावळटपणा आहे. त्याच्या पलीकडे हिंदुसमाजाने गेले पाहिजे. सावरकरांचे म्हणणे असे की युरोप जेव्हा या धर्मभोळेपणाच्या पकडीतून सुटला तेव्हाच तो समर्थ, समृद्ध झाला. सावरकरांच्या दृष्टीने हा धर्मभोळेपणा, ही घाबरटवृत्ती सर्व धर्मांत आहे. ते म्हणतात, 'ही स्थिती आपल्याच आचारकांडाची झाली आहे असे मात्र मुळीच नाही. ख्रिश्चन, पारशी, ज्यू, मुसलमान–धर्मांचा छाप ज्यावर पडतो तो तो आचार वा रूढी अपरिवर्तनीय होय, ही खुजट नि कुजट धर्मभोळी समजूत सर्व पोथीनिष्ठ धर्मांतून अशीच हानिकारक ठरलेली आहे. पुराणात काय, कुराणात काय, वेदात काय, अवेस्तात काय, त्या काळी त्यांना लोकहितकारक नि त्यांच्या परिस्थितीत उपयुक्त वाटलेले आचार, समजुती नि किरकोळीतील किरकोळ गोष्टीदेखील– दाढी, शेंडी, केस यांच्या लांबीरुंदीपर्यंत, एकाच छापाखाली ढकललेल्या आढळतात. 'एष धर्मः सनातनः' परिस्थिती बदलताच हे धर्मच अधर्म ठरण्याचा, लोकांच्या धारणाचे उलट मारणासही कारणीभूत होण्याचा संभव आहे. हृया अत्यंत महत्त्वाच्या सत्याविषयी त्या साऱ्या धर्मग्रंथांतून दुर्लक्ष झालेले आढळते.

'ही धार्मिक प्रवृत्ती म्हणजेच धर्मभोळेपणा आणि ती प्रवृत्ती दुसऱ्यावर बळाने लादण्याचा यत्न म्हणजेच धर्मवेडेपणा. जोवर

लोकांतील ही धर्मभोळी नि धर्मवेडी प्रवृत्ती उच्चाटली गेली नाही, तोवर ते लोक प्रगत होत नाहीत. त्यांचे ज्ञान वाढत नाही. आणि त्या धर्मग्रंथाच्या वेळी असलेल्या परिस्थितीच्या उलट परिस्थितीत, ते 'सनातन धर्म'च त्यांच्या नाशास कारणीभूत झाल्यावाचून सहसा राहत नाहीत. जे लोक हे सत्य ओळखून आपले जुने नि सद्य:परिस्थितीत नडणारे आचार झटपट पालटून आजच्या ज्ञानविज्ञानपरिस्थितीला जुळणारे नवे आचार अवलंबतात, ते प्रगतिशील ठरून त्या स्थितिशील धर्मभोळचा वा धर्मवेडचा समाजावर मात करतात.' (स. सावरकर खंड–३, पान २१८)

म्हणून सावरकरांनी स्पष्टपणे सांगितले की, 'पोथीजात धर्मकृत्यांचे युग संपले आहे. आता त्यांचा काहीएक उपयोग उरलेला नाही. हिंदू राष्ट्राची प्रज्ञा धर्मभोळेपणाच्या अफूची गोळी घेऊन बेशुद्ध करण्यासच काय ती असली धर्मकृत्ये कळत न कळत कारणीभूत होत असल्यामुळे ती आता 'धर्मकृत्ये' या पदवीसदेखील पात्र राहिलेली नाहीत.' याचा अर्थ असा की, यज्ञ आदी पोथीजात धर्मकृत्ये हिंदूंच्या उत्थानास उपयुक्त नसल्यामुळे ती करू नये. नवग्रहांची अरिष्ट शांतीप्रीत्यर्थ लाख लाख जपजाप्ये, एक लक्ष अर्थवशीर्षे, गायत्री मंत्रांची कोटी आवर्तने, आगीच्या होळचा पेटवून त्यात खंडीखंडी तुपाचे हौद केवळ जाळून टाकणे इत्यादी धर्मकृत्यांनी एक दमडीचेही हित साधणारे नाही असे त्यांनी म्हटले आहे.

## धर्मभोळचांचे तीन वर्ग

धर्मभोळचा अज्ञानास उचलून धरणाऱ्यांचे तीन वर्ग सावरकरांनी कल्पिले आहेत– ते म्हणजे लुच्चे धंदेवाईक, नेणते भाबडे व तिसरा जाणते संकोची. पहिल्या वर्गातील मंडळींचा हा धंदाच असतो की नाना थापाथुपांनी आणि फसव्या चमत्कारिक करामतींनी लोकांमध्ये दैविक शक्ती असण्याचा बोभाटा करावयाचा आणि लाखो भोळचाभाबडचा लोकांस नवससायास, गंडेदोरे व ताईततावीज प्रभृति ढोंगधत्तुऱ्यांच्या नादी लावून लाखो रुपये कमवायचे. दुसऱ्या वर्गात लोकांचा धार्मिक ढोंगधत्तुऱ्यावर खरोखरच विश्वास बसलेला असतो पण वैज्ञानिक ज्ञानाचा व बुद्धिवादाचा प्रसार झाला तर हे लोक शुद्धीवर येऊ शकतात. तिसरा वर्ग जाणत्या लोकांचा. हे धर्मकांड अज्ञानजन्य आहे हे त्यांना माहीत असते, पण लोकांना धर्मबुद्धी राहो अशी या लोकांचीच खुळी आशा असते. म्हणून ते अशा गोष्टींना

विरोध करीत नाहीत; तसेच लोकांमध्ये गाजलेला यांचा शिष्टपणा गमवावयास ते तयार नसतात.' (स. सा. खंड ३, पान ४०३).

सावरकरांवर ते समाजाचा बुद्धिभेद करीत आहेत असा आरोप करणाऱ्यांना सावरकर म्हणतात, 'अज्ञानाचा बुद्धिभेद केलाच पाहिजे. ज्ञानाचा जो जो उपदेश तो तो अज्ञानाचा 'बुद्धिभेद' करतो. पृथ्वी वाटोळी म्हटली त्याने त्या वेळच्या युरोपीय धर्मवेडाच्या भावना इतक्या प्रबळपणे दुखविल्या की त्या धर्मवेडाने त्या सत्यवक्त्यास जिते मारले. पोपच्या धर्मबुद्धीला अमेरिका माहीत नव्हती. कोलंबस म्हणाला, अमेरिका आहे. पोपच्या धार्मिक भावना त्यामुळे इतक्या दुखल्या, की कोलंबसला पाखंड गणण्यात आले. तशा वेळी पोपच्या अज्ञानाच्या भावना दुखवू नयेत म्हणून कोलंबसाने अमेरिका सापडली नाही, अस्तित्वातच नाही असे म्हणावयाचे की काय ? सकाळी शाळेत जाण्याची मुलाची बुद्धी नसते. त्याचा बुद्धिभेद करून त्याला शाळेत धाडू नये की काय ? अज्ञ मनुष्य द्यूत खेळण्यात आपले हित समजतो म्हणून द्यूताविरुद्ध उपदेश करू नये की काय ? त्याचा बुद्धिभेद करू नये की काय ?

बुद्धिभेद करू नये, पण दुर्बुद्धिभेद अवश्य करावा. सद्भावना दुखवू नये, पण असद्भावना अवश्य दुखवाव्या.

श्रीभगवदगीतेतील श्लोकाचा असाच अर्थ केला पाहिजे. नाही तर तो श्लोक स्वयमेवच एक अनर्थ होऊन बसेल. 'अज्ञानाच्या बुद्धिभेदाविषयी असेच म्हटले पाहिजे, की जोवर अज्ञानाचे ते कृत्य एकंदरीत लोकहितास पोषकच होत आहे तोवर जरी ते कृत्य त्याचा तो मुख्य हेतू न समजता केवळ रूढिवश होऊन सामान्य लोक आचरत असतील किंवा ते आचरताना थोड्या प्रमाणात काही आमिष, मनोरंनादी उत्तेजके त्यांना द्यावी लागतील, किंवा फार मोठ्या प्रमाणात लोकहित साधत असता किरकोळ चुका घडत असतील, तर तिकडे जाणत्याने काणाडोळा करून महाकृत्य तसेच संपादून घ्यावे. तेवढ्यासाठी हे सारेच सारे कृत्य बिघडवू नये. त्यातून फुटून फटकून वागू नये. लोकसंग्रहाचा, दहाजणांस वागवून घेण्याचा, ज्याच्या त्याच्या घरी समाजाचे उदंड सोसून पुन्हा समाजास आवळून धुरेला जुंपण्याचा जो कार्यकर्त्याचा गुण, तेवढाच काय तो वरच्या श्लोकात सुचविला आहे. परंतु जेव्हा रूढीने एकंदरीत राष्ट्रचे राष्ट्र रसातळाला जाण्याचा धोका असतो, किंवा धर्मविधीने असत्याचा नि

अधर्माचा फैलाव होऊन राष्ट्रचे राष्ट्र प्रज्ञाहत होते, किंवा कोणत्याही कारणाने लोकहितावर कुऱ्हाड पडते, तेव्हा तेव्हा ज्ञानाने अज्ञानाचे उच्चाटन केलेच पाहिजे. दुर्बुद्धिभेद बुद्धिवंताने केलाच पाहिजे. लोकांच्या अज्ञानावर ज्यांना स्वतःचे पोट जाळायचे असते वा बडेजावी मारायची असते तेच त्या अज्ञानाचा बुद्धिभेद करू इच्छित नाहीत,

' जे सूर्य, मंगळ, प्रभृति ग्रह म्हणजे निव्वळ निर्जीव, निर्मानस, निर्बुद्ध तेजाचे लोळ, म्युनिसिपालिटीच्या कंदिलासारखे ठराविक दराने जळणारे आकाशातील कंदील, त्यांच्या नावाचे कोटी वेळी म्हणे जप केला. त्यांच्या प्रार्थना केल्या. आजच्या ज्योतिषीय ज्ञानाने ज्या मंगळाची परिस्थिती मंगरूळच्या परिस्थितीसारखी प्रत्यक्षपणे पाहता येते नि तो एक आमच्या उत्तरध्रुवासारख्या होतकरू भूमीचा काही प्रदेश असलेला पदार्थ आहे प्रार्थना पूजा समजणारा इच्छावान जीव नव्हे एखाद्या मातीच्या गोळ्यासारखे हे सारे नवग्रह मठ्ठ. यांना आज शतकोशतके प्रार्थून आपल्या राष्ट्राने काय मिळविले ? पारतंत्र्य, दारिद्र्य, दुःख, अपमान, अवहेलना. आणि या साऱ्या नवग्रहांना दमडीचो धूप न जाळणाऱ्या त्या युरोपकडे पाहा. त्यांना शनी पिडीत नाही, मंगळ अमंगळ ठरत नाही. त्यांची भरभराट, आम्हा ग्रहपूजकांच्या छातीवर त्यांच्या वर्चस्वाची टाच आम्हांस त्या नवग्रहांची पूजा करण्याची अनुज्ञादेखील देण्याची शक्ती त्यांच्यात. त्यांची लहर लागली तर ते आमची ती ग्रहहोमांची यज्ञकुंडे एका क्षणात उद्ध्वस्तू शकतील अशी त्यांची शक्ती. यावरून या नवग्रहादिकांची व या एकशेआठ वा आठ लाख सत्यनारायणांची पूजाप्रार्थना एखाद्या निर्जीव खांबाला राजकारणातील प्रश्नांविषयी विचारलेल्या मताप्रमाणे निष्फळ, निव्वळ मूर्खपणा नव्हे काय ?' (स. सावरकर खंड–३, पान–४०५–८).

## अधर्म भावना दुखावलीच पाहिजे

धर्म असेल तर त्याविषयीच्या सद्भावना दुखवू नयेत हे ठीकच पण जर एखादा अधर्माला धर्म समजत असेल आणि जर त्या अधर्माविषयीच्या त्याच्या भावना इतक्या धर्मवेडचा असतील, की धर्माच्या सभ्य नि सदिच्छ उपदेशानेही त्या दुखावतील, तर अशा प्रसंगी त्या अधर्मभावना दुखविणेच खरे धर्मकृत्य ठरते. धर्मप्रसाराला तशा अधर्मभावना तशा अर्थी दुखविल्यावाचून गत्यंतरच उरत नाही. सावाला

८२१९

चोराच्या तडाक्यातून सोडविताना चोराच्या भावना दुखतात, मरू द्या त्या सावाला, असे म्हणावयाचे की काय ? आपली आई वाताच्या झटक्यात खिडकीतून खड्ड्यात उडी मारू लागली तर तशा प्रसंगी तिच्या भावना कितीही दुखावल्या तरी त्या दुखवून तिला तशी प्राणघातक उडी न मारू देणे हेच खऱ्या मातृभक्ताचे कर्तव्य होय. खरा पुत्रधर्म होय. तीच गोष्ट राष्ट्रभक्तीची आणि स्वधर्मभक्तीची होय. राष्ट्रहितास अत्यंत हानिकारक अशा ज्या ज्या धार्मिक रूढी तुम्हांस वा आम्हांस लोकविकृष्ट वाटतात, त्यांचा त्यांचा उच्छेद करण्यासाठी झटणे हेच तुमचे वा आमचे राष्ट्रीय कर्तव्य होय, राष्ट्रधर्म होय.

मलबारातील मोपल्यांचे आणि मध्यप्रांतातील हलवींचे उदाहरण वानगीसाठी विवंचून पाहा. 'समुद्र यातुःस्वीकारः कलौ पंच विवर्जयेत्' समुद्रगमन करणाऱ्यास जातिबहिष्कृत करावे, हा सिंधुबंदीचा करंटा धर्मनियम जेव्हा शास्त्रांनी घालून दिला तेव्हापासून हिंदुराष्ट्राचा सारा परदेशीय वाणिज्य व्यापार आम्ही आपण होऊन परक्यांच्या हाती सोपवून दिला. अर्थात मलबारातील हिंदुराजेही समुद्र उल्लंघणे महापाप समजू लागले. परंतु अरब लोक मलबाराशी जो सामुद्रिक व्यापार करीत त्याद्वारे अलोट संपत्ती मिळते तीही आपल्यास मिळावी आपल्याच सत्तेखालच्या सेवकांनी आपल्याच मोठमोठ्या वाणिकनौका घेऊन नि जगातील द्रव्य आणून आपल्या कोशात त्याची भर घालावी, अशीही लालसा त्या मलबारी हिंदू राजांना झाली. तेव्हा समुद्रगमनाचे पाप हिंदूंच्या हातून -होऊ नये आणि समुद्रगमनानेच मिळणारी जागतिक वाणिज्यसंपदा तर संपादिता यावी, या दोन्ही परस्परविरुद्ध हेतूंना साधणारी कोणती फक्कड युक्ती त्या हिंदू राजांनी काढली म्हणता ? तर प्रत्येक हिंदुकुटुंबातील एकेक मुलाने मुळातच हिंदूचे मुसलमान व्हावे ही. तशी राजाज्ञा सुटली आणि या 'धार्मिक' भावनेपायी सहस्रावधी कुटुंबातील एकेक मुलगा मुसलमानास देऊन टाकला. सैंपाक करावयास सर्पण हवे म्हणून हातपायच कापून चुलीत कोंबण्यात आले. ही ऐतिहासिक घटना आहे— विडंबन नव्हे. ही जी सहस्रावधी हिंदू मुले, सिंधुबंदीचा 'धर्म' रक्षावा म्हणून मुसलमान झाली, त्यांचेच वंशज हे मोपले मुसलमान. आज तेच हिंदू समाजावर अनन्वित बलात्कार करून, सहस्रावधी हिंदूंना तरवारीच्या धाकाने बाटवून गोताचेच काळ झाले आहेत.'

भ्रामक धर्मभावना ही धर्मभोळेपणास कारणीभूत होते, आचार-

धर्मासच धर्म मानले जाते, आचारधर्म हा अपरिवर्तनीय आहे. अशी समजूत धर्मभोळेपणामुळे होते. म्हणून भ्रांत जनांचा दुर्बुद्धिभेद करणे हे सुधारकांचे कर्तव्य असते. म्हणून त्यांचा कितीही निषेध झाला तरी बुद्धिवादाने समाजाचे सामोपचाराने मतपरिवर्तन करण्याचा सुधारकाने सतत प्रयत्न केला पाहिजे, असे करीत राहिले तर प्रायश्चित्तिक मंडळी सुधारकांस येऊन मिळतील असा आशावाद सावरकरांनीं व्यक्त केला आहे.

## सुधारणा म्हणजेच दुष्ट रूढीचा उच्छेद

सुधारकांना अनेक आपत्तींना, आक्षेपांना तोंड द्यावे लागते. प्रत्येक सुधारकास या परिस्थितीला सामोरे जावे लागते. कारण सावरकर सांगतात, 'सुधारणा म्हणजे कोण्यातरी दुष्ट रूढीचा उच्छेद. रूढी म्हणजेच बहुसंख्याकांनी चिवट निष्ठेने चालविलेली चाल. अर्थात तिचा उच्छेद करू इच्छिणाऱ्या सुधारकाला ती बहुसंख्य प्रतिकारीत राहणारच. त्यातही जी रूढी कोटयानुकोटी लोक धर्म म्हणून पाळत आहेत तिलाच उच्छेदू निघणारा सुधारक हा सर्वांहून अत्यंत अप्रिय ठरणार. पण ते भय त्याला पडेल, की जो लोकांचीं हांजी हांजी करून काय ते जे थोडे लोकहित साधेल ते साधू इच्छितो. त्या भयाने तो चळचळ कापत, धार्मिक वा सामाजिक क्रांतीची वाटच सोडून, बहुसंख्यलोकाराधन करीत राहतो, की ज्याचा लोकप्रियता हा एक धंदाच होऊन बसला आहे. पण खरा सामाजिक वा धार्मिक सुधारक जो जो होऊन गेला वा ज्यास ज्यास व्हावयाचे असेल त्याचे लोकहित हेच ध्येय होते, असले पाहिजे. आमच्यापुरते तरी लोकप्रियता की लोकहित, असा व्यामोह मनास पुनःपुनः पडू नये यास्तव आमच्याच एका अनुष्टुपात ग्रथिलेले हे सूत्र आम्ही आमच्या मनास वारंवार उपदेशीत राहतो की–

वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुतिः ।

(समग्र सावरकर–खंड–३, पान–४१३–४१४)

६२।३२

# ६. जात्युच्छेदक समाजरचना

सावरकरांच्या सामाजिक आंदोलनात अस्पृश्यतानिर्मूलन, जातिभेदाचा उच्छेद करणारी समाजव्यवस्था व शुद्धीची चळवळ यांना महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना या तीन उद्देशांनी प्रेरित होऊनच सावरकरांनी सामाजिक कार्यास १९२४ साली प्रारंभ केला. या तिन्हीबाबत सावरकरांचे निश्चित विचार होते. सावरकरांनी १९२८ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या 'समता संघास' पत्र पाठविले होते त्यात त्यांची जातिभेदविषयक भूमिका व स्वतः त्यासाठी त्यांनी केलेले कार्य यासंबंधी थोडक्यात निवेदन आहे. त्यांत सावरकर म्हणतात, 'हिंदू समाजातून जन्मजात जातिभेदाचे आमूलात् उच्चाटन करणे आवश्यक आहे. त्याचे अस्तित्व कोणत्याही आनुवंशिक स्वरूपात असमर्थनीय आणि राष्ट्रीय शक्तीस हानिकारक आहे.'

स्वतःचे जातिभेद निर्मूलनाचे कार्य सांगताना सावरकरांनी म्हटले आहे, 'जातिभेदाच्या निर्दालनासाठी मी शाळेत होतो तेव्हापासून प्रकटपणे वागत आलो आहे. कॉलेजमध्ये मी हा उघड उपदेश देई. विलायतेत तर बोलावयासच नको. पुढे अंदमानातही हाच उपदेश देई. आणि तो प्रत्यक्ष व्यवहारात आणीत मी शेकडो लोकांच्या जातिभेदमूलक समजुती पालटल्या आहेत. कारागृहातून बाहेर पडताच मी तीव्र लोकद्वेषास तोंड देऊनही जातिभेदाच्या निर्दालनाचे यत्न प्रकटपणे व्याख्यानातून, लेखातून, चर्चेतून माझ्या व्यक्तिपुरते तसे आचरण प्रकटपणे केले आहे. 'माझी जन्मठेपेतील' प्रकरणेच्या प्रकरणे या विषयास वाहिलेली असून हिंदू तेवढा एक, हिंदू ही एकच जात आम्हास माहीत आहे असा उपदेश व आचार यांचा तिकडे मी कसा सारखा प्रयोग चालविला होता हे लिखित आहे. अंदमानापासून आतापर्यंत अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणण्यात मी उघड आणि यशस्वी खटपट केली आहे.

'मला जातिभेद नको असला तरी हिंदुत्व हवे आहे. जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व इत्यादि 'त्व' इतर सोडत असतील तर माझे

हिंदुत्वही विलय पावेल.'

सारांश सावरकरांची जातिभेदनिर्मूलन, अस्पृश्यतानिवारण व शुद्धी हा त्यांच्या हिंदू संघटनेचा प्रत्यक्ष कार्यक्रम आहे. त्याचे उद्दिष्ट हिंदुत्वाचा परिपोष आहे हेही स्पष्ट आहे. पण ते सावध व बुद्धिवादी विचारवंत असल्यामुळे त्यांच्या विचाराला जसे टोक आहे तशी त्याची अंतिम मर्यादाही ते सांगून टाकतात. त्यामुळे सावरकरांचा मानवतावाद हिंदुत्वाशी संलग्न आहे पण केवळ ते सैद्धांतिक वा बौद्धिक मानवतावादी नाहीत.

सावरकरांची जात्युच्छेदक विचारप्रणाली समजून घ्यावयाची असेल तर प्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की जन्मना जायते हिंदुः हा त्यांचा मुख्य विचार आहे. किंबहुना मनुष्याचा जन्म ज्या एकमेव जातीत होतो ती म्हणजे मनुष्य जात. बाकी सर्व जाती मानीव आहेत किंवा पोथीजात आहेत. त्या सर्व नष्ट केल्या पाहिजेत म्हणजे त्यांचे मानीव श्रेष्ठत्व वा नीचत्व नाहीसे झाले पाहिजे. सावरकर म्हणतात, 'हिंदु राष्ट्राची संघटना जर हवी, आजच्या परिस्थितीशी टक्कर देण्यास समर्थ असे जातिवंत ऐक्य हवे तर जन्मजात जातिभेदाचा राक्षस प्रथम मारला पाहिजे. आणि मारणे इतके सोपे की 'मर' म्हणताच तो मरतो. केवळ आमच्या इच्छेत त्याचे जीवन आहे. याच्याच उलट सिद्धांत म्हणजे केवळ आमच्या इच्छेतच आमचे मरण आहे. नुसती अस्पृश्यता काढून भागणार नाही, त्या विषारी शाखेचे मूळ जो जन्मजात जातिभेदाचा विषवृक्ष, तोच मुळासकट उखडून टाकला पाहिजे. जोवर ह्या जातिभेदास आम्ही आमच्याच राष्ट्राच्या कंठास नख लावू देत आहो, तोवर मारण्याचे काम शत्रूला करावयास नकोच. आम्ही आपण होऊनच मरत आहो. जर आम्ही हिंदू म्हणून जन्मजात जातिभेदाचा आमूलात उच्छेद करू तरच राष्ट्र म्हणून, धर्म म्हणून जगू शकू.'

## हिंदू जातीने केलेला महान प्रयोग

जन्मजात जातिभेदाचा आता उच्छेद केला पाहिजे असे सावरकरांचे मत असले तरी जन्मजात जातिभेदाने आनुवंशिक गुणविकासाच्या दृष्टीने एक महान सामाजिक प्रयोग केला असे सावरकरांनी म्हटले आहे.

सावरकर म्हणतात, 'खरोखरच या जन्मजात जाति-संस्थेने अनुवंशाच्या नैसर्गिक नियमाचा लाभ मनुष्य जातीस किती प्रमाणात

घेता येणे शक्य आहे याविषयीचा हा जो महान प्रयोग ज्या आश्चर्यकारक चिकाटीने इतक्या मोठ्या प्रमाणावर इतक्या स्फुटतेने युगानुयुगे करून पाहिला, त्याविषयी त्या प्रमाणात मनुष्यजातीने तिचे कृतज्ञच असले पाहिजे. या अनुवंशाच्या अवलंबनाच्या अतिरेकाने वा विपर्यासाने शेवटी तो प्रयोग तात्पुरता तरी फसला असे जरी मानले तरीदेखील असा प्रयोग अशा स्वरूपात अशा कारणासाठी असा फसतो हे सिद्ध करणे हेही काही लहान-सहान काम झाले असे नाही. आपल्या हिंदू जातीने ह्या जाति-संस्थेच्या महान प्रयोगात जे अपयश संपादन केले त्यानेही मनुष्य जातीच्या अनुभवांत एक महनीय भर टाकून तिला उपकृत करण्याचे यश संपादन केले आहे, इतकी त्या प्रयोगाच्या मुळाशी असलेली शास्त्रीय दृष्टी आणि सातत्य आश्चर्यकारक होते.

आणि म्हणूनच तो प्रयोग का फसला आणि किती अंशाने फसला ते निरीक्षून तिची फसगत यापुढे टाळण्यासाठी समाजरचनेची पुनर्घटना करण्यातही आपण आता तसेच धाडस, तशीच शास्त्रीय दृष्टी आणि तशीच लोकहिततत्परता दाखविली पाहिजे. अनुवंशाच्या मूळ तत्त्वाचीच पुन: एकदा छाननी करून त्याच्यातील उपकारक शक्तीप्रमाणे विघातक शक्तीही कोणती आणि त्याचप्रमाणे त्यांचे दौर्बल्य कोणचे तेही निरीक्षिले पाहिजे. (जात्युच्छेदक निबंध–पान-३५).

## राष्ट्रधारणा महत्त्वाची

असे असले तरी, जातिभेद हा एक सामाजिक प्रयोग मानला तरी त्याची बेडी आता पायात राहता कामा नये. कोणत्याही समाजव्यवस्थेचा निकष श्रुतिस्मृती हा न राहता आज राष्ट्रधारणेस उपयुक्त अशी जी समाजव्यवस्था असेल तिचा पुरस्कार व स्वीकार राष्ट्राने केला पाहिजे. एखादा सामाजिक प्रयोग भूतकाळात उपयोगी पडला तरी आज तो उपयुक्त असेल असे नाही म्हणून सावरकर म्हणतात:

'मनुष्यकृत परिवर्तनीय नि प्रसंगी परस्परविरोधी ग्रंथात काय सांगितले आहे त्यावरूनच काय ती कोणतीही सुधारणा योग्य की अयोग्य हे ठरवीत न बसता ती विशिष्ट सुधारणा त्या विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रधारणास हितकर आहे की नाही हे प्रत्यक्ष प्रमाणच काय ते विचारात घेतले जावे. आणि परिस्थिती बदलेल तसे निर्बंधही बेधडक बदलत जावे. पोथीजात जातिभेदास तोडण्यासाठी आजच्या परिस्थितीच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरतील त्या त्या

समाजसुधारणा आपण तात्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस शास्त्राधार आहे का ? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिंदु-राष्ट्राच्या संघटनेस नि अभ्युदयास आपली सुधारणा आजच्या परिस्थितीत अवश्य आहे ना ? हा प्रश्न मुख्य, मग त्यास शास्त्राधार असो वा नसो. मागील भूतकाळाचा राष्ट्रीय अनुभव ध्यानी घेता नि शक्यतो भविष्यकाळच्या क्षितिजाची छाननी करता, आजच्या परिस्थितीत ह्या पोथीजात जातिभेदाने आपल्या हिंदू राष्ट्राची हानीच हानी होत आहे. हिंदू जातीची शकले शकले उडवून, आपसात कलह माजवून अहिंदू आक्रमणास तोंड देण्याची संघटित शक्ती हिंदू राष्ट्रात उत्पन्न होणेच दुर्घट करून सोडले आहे. त्या अर्थी हा पोथीजात जातिभेद आमूलात उच्छेदिणे हेच आपल्या हिंदू राष्ट्राच्या उद्धाराचे एकमेव साधन होऊन बसले आहे.' (जात्युच्छेदक निबंध–पान-८८-८९). सारांश, जात्युच्छेदास शास्त्राधार असो वा नसो, राष्ट्रधारणेस आज तो आवश्यक होऊन बसला आहे ही सावरकरांची भूमिका आहे.

## जातिभेदाने अधःपात

जातिभेदामुळे समाजाचा अधःपात कसा होत आहे याचेही विवेचन सावरकर करतात. हिंदू समाजाचा अधःपात व जातिभेद यांचा कार्यकारी संबंध आहे आणि जातिभेद नि अधःपात यांचे समकालीनत्व आहे. लोकमान्य टिळकांनी एका भाषणात 'जातिभेद, जातिद्वेष आणि जातिमत्सर यांनी आपला देश कसा करपून जात आहे, कसा भाजून निघत आहे. याचेही ज्ञान शाळेतील मुलांना दिले पाहिजे' असे म्हटले होते. हे टिळकांचे उद्गार उद्धृत करून राजकीय बाबत न बोलण्याच्या, न लिहिण्याच्या त्या काळी सावरकरांवर असलेल्या बंधनामुळे जातिभेद राजकीय विभाजनास, मत्सरास कसा कारणीभूत होत आहे याची चर्चा सावरकर करीत नाहीत. पण जातिभेदामुळे हिंदूंच्या पराक्रमाचा कसा संकोच झाला आहे हे स्पष्ट करतात. सावरकरांनी म्हटले आहे:

' अगदी इसवी सनाच्या अकराव्या- बाराव्या शतकापर्यंत जातिभेदाच्या क्षयाने आमच्या नाडया आखडत आल्या असताही विदेशगमननिषिद्धतेच्या परमावधीला तो रोग पोचला नव्हता, तोवर मद्रासच्या पांड्य वीरांच्या सेना विदेशांतही हिंदू राज्ये चालवीत होत्या. शेवटच्या दिग्विजयी पांड्य राजाने त्याच वेळी ब्रह्मदेशाकडे पेगूवर स्वारी केली. नुसते 'प्रतस्थे स्थलवर्त्मना' नव्हे तर अगदी

मोठे प्रबळ नौसाधन (आरमार) घेऊन 'जलवर्त्मना' प्रस्थान केले आणि ब्रह्मदेशाकडे पेगूचा विजय करून येता येता अंदमानादिक त्या समुद्रामधील सारी बेटे हिंदू साम्राज्यांत समाविष्ट करून तो परत आला. पण पुढे जेव्हा तो महासागरसंचारी हिंदू पराक्रम घरच्या विहिरीतला बेडूक होऊन बसला तेव्हा पराक्रम (पर+आक्रम), बाहेरच्या परशत्रूंच्या देशावरच चढाई करणे, हा शब्दच हिंदूंच्या कोशातून लुप्त झाला. शक्यतेचा मूळ उगम आकांक्षेतच असणार. पराक्रमाची, खऱ्या दिग्विजयाची, नवी राज्ये संपादण्याची, आपली संस्कृती आणि प्रभाव सप्तद्वीपा वसुंधरेवर दिग्विजयी करण्याची आकांक्षाच जेव्हा 'जातीच्या' हिंदूंस पाप झाली तेव्हा त्यास दिग्विजय करण्याची शक्यताही दिवसेंदिवस नष्ट होत गेली.' (जात्युच्छेदक निबंध, पान–७, ८). मराठ्यांच्या इतिहासाचे उदाहरणही सावरकर देतात. मराठ्यांनी स्थापन केलेल्या हिंदूपदपादशाहीच्या पतनकाली इंग्रज कोण, त्याचे सामर्थ्य किती आहे याची पुरेशी माहिती नव्हती. कारण देशाबाहेर कोणीच गेलेले नाही. राघोबादादांचा वकील विलायतेस गेला तर त्याला परत आल्यावर प्रायश्चित्त घ्यावे लागले. भारताने नौसाधने वाढविली का नाहीत त्याचे कारण आपली 'जात' जाईल ही भीती.' (जात्युच्छेदक निबंध–पान ८)

## चातुर्वर्ण्य आणि जातिभेद

जातिभेदाचे मूळ चातुर्वर्ण्यात आहे या लोकप्रिय समजुतीचाही उल्लेख सावरकरांनी केला आहे. सावरकरांनी ही समजूत खोडून काढली आहे. चातुर्वर्ण्यात व जातिभेदात महदंतर आहे. चातुर्वर्ण्यं मया सृष्टं म्हणजे मी चातुर्वर्ण्य ही संस्था निर्माण केली. त्यात गुणधर्माप्रमाणे लोकांस मी जन्म देतो आणि तोही वंशपरंपरा देत राहतो या अर्थाचा मागमूसही या श्लोकात नाही. सावरकरांनी म्हटले आहे, 'सनातन धर्माचा जर कोणी कट्टर शत्रू असेल तर जातिभेदाचे निर्मूलन करू निघालेला सुधारक नसून जातिभेदासही सनातन म्हणून उचलून धरणारा सनातन धर्माभिमानीच होय. ज्या तत्त्वानुरूप आणि कारणानुरूप आपल्या हिंदू धर्माची शकले उडाली आहेत त्यावरून पूर्वीच्या चार किंवा फार तर पाच वर्णांचे–जातींचे आज हजारो वर्ण व जाती झालेल्या आहेत. आपल्या राष्ट्रदेहाचे हे रोटीबंद, बेटीबंद, तटबंद असेही सहस्रशः तुकडे पाडणारा हा जातिभेद, ही चातुर्वर्ण्याची मारक विकृती–हा सामाजिक रोग असाच्या

असा भरभराटू देणे हे आपल्या राष्ट्रीय शक्तीस पोषकच आहे, असे आपणांस अजूनही खरोखर वाटते काय?' (जात्युच्छेदक निबंध पान १८, २४).

## सनातन धर्म आणि जातिभेद

'चातुर्वर्ण्य आणि जातिभेद यांचा अन्योन्य संबंध ही समजूत जातिभेदाच्या समर्थकांना बळ देते तसेच सर्वसाधारण लोकांचा जात्युच्छेदनास विरोध असण्याचे एक महत्त्वाचे कारण, सावरकरांनी जातिभदाची चर्चा करताना सांगून सनातन धर्म म्हणजे जातिभेद नव्हे हे स्पष्ट केले आहे. सावरकर म्हणतात, 'आदिशक्तीचे स्वरूप जगताचे आदिकारण आणि जगताचे आदिनियम हे खरोखरीच सनातन, शाश्वत व त्रिकालाबाधित आहेत. तेच काय ते सनातन असू शकतात. कारण जगताचे आदिकारण आणि त्याची इच्छा वा शक्ती हे बदलणे ही मनुष्यशक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे. ते आहेत आणि तसेच निरवधी राहणार. मनुष्यजातची जात जरी नष्ट झाली तरी ते नष्ट होणार नाहीत. वास्तव धर्माच्या या अर्थासच काय ते सनातन हे विशेषण यथार्थाने लागू शकते. पण तेथे धर्म शब्दाचा अर्थ आचार असा असतो त्रिकालाबाधित आदितत्त्वाचे आदिनियम असा नसतो. आचार मनुष्याप्रीत्यर्थ आणि मनुष्यकृत असल्यामुळे ते नश्वर आणि अशाश्वत असलेच पाहिजेत आणि म्हणून नुसते जातिभेद तर काय पण उभे जुने कर्मकांडच्या कर्मकांड जरी बदलले तरी सनातन धर्म बुडणे शक्य नाही. सनातन धर्म बुडविणे मूठभर सुधारकांच्या तर काय, पण मनुष्यजातीच्या हातचे नाही.

## परिवर्तनीय आचार

'जातिभेदाला सनातन धर्म न मानता समाजाचा परिवर्तनीय आचार मानला तर सामाजिक दृष्ट्या व राष्ट्रधारणेच्या दृष्टिकोणातून जातिभेदांचे निर्मूलन हे आवश्यक ठरते. असा आचार बदलण्याचा हिंदुधर्मावर हा काही पहिलाच प्रसंग नाही. पण असे परिवर्तनाचे शेकडो प्रसंग हिंदू समाजावर येऊन गेले. म्हणूनच हा समाज जिवंत राहिला आहे.' (जात्युच्छेदक निबंध, पान १५–१६)

## जातिभेदाचे निर्मूलन करावयाचे कसे?

सारांश, जातिभेदांना धर्माचा आधार नाही. ती एक कालमृत सामाजिक संस्था आहे असे म्हटले तरी या जातिभेदाचे निर्मूलन कसे

करावयाचे ? सावरकरांनी एका सूत्राचा यावर उपाय सांगितला आहे. ‘ जन्मजात जातिभेदाचा उच्छेद आणि गुणजात उद्धार’ हे ते सूत्र. जातिभेद टिकावेत असे आता कोणासच वाटत नाही. पण एकमेकांवर दोषारोप मात्र सर्वच जण करीत असतात. सावरकरांनी स्पष्टपणे सांगितले आहे, ‘ जातिभेद निर्माण झाले ते काही ब्राह्मण किंवा क्षत्रियांच्या संयुक्त कटाने नव्हे.’ सावरकरांनी स्पष्टपणे म्हटले आहे, ‘ जातिभेदाची कल्पना म्हणा, कावा म्हणा, ब्राह्मणांनीच केला आहे असेही क्षणभर मानले तरी ब्राह्मण या अफाट हिंदू समाजात केव्हाही मूठभर असल्याने त्या मूठभरांच्या शब्दास निर्बंधाचे (कायद्याचे) कर्तुमकर्तुम् सामर्थ्य देणारी राजशक्ती, दंडशक्ती ही कोणाची होती ? क्षत्रियांचीच. जातिभेदाच्या प्रथेने प्रत्यक जातीला आपल्या खालच्या जातीवर वर्चस्व गाजविण्याची संधी अनायासेच मिळत असल्याने ती प्रथा सर्वांसच थोडयाबहुत प्रमाणात हवीशी वाटली आणि म्हणून आपली जाती सर्वश्रेष्ठ म्हणून कोणी कितीही धडपड केली तरी जातिभेदाचेच निर्मूलन करण्यास कोणीही इच्छित नव्हते, तर उलट जात्यहंकाराचे स्तोम माजविण्यासच त्या संस्थेचा ज्याने त्याने उपयोग केला आणि त्या उपयुक्ततेकरता तिला ज्याने त्याने या वा त्या प्रमाणात उचलूनच धरले ही खरी वस्तुस्थिती आहे. प्रत्यक्ष बुद्धकाळातही जातिभेद चुकीचा आहे असे न म्हणता जातिश्रेष्ठत्वाचा, अग्रवर्णाचा मान हा ब्राह्मणांचा नसून क्षत्रियांचा आहे एवढाच वाद कित्येक लिखाणात घातलेला आढळतो. तेव्हा आजवर जातिभेदाच्या प्रस्तुतच्या अत्यंत विकृत स्वरूपाने आपल्या हिंदू राष्ट्राची अत्यंत भयंकर हानी होत असेल तर जन्मजात जातिभेदांच्या त्या हानीचा दोष हा कोणाही एका वर्णाचे माथी मारण्यापेक्षा त्या दोषाचे वाटेकरी आपण आब्राह्मण चांडाळ, सर्व जाती, सर्व वर्ण सर्व व्यक्ती आहोत, असेच मानणे योग्य व इष्ट होणारे आहे. जातिभेदाने पूर्वी जे कल्याण झाले वा आज होत असेल वा झाले असेल त्याचे श्रेयही आपणा सर्वांचे आहे.’ (जात्युच्छेदक निबंध, पान–२६–२७).

## व्यावहारिक सूत्रे

जातिभेदाचे निर्मूलन करणे हे आज हिंदूंचे सामाजिक कर्तव्य असले तरी त्याचा व्यवहार्य मार्ग शोधला पाहिजे, ही सावरकरांची भूमिका आहे. म्हणून ते म्हणतात, ‘ शस्त्रवैद्य जसा विच्छेदनाचे वेळी

मूळ प्रकृतीस कमीतकमी धक्का कसा पोहोचेल याविषयी पराकाष्ठेची काळजी घेतो तीच भूमिका समाजसुधारकाची असली पाहिजे. जातिभेदाच्या मुळाशी जी लोकहितकारक मूलतत्त्वे आहेत किंवा होती त्यापासून होणाऱ्या बहुतेक लाभांना ज्या योजनेत आपण अंतरणार नाही किंवा ज्या योजनेने आपणांस टाळता येणारी आहे अशीच योजना, असाच नवा आधार आपण उद्भविला पाहिजे. आमच्या मते वर निर्दिष्ट केलेली योजना म्हणजे जन्मजात जातिभेदाचा उच्छेदच आणि .गुणजात जातिभेदाचा उद्धार ही आहे.'

## आनुवंशिक गुणविकास

'जातिभेदाच्या प्रथेच्या मुळाशी आनुवंशिक गुण विकासाचे तत्त्व होते असे त्याचे एक समर्थन करण्यात येते. म्हणजे गुणी माणसांची मुले गुणी निघतात हा त्या तत्त्वाचा ढोबळ अर्थ. एखाद्या मनुष्यात जर एखादा गुण व प्रवृत्ती असेल तर त्याच गुणाचा, प्रवृत्तीचा व कार्याचा व्यासंग त्याने सतत चालविला असता त्याच्या संतानातही इतर घटक समान असता तो गुण व ती कार्यक्षमता अधिक उत्कटपणे प्रकटणे अपरिहार्य आहे. आता त्या संतानाने तोच गुण पुढे वाढवीत नेला आणि तशाच गुणाच्या स्त्रीशी संबंध केला आणि ही परंपरा पिढ्यानपिढ्या अशीच अविच्छिन्न चालली तर तो गुण, तो स्वभाव व ती विशिष्ट कार्यक्षमता त्या कुलात इतर घटक समान असता, अत्यंत उत्कटपणे येऊ शकेल. हा नियम सर्व प्राणिमात्रांसही लागू आहे.' असे सावरकरांनी आनुवंशिक गुणविकासाचे थोडक्यात विवरण केले आहे. (जात्युच्छेदक निबंध, पान–३१–३२)

सावरकरांनी आनुवंशिक गुणविकासाचे (हेरेडिटी) हे तत्त्व सर्वस्वी असमर्थनीय किंवा असंभाव्य ठरविलेले नाही. पण सावरकरांनी 'अनुवंश हे गुणविकसनाचे एकमेव कारण नाही. बीज हा एक घटक आहे' असे सांगितले आहे. त्यांचे म्हणणे असे, 'उपजत गुणविकास नुसत्या उपजण्याने होणार नाही. तर बाह्य परिस्थितीवरही तो अवलंबून असतो. दशग्रंथी ब्राह्मणाचा मुलगा उपजतच 'हरिः ॐ' म्हणून वेदपठण करू लागत नाही. जातिभेदाचे मूळ गुणजातता नसून जन्मजातता आहे. पण या महान सामाजिक प्रयोगामागे शास्त्रीय दृष्टी व सद्बुद्धी होती हे निःसंशय. या प्रयोगामागे असलेले धाडस व सातत्य आश्चर्यकारक होते यात शंका नाही. पण त्यांच्यातील उपकारक भाग व विघातक भाग कोणता हे ओळखून

१४।१५

आता समाजव्यवहार सुधारला पाहिजे असे सावरकरांचे मत आहे.

## अनुवंशाच्या मर्यादा

गुणविकास हे जातिभेदाचे एक उद्दिष्ट मानले तरी आनुवंशिक गुणविकास हा शिक्षण, हवामान, भौगोलिक भिन्नता वगैरे घटकांवर अवलंबून असतो. ही गुणविकासाची मर्यादा लक्षात घेतली पाहिजे. पण आनुवंशिक गुणविकास हा स्वयंपूर्ण व एकमेव घटक असे मानण्याची चूक झाली आहे. पण आता स्थिती अशी आहे की, गुण विकसित तर राहोच पण मृतप्राय झाला तरी त्याची क्षिती न बाळगता अनुवंश तेवढा असला म्हणजे गुणाचे काय काम असे आव्हानच करणारी विचित्र वस्तुस्थिती उत्पन्न झाली आहे. आणि लोकांनाच आम्ही काय समजू लागलो. अनुवंश असला की त्या जातीत तो गुण असलाच पाहिजे ही धारणा किंबहुना तो गुण आहे की नाही हा प्रश्न नाही, जन्म त्या जातीत आहे की नाही हा मुख्य प्रश्न.'

सावरकरांचा दुसरा आक्षेप असा की अनुवंशाने गुणविकसन होते हे गृहीत धरले तरी सद्गुणांबरोबर दुर्गुणही दृढ किंवा वृद्धिगत होतात. पण माणसाने आनुवंशिक गुणविकासावर अतिरेकी विश्वास ठेवल्यास बीजशुद्धी आणि क्षेत्रशुद्धी शंभर टक्के सांभाळली जावी म्हणून बहीणभावांची हीच अत्यंत श्रेष्ठ विवाहपद्धती होय असे मानण्यापर्यंत त्याची मजल गेली.

संकर आणि सगोत्र विवाहाची चर्चाही सावरकरांनी केली. 'मानवी जातींचा जातीय अनुवंश पिढ्यानुपिढ्या शुद्ध राखणे हे अगदी दुर्घट आहे. निसर्गच ही शुद्धतेची काळजी घेतो. कारण मासा काही पक्ष्याला जन्म देत नाही. जातीची मूळ व्युत्पत्तीच सांगते की जन्माने येते तीच काय ती जात, पोथीने येते ती नव्हे, तसेच आपल्या चार वर्णांतही अनेक वेळा संकर झालेला आहे. आमच्या शेकडो जाती संकरोत्पन्नच आहेत. त्याप्रमाणे श्रुतिस्मृतिपुराणोक्त अशी तिथेच सनातनी मुद्राच ज्या प्रथांवर मारलेली आहे त्या पितृसावर्ण्य, मातृसावर्ण्य, अनुलोम, प्रतिलोम ह्या चार प्रथांवरूनदेखील हे निर्विवाद सिद्ध होऊ शकते की चारी वर्णांत काय किंवा संकरोत्पन्न चारशे जातींत काय, अगदी निःसंकीर्ण अनुवंश असा कोठे राहिलेलाच नाही. आणि म्हणूनच आनुवंशिक गुणविकासाच्या नियमान्वयेच आमच्यात परस्परांचे गुणावगुणही संकीर्ण झालेले आहेत.' (जात्यु-

च्छेदक निबंध–पान– ३५,३६, ३७).

## जन्मजात जातींचा उच्छेद

सारांश, जातिभेदविषयक सावरकरांच्या विचाराची मुख्य सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत–

आजच्या जातिभेदाचे अत्यंत प्रमुख लक्षण जन्मजातपणा आणि जन्मजातपणाचे समर्थन करू शकणारे अत्यंत प्रमुख तत्त्व नि हेतू म्हणजे आनुवंशिक गुणविकासाचा नैसर्गिक नियम. आनुवंशिक गुण-विकासासंबंधी सावरकरांचे विचार वर दिले आहेत. त्यांचे थोडक्यात म्हणणे असे की आजच्या जाती ह्या नैसर्गिकतःच भिन्न नसल्यामुळे त्या केवळ मानीव व पोथीजात असल्यामुळे त्यांचा अनुवंश, त्यांची बीजशुद्धी निर्भेळ राहणे दुर्घट असणारच. व्यावहारिक अनुभवही हेच सिद्ध करतो.

जातिभेदाचा मुख्य आधार भावना आहे. आज त्याच्यामागे दुसरी शक्ती उभी नाही. आणि त्याचे खरे मरण आपल्या न मानण्यात आहे. यास्तव ती जात्यहंकारी भावना आपण प्रत्येकाने सोडली, की त्याचे मरण ओढवेलच. म्हणून सावरकरांनी पुढील उपाय सुच-विले आहेत–

१) प्रत्येकाने अमकी हिंदू जात जन्मतः उच्च आणि अमकी जन्मतः नीच ही भावना मनास केव्हाही शिवू देता कामा नये. उच्च-नीचता प्रगट झालेल्या गुणांवरून ठरेल.

२) प्रत्येक हिंदू मुलाची जन्मजात जात अशी एकच–हिंदू. त्या वाचून दुसरी कोणतीही पोटजात मानू नये. 'जन्मना जायते हिंदुः' वास्तविक पाहता मनुष्याची खरी जात मनुष्य हीच तेवढी. पण जोवर मुसलमान–ख्रिश्चनादी विधर्मीय लोक त्या उच्च ध्येयास सोडून आपणांस जन्मजात मुसलमान व ख्रिश्चन मानतात आणि हिंदूंना गिळू पाहतात तोवर तरी स्वसंरक्षणार्थ जात्यहंकार आपणही धरलाच पाहिजे. प्रत्येक हिंदू मुलास प्राथमिक शिक्षण, व्यावहारिक व धार्मिक समानतेने पुढे त्यात जो गुण वा प्रवृत्ती प्रकट होईल त्याप्रमाणे तो आपला व्यवसाय करील.' –(जात्युच्छेदक निबंध–पान ६५–६६)

## जातिनिर्मूलनासाठी काय करावे?

ज्यांना जन्मजात म्हणविणारा जातिभेद मान्य नाही, तो अनिष्ट

९३।१७

आहे असे वाटते, तो मोडावयाचा म्हणजे काय करावयाचे हा प्रश्न पडतो. त्यासाठी सावरकरांनी कार्यक्रम दिला आहे. का ी सूत्रे सांगितली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात सावरकरांनी जी सामुदायिक चळवळ केली त्यामुळे जात्युच्छेदक चळवळीचे प्रात्यक्षिकच लोकांपुढे केले होते. त्या जात्युच्छेदक सामाजिक विचारांचे व चळवळीचे स्वरूप कसे असावे त्याचा तो एक नमुना होता. त्याचे वर्णन दोन लेखांत ('जन्मजात जातिभेद मोडावयाचा म्हणजे काय करावयाचे ?–किर्लोस्कर फेब्रु.–मार्च १९३५) सावरकरांनी केले होते. सावरकरांच्या या लेखांचा सारांश त्यांनीच स्वतः दिला आहे. सावरकर म्हणतात,

'आजचा जातिभेद हा 'जन्मजात' म्हणून म्हणवीत असला तरी तो 'निव्वळ पोथीजात' आहे. जन्मताच प्रगटणाऱ्या कोणत्याही रूपगुणधर्माच्या भिन्नतेने आजच्या जाती निरनिराळ्या ठरू शकत नाहीत. अमक्या छापाच्या गटात अमुक जन्मला म्हणून तो श्रेष्ठ किंवा स्पृश्य आणि अमुक कनिष्ठ वा अस्पृश्य 'मानला' जावा असे पोथीत सांगितले आहे. यासाठी तो तसा नुसता मानला जात आहे. आजचा जातिभेद हा जन्मजात नसून निव्वळ पोथीजात आहे.

'आजच्या जातिभेदाची ही जन्मजात म्हणून नुसती मानल्या गेलेल्या उच्चनीचतेची विषारी नांगी मोडून टाकली गेली की, मग त्या त्या जाती वा उपजाती नुसत्या नावाने आणखी काही काळ जरी अशाच राहिल्या तरी मोठीशी हानी होणार नाही. प्रत्येक कुळाचे आडनाव जसे भिन्नभिन्न असते, परंतु त्या कुळाला प्रत्यक्ष गुणाने उपार्जिल्यावाचून कोणताही अधिकार भोगता येत नसल्यामुळे त्या भिन्न नावाच्या गटांमुळे जसा कोणताही परस्पर मत्सर वा राष्ट्रीय विघटना आज होऊ शकत नाही, तशीच ब्राह्मण, क्षत्रिय, साळी, माळी, महार, चांभार प्रभृति विभिन्न नावे त्या त्या जातींच्या गटांची यापुढेही जरी चालली आणि जरी त्यांच्या विशिष्ट परिषदा, संघ, सण नि संस्कार जातवारीने यापुढेही चालत राहिले, तरीही त्यांना जर प्रत्यक्ष व्यवहारात कोणतेही विशिष्ट हक्क प्रगट गुणांवाचून उपभोगिता आले नाहीत तर, आणि जर यच्चयावत अधिकार नि व्यवसाय सर्व जातींना समानतेने उघडलेले असले तरी-अशा घरगुती गटांनी राष्ट्रीय संघटनेची हानी होण्याचा संभव म्हणण्यासारखा उरणार नाही. उलट अपरिहार्य म्हणून उरणाऱ्या ह्या अशा नांगी तोडलेल्या जातवार गटांचा उपयोगही राष्ट्रीय संघटनेला तसाच

करून घेता येईल की जसा तालुका, जिल्हा, इलाखा प्रभृति भौतिक गटांचा उपयोग राज्याच्या संघटनेला करून घेता येतो.'

## ज्ञातिपरिषदांचा उपयोग

'जातीय परिषदा नि ज्ञातीय संस्था खाली दिलेली मुख्य सूत्रे आपल्या मूळ उद्देशपत्रिकेत दोन ध्रुवांप्रमाणे अढळपणे अंकितील.प्रत्येक ज्ञातिपरिषदेची पहिली प्रतिज्ञा, पहिले सूत्र, हे असले पाहिजे की, 'आम्ही कोणत्याही इतर जातीस केवळ जन्मामुळेच, जन्मताच, हीन तर मानीत नाही वा उच्चतर मानीत नाही,' आणि दुसरी प्रतिज्ञा ही की, 'आमच्या जातीतील व्यक्तीत जे गुण प्रगटपणे नि प्रत्यक्षपणे आढळून येतील त्यावरूनच आमची पात्रापात्रता ठरविली जावी, आम्हांस अधिष्ठान मिळावे, इतरांप्रमाणेच त्या आमच्या गुणाचे चीज व्हावे, इतरांप्रमाणेच त्या गुणांच्या संपादनास नि संवर्धनास आम्हासही मोकळीक असावी, पण प्रत्यक्ष गुणांच्या कसोटीहून निराळ्या अशा कोणत्याही पक्षपाती पोथीजात ज्ञातिनिष्ठेच्या वशिल्याने इतर कोणतेही न्याय्य अधिकार लुबाडण्याची आमची मनीषा नाही. प्रत्येक ज्ञातिसंघाने ह्या दोन स्पष्ट प्रतिज्ञांच्या पायावर आपली ज्ञातिसंघटना केली असता ती इतर जातींच्या हानीस सहसा बाधक होणार नाही, इतकेच नव्हे तर त्या दोन सूत्रांच्या कक्षेत येणाऱ्या त्या त्या जातींची शिक्षण–आरोग्य–शक्ती–संपन्नता– सहकार्याची वाढ ही आपल्या अखिल हिंदू राष्ट्राच्या संघटनेस सहायकही होण्याचा संभव आहे. जन्मजात कुलांचे गट जसे असतात, तसेच हे जन्मजात जातींचे गटही आपल्या हिंदू राष्ट्राच्या विघटनेसच आजच्यासारखे कारणीभूत न होता संघटनेसही सहाय्य होतील. आमच्या राष्ट्रीय महासेनेच्या त्या निरनिराळ्या उपसेना आपल्या परंपरांच्या छावण्यांतून गटागटांनी संघटित नि सज्ज होत राहिल्या तर ते फारसे अनिष्ट नाही. राष्ट्रीय ध्वजाखाली राष्ट्रीय ध्येयासाठी राष्ट्राचे रणशृंग फुंकले जाताच त्या त्या उपसेना झटकून एकत्र करून त्या महासैन्याच्या सुसंगत हालचाली करण्यास ही त्याची गटागटांनी केलेली पूर्वसज्जता उपयोगी पडल्यावाचून राहणार नाही. जोवर ह्या जाती मोडता येत नाहीत, तोवर त्यांच्या विभिन्न परंपरेच्या आवडीनिवडींचा संघर्ष नि विरोध कमीत कमी हानिकारक करवून घेण्याचा आजच्या परिस्थितीत जो एकच मार्ग आहे तो वरील दोन सूत्रे हाच होय.

१८।१९

'या दृष्टीने पाहता रत्नागिरीच्या चित्पावन संघाचे उदाहरण काहीसे उल्लेखनीय आहे. या संघाने आपल्या मूळ उद्देशपत्रिकेत ही वरील दोन सूत्रे गोविलीं असून नुकत्याच झालेल्या त्याच्या वार्षिक साधारण सभेतही त्यांचा सबळ पुरस्कार केला आहे. ' हा ज्ञातिसंघ आपल्या हिंदुराष्ट्राच्या कोणत्याही ज्ञातीस केवळ जन्मतःच उच्च वा नीच मानीत नाही. प्रत्यक्षपणे प्रकट होणाऱ्या त्याच्या गुणावरूनच ज्याची पात्रता ठरविली जावी आणि कोणत्याही ज्ञातीस वा व्यक्तीस अंगी ते ते प्रकट गुण नसता केवळ जन्माच्या वशिल्यानेच कोणतेही विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानी भोगता येऊ नयेत वा भोगावी लागू नये असेच या संघाचे ब्रीद आहे.' अशी ग्वाही त्या संघाच्या बहुतेक प्रमुख वक्त्यांनी त्या सभेत जी दिली ती स्तुत्य आहे. जर तो संघ त्याचे हे लिखित ब्रीद तितक्याच प्रामाणिकपणे व्यवहारातही आचरील आणि वैश्य, सारस्वत, मराठा, भंडारी प्रभृति ज्ञातिसंघही जर तेच ब्रीदवाक्य शिरोधार्य करतील, तर या ज्ञातिपरिषदा नि हे ज्ञातिसंघ अखिल हिंदुराष्ट्राच्या राष्ट्रीय विघटनेस कारणीभूत होण्याचे भय फारसे उरणार नाही. हिंदू संघटनेच्या महत्कार्यास ते झाल्यास उपकारकही होऊ शकतील.'

(जात्युच्छेदक निबंध पान १६६–१७१).

## भट आणि भंगी

जातिभेद हा चतुष्पाद प्राणी आहे. हे त्याचे चार पाय म्हणजे व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी. या चार रूढी संघटनेस घातक आहेत. त्यांचे उच्चाटन आपण आधी केले पाहिजे. व्यवसायांपैकी भट आणि भंगी हे व्यवसायबंदी असलेले व्यवसाय दुसरे कोणी करीत नाहीत. सुधारकांनी व्यवसायबंदी तोडली पाहिजे असे सावरकरांनी सुचविले. त्यासाठी भंग्यास सन्मानाने वागवावे. आपल्या घरी भंग्यास येऊ द्यावे. सुधारकांनी जाणूनबुजून सार्वजनिक-पणे भंग्याचे काम करावे. सारे काम स्वतःच करून गाव स्वच्छ ठेवावे. भटाची व्यवसायबंदी तोडण्याचे दोन उपाय सावरकरांनी सुचविले आहेत. ब्राह्मण सुधारकांनी शक्यतो भटजी बोलावू नये. सर्व व्रते, पूजापाठ, सत्यनारायण स्वतःच करावेत. विवाह नोंदणीपद्धतीने करावा. दुसरा उपाय हा की ब्राह्मणेतरांनी भटजीस चक्क अट घालावी की आपले संस्कार वेदोक्त पद्धतीनेच व्हावेत. तसे ते करणार नसतील तर आपणच भक्तिभावे पूजा करावी. भटांची भटशाही

२००५
दा. क्र. २३०८९
निबंध २८।०१।०३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

सर्वस्वी यजमानांच्या भाबडेपणावर चालते. स्पर्शबंदीबद्दल सावरकरांनी म्हटले, ' आज अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदूंना महारोगाचे विष समाजाकडून बळाने टोचण्यात येते. पण हा छळ स्पृश्यच करतात असे नाही तर महार भंग्यांचा ब्राह्मण बनतो. म्हणून स्पर्शबंदी तोडण्यासाठी केवळ स्पृश्य सुधारकांनीच नव्हे तर अस्पृश्य सुधारकांनीही परस्परांशी सहकार्य करून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. स्पर्शबंदी तोडण्याचे दायित्व स्पृश्यांइतकेच अस्पृश्यांवरही आहे. अस्पृश्यता घालविणे म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शिवणे हेच होय.'

'अस्पृश्य सुधारकांनी आणखी एक व्रत व्यक्तिश : स्वीकारले पाहिजे. आज निर्बंधाने अनेक शाळा, कचेऱ्या, धर्मशाळा, विहिरी, वाहने प्रभृति सार्वजनिक स्थानी अस्पृश्यतेचे उच्चाटन केले आहे. त्या साऱ्या नैर्बंधिक (कायदेशीर) सवलतींचा प्रत्यक्ष उपयोग प्रत्येक अस्पृश्य सुधारकाने हटातटाने करून त्या आत्मसात केल्या पाहिजेत. ही गोष्ट सध्या त्यातल्या त्यात सहज आहे. कारण त्यात निर्बंधाचे साहाय्य सुधारकांच्या बाजूस आहे. या कामी श्री. राजभोज बोर्डाच्या विहिरीवर अस्पृश्यांकडून प्रत्यक्षपणे पाणी भरविण्याची जी खटपट करतात आणि नागपूरप्रभृति प्रांती निर्बंधानुरूप घडलेल्या तलावप्रभृति स्थानांचा प्रत्यक्ष उपयोग करून घेण्याचा पायंडा जो तिकडील अस्पृश्य पुढारी चढाई करून, वेळी सत्याग्रहाने पाडीत आहेत, जो प्रत्येक ' अस्पृश्या ' ने जिकडे तिकडे अनुकारिला पाहिजे.

' परंतु आज जे हे नैर्बंधिक अधिकार अस्पृश्यांस मिळालेले आहेत. त्या सर्वांत अत्यंत परिणामकारक अधिकार म्हणजे शाळांतून मुले सरमिसळ बसविण्याचा होय. हा अधिकार प्रत्येक अस्पृश्याने तलाव, विहिरी प्रभृतींच्याही आधी बजावावा. मुले प्रत्यही शाळेत स्पृश्यास्पृश्य भावना विसरावयास शिकली की, पुढच्या पिढीला धोबी प्रभृतीप्रमाणेच महारभंगीही पूर्णपणे नि सहजगत्या स्पृश्य वाटणारच. केवळ सवयीच्या बळे ते अस्पृश्य केव्हातरी होते याची आठवणही बुडेल. (जात्युच्छेदक निबंध–पान १७४, १७५, १७७).

## रोटीबंदीचे उच्चाटन

सत्तर वर्षांपूर्वी हरिजनांबरोबर जेवणे हेसुद्धा सुधारकी कार्य समजले जाई. अस्पृश्यतेचे किंबहुना जातिभेदाचे उच्चाटन करण्यासाठी सहभोजन हा एक सामाजिक कार्यक्रम करण्याची प्रथा सावर-

१०।१०।००

करांनी रत्नागिरीत सुरू केली. सावरकर म्हणत की, पोटजात-जातिभेदाचे मरण सहभोजनात आहे. भिन्न जातीयांबरोबर जेवणे हा कार्यक्रम दिसायला सोपा होता खरा, पण सावरकरांनी त्यासाठी सहभोजनाची चळवळ केली व त्याचे समर्थन करणारे लेख लिहिले—शेकडो गावी सहभोजने घडवून आणली. त्यांचे सूत्र ' सहपान वा सहभोज ' हा वैद्यशास्त्रीय प्रश्न आहे. वैद्यशास्त्रीय दृष्टया जे पचेल जे रुचेल ते कोणत्याही मनुष्यासह खावे—मग तो हिंदू असो वा मुसलमान. खाण्याने धर्म बुडत नाही. धर्माचे स्थान हृदय आहे, पोट नव्हे. ' जातिभेदाचा जो जिवंत चालता पाय जी रोटीबंदी ती तर प्रत्येक सुधारकाने तत्काळ आणि सारखी तोडीत राहिली पाहिजे. सहभोजन हाच जातिभेदाच्या समंधास गाडणारा प्रबळ मांत्रिक, नुसत्या शास्त्राधाराच्या एरंडाच्या गुऱ्हाळाने तर जातिभेद मरणार नाहीच, पण प्रत्यक्ष शस्त्राधारांच्या नैर्बंधिक सक्तीसही तो मारणे दुर्घट, अनिष्टही. जसा मारावा तसा जर त्यास मारणे असेल, तर सुधारका, तू तुझ्यापुरती रोटीबंदी तत्काळ तोडून टाक. किती सोपे हे साधन. ब्राह्मण व महारांनी एकत्र बुंदीचे लाडू झोडावयाचे की जातिभेद मेलाच म्हणून समजा. जातिभेदाच्या ह्या अजिंक्य किल्ल्यास असाच शाप मिळालेला आहे की, तू शतकोशतके ब्रॉंबगोळयांच्या माऱ्यानेही ढासळणार नाहीस, पण शेवटी बुंदीच्या लाडवांचा मारा मात्र तुझा चक्काचूर उडवील.' (जात्युच्छेदक निबंध—पान १७९–१८०–१८५)

## जातिभेद अपरिहार्य व अनिष्ट आहे

आमचे उपनाव सावरकर, किर्लोस्करांचे किर्लोस्कर. नुसती उपनावे सावरकरांच्या कुळात जन्मलेला मनुष्य म्हटला की तो ती परीक्षा उतरो वा न उतरो, बॅरिस्टर समजून ते अधिकार त्याला मिळालेच पाहिजेत आणि किर्लोस्कर कुळातील प्रत्येकाने त्याला त्या धंद्याची आवड वा पात्रता असो वा नसो, त्याने लोखंडी नांगराचाच कारखाना काढला पाहिजे असा जन्मजात नियम केला की भांडणाला आरंभ झालाच— समाजाची हानी झालीच म्हणून समजावे. आज जातिभेदाने जी हानी नि वैमनस्ये माजतात, ती अशा केवळ मानीव जन्मजात उच्चनीचतेच्या विशिष्टाधिकारांनी आणि विशिष्ट व्यंगांनीच काय ती माजतात. कोणत्याही जातीला तिच्या प्रकट गुणापलीकडे कोणतीही विशिष्ट उच्चता वा नीचता चिकटविणे बंद झाले

की मग स्वत:स कोणी ब्राह्मण म्हणविले काय किंवा महार म्हणविले काय, ब्राह्मण संघ स्थापला काय, महार संघ स्थापला काय ते कोण्या कुळाने सावरकर म्हणविले काय किंवा किर्लोस्कर म्हणविले काय हे जितके निरुपद्रवी, जवळ जवळ तितकेच निरुपद्रवी होणारे आहे.

इतके विवेचन एकदा ध्यानात ठेवले, की मग ह्या संक्रमणकाला-पुरते जात्युच्छेदक पक्षाने जातिसंघाविषयी काय धोरण ठेवावयाचे ते ठरविणे पुष्कळच सुलभ होते. ते कसे हे आता थोडक्यात पाहू.

## संक्रमणकालात जातिसंघ हे एक अपरिहार्य अनिष्ट आहे

'जात्युच्छेदकांनी एक मुख्य गोष्ट जी ध्यानी ठेवली पाहिजे, ती ही की या संक्रमणकालात आणखी शंभर वर्षे तरी जातिसंघही 'मोड' म्हणताच मोडून जाणारे नाहीत. ती आपल्या मार्गातील एक अनिष्ट नि प्रचंड धोंड आहे आणि तो पहाड कुदळींच्या घावासरशी उन्मळणे दुर्घट. त्याला बोगदे पाडणे मात्र त्यातल्या त्यात सुलभ. ते एक अपरिहार्य अनिष्ट कसे, ते सविस्तरपणे या लेखाच्या अवकाशात सांगणे अशक्य, पण काही मुख्य कारणे उल्लेखू. यातील सभासदांनी प्रकट-पणे आपली हिंदू हीच काय ती यापुढची जात नोंदवावी. शिरगण-तीत सरकारी कागदातही पोटजात मानू नये, लिहू नये. आम्ही असेच करतो. स्पर्शबंदी, रोटीबंदी प्रकटपणे नावे छापून तोडावी. सहभोज-नांचा सारखा धूमधडाका उडवावा. पूर्वास्पृश्यांच्या घरी प्रकटपणे नावे देऊन जेवावे. स्वच्छतेचे बंधान तेवढे पाळणे आवश्यक.

## जातिसंघांची अपरिहार्यता

आपण कोणताही जातिसंघ स्थापू नये. कोणतीही जात आजची आपली जात म्हणूनच मानू नये– सांगू नये. परंतु आपण जन्मलो अमक्या कुळात हे जसे सांगणे अनाक्षेपार्ह, तसेच आपण जन्मलो अमक्या जातीत हे सांगणे अनाक्षेपार्ह. ते नाकारणे हास्यास्पद. मी राष्ट्रवादी असलो तरी कोणत्या गावी जन्मलो हे विचारता 'हिंदु-स्थानात' हे सांगणे हास्यास्पद. भगूर गावी जन्मलो हेच सांगणे युक्त, सत्य, अनाक्षेपार्ह. तसेच जन्मलो चित्पावन कुळात हेही सांगितलेच पाहिजे. तो इतिहासच आहे. कारण माझे वाड-वडील चित्पावनात मोडत हे नाकारणेच अशक्य. मी स्वत: चित्पावन जातीत, पण आता मनाने आहे हिंदू जातीचाच काय तो, हेच ठाण घेतले पाहिजे. त्याच-प्रमाणे मी जरी स्वत: जातिसंघ न काढला तरीही जोवर काही प्रश्न

निव्वळ विशिष्ट जातीपुरतेच सोडविणे हिंदुसंघटनांच्या दृष्टीनेच अपरिहार्य आहे, तोवर त्या प्रश्नांपुरती जातीपातीची जाणीव मला ठेवलीच पाहिजे. संक्रमणकालापुरता जातिभेदाचा नि जातिजातींचा उल्लेख करीत गेलेच पाहिजे. अस्पृश्यता काढणे तर अस्पृश्य जातींचा उल्लेख केलाच पाहिजे. सहभोजनात सर्व जाती सरमिसळ बसल्या हे सिद्ध करण्यासाठीच, जाती मोडण्यासाठीच, सहभोजकांना स्वत:ची सध्याची जात नसली तरीही त्यांची नावे छापताना त्यांची जन्माची मानीव जात कोणती ते 'ब्राह्मण', 'मराठा', 'महार', इत्यादी नाव त्यापुढे कंसात घातलेच पाहिजे, ते विसंगत नाही, इतकेच नव्हे. तर तसे आपल्या जन्माच्या मानीव जातीचे नाव न सांगणे हा निव्वळ शब्दच्छल होणारा आहे. त्याच कारणासाठी वर केलेल्या जाति-संघाच्या अनिष्टतेतही जो इष्ट घटक आहे त्याचा जात्युच्छेदनाकडेच उपयोग करून घेण्यासाठी जात्युच्छेदकांनी सर्वच जातिसंघाशी सर्वतो-परी असहकार करणे चुकीचे, निरर्थक नि अनिरर्थकही होणार आहे.

सर्वच जातिसंघांशी सर्वतोपरी असहकार करू नये, असे जे वर म्हटले त्याचाच अर्थ असा की, काही जातिसंघांशी सर्वतोपरी असह-कार नि काहींशी काही अंशी सहकार केला पाहिजे. ती निवड कशी करायची? तर त्याची अगदी चोख कसोटी अशी–

'आज असलेल्या जातिसंघात काही स्वत:च्या जातीचे जन्मजात उच्चत्व गाजविण्यासाठीच निर्मिलेले. त्यामध्ये, जातिभेदोच्छेदक मताचा उघड पुरस्कार करणाऱ्यांना नि सहभोजनादिक आचारादी प्रत्यक्षपणे जातिभेद प्रकट वर्तनात तोडणाऱ्यांना, ते त्यांच्या जातीचे असले तरी आपले ते वर्तनस्वातंत्र्य गमावल्यावाचून जाता येणार नाही. असे असेल तर मात्र अशा त्या जातिसंघाशी जात्युच्छेदकांनी कोणताही संबंध ठेवू नये. उदाहरणार्थ, एखाद्या लिंगायत संघाने भंग्यासह वा ब्राह्मणासह असो, पण भिन्न जातीशी जेवलेल्यांना बहिष्कार घालणे, अस्पृश्यांना न शिवणे, मंदिरप्रवेश न करू देणे इत्यादी नियम केले असले आणि ते स्वत: न पाळणारांना तसे पाळणे भाग पाडण्याचा, भिन्न आहेत म्हणून आमच्या कुळांचा काही वाद होत नाही पण नाही तर सभासदत्व रद्द करण्याचा हट्ट धरला असला तर अशा जातिसंघाशी जात्युच्छेदकांना केव्हाही नि कसलाही संबंध ठेवता येणार नाही.

'पण सुदैवाने जातिसंघाचा दुसरा एक वर्ग आहे. उदाहरणार्थ,

गेल्या दहा वर्षांच्या हिंदूसभेच्या प्रचाराने उत्पन्न झालेल्या संघटक वातावरणात वावरणाऱ्या या रत्नागिरी जिल्ह्यात अलीकडेच निघालेल्या वैश्यसभा नि मराठा शिक्षणसंघ ह्या दोन जातिसंघांना घेऊ. प्रथमत: या दोन्ही संघांमध्ये सहभोजनातून भंग्यासहसुद्धा प्रकट-पणें जेवणारे नि जातिभेद तोडण्याचा प्रचार करणारे अनेक वाणी वा मराठे गृहस्थ आपल्या जात्युच्छेदक ध्येयाला नि प्रत्यक्ष वैयक्तिक आचारांना कोणतीही मुरड घालण्याची आवश्यकता न पडता किंवा त्यांच्यावर वा कोणावरच तसे बंधनही संघाकडून घातले न जाता, त्या जातिसंघाचे सभासद होता येते. कार्यकारी मंडळातही असे जात्यु-च्छेदक निवडून येतात. दुसरे की, ह्या संघाची सभासदपणाची प्रगत व्याख्या इतकीच आहे की, जो वाणीकुळात वा मराठाकुळात जन्मला तो, मग तो आज आता जातिभेद मानीत असो वा नसो किंवा वाणी वा मराठा ही जात लावीत असो वा नसो– तो सभासद होऊ शकतो. तितकी अट मानणे जात्युच्छेदक वाणी वा मराठा संघटकास विसंगतपणाचे वाटण्याचे काहीच कारण का नाही, हे मागे या लेखात सांगितलेच आहे.

‘ तिसरे की, हे संघ अनेक पोटजाती मोडून त्यांच्यातील रोटीबंदी बेटीबंदी मोडण्यास अनुकूल आहेत. म्हणजे हे संघ जात्युच्छेदक संघा-च्याच त्या प्रमाणात एक दुय्यम नि आंशिक शाखा होऊन बसतात. चवथे की– त्यांचे कार्यक्षेत्रही संघटनास अनुकूल तेच. त्या त्या जातीत शिक्षण पसरविणे, व्यसने, खर्चिकपणादिक दुर्गुण घालवणे, त्या त्या जातीला तिच्या प्रकट गुणानुरूप अधिकार जर इतर जातींच्या वा सरकारच्या दुराग्रहाने वा उपेक्षने मिळत नसतील तर ते मिळवणे, जातीवर, जात म्हणून होणारे विशिष्ट अन्याय रोखणे, इत्यादी अनेक उपयुक्त, न्याय्य नि हिंदुसंघटनानुकूल कार्येच ते संघ बहुतांशी करवीत आहेत. इतर जातींवर कुरघोडी करण्याचे वा स्वत:ला आपल्या प्रकट गुणांहून अधिक असे कोणतेही विशिष्टाधिकार न मानणारे असेच त्यांचे बहुतांशी धोरण आहे.

अशा जातिसंघाशी जात्युच्छदकांनी सहकार्य करणच उपयुक्त. आपल्या जात्युच्छेदक मतांना, प्रचाराला, नि प्रकटपण केलेल्या सह-भोजनादिक जात्युच्छदक आचारांना कोणतीही मुरड घालावी न लागता, जर केवळ जन्मला त्या जातीत एवढ्याच एका कसोटीने त्या जातिसंघात त्या जातीच्या जात्युच्छदकास जाता येत असेल, तर त्या

जातिसंघाचे सभासद होण्यासही जात्युच्छेदकांना काही हरकत नाही. इतकेच नव्हे, तर त्या जातिसंघात असलेल्या जात्युच्छेदक सभासदांची जितकी संख्या होईल तितके उलट चांगले. जातीच्याच नावे विधिमंडळात जात्युच्छेदकांनी घुसावे नि त्या राखीव जातिनिष्ठतेची प्रथा नवीन घटनेत तोडून टाकवावी– विधिमंडळाच्याच हाताने– हेच इष्ट नि बुद्धिमानपणाचे नव्हे काय ? तीच नीती जातिसंघाच्या प्रकरणी तंतोतंत लागू आहे.

'जातिसंघातून जात्युच्छेदक बहुमत होत राहिले की स्पर्शबंदी, रोटीबंदी प्रभृति आजची जातिपातींची लक्षणे नष्ट होतील. कुणी काही खावो, कुणासंगेही खावो, त्याची जात जात नाही ही नवी भावना जातिसंघातच रूढावेल, कोणतीही जाती जन्मतःच केवळ उच्च वा नीच नाही ही प्रत्येक संघाची प्रतिज्ञा होईल, म्हणजेच जातिभेदाचा विषारी दात उपटला जाऊन साऱ्या जाती एकत्र शिवणे बसणे–उठणे–खाणे–पिणे–राहणे करू लागल्यामुळे शेवटी नावानेच काय त्या ह्या जाती, उपनावाप्रमाणे काही काळ चालू राहतील आणि अखिल हिंदू संघाच्या संघटक शाखा होऊन पडतील.' (जात्युच्छेदक निबंध– पान–२९८, ३०४–३०९).

## अस्पृश्यतेचे निर्मूलन

सावरकरांनी जात्युच्छेदाच्या आपल्या कार्यात अस्पृश्यता निवारणास अग्रक्रम दिला होता. किंबहुना अंदमानातून मुक्तता झाल्यावर दोन महिन्यांच्या आतच सावरकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी भाषणे देण्यास प्रारंभ केला. पुढे १९३५ साली सावरकरांनी डॉ. आंबेडकरांना जे पत्र लिहिले होते त्यात त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते, 'आपल्या हिंदू धर्माच्या नि हिंदू राष्ट्राच्या मुळासच लागलेली ही जन्मजात म्हणविणाऱ्या पण पोथीजात असणाऱ्या जातिभेदाची कीड मारल्यावाचून तो संघटित व सबळ होऊन आजच्या जीवनकलहात टिकाव धरू शकणार नाही, याविषयी मलाही मुळीच शंका वाटत नाही. आपल्याप्रमाणेच नि आपल्याइतक्याच स्पष्ट शब्दांत मी अस्पृश्यताप्रभृति अन्याय्य, अधर्म्य नि आत्मघातक अशा रूढींची व्याद प्रसविणाऱ्या या जन्मजात जातिभेदास निषेधित आलो आहे.

'अस्पृश्यता व जातिभेद मोडण्याचे दायित्व स्पृश्यांवरच काय ते नाही. अस्पृश्यता नि जातिभेद यांचे प्रस्थ स्पृश्यांइतकेच अस्पृश्यांतही आहे. भट नि भंगी जातिभेदाच्या पापाचे साक्षीदार असून मनोवृत्ती

पालटल्याची साक्ष दोघांनीही एकमेकांना दिली पाहिजे. दोघांनी मिळून हे पाप निस्तरले पाहिजे. दोष सगळ्यांचा, प्रमाण काय ते थोडेफार.

'आम्ही हिंदू, आपण हिंदू, या पिढ्यानुपिढ्यांच्या धर्मबंधुत्वाच्या स्मरणासह हृदयात जे उत्कट ममत्व उत्पन्न होते त्या ममत्वाने अनावृत प्रकट निमंत्रण धाडीत आहे.' (जात्युच्छेदक निबंध– २६६–३२८).

सावरकरांची अस्पृश्यतानिवारणाविषयीची भूमिका थोडक्यात या पत्रात आली आहे. धर्मांतराचा प्रश्न निर्माण झाल्यावर त्याविषयी सावरकरांनी पुढे लिहिले होते त्याविषयी पुढे विचार करू, पण सावरकर अस्पृश्यता हा जातिभेदाचा विकृत किंवा अमानुष प्रकार आहे असे मानत. त्यामुळे केवळ अस्पृश्यता निवारणावर त्यांचा भर नव्हता तर जातिभेदाचे निर्मूलन करण्यावर भर होता. अस्पृश्यता हा माणुसकीविरुद्धच गुन्हा असे सावरकरांचे मत होते.

सावरकर म्हणतात, 'अस्पृश्यता जी निघाली पाहिजे, ती आपल्या सात कोटी धर्मबंधूंना निष्कारण पशूहूनही अस्पृश्य लेखणे हा मनुष्य जातीचाच नव्हे तर आमच्या आत्म्याचाही घोर अपमान करणे होय, म्हणून ती निघाली पाहिजे असे आमचे स्पष्ट मत आहे. अस्पृश्यतानिवारणामध्ये आज हिंदू समाजाचे हित आहे. म्हणूनही ती निघाली पाहिजेच. पण वेळप्रसंगी त्या रूढीपासून हिंदू समाजाचा आंशिक लाभ होत असता तरीही आम्ही तिच्याविरुद्ध तितक्याच प्रबळपणे खटपट केली असती. कारण माझ्या अस्पृश्य समजलेल्या बंधूस जेव्हा मी, तो केवळ खालच्या जातीत उत्पन्न झाला म्हणून स्पर्श करीत नाही आणि एखाद्या कुत्र्या–मांजरास स्पर्श करतो तेव्हा मी मनुष्यत्वाविरुद्ध एक अत्यंत गर्ह्य असा अपराध करीत असतो.'

## आपद्धर्म म्हणून तरी...

केवळ न्यायासाठी आणि आपला मनुष्यपणाचा धर्म म्हणून अस्पृश्यता त्याज्य समजण्याइतकी कोणाकोणाची उदारमनस्कता विशाल झाली नसली तरी, धर्म म्हणून नसले तर निदान आपद्धर्म म्हणून तरी अस्पृश्यतेची रूढी नष्ट करणे हे सांगणे इष्ट असते. इतकंच नव्हे तर न्यायदृष्ट्या आणि नीतिदृष्ट्याही ते कर्तव्यच असते. शाळेत शिकण्याकरिता जात नसशील तर निदान प्रत्यही खडीसाखर देत जाईन तीसाठी तरी जा हे आपण

मुलांस सांगतो. ते अशा बुद्धीने असते की, प्रथम खडीसाखरेसाठी शाळेत तो गेला तरी हळूहळू त्यास शिक्षणाची रुची लागत तो पुढे शिक्षणासाठीच शाळेत जाऊ लागेल. तीच स्थिती धर्माची उदार रहस्ये ज्या हिंदू समाजाच्या असंख्य अनुयायांतून लुप्त होऊन अन्याय आणि आत्मघातक रूढीच धर्म म्हणून समजल्या जात आहेत, त्या समुदायाची आहे. न्याय्य म्हणून अस्पृश्यता त्यागावी हे तुला पटत नसेल, तर ते तुला पटेतो थांबण्यास आता वेळ नसल्याने ह्या अमानुष रूढीने राष्ट्रपुरुषाचा प्राण कासावीस होऊ पाहत असल्याने तितका विलंबदेखील आता असह्य होणारा आहे. म्हणून निदान ही रूढी आत्मघातक आहे म्हणून तरी तू सोड असे अनेक वेळेला सांगावे लागते; आणि ते सांगणे अगदी अपरिहार्यच नव्हे तर अशा प्रसंगी एक पवित्र कर्तव्यच असते. हे कर्तव्य करताना वारंवार सिद्ध करून दाखवावे लागते की, अस्पृश्य या अन्याय्य छळाने त्रासून परधर्मीयांच्या गोटात शिरण्याच्या स्वाभाविक, परंतु अत्यंत निंद्य मोहास बळी पडतात आणि त्यामुळे आमच्या हिंदू समाजाच्या संख्याबळाची आणि गुणबळाची भयंकर हानी होते. धर्मशास्त्रात अस्पृश्यता ही संमत आहे असे क्षणभर गृहीत घेतले तरीदेखील त्याच धर्मशास्त्रात आपद्धर्म म्हणून प्रकरण सांगितले असल्याने आणि त्या प्रकरणात काही प्रसंगी ‘राष्ट्रविप्लवे स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते’ अशा अनेक स्पष्ट आणि निर्णायक आज्ञा सांगितलेल्या असल्याने, धर्मशास्त्राच्या नसेल तर आपद्धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणे म्हणून ही अस्पृश्यतेची रूढी त्यागिणे हे कर्तव्य ठरत आहे असे सापेक्षत: दुय्यम प्रतीचे कोटिक्रम करावे लागतात. अशा कोटिक्रमाने प्रथमत: हिंदुराष्ट्रतारणास अवश्य म्हणून, धर्म नाही तर आपद्धर्म म्हणून, शेकडो लोक अस्पृश्यता-निवारणास उद्युक्त होतात आणि त्याप्रमाणे एकदा त्यांचे पिढ्यानुपिढ्या मुरलेले ते अस्पृश्यतेचे दुष्ट संस्कार उलट सवयीने पुसट होत जातात आणि अस्पृश्यांविषयी जे मूर्खपणाचे पूर्वग्रह झालेले असतात ते अस्पृश्यांच्या संगतीने, अधिक विचाराने आणि सवयीसवयीने खोटे आहेत हे त्यांचे त्यांच्यात लक्षात यऊन ते अल्पावधीत आपद्धर्म म्हणूनच नव्हे तर धर्म म्हणून, लाभकारक म्हणूनच नव्हे तर न्याय्य म्हणून, उपकाराकरिता नव्हे तर माणुसकी म्हणून अस्पृश्यतेच्या रूढीचा मन:पूर्वक धिक्कार करू लागतात. अस्पृश्य जातीस अस्पृश्य म्हणणेदेखील जीवावर येऊन त्यास ‘पूर्वास्पृश्य’ आणि तेही मोठ्या

कष्टाने म्हणू लागतात. हा अनुभव आम्हांस शेकडो ठिकाणी, अगदी प्रामाणिकपणे पुराणप्रिय धर्मशास्त्र्यापासून तो अज्ञानी आणि म्हणूनच त्या शास्त्र्याहूनही अधिक रूढग्रंथ अशा गावंढळ शेतकऱ्यां-पर्यंत अनेक समयी आला आहे.'

## धर्मांतराचा धाक नको

'ज्याप्रमाणे आमच्या 'स्पृश्य' धर्मबंधूंना आमची ही एक सूचना आहे, त्याचप्रमाणे आमच्या 'अस्पृश्य' बंधूंसही एक धोक्याची सूचना देणे आम्हांस आमचे कर्तव्य वाटत आहे. ती ही की, त्यांनी इतर हिंदूंना 'अस्पृश्यता काढा नाही तर आम्ही बाटू' असा– धर्मांतराचा धाक घालू नये. कारण असे नुसते म्हणणेदेखील त्यांचे त्यांनाच अत्यंत लांछनास्पद आहे. अस्पृश्यता जो काढणार त्याचा तेवढा हिंदुधर्मावर अधिकार आहे, आणि 'अस्पृश्य' तेवढा हिंदुधर्मात आलेला एक उपऱ्या आहे की काय, कीज्याला तो धर्म म्हणजे एखाद्याला वाटेल तेव्हा फेकून देता येणाऱ्या जीर्ण वस्त्राहून किंवा बाजारात सवदा करण्यासाठी आणलेल्या भाजीपाल्याहून अधिक महत्त्वाचा वाटत नाही? हिंदू धर्माची आणि हिंदू संस्कृतीची, हिंदू देशाची आणि हिंदू इतिहासाची, हिंदू तत्त्वज्ञानाची आणि हिंदू वाङ्मयाची थोडक्यात म्हणजे हिंदुत्वाची आपली पूर्वार्जित मत्ता ही केवळ वसिष्ठासारख्या ज्ञानी ब्राह्मणांनी किंवा श्रीकृष्णासारख्या गीताद्रष्ट्या क्षत्रियांनी किंवा हर्षादिकासारख्या साम्राज्य चालविलेल्या वैश्यांनी किंवा नामदेवतुकारामादिक वणिग्शूद्रांनी वा शूद्रांनीच उपार्जित केलेली नसून, ती मिळकत मिळवावयास चोखा महार, रोहिदास चांभार, सजन कसायी इत्यादी तुम्हा अस्पृश्य जातींचे अनेक पूर्वजही झटले आहेत. ह्या हिंदुत्वाच्या रक्षणार्थ पूर्वी आणि आताही हजारो 'अस्पृश्य' वीर रणांगणावर झुंझत आलेले आहेत. महाभारतातील एका अत्यंत उज्ज्वल अध्यायास उपदेशिणाऱ्या व्याधगीतेच्या त्या 'अस्पृश्य' द्रष्ट्यापासून तो हिंदुत्वाच्या जरिपटक्याच्या रक्षणार्थ म्लेच्छांना मारीत मारीत धारातीर्थी मरणाऱ्या शिदनाईक महारां-पर्यंत लाखो अस्पृश्य संत, तत्त्ववेत्ते आणि वीर ह्या हिंदुत्वाच्या समाईक संपत्तीची उपार्जना आणि जोपासना करण्यासाठी झटत आलेले आहेत. हिंदुत्वाच्या गावाच्या वेशीवर आज अनेक सहस्रके जागता पहारा ज्या 'अस्पृश्य' महारांनी दिलेला आहे ते सर्व महार, ते आपल्या राजधानीचे 'येसकर' तुमचेच पूर्वज होते.'

## समान पूर्वज

'नव्हे, पूर्वजांविषयी बोलायचे तर अनुलोम–प्रतिलोमादिक विवाहांनीच अस्पृश्यादिक जातींची उत्पत्ती बहुशः झालेली असल्याने तुमचे पूर्वज आणि ह्या चतुर्वर्णादिकांचे पूर्वज एकच होते, ही गोष्ट निदान त्या त्रैवर्णिकांना तरी नाकारता येणार नाही. कारण अस्पृश्यांचे रक्त स्पृश्यांच्या अंगात खेळत आहे आणि स्पृश्यांचे अस्पृश्यांच्या, या विधानाच्या सत्याची साक्ष त्याची मनुस्मृतीच देत आहे. पंचमादिक वर्णांच्या उत्पत्तीची ही मीमांसा त्यांना मान्य अशा त्याच स्मृतीने सांगितली आहे. मग जर काही काळापूर्वी आजच्या स्पृश्यांचे आणि अस्पृश्यांचे पूर्वज बहुशः एकच होते तर अर्थातच ही हिंदुत्वाची मत्ता जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्य हिंदूंचीही पितृपरंपरागत स्वायत्त संपत्ती आहे. ती तुमच्या आणि आमच्या भावना अस्पृश्य बंधूंनी कधीही करून घेऊ नये आणि ती दरिद्री भावना व्यक्त करणारी 'आम्हांस शिवा, नाही तर आम्ही दुसरे घर पाहतो' अशी अत्यंत भिकारडी आणि नेभळ्या कुलकलंकासारखी वाक्ये उच्चारून आपल्याच पूर्वजांच्या घरास सोडून, त्यांच्या शत्रूसच पूर्वज समजण्याचा भ्याडपणा कधीही करू नये. कारण हिंदुत्वावरचा अधिकार सोडणे म्हणजे चोख्यामेळ्याच्या दैवतास मुकणे होय. सजन कसाई, रोहिदास चांभार, रामनंदाने स्थापिलेले त्याचे अनेक डोम, मांग इत्यादि जातीतील संतशिष्य ह्या सर्वांनी, अस्पृश्यांनी, ह्या तुमच्या अगदी प्रत्यक्ष पूर्वजांनी, उपार्जन केलेली मत्ता भित्रेपणाने सोडून पळून जाणे होय. जे हिंदुत्व तुमच्या हजारो पिढ्यांनी प्राणापलीकडे हे अस्पृश्यतेचे हाल सोसूनदेखील जतन केले, ते हिंदुत्व धिक्कारून आणि त्या तुमच्याच महार, मांग प्रभृति सोमवंशी कुलातील शतसहस्र पूर्वजांस मूर्खात काढून आपल्या बापाचे नाव बदलणे होय. मग तुम्हांस चोखामेळा आमचा, रोहिदास आमचा, तिरुवल्लुवर आमचा, अजिंठा आमचा, काशी आमची, पंढरी आमची, कालिदास आमचा, ही हिंदु संस्कृती आमची म्हणून अधिकार सांगता येणार नाही. जे तुमचे स्वतःचे वाडवडील हिंदू म्हणून नांदले त्यांना 'काफर' म्हणावे लागेल. तर आता पुन्हा अशी अमंगल भाषा तुमच्या स्वतःच्या जातीय अभिमानासाठीच बोलू नका.

एका भावाने दुसऱ्यास छळले तर त्या दुसऱ्याने पहिल्याशी झुंजून आपले न्याय्य स्वत्व मिळवावे, का त्या भावावरचा राग काढण्या-

साठी आपल्या बापासच बाप म्हणणे सोडून देऊन श्राद्धाचे दिवशी कोण्या दुसऱ्याचा आणि त्यातही ज्या दुसऱ्याशी आपले सामाजिक वाडवडील सारखे लढत आले अशा परशत्रूचा पितृपदी नामोच्चार करावा ? एतदर्थ हे धर्मबंधूंनो, ही नीच भावना मनासदेखील शिवू देऊ नका.

## स्पृश्यही होईन आणि हिंदूही राहीन

'ही प्रतिज्ञा करा. हिंदू धर्म, हिंदू संस्कृती–हिंदुत्व एकटया स्पृश्यांच्या बापाचे नाही, ती दोघांच्याही बापांची समाईक मिळकत आहे. ती सोडून जाऊ का म्हणून स्पृश्यांसच काय विचारता ? ते का तिचे धनी आणि तुम्ही का चोर आहा? आणि जे पापी आणि निर्दय स्पृश्य तुमचे लाखो लोक बाटून गले, तरी अजून अस्पृश्यता काढण्यास मान्य होत नाहीत ते तुम्ही आणखी काही लाख निघून गेलेत तरी थोडेच घाबरणार आहेत ? यासाठी अशी अमंगळ भावना जितकी स्वतःस लज्जास्पद तितकीच परिणामी विफल असल्याने, आमच्या अस्पृश्य बंधूंनी तिच्याशी वरवरदेखील अंगलट करण्याचे पातक करू नये अशी आमची कळकळीची त्यांस विनंती आहे.' (जात्युच्छेदक निबंध, पान–७२, ७३, ७७, ७९, ८९).

या प्रदीर्घ उताऱ्यावरून स्पृश्य होण्याचा नि हिंदुत्व न सोडण्याचा किंवा हिंदुत्व परंपरा ही समाईक मत्ता आहे असे समजण्याचा उपदेश सावरकर पूर्वास्पृश्य बंधूंना करीत असत हे दिसून येते.

## धर्मांतर का होते ?

अस्पृश्यांच्या धर्मांतराविषयी सावरकरांचा मुख्य निष्कर्ष असा की 'कोणत्याही पारलौकिक तत्त्वज्ञानविषयक हेतूने धर्मांतराचा विचार हरिजनात आलेला नाही. धर्मांतर आम्ही एवढ्यासाठी करतो की त्यायोगे आमची अस्पृश्यता समूळ नष्ट होऊन कोणत्या तरी अहिंदू अशा बलिष्ठ समाजात आम्ही सामावले जाऊ हेच धर्मांतराच्या चळवळीचे मुख्य सूत्र स्पष्टपणे घोषिले जात आहे. वास्तविक पाहता ज्या अर्थी धर्मांतराचे नाव तिसरे पडले असले तरी चळवळीपुढे धर्म हा प्रश्न नसून आपली सामाजिक स्थिती ऐहिक लाभाच्या दृष्टीने कोणत्या गटात राहिल्याने सुधारेल हाच खरा प्रश्न त्याच्या डोळ्यांसमोर आहे.' (जात्युच्छेदक निबंध, पान–२४७).

'महारांनी वा हरिजनांनी धर्मांतर केले तर 'महारी मुसलमान'

अशी काहीतरी जात निर्माण होईल. जे कोणी धर्मांतर करतील ते त्या जातीस मेले असे होईल. ही गोष्ट अनुमानाची नाही. प्रत्यक्ष पुराव्याची आहे. शेकडो ब्राह्मण गटचे गट बाटले ते जसे ब्राह्मण जातीस मेले, ते ब्राह्मण म्हणून राहिलेच नाहीत तसेच धर्मांतर करणाऱ्या महारांचे होईल' असा इशारा सावरकरांनी 'महारबंधूंशी मोकळा विचारविनिमय' लेखमालेत १९३५ साली दिला होता. सावरकरांनी त्यांना सांगितले होते की, 'महारांचे कुळाचार, त्यांची पावस्की, देवस्की, त्यांच्या धर्मभोळ्या समजुती त्यांच्या स्वतःच्या जीवनाशी तादात्म्य पावलेल्या आहेत. शतकानुशतके चंद्रभागच्या वाळवंटी 'विठ्ठल विठ्ठल' चा नामघोष हरिजनातील वारकरी करीत आले आहेत.' इतिहासातला पुरावा म्हणून खुश्रूचे उदाहरण सावरकर देतात. खुश्रू हा अस्पृश्य हिंदू प्रथम बाटविला गेला. पण स्वपराक्रमाने तो दिल्लीचा बादशहा झाला. दिल्लीच्या मुसलमानी तख्तावर येताच त्याने अकस्मात हिंदुपदपादशाहीचा झेंडा उभारला. तेव्हा पंजाबपासूनचे सारे मुसलमान सत्ताधीश त्याच्यावर चालून गेले. तेव्हा त्यांच्याशी लढता लढता रणांगणात खुश्रू मेला, तो हिंदू म्हणून. धर्मांतरामुळे सवर्ण हिंदूंच्या सहानुभूतीला पूर्वास्पृश्य पारखे होतील आणि त्यांची कौटुंबिक, आर्थिक, धार्मिक नि सामाजिक वाताहत होईल कारण पंजाब, बंगाल, मद्रास आदी सर्व प्रांतांतून बाटलेल्या अस्पृश्यांच्या ' अस्पृश्य ख्रिश्चन, कमीना, रंगरेज प्रभृती हीन मुसलमान म्हणून जाती पडल्या आहेत. अस्सल मुसलमान वा ख्रिश्चन बाटग्यांना आपल्या सामाजिक संबंधापासून दूरच ठेवतात असा अनुभव आहे.'

## महार राहूनही अस्पृश्यता जाईल

धर्मांतर करण्यापेक्षा महार राहून अस्पृश्यता घालविली पाहिजे; घालविता येईल हा सावरकरांचा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात, ' लक्षावधी स्पृश्य हिंदूच त्या अस्पृश्यतेच्या समूळ उच्चाटनासाठी प्रामाणिकपणे झटत आहेत. आर्यसमाज, देवसमाज, हिंदुमहासभा, राष्ट्रीय सभा अशा प्रमुखांतील प्रमुख नि कर्त्यांतील कर्त्या भारतव्यापी संस्था आमच्या आजवरच्या 'अस्पृश्य' धर्मबंधूंना आणि राष्ट्रबंधूंना, 'स्पृश्य' म्हणजे पूर्वी जे अस्पृश्य होते पण आता स्पृश्य झालेले आहेत– असे पूर्वास्पृश्य करून सोडण्यासाठी या अस्पृश्यतेच्या विषवृक्षाच्या मुळावर कुऱ्हाडीचे घाव घालीत आहेत. अशा वेळी या

हिंदू स्पृश्यांच्याच खांद्याशी खांदा भिडवून जर हिंदू अस्पृश्य त्यांच्याही कुऱ्हाडीचे घाव संगनमताने या विषवृक्षाच्या मुळावर घालू लागतील, दोष सर्वांचा–सर्वजण मिळून तो सुधारू या, अशा मनमिळाऊ वृत्तीने ही सुधारणा करतील, तर ही सुधारणा दहावीस वर्षांच्या आत निश्चितपणे होऊ शकेल. हा विषवृक्ष उन्मळून पडू शकेल. जर आमच्या चांभार, मांग, वडारी प्रभृति तथाकथित 'अस्पृश्य' धर्मबंधूंना ही परिस्थिती पाहून अस्पृश्यता उखडून टाकूच टाकू, हिंदूंचे हिंदू राहून, धर्मांतराचे दुष्कृत्य प्राण गेला तरी न करता हिंदूंचे हिंदू राहूनच अस्पृश्यतेला गाडून टाकू म्हणून पूर्ण विश्वास वाटत आहे. त्यांनी तसे करण्याचा कृतनिश्चय केला आहे.' (जात्युच्छेदक निबंध, पान २४९).

हरिजन मुसलमान धर्मात समतेच्या आशेने जातात. मुसलमान धर्मात धार्मिक उच्चनीचता वा जन्मजात जातिश्रेष्ठता नाही ही प्रौढी एक निव्वळ थाप आहे हे सिद्ध करण्यासाठी 'मुसलमानी धर्मातील समतेचा टेंभा' या शीर्षकाखाली सावरकरांनी १९३६ मध्ये 'केसरी'त एक लेख लिहिला होता. त्यांचे थोडक्यात म्हणणे असे– 'मुसलमानी धर्माच्या मूळ प्रतिज्ञेमध्येच जगाचे एकदा दोन तुकडे केलेले आहेत. महंमदसाहेबांना खरा पैगंबर मानणारे ते खरे मुसलमान व बाकीचे सर्व काफर. ही शिकवण ज्या धर्माची पहिली प्रतिज्ञाच आहे तो धर्म केवढ्या भयंकर विषमतेचा पुरस्कर्ता असेल.' सावरकरांनी स्वत: मुसलमानी धर्माच्या इतिहासाचा अभ्यास करून जुलै–ऑगस्ट १९३५ च्या किर्लोस्करमध्ये याविषयी दोन लेख लिहिले होते.

सारांश, सावरकरांची जातिभेदाविषयीची भूमिका जात्युच्छेदाच्या बाजूची असली तरी सामाजिक वास्तवाचे भान ठेवणारी होती. सामाजिक इतिहासाची, मानसशास्त्राची बाजूही सावरकर मांडतात. ती भूमिका तत्त्वाग्रही आहे, प्रत्यक्षनिष्ठ व निर्मूलनाचा प्रत्यक्ष कार्यक्रम समाजाला सांगणारी आहे. अस्पृश्यतानिवारण हे सर्व हिंदूंनी मिळून करावयास हवे, कारण ते पाप सर्वांचे आहे, असे सावरकर सांगत. पण त्याचबरोबर धर्मांतर नको, त्याने हा प्रश्न सुटणार नाही असेही सांगत ◘

# ७. धर्मांतर व शुद्धीकरण

सावरकरांची धर्मांतर व शुद्धीकरण याविषयींची भूमिका, ख्रिश्चन-मुसलमान यांचे धर्मप्रसाराचे प्रयत्न आणि डॉ. आंबेडकर व पूर्वास्पृश्य यांनी निर्माण केलेला धर्मांतराचा प्रश्न या प्रसंगी त्यांनी मांडली होती या सर्वांमधे एक समान सूत्र होते ते म्हणजे हिंदुत्वाचे संरक्षण व संवर्धन. भारतीय इतिहासाचा मागोवाही त्यांनी याविषयी विवेचन करताना घेतला होता. सावरकरांची भूमिका राष्ट्रीय व राजकीय होती. केवळ समाजशास्त्रीय पृथक्करण नव्हते; पण हिंदूंच्या सामाजिक रूढी, हिंदूचे समाजमानस यांचा विचार सावरकरांच्या भूमिकेत असला तरी तो मूलतः राजकीय व आक्रमक होती. भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांचा प्रश्न हा एक सामाजिक व राष्ट्रीय सात्मीकरणाचा प्रश्न आहे. एकजिनसी भारतीय समाज निर्माण झाल्याविना हिंदुत्वही सुरक्षित राहणार नाही हे लक्षात ठेवून धार्मिक अल्पसंख्याक पचवून टाकण्याची प्रक्रिया सावरकर सांगत नाहीत, पण शक्यताही नाकारीत नाहीत. तरीही सावरकरांचे याविषयीचे विचार ऐतिहासिक दृष्टचा व समाजशास्त्रीय दृष्टचा मौलिक आहेत.

## मुसलमानांविषयीची भूमिका

सावरकर अंदमानात असतानाच मुसलमान वार्डर तरुण कैद्यांना धाकाने वा विलोभनाने मुसलमान करण्याचा कसा प्रयत्न करीत हे त्यांनी समक्ष पाहिले होते. त्या वेळी त्यांची भूमिका काय असे याची माहिती पुढे येणारच आहे. परंतु अंदमानमधून सुटल्यावर सिंधमधील हिंदू धोक्यात आहेत असे त्यांना दिसले. सावरकरांवर राजकारणात भाग घ्यावयाचा नाही असे त्या काळी सरकारी बंधन होते. नुकतेच अंदमानामधील तेरा वर्षांचा भयाण व कष्टदायी कारावास भोगून सावरकर बाहेर पडले होते. पण हिंदुत्वाच्या रक्षणाचे कार्य त्यांना बोलावीत होते. शेवटी कर्तव्य म्हणून हिंदू जागृत करणे

आवश्यक आहे हे त्यांच्या मनात पक्के झाले. आणि त्या वेळी रत्ना-गिरीस सावरकरांना भेटावयास गेलेले नागपूरचे श्री. विश्वनाथराव केळकर यांच्या ‘स्वातंत्र्य’ नावाच्या त्या वेळी चालू असलेल्या साप्ता-हिकाच्या दिनांक १६, १९ व २३ मार्च १९२४ च्या अंकात ‘काय अजूनही निजलात?’ या शीर्षकाचे’ ‘तळमळणारा आत्मा’ या नावांने सावरकरांनी सिंधमधील हिंदूंना उद्देशून तीन लेख प्रसिद्ध केले व हिंदूंची शुद्धी व संघटन या त्यांच्या नव्या सामाजिक जागृतीच्या कार्याचा प्रारंभ केला. सावरकरांची भारतीय मुसलमानांसंबंधीची हिंदुत्वाच्या दृष्टिकोणातून त्या वेळी काय भूमिका होती हे कळण्या-साठी ती सविस्तर समजून घेणे आवश्यक आहे. गांधीजींनी खिला-फत चळवळीला पाठिंबा जो दिला होता त्याच्या पार्श्वभूमीवर हा लेख लिहिलेला आहे. त्यातील मुसलमानविषयक विवेचनाचा सारांश असा–आम्हांस सिंधमधील एका प्रख्यात हिंदू पुढाऱ्याचे जे पत्र आलेले आहे त्यावरून आम्हांस प्रतीती पटली की सिंधमध्ये चाल-लेल्या मुसलमानांच्या दंडेलीच्या बातम्या ज्या वरवर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतात त्या निराधार नाहीत. ते लिहितात– सिंधमधील हिंदूंची स्थिती फारच चिंताजनक आहे. बाहेरच्या आमच्या हिंदु बांधवांस त्याची कल्पना नाही. येथे संयोगी नावाची मूळ हिंदु अस-लेली एक जाती आहे. कित्येक शतकांपूर्वी त्यास सिंधमधे असलेल्या इतर लाखो हिंदूंप्रमाणे बाटविण्यात आले. परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट अशी की हिंदूंतील त्यांच्या मूळ जातीच्या पंचायती त्यांना परत घेण्यास तयार नाहीत.

हिंदूमधील ही मानसिक–जातिबंधने व मुसलमानांच्या दंडेलीची भीती या दोन कारणांमुळे हिंदू शुद्धीकरणाला घाबरत होते. त्या भयगंडातून हिंदु–मुसलमान ऐक्यासाठी मुसलमानांच्या मनधरणीचे तत्त्वज्ञान निर्माण झाले होते ही सावरकरांची धारणा होती. त्यांतील धोके त्यांना स्पष्ट दिसत होते. ते या तीन लेखांत सावरकरांनी स्पष्टपणे मांडले होते. मुसलमानांना उद्देशून सावरकर म्हणतात, ‘तुमच्या धमक्यास हिंदू भीक घालणार नाहीत. सिंधमधे हिंदूंचे शुद्धीकरण चालणार. तुमची इच्छा असेल तर प्रेमाने, दोघांच्या तडजोडीने व राजकारणात एकोप्याने चालणार. तुमची तशी इच्छा नसेल तर तुमच्याविना व तुमच्या धमक्यांस कवडीची भीक न घालता दुगुण्या उत्साहाने चालणार. आणखी एक गोष्ट आमच्या

११४।१५

मुसलमान बंधूंना आम्ही सांगून ठेवतो की तुम्हीही रक्ताचे व बीजाचे हिंदूच असल्याने तुम्ही आम्हांस सर्व जगाहून जवळ आहात. परंतु तुम्ही जर मनात असे समजत असाल की तुम्हांस हिंदूपेक्षा सर्व जग जवळ आहे, तुर्कस्थान आदी मुसलमान तुम्हांस साहाय्य देतील व त्यांच्या बळावर तुम्ही बावीस कोटी हिंदूंची खोडकी जिरवणार तर खूप समजून ठेवा की या तुमच्या दुष्ट बुद्धीने तुमचा घात होणार आहे. तुमच्या शब्दास तुर्क लोक किंवा अफगाण लोक किती मान देतात हे तुर्कस्थानने केलेल्या खिलाफतीच्या उच्चाटनानेच सिद्ध होत आहे. आता हे हिंदुस्थानांतील हिंदूच तुमच्या उपयोगी पडतील. तथापि तुम्ही त्यांच्याशी द्वेषभावाने वागून त्यांच्या धर्माचे उच्चाटन करण्याचे व्यर्थ मनाचे मांडे मनात खात राहाल तर खुशाल खा. ध्यानात ठेवा की हूण, शक इत्यादी अनेक आक्रमकांना पचवून हिंदू उरलेले आहेत, वर्धमान आहेत.'

सावरकरांनी याच लेखात सिंधी हिंदूंना सांगितले, 'सिंधमधे पंचायतींच्या पुढाऱ्यांच्या घरोघरी धरणी धरावी की त्यांनी संयोगी जातीस शुद्ध करून परत त्यांच्याशी व्यवहार करावे तेथील हिंदू पंचायतीच्या पुढाऱ्यांच्या दारोदारी भटकत राहा, वेळ पडली तर त्यांच्या पाया पडा, त्यांच्या दाराशी अन्न सोडून धरणे धरा. तेथे सत्याग्रह यशस्वी होतात.' (सर्व उतारे हिंदुसमाजसंरक्षक वीर सावरकर–लेखक-बाळाराव सावरकर या पुस्तकांतून उद्धृत पाने २७, २९, ३३).

## उपकार नकोत

सावरकरांनी जात्युच्छेदक आंदोलन व अस्पृश्यतानिवारण ही दोन्ही आंदोलने राष्ट्रीय भूमिकेवरून चालविली होती. हिंदूंचे पुनरुत्थान करावयाचे असेल तर या दोन्ही गोष्टी करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. १९३७ साली रत्नागिरी येथील स्थानबद्धतेतून मुक्त झाल्यावर त्यांनी ही आपली भूमिका ठामपणे पुन्हा एकदा मांडली. पुण्यात ३ जुलै १९३७ रोजी हरिजनांच्या वतीने सत्कार करण्यात आला व मानपत्र अर्पण करण्यात आले. त्या मानपत्रात म्हटले होते, 'हिंदुधर्मास लागलेला उच्चनीचतेचा महारोग नष्ट होणे दुरापास्त आहे. म्हणून धर्मांतराचा उपाय आम्हांस मान्य झाला आहे व हा महारोग निवारण्यासाठी आपण साहाय्य कराल अशी आशा आहे.' या सत्काराला उत्तर देताना पूर्वी अनेक वेळा मांडलेली धर्मांतरा-

विषयीची भूमिका सावरकरांनी पुन्हा मांडली. ते म्हणाले, 'परधर्मात जाण्याने आपले खरोखरच कल्याण होत असेल तर आपण सुखेनैव जा. परंतु माझी निश्चिती आहे की येथे राहण्यात तुमचे हित आहे. आपण हिंदुधर्मात राहण्याने स्पृश्यावर उपकार करीत आहोत ही भावना तुम्ही ठेवू नका. आपण स्वतःच्या अभ्युदयाकरिताच हिंदुधर्मात राहत आहोत या भावनेने तुम्ही हिंदुधर्मात राहा. तुमच्यापूर्वी कित्येक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य बाटले आहेत पण त्यांचे काही कल्याण झालेले दिसत नाही. स्वतःच्या पोटाचे त्यांनी फारतर कल्याण केले असेल पण आपली जात वर आणण्यास त्यांच्या धर्मांतराचा काय उपयोग झाला ? मनुष्याची योग्यता तो कोणाच्या पोटी व कोणत्या जातीत जन्मला यावरून आज ओळखली जाते. पण ही रूढी बंद झाली आणि गुणांवरून योग्यता ठरू लागली म्हणजे हिंदुसमाजात दिसणारी विषमता तात्काळ नष्ट होईल.

जात्युच्छेदनाची चळवळ याच तत्त्वावर उभारलेली आहे. डॉ. आंबेडकरांसारखा विद्वान तुमच्या मातीत जन्मला हे तुमचे भाग्य होय. त्यांच्यामुळे तरी महार जातीतील माणसे किती उंच जाऊ शकतात हे दाखविता येते. त्यांची धर्मांतराची घोषणा पारलौकिक धर्मांतराविषयी नसून व्यावहारिक असमानतेविषयीची आहे. ही व्यावसायिक विषमता नष्ट झाली म्हणजे धर्मांतर झाल्यासारखेच आहे. विषमतेचे विष ब्राह्मणापासून तो थेट चांभार, भंगी यांपासून दूर ठेवले पाहिजे.' (वीर सावरकर हिंदुसभापर्व पान ३२–३३).

सावरकरांनी रत्नागिरीत असताना मौलाना शौकतअल्लीशी त्यांची जी चर्चा झाली होती, त्या वेळी धर्मांतर व शुद्धीविषयींची आपली मते स्पष्टपणे त्यांना सांगितली होती. शौकतअल्लींनी सावरकरांना विचारले, 'मुसलमान हिंदूंना पूर्वीपासूनच बाटवीत होते. पण तुम्ही शुद्धी नवीनच का सुरू केली ? तेव्हा ती मुसलमानांच्याच विरुद्ध आहे हे सिद्ध होत नाही काय ?' यावर सावरकर म्हणाले, 'आजपर्यंत विश्वासाने आम्ही आमचे घर उघडे टाकत आलो, पण इतर जणांनी जेव्हा त्या उदारपणाचा लाभ घेऊन आमच्या घरात दिवसाढवळ्या दरवडे घालण्याचा धुमाकूळ मांडला तेव्हा आज आम्ही आमच्या घरास कुलूप ठोकण्याचे ठरविले. आता ते चोरच येऊन म्हणतात, 'अहो चोरी तर आम्ही पूर्वीपासूनच करीत आहोत पण तुम्ही कुलूप नवीन घातले !' ख्रिश्चन, पार्शी, यहुदी, इतर अनेक

धर्मीय लोक आहेत तेही त्यांची संघटने करतात. त्यांपैकी कोणाच्या डोळ्यांत हिंदुसंघटन इतके मुळीच सलत नाही. मग ते मुसलमानांच्याच डोळ्यांत इतके का सलावे ? अर्थात मुसलमानांच्याच काही राजकीय धार्मिक दुराकांक्षाचा धंदा बुडतो. म्हणूनच त्यांस ते बघवत नाही.' सावरकरांनी पुढे सांगितले की हिंदुसंघटन हे कोणावरही अन्याय आघातासाठी नाही. जोवर ते स्वसंरक्षणासाठी व आघाताच्या निवारणासाठीच आहे तोवर त्याची कोणत्याही समाजाच्या न्याय्य आकांक्षांस आडकाठी येणार नाही. मुसलमानांची बाटविण्याची संघटने बंद करा, म्हणजे हिंदूंची शुद्धीची संघटने आपोआप शिथिल होतील.'

सारांश, सावरकरांची धर्मांतरविषयक भूमिका स्पष्ट आहे. सावरकर हिंदू अस्तित्ववादी आहेत. हिंदूंच्या न्याय्य अस्तित्वाआड जे जे येईल त्याचा प्रतिकार केला पाहिजे असे सावरकरांना वाटे. हिंदूंनी आपले संख्याबळ घटू देता कामा नये, बाटविण्याच्या ज्या रूढीमुळे हिंदूंचे जे संख्याबळ कमी झाले, शुद्धीबंदीमुळे जे नुकसान झाले त्याच्याविरुद्ध सावरकरांनी आघाडी उघडली. याची सुरुवात सावरकर अंदमानात असतानाच झाली होती. सावरकरांचे शुद्धीविषयी तीन सिद्धांत होते– पहिला हिंदूंचे संख्याबळ हेही राष्ट्रीय दृष्टचा महत्त्वाचे आहे. कारण भारताचे गुणबळ वाढवायचे असेल तर हिंदूंचे संख्याबळही कायम ठेवले पाहिजे. दुसरा मुख्यत:– अन्नव्यवहाराने हिंदूंस बाटविण्यात आलेले आहे. अजाणता त्यांचे धर्मांतर झाले आहे. तिसरा असा की, ख्रिस्ती व मुसलमानांच्या राजसत्तेचा या धर्मांतराला पाठिंबा आहे. त्यात पारमार्थिक मार्ग नसून सत्तेच्या बळावर निष्ठा बदलण्याचा, संस्कृती बदलण्याचा तो मार्ग आहे. जेथे राष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांपासून धर्मांतर करून समाज तोडला जातो, तेथे धर्मांतर हे राष्ट्रांतर घडते म्हणून सावरकरांनी ख्रिस्ती व मुसलमान यांनी सत्तेच्या आधारे भारतात जे धर्मांतर घडवून आणले त्याचा इतिहासात जाऊन शोध घेतला आहे. सावरकरांचे या तीन सिद्धांतांविषयीचे विचार सारांशरूपाने या प्रकरणात चर्चिले आहेत.

## संख्याबळ आवश्यक

'नुसत्या संख्याबळात काय आहे असे म्हणणाऱ्या धूर्तांना एकदा खडसावून सांगणे भाग आहे की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे शुद्धी ही नुसत्या संख्याबळाच्या वाढीसाठी आहे असे गृहीत धरले तरीही ती

अवश्यच आहे. कारण संख्याबळ हेही बळच आहे. प्रथमतः हे ध्यानात ठेविले पाहिजे की, जर समाज असेल तरच त्याच्यात गुणबळ वाढविण्याचा प्रश्न उद्‌भवतो. परधर्मीयांच्या सहस्र वर्षे चालत आलेल्या आणि प्रतिकार न केला तर आणखी अनेक वर्षे चालू राहणाऱ्या प्रबळ दंडेलीने एकेक करून सर्व हिंदू परधर्मात लुटून नेले गेले, तर मग गुणबळ वाढविणार तरी कोणामधे ? गुणाला अधिष्ठानच जर नाहीसे झाले, जर हिंदुसमाजच उरला नाही, तर उन्नती तरी कोणाची करावयाची ? जे उरतील त्यांची म्हणाल, तर उरले आहेत तेही गेले त्यांच्याप्रमाणेच प्रतिकार न केला तर, नष्ट किंवा भ्रष्ट होऊन जाणार. दुसरे कारण असे आहे की, कोणत्याही व्यक्तीच्या किंवा समाजाच्या गुणबळाच्या वाढीला मर्यादा आहे. मुंगीला शारीरिक आणि मानसिक वाटेल तितका खुराक चारला तरी ती हत्ती होऊ शकणार नाही. गवताची काडी कितीही खत घातले तरी गवताची काडीच राहाणार. तिला जर हत्तीला बांधावयाचे असेल तर गुणवर्धनाच्या नैसर्गिक कक्षेच्या बाहेर असल्याने अशक्य होते, ते संख्याबळाने पुरे करून घ्यावे लागते. गवताची काडी जरी काडीच राहिली तरी तशा अनेक काड्या, काथ्याची अनेक तुसे आणि दोऱ्यांची जुडगी एकत्र करून म्हणजे त्यांचे संख्याबळ वाढवूनच, त्याचा एक संघटित नाडा किंवा दोरखंड बनविता येतो, आणि तो मात्र हत्तीला बांधू शकतो.' (स. सावरकर खंड–३, पान–३४)

## शुद्धीकरणाचे संस्कार

हिंदूंच्या मनात, आजपर्यंत कोणाच्या पाण्याचा थेंब तोंडात पडला की, मनुष्य जन्मभरच नव्हे तर पिढ्यान्‌पिढ्या बाटतो ही खुळी समजूत जशी बद्धमूल झालेली आहे, तशीच मुसलमानादिक अहिंदु समाजातही उलट्या स्वरूपाची एक घातक समजूत दृढतर झालेली असते की, कोणत्याही हिंदूस वेडसरपणात किंवा उपासमारीत गाठून त्यास दोन घास अन्न मुसलमानी हाताने खावविले की, तो मनुष्य हिंदू लोक आपण होऊनच मुसलमान झाला असे समजून त्यास आपल्या मुसलमानी वा ख्रिश्चन समाजाच्या हाती सोपवून देतात.

## पुन्हा हिंदू करणे शक्य

आता आपल्याला अन्नोदक व्यवहाराचे काही महत्त्व वाटत नाही. हेच आपल्या ह्या विषयात झालेल्या समाजहितकारक विचारक्रांतीचे निदर्शक आहे. आणि म्हणूनच अन्नव्यवहाराने धर्म बाटतो ही समजूत

खुळी आहे. म्हणून समजणारी ही विचारक्रांती मुसलमानादिक सर्व अहिंदूंस घोषित करण्यासाठी तरी काही दिवस शुद्धीकरणाचे संस्कार चालू ठेवले पाहिजेत. ह्या शुद्धीकरणाने मुसलमानादिकांस लवकरच कळून येईल की, ते हिंदूंस बाटविण्यासाठी म्हणून जे अन्न वाटीत बसतात ते आता व्यर्थ जाणार आहे. त्यांचे अन्न खाऊन ते पचवून टाकण्याइतका हिंदूंचा जठराग्नी प्रदीप्त झालेला आहे. असा अनुभव दोन–तीन वर्षे त्या अहिंदू समाजास येत गेला की, ते पुन्हा हिंदूंस दुष्काळ, उपासमार, वेड अशा आपत्तीत गाठून त्यास बाटविण्याचे दुष्ट हेतूने पोषित बसण्याचे विफल श्रम आपोआप करीतनासे होतील. आता ते दिवस गेले की, एक दिवस हिंदूंस दोन तुकडे चारले की तो आणि त्याची संतती मुसलमान होई आता हिंदूंस इतक्या स्वस्त मूल्यावर विकत घेता येणे शक्य नाही हे एकदा मुसलमानादिकांच्या पूर्ण प्रत्ययास आले म्हणजे मिशनरींच्या धंद्यासदेखील पार उतरती कळा लागलीच म्हणून समजा. अमेरिकनादी लोक मग अशा विफल साधनावर कोटयवधी रुपये खर्चणार नाहीत. आज हिंदू पोसला– दहा वर्षे पोसला, तरी संधी सापडताच तो आपला एक तुळशीपत्र खाल्ले की, पुन्हा हिंदूंचा हिंदू होतो, असे पक्केपणी कळले की, ते पाद्री आणि पीर आपली भ्रष्टाचाराची दुकाने भराभर आटोपू लागतील. आम्ही तर प्रत्येक हिंदूला उघडपणे सांगतो की, जर निरुपाय होईल तर चापून मुसलमानांच्या घरी खा, पाणी प्या; इंग्रजांच्या घरी खा, पाणी प्या; सर्व जगाच्या घरी खा, पाणी प्या, आणि जेवण झाल्यावर लगेच मुखशुद्धीसाठी एक तुळशीपत्र तोंडात टाका की तुमची मुखशुद्धीच नव्हे तर आत्मशुद्धीही होऊन आणि अन्न पार पचवून टाकून तुम्ही पुन्हा हिंदूंचे हिंदूच राहाल. आजवर सर्व जगाने हिंदूंचे खाल्ले, हिंदूंना लुटले, आता तुम्ही सर्व जगाकडून ती फेड करून घ्या, सर्व जगाचे अन्न खा आणि पुन्हा हिंदूंचे हिंदूच राहा. खाण्या–पिण्याने हिंदूधर्म बाटणार तरी कसा ?' (स. सावरकर खंड-३, पान ४२).

## मुस्लीम धर्मांतराचा पूर्वेतिहास

सावरकरांनी भारतावर झालेल्या मुस्लीम आक्रमणाची चर्चा करताना हिंदूंच्या सामाजिक रूढीमुळे त्यांना कसे धर्मांतर सोपे झाले याची चर्चा 'सहा सोनेरी पाने' या भारतीय इतिहासावरील त्यांच्या

पुस्तकात केली आहे. सावरकरांचा निष्कर्ष असा की, हिंदूंनी मुस्लीम सत्तेचा राजकीय पराभव केला तरी त्यांना धार्मिक प्रत्याक्रमण करता आले नाही. रोटीबंदी, बेटीबंदी आदी सामाजिक रूढीमुळे मुसलमानांचे संख्याबळ कायम राहिले. सावरकरांचे विवेचन सारांश रूपाने पुढे दिले आहे :

' महंमदाच्या विजयामुळे हिंदूंची इतकी चिरकालीन हानी झालेली नव्हती की, जितकी त्याने जे लक्षावधी हिंदूंचे वायव्य प्रांतात नि पंजाबात बलात्काराने धर्मांतर घडवून आणले. जी हिंदूराज्ये जिंकली ती हिंदूंनी लवकर वा उशीरा पण पुन्हा जिंकून घेतली. हे पुढच्या इतिहासावरून स्पष्टच आहे. परंतु त्याने लक्षावधी हिंदूंना जे मुसलमान करून टाकले त्यांना मात्र हिंदूंना पुन्हा धार्मिक दृष्टीने जिंकता आले नाही. आम्हांला आमच्या राष्ट्राचा प्रदेश स्वतंत्र करून आमचे गेलेले राज्यबळ परत जिंकता आले. पण हिंदुराष्ट्राची झालेली संख्याबळाची हानी काही आम्हांला भरून काढता आली नाही.

'त्या हिंदूराष्ट्राला परिणामी अत्यंत घातक ठरलेल्या तत्कालीन हिंदुसमाजाच्या जातिभेद, विटाळवेड, धर्मसहिष्णुतेची विकृती इत्यादी विक्षिप्त धर्मामुळेच मुसलमानांनी बळाने बाटविलेले लक्षावधी हिंदू मुसलमानाचे मुसलमानच राहिले. इतकेच नव्हे तर त्या बाटविलेल्या हिंदूंची संख्या पिढीमागून पिढीने वाढत गेली. त्यातही त्या पुढच्या पिढ्या जन्मत:चे मुस्लिम संस्कृतीत वाढल्या गेल्यामुळे कट्टर मुसलमान बनत गेल्या. इतके कट्टर मुसलमान की पुढ हिंदुस्थानावर इराणी, तुर्क, मोगलादी परकीय मुसलमानांच्या वायव्य दिशेकडून ज्या टोळधाडी वारंवार येत गेल्या त्यांच्या सैन्यात याच बाटग्या मुस्लिमांच्या नव्या नव्या पिढीतील सहस्रावधी लोक भरती होत गेले आणि त्या परकीय मुसलमानांइतक्याच त्वेषाने नि द्वेषाने 'हिंदु काफिरांचा ' समूळ विध्वंस करण्यासाठी आणि त्यांना बळाने बाटवून मुसलमान करण्यासाठी हिंदुराष्ट्रावर तुटून पडू लागले.

'कुख्यात हिंदुद्वेषी सुलतान महंमद घोरी हचाच घुरी जातीचा होता. अफगाणिस्थान, पठाणिस्थान, बलुचिस्थान येथील मुसलमान जनतेतील बहुसंख्य मुसलमान हे त्या प्रांतातील मूळचे निवासी जे हिंदू लोक त्यांचेच बाटविलेले वंशज होते. पण आपले पूर्वज कधीकाळी हिंदू होते याची लवलेश जाणीव त्यांना पुढे पुढ उरलेली नसे. इतकेच नव्हे तर ती जाणीव कोणी दिली तर त्याची त्यांना चीड येई. मागचे काय असेल ते असेल, आज तरी आम्ही १२०।१२१

स्वतःच इस्लामचे पाईक आहोत. मुसलमान राष्ट्राचेच अंगभूत आहोत हिंदू काफिरांशी आमचा आता तरी हाडवैरावाचून कोणताही संबंध नाही, अशा धर्मांध दुर्भावनेने ते भारावून गेलेले असत. त्यांचे नुसते धर्मांतरच झालेले नव्हते तर अशा धर्मांतराचा जो अपरिहार्य परिणाम पिढीमागून पिढीने बाटग्या लोकांवर होत जातो तो होऊन त्या बाटग्या हिंदूंच्या वंशजांचे राष्ट्रांतरही होत गेले. हिंदुस्थानावरील थेट रामेश्वरापर्यंन्त झालेल्या पहिल्या पहिल्या मुसलमानी आक्रमणाच्या त्या पाचसहा शतकांविषयी आम्ही येथे लिहीत आहोत त्या काळाच्या परिस्थितीत एकंदरीत आजचे धर्मांतर म्हणजेच उद्याचे राष्ट्रांतर ठरत गेले.

## पण येथे धर्म शब्दाचा अर्थ तरी कोणता ?

पण धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर ह्या वरील सूत्रात धर्म नि धर्मांतर शब्द काय अर्थी योजलेले आहेत ते स्पष्टपणे सांगितले पाहिजे. निरनिराळ्या धर्मातील किंवा स्वतंत्र दर्शनांतील तत्त्वज्ञानाचे तुलनात्मक चिंतन करणे किंवा त्यात जे स्वीकार्य वाटेल असे दर्शन आपल्या व्यक्तीपुरते स्वीकारणे अशा अर्थी काही वरील सूत्रांत धर्म आणि धर्मांतर हे शब्द योजले नाहीत. अमुक पुस्तक इशप्रेषित आहे, त्याच्या दोन पृठ्ठयांत जे काही सांगितलेलें आहे ते ते आणि ते तेच काय ते धर्म्य आहे आणि इतर सर्व असत्य नि पापमय आहे अशा अभिनिवेशाने जी धर्मसंस्था त्या धर्मग्रंथातील तथाकथित तत्त्वज्ञानच नव्हे तर आचारविचार, निर्वंध (कायदे), व्यवहार, भाषा इत्यादी गोष्टी तदितर धर्मसंस्थांच्या अनुयायांवर उपदेशाने न साधलें तर कपटाने, क्रौर्याने नि बलात्कारानेही लादण्यास अनमान करीत नाही, त्या धार्मिक बलात्कारासही धर्म्यच समजते, अशा आक्रमक संस्थांच्या धर्मास उद्देशूनच काय तो वरील सूत्रांत धर्म शब्द वापरलेला आहे. अशा अततायी धर्मसंस्थांनी तदितरांचे केलेले जे धर्मांतर हेच परिणामी त्या तदितरांचे राष्ट्रांतर ठरते.

## जातीय बहिष्काराचे प्रत्यस्त्र

मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार करील असे रामबाण प्रत्यस्त्रच हिंदूस्थानातील जे जातिबहिष्काराचे प्रत्यस्त्र म्हणून त्यांनी त्या मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणांचा प्रतिकार करण्यास सोडले ते त्यांच्या अंगावर उलटले.

ह्या 'जातिबहिष्कारा'च्या प्रत्यस्त्राची त्या हिंदूमुस्लिम धर्म-

युद्धाशी संबंध असलेल्या स्वरूपापुरती तरी कल्पना येण्यासाठी आणि त्याचा स्वधर्मरक्षक उपयोग होण्याच्या ठायी स्वधर्मघातक उपायच कसा होत गेला, ते लक्षात यावे म्हणून प्रथमत: जन्मजात जतिभेदाचीच कहाणी, अगदी संक्षिप्तपणे का होईना, पण सांगणे हे हिंदूंच्या मुसलमानांनी केलेल्या भ्रष्टीकरणाची फाड करावयाची तर अपरिहार्य आहे.

## जातिबहिष्काराचा राष्ट्रीय दंड

मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदूंवर होऊ लागल्या, त्याच्या पुष्कळ आधीपासून म्हणजे हिंदूंनी हूणांचा नायनाट केल्यापासून हिंदुसमाजाची आणि राष्ट्राची राजकीय, सामाजिक आणि धार्मिक स्थिरस्थावरता पुन्हा एकदा करण्याचा राष्ट्रीय प्रमाणावर मोठा सर्वांगीण प्रयत्न हिंदूंच्या शतावधी नेत्यांनी चोहो बाजूंनी भरतखंडभर चालू केला होता. त्या वेळी हिंदुराष्ट्राचे राजकीय नेतृत्व त्या काळीच उदयास येऊ लागलेल्या आणि वैदिक हिंदुधर्माचे कट्टर भक्त असलेल्या रजपुतांच्या प्रतापशाली राजघराण्यांकडे आलेले होते. त्या नवरचनेच्या प्रयत्नातच ह्या विशाल हिंदू समाजाची घडी जातिभेदाच्या चौकटीत चोपून बसविली जात होती. हळूहळू पण अपरिहार्यपणे त्या जातिभदाच्या प्रथेलाच जन्मजात जातिभेदाचे स्वरूप प्राप्त झाले. पूर्वीच्या चार वर्णांतच नव्हे, तर त्या चार वर्णांच्या पोटातून आणि अवांतर जातिप्रवाहाचीही त्यात भर पडत पडत शेवटी बळकटपणें नि शास्त्रसंमतपणे इतकेच नव्हे तर जवळजवळ सर्वसंमतपणे चार सहस्र जन्मजात जातींत हे हिंदुजगत सामाजिक नि धार्मिक दृष्टचा अंतर्गतत: विभागले गेले. एक प्रकारे हे त्या वैदिक हिंदुराष्ट्राचे सामाजिक स्थित्यंतर, त्या काळाच्या ऐतिहासिक आवश्यकतेमुळेच घडले गेले.

जो ज्या जातीत जन्मला तोच काय तो त्या जातीत राहू शकेल, हे ह्या जन्मजात जातिभेदाचे एक मूळ सूत्र होते. दुसऱ्या जातीशी अन्नव्यवहार करणे वा दुसऱ्या जातीचे पाणी पिणे ही कृत्येसुद्धा बहुतेक जातींमधे दंडनीय समजली जात. मग जातीजातींत मुली देण्याघेण्याची अत्यंत कडक बंदी होती हे काय सांगावयास पाहिजे ? त्या काळातील ह्याच निरनिराळ्या जातिसंस्कार म्हणून मानलेल्या 'धर्माचारांना' आम्ही लोटीबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी आणि ज्याविषयी आम्ही आता पुढे सांगणारच आहोत ती शुद्धिबंदी,

१२२।१२३

सिंधुबंदी इत्यादी सात नावे आमच्या जातिभेदावर लिहिलेल्या अनेक लेखांतून दिलेली आहेत. हिंदूंच्या प्रगतीलाच नव्हे तर गतीलासुद्धा पायबंद घालणाऱ्या या सात बंद्या म्हणजेच सात बेड्याच होत्या. त्या बेड्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या पायात ख्रिश्चन किंवा मुस्लिम किंवा इतर कोण्या परराष्ट्रीय म्लेंच्छाने बळाने ठोकलेल्या नव्हत्या तर त्य हिंदूंनीच आपण होऊन एका बुद्धिभ्रंशाच्या लहरीत, स्वधर्म-रक्षक तोडगा म्हणून आपल्या पायात ठोकून घेतलेल्या होत्या.

## एकात्म हिंदुत्वाची संकल्पना

अनुदार विज्ञान, श्रमविभागात्मक अर्थकारण, सामुदायिक सह-जीवन नि सामुदायिक नीति इत्यादी तत्त्वांवरही त्या काळी स्मृति-कारांना आकळला तेवढा दूरदूर विचार त्या संस्थेच्या रचनेत अनु-स्यूत केला होता. सहस्रावधी वर्षे होऊन गेली, सहस्रावधी संकटे येऊन गेली पण तथाकथित स्पृश्य काय किंवा अस्पृश्य काय, कोट्या-नुकोटी हिंदूंच्या मनावर ह्या जातिभेदाच्या संस्थेने जो प्रभाव, जो मोह पाडलेला होता आणि अगदी परिया, भंगी, कोळी, भिल्ल, वैश्य, जाट, क्षत्रिय, ब्राह्मण इत्यादी हिंदूंच्या जातींच्या आणि त्यांच्या सहस्रावधी पोटजातींच्या श्रद्धेप्रमाणे त्यांचे ते मर्यादित जातिधर्म हेच आपले ऐहिक नि पारलौकिक कल्याण साधणारे, देवाची कृपा संपादणारे नि आपापल्या संसारास पवित्र करणारे सदाचार आहेत, असा जो एकनिष्ठ विश्वास हिंदुजगतात उत्पन्न झालेला होता तो ह्या जातिभेदाच्या संस्थेची पाळेमुळे शतकानुशतके हिंदुराष्ट्राच्या ह्या सर्व जातिजीवनक्षेत्रातून अत्यंत खोल शिरलेली असल्यावाचून आणि त्यातून संचरत राहिलेल्या जीवनरसाने त्या असंख्य भिन्न जातिसमूहामुळे विछिन्न दिसणाऱ्या ह्या राष्ट्राला आतून कोणत्या तरी एकात्म सवात्त्च्या आणि स्वत्वाच्या अदम्य भावनेने प्रस्फुरित केलेले असल्यावाचून, तसा कदापि उत्पन्न होऊ शकता ना. ह्या वर-वर विभिन्न दिसणाऱ्या जातिभेदाच्या स्वायत्त पण संयुक्त संघाला ज्या आंतरिक, अंतर्यामी नि अनावर अशा एकात्म भावनेने असे एक-जीव केलेले होते, त्या राष्ट्रीय भावनेचेच नाव होते– हिंदुत्व, हिंदु-धर्म.

## जातिबहिष्काराचे शस्त्र

हिंदूंच्या ह्या जातीजातीत जर कोणाकडून काही जातीय आचा-रांचा कळत न कळत भंग झाला. कोणी दुसऱ्या जातीच्या हातचे

पाणी प्याला किंवा दुसऱ्या जातीच्या व्यक्तीशी शरीरसंबंध जाणून-बुजून किंवा अजाणपणे केला तर अशा कोणत्याही जातिधर्माविरुद्ध जाणाऱ्या अपराधी हिंदूला त्या काळी जो कडकातला कडक दंड देण्यात येई तो म्हणजे जातिबहिष्कार हा होय.

ह्या जातिबहिष्कार शब्द आज आपण सहजगत्या निर्भयपणे उच्चारू शकतो. आपण त्या मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणांच्या काळी आणि त्यानंतर अनेक शतके हिंदुसमाजातील कोणत्याही व्यक्तीला, कुटुंबाला वा वर्गाला जातिबहिष्काराच्या दंडाचे नाव काढताच धसका बसल्यावाचून राहत नसे. आणि ज्या हिंदूला जात पंचायतीकडून किंवा शंकराचार्यादिकांच्या धर्मपीठांकडून जातिबहिष्कार झाल्याचा दंड देण्यात येई तो हिंदु राजमुकुटधारी असला तरी चळचळा कापत असे. जात अंतरणे म्हणजे जग अंतरणे, जीवन अंतरणे, इतका दुःसह परिणाम भोगावा लागे. प्रत्यक्ष आई–बाप, रक्ताचे बंधुबांधव सुद्धा त्या जातिबहिष्कृतास अकस्मात अंतरले जात. संक्षेपतः येथे इतकं सांगणें पुरे आहे की, कोणत्याही देहदंडापेक्षा किंवा आर्थिक दंडापेक्षाही त्या काळच्या स्वधर्मनिष्ठ हिंदूंना जातिबहिष्काराच्या दंडाची भीती अधिक असे. आणि त्यामुळेही जातीजातींचे शास्त्रस्मृतिमर्यादित आणि व्यवस्थित असे जे रूढ झालेले आचार असत ते आपण होऊन काटेकोरपणे पाळण्याची प्रवृत्ती हिंदुसमाजात पिढ्यानुपिढ्या अगदी अंगी मुरत असलेली होती.

## हिंदु बाटविण्याची मोहिम

जेव्हा सिंधवर मुसलमानांनी स्वारी केली आणि हिंदू लोकांना सशस्त्र आक्रमणे करून बाटविण्याचा, मुस्लिम करण्याचा प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या लवकरच लक्षात आले की, ह्या हिंदू लोकांचा स्वधर्माभिमान आणि स्वधर्मनिष्ठा ही जरी जगातील कोणत्याही धर्माच्या अनुयायांइतकी किंबहुना काही प्रकरणी त्याहूनही कट्टर असली, अदम्य असली आणि त्यामुळेच हिंदूंना मनाने मुसलमान करणं हे जरी अत्यंत कठीण काम असले तरी त्यांना शरीराने मुसलमान करणे हे कार्य अतिशय सोपे आहे.

ही गोष्ट केवळ मुसलमानांच्याच धार्मिक आक्रमणाच्या काळाला लागू होती असे नव्हे तर मुस्लिम धर्माच्या जन्मापूर्वीही ज्या सिरियन ख्रिश्चनांना मलबारमध्ये हिंदू राजांच्या औदार्यामुळे, म्हणजेच घरबुडवेपणामुळे इसवीसनाच्या पहिल्या चार शतकांचे आत आश्रय

१८४।१८५

दिला गेला आणि ज्या ख्रिश्चनांनी हिंदूंना बाटविण्याचा आरंभ केला त्या ख्रिश्चनांनाही ही गोष्ट कळून चुकली होती की, हिंदूंना नुसते अन्नाचा घास तोंडात कोंबूनही ' बाटविणे' शक्य आहे. किंवा विहिरीवर पाणी भरतात त्या जलाशयात ख्रिश्चनांचे उष्टे पाव, बिस्किट, गोमांसाचे खंड (तुकडे) असे पदार्थ टाकले की, ते पाणी प्यालेले सारेच हिंदू त्या अन्न–जल–सहवास–संपर्काने जन्माचे बाटले जातात. त्यांना पुन्हा हिंदुधर्मात कोणी घेत नाही.

## बाटविलेल्यांच्या पायात शुद्धिबंदीची बेडी ठोकली

बळाने बाटविलेल्या हिंदूंची संख्या मुसलमान पंजाबपर्यंत चढाई करून येईतो लक्ष लक्ष झाली असताही आणि त्यांपैकी अनेकांना परत हिंदुधर्मात येण्याची इच्छा असताही हिंदूंच्या ह्या जातिबहिष्काराच्या कठोर दंडविधानात हिंदुधर्मात किंवा समाजात शुद्ध होऊन परत येता येण्याचा कोणताही मार्ग, कोणताही प्रायश्चित्ताचा पर्याय हिंदुसमाजाने उघडा ठेविला नव्हता, उपलब्ध ठेवला नव्हता. ही गोष्ट त्यांच्या त्या काळच्या आपापसातील जातीय प्रकरणांच्या रोटीबंदी, बेटीबंदी इत्यादी बेड्यातील विचारसरणीला इतकी धरून होती की, जो हिंदू 'बाटून' एकदा मुसलमान झाला त्याला आजन्म पुन्हा शुद्ध होऊन परत हिंदुधर्मात येणे अशक्य करणारी ही शुद्धिबंदी मानवी बेडी सहजपणे आणि तिच्या परिणामांची कोणतीही छाननी न करता त्या पूर्वीच्या बेड्यांप्रमाणेच त्या जातिबहिष्कृतांच्या पायात हिंदुसमाजाकडून ठोकण्यात आली. त्याचाच अर्थ असा की, हिंदुसमाजाच्या स्वतःच्या पायातही ती शुद्धिबंदीची बेडी आपसूकच ठोकली गेली. बाटविलेल्यांना जातिबहिष्काराचा दंड देऊन हिंदूंनी हिंदुराष्ट्राच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली.

मुसलमानांच्या हिंदूंना बळाने बाटविणाऱ्या भयंकर आक्रमणास पायबंद घालण्यासाठी हिंदुसमाजाने जातिबहिष्काराचा दंड देण्यास आरंभ केला. अर्थात जे कोणी हिंदू स्वार्थासाठी, सत्तेसाठी, संधिसाधुपणाने आपण होऊन स्वधर्मद्रोहाचं महापातक करण्यास सिद्ध झाले आणि मुस्लीम धर्म स्वीकारून बाटले तशा बाटग्या हिंदूंनाच काय तो जातिबहिष्काराचा हा कठोर दंड देणे उचित आणि उपयुक्त होते पण मूलतःच पतित असे मानल्या गेलेल्या म्लेंच्छ जातीच्या कोणा मनुष्यासह बळाने रोटीव्यवहार करावा लागला. पाणी प्यावे लागले किंवा पत्नीला दुष्ट म्लेच्छांनी बळाने बलात्काराने बाटविले असता

तिच्यासह स्वतःच मुसलमानांचा गुलाम केला गेल्याने राहावे लागले, अन्न-पाणी व्यवहार करावा लागला तर त्या हिंदूलाही त्याची मूळची जातच नव्हे तर हिंदूतील कनिष्ठतील कनिष्ठांठ जातही वाळीत टाकी तो बाटला असे समजून जातिबहिष्काराचा कठोरांतील कठोर दंड देऊ. म्हणजे, हिंदुसमाजातील आपसाआपसांतल्या जातीमधे कोण्या हिंदूचे वाळीत पडणे ही गोष्ट आणि कोण्या हिंदूचे मुसलमानाशी हिंदूंच्या जातिधर्माविरुद्ध रोटी व्यवहार, बेटी व्यवहार इत्यादि संव्यवहार घडल्यामुळे जातिबहिष्कृत होत्साता तो मुसलमान होऊन जाणे ही गोष्ट, ही दोन्ही कृत्येही हिंदूंना सारखीच वाटत. त्या दोन घटनांत असणारा आणि हिंदूंच्या सामुदायिक संख्याबळावर दूरवर हानिकारक परिणाम करणारा राष्ट्रीय विभेद त्या काळच्या हिंदुसमाजाच्या ध्यानातच आला नाही.

एक हिंदु-हिंदुसमाजातल्याच एक जातीने खाण्यापिण्याच्या दोषापायी वाळीत टाकला, तरी तो हिंदुसमाजाला मुक नसे, हिंदुसमाजातील इतर अनेक जातीत तो मिसळून जाई किंवा त्याला अनुकूल अशा समदुःख्यांची स्वतंत्रच एक जात बनवी, पण ती जात हिंदु समाजातच राहणारी असे, त्याचे ज्यात्यंतर होई, परंतु त्या पोटी सहसा धर्मांतर होत नसे, समाजांतर सुद्धा होत नसे, राष्ट्रांतर होत नसेच नसे. रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृति जातीय धर्माचारांच्या घडणाऱ्या भंगापायी वाळीत पडणारे, जातिबहिष्कृत होणारे, ते सहस्रावधी हिंदू, हिंदुसमाजाच्या कक्षेबाहेर पडत नसत, त्यांचे हिंदुपण तसेच अखंड राही. अक्षुण्ण राही. अर्थात तशा आपसातील जातिबहिष्कारामुळे एकंदर हिंदुसमाजाच्या संख्याबळाची हानी होत नसे.

परंतु जेव्हा त्याच रूढीप्रमाणे मुसलमानाने बाटविलेल्या कोणाही हिंदू स्त्री-पुरुषांना तोच जातिबहिष्काराचा दंड देऊन हिंदु जाती त्या बाटलेल्या हिंदुलोकांना शुद्धिबंदीची बेडी ठोकून जातीबाहेर टाकी, तेव्हा त्यांचे हिंदुपणच हिरावले जाई. अशा सहस्रावधी हिंदू स्त्री-पुरुषांना वारंवार होणाऱ्या धार्मिक आक्रमणांतून मुसलमान लोक सारखे बाटवीत गेल्याने त्या त्या बाटविलेल्या हिंदु स्त्री-पुरुषांना हिंदुसमाज हिंदू जातीतूनच बहिष्कृत करीत गेल्याने आणि त्यामुळे त्यांना मुसलमानांच्या धर्मात नि समाजात राहणे भाग पडत गेल्याने हिंदुराष्ट्राच्याच संख्याबळाची भयंकर हानी होत गेली.

## व्यवहारांतील नीतिशास्त्र

संक्षेपत: यथे इतकेच सांगणे पर्याप्त आहे की, व्यवहारात नि नीतिशास्त्रात तरी गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास उपकारक ठरतो तेव्हा तितक्याच मर्यादेपर्यंत तो सद्‌गुण समजला गेला पाहिजे. आणि जेथून तोच गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अधःपातास कारणीभूत होतो, तेथून त्यांचे दुर्गुणांत रूपांतर होते, तो त्याज्य ठरतो.

अगदी संक्षेपतः का होईना परंतु काही गुणांचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन भेद केलेले आहेत. म्हणूनच देशकालपात्राच्या विवेकाची कसोटी फार महत्त्वाची आहे. हिंदूंच्यां संस्कृतीने मनुष्याला देवत्वाप्रत पोचविण्याची आकांक्षा बाळगून मनुष्याच्या अंगात सात्त्विक भाव उत्पन्न करण्याची पराकाष्ठा केली. परंतु हे जग हे केवळ सत्त्वाच्या एकाच धाग्याने विणलेले नाही, हे त्रैधातुक आहे, सत्त्व रज, आणि तम ह्या तीन धाग्यांनी ते विणलेले आहे. आणि म्हणूनच जर आणि ज्याला या जगात जगावयाचे असेल, जिंकावयाचे असेल. निदानपक्षी अन्यांकडून, अन्यायाकडून जिंकले जावयाचे नसेल, त्याला सत्त्व, रज आणि तम ह्या तिन्ही परिस्थितींतील अवस्थांना यशस्वीपणे तोंड देता येईल असे त्रिशूली साधनच वापरले पाहिजे. परंतु त्या हिंदु–मुस्लिमीय काळी हिंदुराष्ट्राला त्या सद्‌गुणांच्या सापेक्षतेचा उपदेश करणाऱ्या गीतेचीसुद्धा विस्मृती झाली. नव्हे गीतेतील धर्माचाच त्या काळच्या हिंदूंनी विपर्यास केला. गीतेतील मुख्य जो धर्म आहे तो म्हणजे पात्रापात्रविवेक–त्याची ओळखही त्या हिंदूंना राहिली नाही.

मुसलमानांना हिंदू करून घ्यायचे नाही किंवा मुसलमानांनी हिंदुस्थानात स्थापिलेल्या इस्लामी धार्मिक सत्तेवर कोणतेही प्रत्याक्रमण करावयाचे नाही. त्यांना धार्मिक प्रश्नी कोणताही उपसर्ग द्यावयाचा नाही, कारण ती कृत्ये आपल्या हिंदुधर्माच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत, अशी हिंदूंची ठाम प्रवृत्ती पाहून मुसलमानांना इस्लामी धर्मसत्तेच्या संरक्षणासाठी कोणतीही चिंता करण्याचे कारण उरले नाही. त्यांना एकच काय ती चिंता उरली होती आणि ती म्हणजे आपले धार्मिक आक्रमण एकसारखे वाढवून आपल्या हातून हिंदूंनी राजसत्ता जरी हिरावून नेली असली तरी निदान आपल्या इस्लामी धर्मसत्तेची कक्षा भरतखंडभर वाढविण्याचे अटोकाट प्रयत्न करण्याची काय ती होती.

मुसलमानांच्या या धर्मसत्तेपायी हिंदुजगताची केवढी हानी झालेली होती याची चर्चा आम्ही ह्या ग्रंथात वर अधूनमधून केली आहे. आता येथे काही ठोकळ आणि एकवट आढावा देत आहो. आणि तोही त्या मुस्लिम धर्मसत्तेपायी झालेल्या दुय्यम अशा अनेक हानिकारक गोष्टींविषयी नव्हे तर तिच्यामुळे जे दोन सर्वांहून अधिक हिंदुविघातक परिणाम झालें त्या दोन गोष्टींविषयीच होय.

## संख्याबळाची हानी

पहिली गोष्ट म्हणजे हिंदूंच्या संख्याबळाची झालेली प्रचंड नि राष्ट्रव्यापी हानी. साधारणः ह्या एक सहस्र वर्षात दोन ते तीन कोटी हिंदूंना मुसलमानांनी बाटविले.

हिंदूंच्या संख्याबळाचा जो रक्तशोष चालेलला होता तो त्या काळच्या हिंदुसमाजालाही कळत होता. परंतु त्या रक्तक्षयाच्या रोगावर शुद्धिबंदीच्या बुद्धिभ्रंशामुळे त्यांना दुसरा उपचार सुचत नव्हता. असाध्य रोगाची प्राणांतिक व्यथा रोगी जशी अगतिकपणे केवळ सोशीत राहतो तसे त्या काळचे हिंदुजगत ही रक्तक्षयाची प्राणांतिक व्यथा अगतिकपणे केवळ सोशीत राहिले.

## भूक्षेत्राची हानी

परंतु ' संख्याबळाच्या' ह्या हानीहूनही भयंकर अशी दुसरी जी एक हिंदुराष्ट्राची हानी होत होती ती म्हणजे हिंदुस्थानच्या विस्तृत भूमीला खंडखंडशः मुस्लिमांची ही इस्लामी धार्मिक सत्ता हिंदूंच्या हातून न कळत छिनावीत चालली होती ही होय.

हिंदूंशी लढून जितकी भूमी मुसलमानांना साऱ्या हिंदुस्थानभर जिंकता आली नाही तितकी भूमी मुस्लिमांनी हिंदुस्थानभर हिंदूंना बाटवून जिंकली.' (समग्र सावरकर खंड ४ पाने ७०७ ते ७०८)

## शुद्धीकार्याचा प्रारंभ

सावरकर अंदमानात १९११ साली गेले. त्यानंतर त्यांना असे आढळले की कारागृहात हिंदू कैद्यांना मुसलमान करण्याचे प्रयत्न चालू आहेत. यांची माहिती देताना सावरकरांनी ' माझी जन्मठेप' पुस्तकात म्हटले आहे की मुसलमान करण्याच्या या प्रयत्नास बंदीगृहात चाकरीवर असलेले मुसलमान शिपाईही हस्ते परहस्ते सहाय्य देतात, ही परिस्थिती अंदमानात होती. तेथे प्रथमपासून धर्मांध मुसलमान वार्डर वगैरे अधिकारी असत. मुसलमानी अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी काही कैदी मुसलमान होण्यास तयार होते.

१२८१२९

हा प्रवाह थोपविणे आवश्यक होते. सावरकरांनी वैचारिकदृष्टया व सामाजिक दृष्टया शुद्धीसाठी आवश्यक ते कार्यक्रम अंदमानात सुरू केले. शुद्धीकरणावर पहिला आक्षेप असा होता जे पतित किंवा लुच्चे लोक हिंदुसमाजात जन्माला आले आहेत त्यांना आपल्या धर्मात त्यांनी रहावे म्हणून प्रयत्न करणे हा व्यर्थ पोरखेळ आहे. सावरकरांनी या आक्षेपास उत्तर दिले आहे. मुसलमान किंवा ख्रिश्चन हिंदुसमाजातील पतितास, आपल्या धर्मात नेण्याचे प्रयत्न करतात, त्या कार्यावर लाखो रुपये खर्च करतात त्याचे कारण त्यांना आपले संख्याबळ वाढवावयाचे आहे. सावरकरांनी म्हटले आहे, 'जर तुम्ही हिंदूस, मग तो कितीही पतित किंवा नीच का असेना, परंतु लोभाने, कामाचे, व्यसनाचेदेखील आमिष दाखवून आणि आमचे मौलवीसाहेब तर सुरा दाखवूनही बाटवता ते तुमचा समाज आणि संख्याबळ वाढविण्याकरता, तुमच्या ऐहिक लाभासाठीं बाटवीत असाल तर आम्हीं हिंदूही आमचा समाज व संख्याबळ वाढविण्यासाठी आणि आमची संस्कृती क्षीणतर होऊन अन्य जातीपुढे आपल्या जाती-जीवनाचा बळी दिला जाऊ नये म्हणून त्याच कारणासाठी आम्ही बाटविलेल्या हिंदूंस शुद्ध करून घेतो.

'कारण ती व्यक्ती जी भ्रष्टविण्याकरता तुम्ही झटता ती दुष्ट वा मद्यपी वा पतित असेल. परंतु तुम्ही सूक्ष्म विचारांनी हे सामाजिक सत्य ओळखून ध्यानात ठेवलेले आहे की ती व्यक्ती तुम्ही नावाने, बळाने कशी तरी मुसलमानी वा ख्रिस्ती धर्मात कोंबून ठेवली की तिची संतति लहानपणापासूनच तुमच्या संस्कृतीत वाढविल्याने मनाने पक्की ख्रिस्ती वा मुसलमानी होऊन तुमच्यातील सुज्ञ, बलिष्ठ आणि उपयुक्त नागरिकांची संख्या वाढवितात. कारण दुष्टाची, मद्यप्याची वा लबाडाची संतती लबाडच निघते असा नियम नाही. कानडा व ऑस्ट्रेलिया या द्वीपात अशीच टाकाऊ माणसे इंग्लंडने धाडलीच होती.

आज त्याच इंग्लंडातील हत्यारी, चोर, दरोडेखोर अपराध्यांच्या त्या द्वीपांतरित पतितांच्या वंशजांनी कानडात आणि ऑस्ट्रेलियात स्वतंत्र राष्ट्रे आणि राज्ये स्थापित करून चालविली आहेत. हिंदु समाजातील घाण आणि गाळही तुम्ही फावड्याने-सोन्याच्या फावड्याने- जो एकसारखा ओढीत आहा तो एवढ्याचसाठीं की, सुज्ञ शेतकऱ्याप्रमाणे तुम्हास त्या घाणीच्या आणि गाळाच्या उपयोगाची माहिती आहे- की जर त्याचे खत शास्त्रीय रीतीने उपयोजिले तर

जीवनद धान्याच्या सोनेरी कणसांनी तुमची शेती पुढील वर्षाच्या धान्यर्तूत डवडवून डोलू लागेल.

आणि हेच सामाजिक तत्त्व ध्यानांत ठेवून नीच असो, चोर असो, लुच्चा असो, अज्ञ असो, पण हिंदू म्हटला की तो परधर्मात जाऊ द्यावयाचा नाही आणि गेला असला तर तो परत शुद्ध करून हिंदू समाजात समाविष्ट करून घ्यावयाचा म्हणून शुद्धीकरणाची आमची सेना झटत आहे. कारण चोर जरी असला तरी हिंदू चोर हा मुसलमान चोराहून हिंदू संस्कृतीस कमी हानिकारक आहे. हिंदू चोर नुसती चोरीच करील, पण केवळ देऊळ म्हणून फोडणार नाही, मूर्ति तोडणार नाही किंवा वेद जाळणार नाही. मुसलमान चोर चोरी तर करीलच, पण जाता जाता देवमूर्तींचा उच्छेद करून आणि शक्य तर एखाद्या तरी 'काफर'च्या डोक्यात तो काफर म्हणून सोटा घालून स्वर्गात त्या चोरीचे पापक्षालन होण्यापुरते रक्त सांडण्यास कमी करणार नाही ! हा फरक सदोदित संभवनीय म्हणून ध्यानात ठेवला पाहिजे. एवढ्यासाठी देखील चोरी सुटत नसेल, मद्य सुटत नसेल, लोभ सुटत नसेल तरी चिंता नाही. पण तरीही हिंदुत्व सोडू नकोस. तू हिंदूच राहा म्हणून पतितांचे मन वळविणे हिंदु संस्कृतीच्या आणि जातीय जीवनाच्या दृष्टीने अवश्य आहे हे सिद्ध होते.

परंतु शुद्धीकरणाची चळवळ चोरापोरातही का चालू ठेवली पाहिजे यास दुसरे, वरील कारणाहूनही अत्यंत महत्त्वाचे, आणखी एक समर्पक कारण आहे.

चोरी सोडलीस तर उत्तमच ! पण ती सुटत नसेल तर निदान हिंदू चोर होऊन तरी राहा. कारण चोरी न सोडणे हे पाप असले तरी हिंदू न रहाणे हे त्या पापाहून शतपट घोर असे राष्ट्रीय आणि सामाजिक पाप आहे– नैतिक आहेच आहे. ते तरी निदान करू नकोस ! असे प्रत्येक मनुष्याला, मग तो किती टाकावू का असेना, आपण हिंदूंनी सांगितले पाहिजे. त्यासाठी झटलें पाहिजे. कारण असेच टाकावू मनुष्य आपल्या पूर्वजांनी आपल्या स्वतःच्या पावित्र्याच्या घमेंडीत परधर्मात दर पिढीस जाऊ दिले–

एतदर्थ नावाने का होईना परंतु कितीही नीच किंवा निरुपयोगी जरी झाला तरी त्याला हिंदुत्वाच्या कक्षेत ठेवण्यासाठी किंवा आणण्यासाठी झटलेच पाहिजे.

अशा दूरवर विचाराने प्रेरित होऊन त्या कठोर कारागारात आणि

१३०१३४

वसाहतीतही चोर, दरवडेखोर आणि हत्यारी अशा त्या पतितासही मुसलमानी धर्माच्या तावडीतून सोडविण्यासाठी आपण उद्युक्त झाले पाहिजे असे आम्ही तेथील हिंदूंस आणि राजबंदिवानास सांगू लागलो. वरील वाक्ये सहासात वर्षे आमच्या ओठावर सारखी खेळत होती. सन १९१३ व्या वर्षी म्हणजे आम्ही अंदमानात गेल्यानंतर सरासरी दीड-दोन वर्षांनी आम्ही हिंदूंस बाटवीत असता मुसलमानांवर पहिला खटला भरला. पहिला प्रतिकार केला. राजबंदिवानांतील ज्या लोकांनी आम्हांस साह्य करण्यास तत्परता दर्शविली आणि ज्या हिंदु बंदिवानांनी ह्या चळवळीत हळूहळू उत्साहाने भाग घेण्यास आरंभ केला, त्यांच्या सहकार्याने ही शुद्धीकरणाची चळवळ आम्ही सरासरी १९२१ २२ वर्षापर्यंत म्हणजे आम्ही अंदमानातून हिंदुस्थानातील तुरुंगात धाडले जाईतो सारखी चालविली होती.

## अंदमानात शुद्धी

आणखी एक आश्चर्यकारक अनुभव आम्हास आला की, हिंदुत्वाच्या सामाजिक आणि राष्ट्रीय अभिमानास या गुंड म्हणून गाजलेल्या हिंदूंच्या हृदयात आम्हास लवकर जागृती करता येई. इतर साध्या शिक्षित व भाबड्या हिंदूंत जरी हा अभिमान जागृत केला जाई तरी प्रत्यक्ष धकाधकीत त्या अभिमानाने स्वतः झीज सोसून कार्य करण्याची धमक फार थोडी येई.

जो जो हिंदु बंदिवानात हिंदुत्वाचा अभिमान संचारू लागला तो तो मुसलमान आम्हांवर जळफळू लागले. बारीच्या चिथावणीने आम्हास केव्हा केव्हा फार कष्ट सोसावे लागत, शारीरिकच नव्हे, ते तर आम्ही सोशीतच होतो, पण मानसिक कष्टही सोसावे लागले, ते कुठवर सांगावे ?

आजवर नुसते कोण्या हिंदूस थोडेसे मुसलमानाच्या हातचे पाणी दिले किंवा खाणे दिले की तो हिंदू, मुसलमान झाला म्हणून हिंदू लोकच बहिष्कृत करीत. आज ह्या वेळेस आपल्या ह्या हिंदुस्थानात ही दुष्ट आणि गांवढळ समज शास्त्रीमंडळींतही प्रबळ आहे हे कोणास सांगावयास पाहिजे आहे असे नाही. एका या समजेपायी भ्रष्ट झालेल्या हिंदूतील शेकडा पन्नास लोक, भूतकाली आणि वर्तमानकाली परधर्मात समाविष्ट केले गेले आहेत. हिंदुस्थानातली आजची जर ही स्थिती तर अडाणी पतितांच्या आणि पाप्यांच्या निबुध वसाहतीतील अंदमानातील दहा वर्षापूर्वीची स्थिती काय

असेल ती कल्पना करणे कठीण नाही! एतदर्थ आम्ही उघडपणे अंदमानात या रूढीस तोडण्यासाठी खाण्याने मनुष्य बाटतो ही पोरकट समजूत मारण्यासाठी सारखे प्रयत्न चालविले होते. नाना प्रकारांनी तिचे हास्यास्पदत्व हिंदू बंदिवानांचे मनावर बिंबवीत होतों.

जर हिंदूंचे खाऊन मुसलमान हिंदू होत नाही, ते हिंदूंचे अन्न पचवून पुन्हा मुसलमानाचा मुसलमानच राहतो किंवा ख्रिस्तीचा ख्रिस्ती राहतो तर मुसलमानाचे अन्न खाताच तुम्हास धर्माचाच रेच व्हावा? तुमचे हिंदूपणाची पचनशक्ती क्षीण कशी झाली? मुसलमानांचे अन्न खाऊन, ख्रिस्त्यांचे पाणी पिऊन, ते पचवून पुन्हा हिंदूचे हिंदू राहण्याइतकी तुमची पचनशक्ती आता वाढली पाहिजे, सगळ्या जगाने तुमचे अन्न खाऊन टाकले, तुम्ही उपाशीचे उपाशी ! आता बंधूंनो, आपण सगळ्या जगाचे अन्न खाऊन पिऊन पचवून टाकून पुन्हा हिंदूंचे हिंदू राहिले पाहिजे! तर तरणोपाय आहे. अशा अनेक प्रकारे आम्ही हिंदूंस समजावून देत चाललो. प्रत्येक प्रसंगी हे तात्पर्य त्यांच्या मनात ठसवू लागलो.

अंदमानातील शुद्धीच्या चळवळीने हे इतके कार्य न करता केवळ इतके जरी कार्य केले असते की मुसलमानही हिंदू होऊ शकतो ही गोष्ट लोकांच्या मनात ठसविली तरीही, ती चळवळ सफल झाली असे म्हणता येते. 'हिंदू मुसलमान होतो. पण मुसलमान कसा हिंदू होणार!' अगदी अक्षरशः अशाच शब्दांत शेकडो हिंदू जो प्रश्न करीत होते तो आता अंदमानात विचारणारा कोणी उरला नाही. मुसलमानालाही हिंदू करता येते. केवळ दोन घास मुसलमानी अन्न खाल्याने रेच होऊन जीव जावा इतका काही हिंदू धर्मांचा कोठा अशक्त नाही. ही गोष्ट आता अंदमानातील त्या हिंदूंच्या रूढ समजुतींतील एक दृढ समजूत झालेली आहे. शुद्धिचळवळीचा हाही काही लहानसहान लाभ झाला नाही. कारण या हिंदुस्थानातील 'सुजाण' आणि 'स्वतंत्र' लोकांतही अनेक धर्ममार्तंड अजून आढळतात की जे हाच मूर्खपणाचा गावंढळ प्रश्न गंभीरपणे विचारतात !

ऐतदर्थच आमची अशी निश्चिती आहे की, अन्नपेयांच्या स्पर्शास्पर्शतेच्या बाष्कळ अतिरेकाचा त्याग आणि धर्मबहिष्कृतांस शुद्ध करून घेण्याची रूढी ह्या दोन सुधारणा हिंदूंनी आपल्या समाजात जर केल्या तर मुसलमानास हिंदूतील आपद्ग्रस्तास बाटविणे पुष्कळच दुर्घट होईल, बाटविल्यास संभाळणे त्याहूनही दुर्घट होईल. त्यामुळे त्यास बुद्धिवादाने ज काय हिंदू बाटविता वा सांभाळता येतील

तितकेच हिंदू मुसलमान झाल्याने आणि त्याच न्याय्य रीतीने मुसलमानांसही हिंदू करून घेण्यास हिंदूंस हरकत न उरल्याने एका बाजूस मुसलमानांची अत्याचारी वृत्ती संधी न साधल्याने आणि निष्फळ ठरल्याने कमी होईल आणि दुसऱ्या बाजूस हिंदूंना आपले धर्मबांधव हिसडून नेले जाताना पाहून जो मुसलमानांविषयी साहजिकच द्वेष येतो तो कमी होईल. तलवार तर दोघांचीही तुटलीच आहे तत्त्वाने धर्मप्रचार करण्यास दोघांसही अधिकार आहे. विटाळाचा विटाळ तेवढा आपल्या बुद्धीस हिंदूंनी होऊ देऊ नये. म्हणजे मुसलमानी धर्मांतराच्या विटाळ, तरवार आणि तत्त्व ह्या त्यांस अनुकूल झालेल्या तीन साधनांपैकी तत्त्व हेच काय ते न्याय्य साधन त्यांस उरून धर्मांतराचा वाद मिटेल. म्हणजेच हिंदुमुसलमानांच्या तीव्र चुरशीस कारण होणारे एक मोठे निमित्त दूर होईल.

(खंड २–४७७ ते ५०१ समग्र सावरकर. माझी जन्मठेप.)

अंदमानात असताना सावरकरांनी जे शुद्धीकरण केले त्याचेच सावरकरांनी 'माझी जन्मठेप' मध्ये केलेले वर्णन सारांशरूपाने येथे दिले आहे.

शुद्धिकरणाप्रमाणे परकीय समाजास हिंदू समाजात दाखल करून घेण्याच्या प्रश्नाचीही सावरकरांनी चर्चा केलेली आढळते.

## पौरुष, पचनशक्ती आणि पराक्रम

परकीयांना आपल्या समाजात पचविण्याची प्रक्रिया कशी होती याचे विवेचन सावरकरांनी केले आहे. आपले लोक, शक– हूणांच्या स्त्रियांशी लग्ने लावीत व त्यांच्यापासून झालेल्या संततीलाच नव्हे तर ते परकीय समाजचे समाजच आपल्या धर्मात नि आपल्या संस्कृतीत आत्मसात करून टाकण्याइतके आपल्या राष्ट्राचे पौरुष, पचनशक्ती आणि पराक्रम ही त्या काळात प्रखर होती. पुढे हिंदू जात व धर्म शुद्ध राहावा या भ्रामक कल्पनेने रोटीबंदी व बेटीबंदी हिंदूंनी आपण होऊन आपल्यावर लादून घेतली. सावरकर या सामाजिक भ्रमाचे वर्णन करताना म्हणतात, आपली जात नि धर्म शुद्ध रहावी ह्या भ्रामक कल्पनेने त्या काळचा हिंदुसमाज रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृति आचार आपण होऊन स्वधर्म म्हणून, ते आचार हिंदूंना हानिकारक असूनही, स्वकर्तव्य म्हणून पाळीत होता. त्याप्रमाणे आणि त्या कार्यासाठी म्हणजे आपली जात शुद्ध रहावी याच कारणासाठी ही शुद्धिबंदी आणि तीतूनच उदभवलेली सिंधुबंदी, हे दोन नवीन धर्मा-

चारही हिंदू समाज आपल्या स्वतःच्या इच्छेने धर्मकर्तव्य म्हणून कट्टरपणे पाळू लागला. जो हिंदू एकदा मुसलमानाकडून बळाने का होईना पण बाटविला गेला त्यास तर काय, परंतु त्याच्या वंशजांनाही परत हिंदू धर्मात घेणे नाही. त्या पापास शुद्धीचे प्रायश्चित्तच नाही.'

## हिंदू हितघातक धर्मभोळेपणा

'ज्या भयंकर चुकीमुळे अटकबंदी, सिंधुबंदीसारखी त्या त्या काळी लाभदायक असलेली बंधने स्मृतीमध्ये घातली जात त्या त्या काळी त्या बंधनांच्या नवीन प्रक्षिप्त श्लोकांवरही, ते श्लोक त्या स्मृतिकारांनी इतर श्लोक जसे त्या स्मृतीत सनातन धर्म म्हणून घातलेले होते त्यांचा सनातनत्वाचा अधिकार, ती पवित्रता आणि ती अनुल्लंघनीयता ह्या नवीन घालाव्या लागणाऱ्या धर्मबंधनांनाही, त्या प्रक्षिप्त श्लोकांनाही, प्राप्त व्हावी ह्या हेतूने ह्या नवीन बंदीवरील श्लोकांपुढेही एष धर्मः सनातनः ही ठाम, परंपरागत नि स्मृतिशास्त्राची अधिकृत मुद्राही हटकून मारली जाई—ग्रथिली जाई. त्यामुळे ती सिंधुबंदी किंवा अटकबंदी ज्या परिस्थितीत हिंदूंना हितावहच होती, ती राष्ट्रनाशक परिस्थिती बदलल्यानंतरही तीच अटक ओलांडून अफगाणिस्थान, इतरांवर पुन्हा स्वारी करण्याइतके हिंदूंचे सैनिक सामर्थ्य एखाद्या प्रौढप्रताप पेशव्यांच्या किंवा रणजितसिंगाच्या काळी वाढले असताही त्या पालटलेल्या परिस्थितीत हिंदुहितघातक ठरणारा हा बुळा धर्मभोळेपणा मात्र नष्ट होऊ शकला नाही. तो जसाच्या तसाच त्या धर्मवेडया समाजाला अटक ओलांडणे म्हणजे पाप करणे ही भीती सोडू देत नसे. म्हणजे प्रथम हितावह असलेली धार्मिक रूढी पुढे राष्ट्रास अनर्थावह झाली तरी समाज तिला तत्काल तोडण्यास सिद्ध होत नसे. जेव्हा ती रूढी तोडणे हेच राष्ट्रहिताचे म्हणजे धार्मिक दृष्टयाही पुण्यप्रद होते तेव्हासुद्धा ती रूढी तोडणे हे पापप्रद आहे, असा आंधळा धर्माभिमान हट्ट धरीत राही, तेव्हा हा जो 'एष धर्मः सनातनः' चा बाऊ तेवढा असले प्रक्षिप्त श्लोक लिहिताना आमचे अर्वाचीन स्मृतिकार दाखवीत, ती तेवढी भयंकर चूक झाली. (समग्र सा. खंड–४, पान ७५६).

## मुसलमानाचे संख्याबळ कायम

मराठ्यांनी मुसलमानांच्या हातची राजकीय सत्ता हिरावून घेतली तरीही मुसलमानांची सत्ता कायम होती. त्यांचे संख्याबळही

कायम होते. आणि त्या प्रजेचे व सत्तेचे संरक्षणही हिंदू राजेच करीत होते असे सांगून सावरकर म्हणतात, 'पुन्हा मुस्लिमांची ती लोकसंख्या त्यांच्या बहुपत्नीकत्वामुळे आणि प्रच्छन्न धर्मप्रसारामुळे सारखी वाढत होती आणि त्या प्रमाणात हिंदुस्थानची अधिक अधिक भूमीही त्यांच्या वसतीखाली जाऊन मुसलमानी धर्मसत्तेच्या हाती पडत चालली होती. ह्या वस्तुस्थितीची काही कल्पना येण्याआधी इतके सांगितले तरी पुरे आहे की, हिंदूंची, विशेषत: मराठ्यांची राजसत्ता वस्तुत: (डी फॅक्टो) प्रस्थापित झाल्याबरही प्रत्येक लहान मोठ्या गावांतून, मुसलमान वाडा किंवा मुसलमान मोहल्ला, म्हणून एक निराळा भाग वसलेला असे. प्रत्येक नगरातून तर सोडाच पण प्रत्यक्ष पुणे, सातारा, कोल्हापूर, नागपूर, बडोदे, देवास, धार, इंदूर, ग्वालियार, जोधपूर, उदयपुर आणि पुढे पुढे शिखांचे अमृतसर, लाहोर ते थेट श्रीनगरसारख्या हिंदूंच्या मोठमोठ्या स्वतंत्र राजधान्यांतूनही प्रत्येकी सहस्रावधी मुसलमानांनी व्यापलेले निरनिराळे विभागचे विभाग 'मुस्लीमपुरा' 'मुस्लिम आबादी' अशा नावांनी तुटकपणे वसलेले होते आणि त्या त्या विभागावर मुसलमानांची धर्मसत्ताच नव्हे तर भूस्वामित्वही (जमीनमालकीपण) प्रस्थापित झालेले होते.

(समग्र सावरकर खंड– ६, पान ७८१)

## वनवासींचे सात्मीकरण

या उलट पर्वतीय टोळ्यांना आत्मसात करण्यासाठी आसाममध्ये राजसत्तेचा कसा उपयोग केला हे पहाण्यासारखे आहे. सावरकरांनी यासंबंधीचे आसाममधील वनवासी टोळ्यांचे उदाहरण दिले आहे. सावरकरांनी म्हटले आहे, 'आश्चर्याची गोष्ट अशी की, हुणांप्रमाणे किंवा शकांप्रमाणे त्या पर्वतीय अनेक टोळ्यांतून हिंदूधर्माची तत्वे आणि आचार त्या वेळेस तरी तिकडे जिवंत असलेल्या हिंदूधर्माच्या मठपतींनी नि मठप्रचारकांनी (मिशननी आणि मिशनऱ्यांनी) इतके खोलवर रुजविले होते की, त्या पर्वतीय टोळ्यांनी इतर काही टोळ्यांप्रमाणे या लढावू शान टोळीच्या आसाम विजेत्या राजानेही आसामच्या राज्यावर येताच सन १५५४ मध्ये आपल्या टोळीतील अनेक लोकांसह हिंदू धर्माचा स्वीकार केला. हळूहळू ती सहस्रावधी लोकांची टोळीच्या टोळीच हिंदूधर्म स्वीकारती झाली. त्या राजाने

आपले पूर्वीचे शान भाषेतील नाव बदलून 'जयध्वजसिंग' हे क्षत्रियांतील नाव धारण केले, त्यापुढे आलेल्या सर्व अहोम राजांनीही अशी हिंदू नावेच धारण केली,

वरील अहोमसारख्या शूर जातींच्या जाती जेव्हा त्या हिंदूंच्या पडत्या काळातही हिंदू धर्माचा आपणहून स्वीकार करीत होत्या, तेव्हा त्यांना हिंदू जातिसंघात घेण्यास शुद्धीबंदीचा किंवा जातीभेदाचा काही एक विरोध होण्याचा त्याकाळी संभव नसे. कारण अशा अनेक हिंदूंच्या जाती हिंदुमहाराष्ट्रात आपापल्या शिबिरांतून पण हिंदू राष्ट्राच्या एकाच ध्वजाखाली नांदत, त्यातच अशा आणखी एका जातीच्या शिबिराची नवी भर पडे. त्यांचे काही व्यवहार, काही आचार त्याच जातीत त्यांच्यापुरते पाळीत, बाकी सर्व व्यवहार हिंदूस्मृतीप्रमाणे आणि निर्बंधाप्रमाणे सर्वांचे मिळून मिसळून चालत. शुद्धिबंदी, मुसलमानांच्या आततायीपणाने त्या वेळी प्रथम उत्तरेकडेच पंजाबपर्यंत काय ती अगदी कडक अशी होत चाललेली होती. इतरत्र साऱ्या हिंदुस्थानात मुसलमानांच्या वर्चस्वाचे संकट नव्हतेच. मुसलमान पुढे घुसलेलेच नव्हते. म्हणून शुद्धिबंदीचा प्रश्नही हिंदुसमाजापुढे तीव्रतेने आला नव्हता.

(समग्र सावरकर खंड–४, पान– ७५२)

## धार्मिक प्रत्याक्रमणाची बुद्धीच नाही

हिंदुसमाजाने मुसलमान व ख्रिश्चन यांच्या सशस्त्र धार्मिक आक्रमणांना प्रतिकार केला असला तरी हिंदूंमध्ये धार्मिक प्रत्याक्रमण करण्याची बुद्धीच नाही. याबद्दल सावरकरांनी आपली खंत व्यक्त केली आहे. सावरकर म्हणतात, ज्या धर्मीयांकडून सीरियांतील मूठभर ख्रिश्चन लोकांचा छळ होऊ लागला तेव्हा पळून हिंदुस्थानात मलबारकडे झामोरीन राजाकडे आश्रयासाठी आले. या परकीय लोकांना विनाअट पाऊल टाकू द्यावयाचे नव्हते. पण सद्‌गुण विकृतीच्या व्याधीने ग्रस्त झालेल्या त्या हिंदु राजाने त्या सीरियन ख्रिश्चनांना आश्रय दिला. त्यांना भूभागही वस्ती करावयास दिला. त्या सीरियन ख्रिश्चन लोकांना असे आढळून आले की आपल्या समवेत हिंदूंना नुसते खाण्या–पिण्यास लावले तरीही हे हिंदू लोक बाटून ख्रिश्चन होऊ शकतात. त्या पद्धतीने सीरियन ख्रिश्चनांनी धर्मप्रसाराची मुहूर्तमेढ रोवली. धर्मांतर सोपे करणाऱ्या रूढी इसवी सनाच्या पहिल्या शतकात आमच्याकडे बद्धमूल झाल्या होत्या.

दुसरी रूढी जे हिंदू असे बाटले त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार पडू लागला. ठराविक पद्धतीने गावेच्या गावे ख्रिश्चनांची गावे म्हणून ओळखली जाऊ लागली. पुढे तर अगदी उघडपणे शस्त्रबळाने हिंदूंना ख्रिस्ती करून घेऊ लागले. पंधराव्या शतकात गोमांतक जिंकल्यानंतर पोर्तुगीजांनी या सशस्त्र धार्मिक आक्रमणास सुरुवात केली.

म्हणजे उत्तरेत मुसलमानांचे आक्रमण व दक्षिणेत ख्रिश्चनांचा शस्त्रबळाने व धार्मिक रूढीमुळे होणारा ख्रिश्चन धर्माचा प्रचार अशा दुहेरी संकटात हिंदू धर्म सोळाव्या शतकापर्यंत सापडला होता. वास्तविक पाहता धार्मिक प्रत्याक्रमण हिंदूंच्या विद्यारण्य स्वामी, शिवाजी, चैतन्य, दुर्गादास, राठोड इत्यादींनी करावयास हवे. धार्मिक शुद्धीकरण आणि सशस्त्र प्रत्याक्रमण आदी उठाव हिंदुसमाजाने अधूनमधून करावयास हवा होता. सावरकरांनी म्हटले आहे, 'आधुनिक हिंदुसमाजाच्या मनाचा स्थायीभाव सहिष्णुता म्हणजेच प्राकृत भाषेत बोलायचे म्हणजे कोडगेपणा हाच स्वभावसिद्ध झालेला आहे.

## रूढींचे मानसिक बंधन

हिंदूंनी केलेली सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणे हिंदु-मुस्लिम महायुद्धाच्या कालावधीच्या मानाने तुरळक होती. परंतु तो काही नियम नव्हता, अपवाद होता. धार्मिक सूडबुद्धी नव्हती. जी काही प्रत्याक्रमणे झाली त्यामुळे हिंदूंचा पक्ष उद्ध्वस्त झाला नाही, सावरला गेला. सर्व हिंदू धार्मिक आक्रमण करण्यास का धजले नाहीत ? प्रत्याक्रमण करणे हे हिंदू धर्माच्याच विरुद्ध आहे, असे त्यांना का वाटले ? शुद्धिबंदी, सिंधुबंदी, रोटीबंदी आदी बेड्याच हिंदुधर्माचे इष्ट आचार आहेत असे हिंदूंना का वाटले ? सावरकरांचा निष्कर्ष असा आहे की धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणाची शक्ती हिंदूंत होती, पण इच्छाच नव्हती. (समग्र सावरकर खंड-४ पान- ७६४-७६५

सारांश, धर्मांतर सोपे करणाऱ्या रूढी हिंदु समाजाचे संख्याबळ कमी करण्यास कशा कारणीभूत झाल्या आहेत हे इतिहासातील दाखले देऊन सावरकरांनी सिद्ध केले आहे हे वरील निवेदनावरून दिसून येईल. शुद्धीचा दरवाजा उघडा नसल्याने हिंदूसमाजाचे संख्याबळ कसे घटले हेही सावरकरांनी सांगितले आहे. हरिजनांच्या धर्मांतराविषयीची सावरकरांची मते मागच्या प्रकरणात दिलीच आहेत. आता शुद्धीकरण व संघटन या चळवळी सावरकरांनी स्वतः रत्नागिरीस कशा केल्या हे पाहावयाचे आहे. ◘

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२११७५
क्र. क्र. २३११९
निबंध २८।११७
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ८ : कर्ते सुधारक

लोकमान्य टिळकांच्या काळात आधी राजकीय की आधी सामाजिक हा वाद निर्माण झाला होता. पण सावरकरांबरोबरचे तरुण क्रांतिकारक हे राजकीय दृष्टचा जसे क्रांतिवादी तसेच सामाजिक दृष्टयाही क्रांतिकारक विचाराचे होते. आधी सामाजिक की आधी राजकीय असा संदेह सावरकरांच्या मनात कधी निर्माण झालाच नाही रत्नागिरीला कारागृहातून सुटून आल्यानंतर सावरकरांनी अस्पृश्यतानिवारण, शुद्धी व संघटन या कार्यास लगोलग सुरुवात केली होती. टिळकांच्या काळातील या वादाविषयी सावरकरांना एकदा कार्यकर्त्यांनी विचारले असता सावरकर म्हणाले, ‘ राजकीय सुधारणा व सामाजिक सुधारणा ही दोन राष्ट्राच्या गाडयाची चाके आहेत. यांतील कोणतीही सुधारणा मागे ठेवणे योग्य नाही. या दोन चाकांवर भारत देश पुढे न्यावयाचा आहे. कोणते अगोदर व कोणते मागाहून असे म्हणणे गैर आहे. कोणतेही चाक मागे राहून चालणार नाही. आज पुष्कळ सामाजिक भेद स्वातंत्र्य मिळविण्याच्या आड येत आहेत तर राजकीय स्वातंत्र्यावाचून सामाजिक सुधारणा पुढे रेटता येणार नाहीत. जे ज्याला साधेल ते त्याने करावे. एकमेकाच्या आड येऊ नये. दोन्ही कार्ये देशाच्या स्वातंत्र्याला पूरक आहेत.’ (स्वा. सावरकरांच्या सहवासात–पान ३६–३७, आ. ग. साळवी)

सावरकर हे क्रियावादी होते. नुसता तात्त्विक काथ्याकूट त्यांना मुळीच आवडत नसे. एकदा वसंत व्याख्यानमालेच्या ऐवजी आता वसंत क्रियामाला व्हावयास पाहिजेत असे ते म्हणाले होते. १९२५ मधे गणशोत्सवात रत्नागिरी येथ ‘पुढचा मार्ग’ या विषयावर बोलताना सावरकर म्हणाले, ‘ मी ज्या गोष्टी सांगणार आहे त्या साध्या असल्यामुळे रूक्ष वाटतील, पण लक्षात ठेवा की यापुढे सभा, मिरवणुकी, परिषदा यांसारख्या उत्साहवर्धक पण उथळ चळवळी बाजूला ठेवून भरीव कार्य होणाऱ्या रूक्ष चळवळीच नेटाने

१३८।१३९

हाती घेतल्या पाहिजेत. लाला लजपतराय यांनाही मी असेच कळविले आहे.' यानंतर सावरकरांनी शुद्धी, अस्पृश्योद्धार, आखाडे आणि स्वदेशी या चार गोष्टी कशा कराव्या हे सांगितले. (हिंदुसमाजरक्षक सावरकर– पान १०५). याविषयी सावरकरांनी एकदा (१९३६) लिहिले होते, 'खरे काम म्हणजे काय काम करावे हे नुसते सांगत बसणे नसून ते काम करून दाखविणे, निदान ते काम करू लागणे हे होय. पण ते दुर्घट. यास्तव काम दाखविण्यापेक्षा हे केले पाहिजे, ते केले पाहिजे यांच्या सोप्या चर्चेतच माणसे आपला वेळ घालवितात. अशी टिपणे करण्यातच आपण जे करावयाचे ते देशकार्य करीत आहो अशा खोट्या समाधानाने आम्ही बहुतेकजण स्वतःची फसवणूक करून घेत आहो. जर हे आपले राष्ट्र उद्धारावयाचे असेल तर यंव केले पाहिजे, त्यंव केले पाहिजे असे आम्ही तुम्हांस सांगावे, तुम्ही आम्हांस सांगावे यात सारा काळ नि शक्ती सध्या खर्चिली जात आहे. वृत्तपत्रे, मासिके, परिषदा, उत्सव ह्यांच्यातील सारे लिखाण नि चर्चा पाहा. योजना, मनोरथ, परोपदेशेपांडित्यम यांनी भरलेल्या. काय केले पाहिजे यांची टिपणवार टिपणे लाखावारी. पुन्हा पुन्हा तेच दळलेले दळताहेत. हे अमुक केले असे सांगणारा लेख, केलेल्या कामाचे प्रतिवृत्त अगदी विरळा.

अमुक केले पाहिजे हे जे रानड्यांच्या पिढीने सांगितले, तेच टिळकांच्या, तेच आमच्या पिढ्या सांगत आहेत. योजना लाखो लोकांच्या आता तोंडपाठ झाल्या आहेत.

पण अमुक केले, त्या योजनांपैकी अमुक काम झाले, हे सांगणारा लाखांत एक आढळणेही दुर्घट. काम करण्याचे साहस नि नेट नि उरक हीच आजची मुख्य उणीव. शेकडो कामे ज्याची त्याने आपल्यापुरती केली तरी होणारी आहेत, पण जो तो दुसऱ्याने कार्य करावे हेच सांगण्यात आपले काम संपलेले मानतो.

तोच दोष अस्पृश्यतानिवारणाच्या कामीही आढळून येतो. अस्पृश्यतानिवारण करावे या मताचे हजारो लोकही त्या प्रश्नाचा शास्त्रार्थ, मथितार्थ, अर्थ ह्याचाच काथ्याकूट करीत बसले आहेत. तेही अवश्यच आहे, पण मुख्य काम म्हणजे ज्याने निदान आपल्यापुरती तरी अस्पृश्यता प्रकटपणे झिडकारून आपल्या घरीदारी सर्व व्यवहारात अस्पृश्यांना स्पृश्यांप्रमाणे वागविणे हेच असता त्या तत्त्वांच्या व्यवहाराचा प्रश्न आला की स्वतःच मागे घेतो' (जात्यु-

च्छेदक निबंध–पान २५८–२५९). सावरकरांसारख्या क्रियाशील पंडिताला प्रत्यक्षकृती महत्त्वाची वाटे, मग ती लहानशी का असेना. त्यांनी रत्नागिरीस आल्यावर म्हणूनच अकस्मात मंद करणं श्रेयः हे आपले ब्रीद ठेवले व शाळेतल्या मुलापासून ते म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना समाजकार्याला जुंपले. सामाजिक कार्यकर्ते कसे निर्माण करावे, कार्याभोवती संघटना कशी उभारावी याचा वस्तुपाठ सावरकरांनी या काळात दिला. बंधने होती, साधने तुटपुंजी होती, हातात पैसा तर नव्हताच, पण केवळ जनकल्याणाची तळमळ, त्यासाठी कष्ट करण्याची सिद्धता, ठोस कार्यक्रम, ठाम निर्धार, अमोघ वाणी, तीक्ष्ण बुद्धी यांच्या आधारे सावरकरांनी एकट्याने रत्नागिरी जिल्ह्यात मूलगामी समाजपरिवर्तन घडवून आणले. त्याचे पडसाद महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या देशात उमटले. नुसती जागृती करून सावरकरांचे समाधान होत नव्हते. ते म्हणत, जागृतीनंतर प्रत्यक्ष क्रियेस प्रारंभ झाला पाहिजे. पुढे पाऊल टाकले पाहिजे.

## हिंदुबंधुत्वाचे मुख्य सूत्र

समाजसुधारक म्हणून सावरकरांनी रत्नागिरीत जे कार्य केले त्याचा प्रारंभ अंदमानातच कसा केला होता ते मागच्या प्रकरणात आपण पाहिले. सावरकर जेव्हा रत्नागिरीस आले त्या वेळी महाराच्या सावलीचा विटाळ खरोखरीच मानीत. महार शिवला तर सचैल म्हणजे कपड्यांसुद्धा स्नान करणारे हजारो लोक असत. कर्मठ ब्राह्मणांच्या घरी 'महार' हा शब्दसुद्धा उच्चारणे अशुभ समजून 'बाहेरचा' म्हणत. मग शाळांतून त्यांची मुले सरमिसळ बसविणे केव्हाही अशक्यच.

जिल्ह्यात तर अस्पृश्यता याहूनही कडक. चांभार, महार, भंगी यांची आपसातही तशीच कडक अस्पृश्यता. कोणी कोणास शिवणार नाही, जवळ घेणार नाही, घरी जाणार नाही. महार, चांभार, भंगी ही नावे स्पृश्य लोकांमध्ये शिवी म्हणून वापरली जात. महारही 'भंगी कुठला' म्हणून दुसऱ्या महारास शिवी देत.

अशा स्थितीत सन १९२५ च्या गणेशोत्सवात सावरकरांनी अस्पृश्यतेच्या घातुक रूढीस उच्चटण्यासाठी चळवळ आरंभिली. तिच्यापासून हिंदू राष्ट्राच्या संघटनेस केवढा अडथळा होत आहे, तो किती अन्याय्य नि अधर्म्यही आहे प्रभृति विषयांवर सावरकरांनी व्याख्यानांची, लेखांची, संवादांची झोड उडवून दिली. इतर काही मोठे

कार्य होत नाही, तर निदान हे तेवढे एक तरी राष्ट्रकार्य तुमच्यापुरते करून टाका, हे कार्य करणे सर्वस्वी तुमच्या, ज्याच्या त्याच्या हाती आहे इत्यादी प्रकारे बुद्धिवाद करून लोकमत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अनुकूल करून घेतले, पण ते केवळ तत्त्वापुरते, प्रत्यक्ष कार्य करण्यास, ते स्वतः आचरून दाखविण्यास मूठभर माणसेही पुढे येईनात. तरीही जी काही माणसे अस्पृश्यता स्वतः पाळणार नाही असे म्हणाली, त्यांस घेऊन सोप्यातील सोपी गोष्ट म्हणून सावरकर महारवाड्यात भजने करण्यास जाऊ लागले.

## स्पर्शबंदी तोडली

सावरकरांनी महारवाड्यात प्रथम भजने सुरू केली व त्यानंतर महार-चांभारांना गावात आणून संमिश्र कार्यक्रम सुरू केले. त्याविषयीचे आपले अनुभव सांगताना (१९३६ सालचा लेख) सावरकर म्हणतात, 'महारास गावात आणून भजनास मंडळीत बसविणे त्या काळी इतके कठीण होते की, ही पुढे आलेली स्वयंसेवक मंडळीही ते करू धजेनात. यास्तव स्पृश्यांनीच महारवाड्यात जाण्याचा कार्यक्रम आखला. पण प्रथम प्रथम महारवाड्यात वा चांभारवाड्यात आम्ही पांढरपेशी लोक गेलो की महार-चांभारच घराबाहेर येईनात. हाका मारल्या तर 'घरात नाय' म्हणून आतूनच कोणी तरी सांगावे, आम्ही स्वतः सतरंजी बरोबर नेऊन अंथरली नि बसलो तरी ते बैठकीवर बसेनात. त्यांनाही ते संकट वाटे. कधी सात जन्मी न घडलेली गोष्ट. कित्येक महारचांभारांना बामणवाण्यांनी त्यांच्या वाड्यात यावे याचा तितकाच तिटकारा वाटे, अधर्म घडलासे वाटे, की जितका भटाभिक्षुकादी स्पृश्यांना वाटत असे. बळेबळे भजन करून मंडळी घरी परतत तेव्हा घरोघर एकच गंमत उडे. कोणाची आजी कोणास घरातच घेईना, कपडे बदलण्याच्या अटीवर काय ते कुणी घरात जाऊ शके. भजनाला येणाऱ्या मंडळीत काहीजण ती गोष्ट आपद्धर्म म्हणून करीत, सद्धर्म म्हणून नव्हे, यास्तव ते घरी जाताना स्वतःच होऊन स्नान करीत, मग घरात शिवत. इतक्यावरच गोष्ट थांबली नाही. दहा-पाच वेळा महारवाड्यात रात्री भजनास आणि नंतर दसरा, संक्रांत प्रभृति प्रसंगी सोने वा तिळगूळ वाटण्यास अस्पृश्य वस्तीत जाऊन परत येऊन आम्ही मंडळी गावभर तशीच शिवाशिव पद्धतशीरपणे कालवितो हे पाहून त्यास संघटित विरोध होऊ लागला. महारवाड्यात जाऊन स्नान न करता घरात येणाऱ्या आम्हा मंडळीं-

वर त्या पापासाठी बहिष्कार टाकण्याच्या भयाने प्रायश्चित्त घेणे भाग पाडण्याची धमकी मिळाली. श्री. आप्पाराव पटवर्धन यांना त्यांच्या गावी बहिष्कारही पडला होता ते प्रसिद्धच आहे. पण या विरोधास न जुमानता हिंदुसभेची बरीच मंडळी वारंवार महार-चांभारवाड्यात जाऊन त्यांचे पाणवठे निरीक्षीत, औषधे टाकून निरोगी करीत, झाडझूड करीत, तुळशी- फुलझाडे लावीत, भजने करीत, साबण वाटून कपडे धुववीत आणि घरोघर परत जात. होता होता केवळ सवयींमुळे लोकांस ते मानवले, तेवढा विटाळ ढिलावला.

पण तिथेच जर चळवळ थांबती तर तिथेच ती खुरटून जाती. पुढची पायरी घेतल्यावाचून मागची माग पडत नाही. यासाठी महारवाड्यात जाऊन भजने करणे समाजाच्या सवयीचे होते न होते तोच महार-चांभारांना गावात आणून संमिश्र भजने करण्यास आरंभिले.

यातही प्रथम तीच अडचण, तीच खळबळ. भरवस्तीत स्पृश्य मंडळी चांभारमहारांस भजनात वा सभेत सरमिसळ घेण्यास इतका तिटकारा करीत, तितकाच ते महार-चांभारही तिथे बसण्याचा तिटकारा करीत, त्यांसही ते आवडेना. ज्यांस आवडे ते भीत. मोठ्या कष्टाने, पैसे देऊनदेखील दहा पाच मंडळींना गावात प्रकटपणे आमच्या संघटक स्पृश्य मंडळीसह एका बैठकीवर बसून भजन करण्यास वा एखाद्या सभेत एकाच टोळक्यात उभे राहण्यास मान्य करून आणावे. गावात चालताना सर्वांसमक्ष त्यांच्या खांद्यावर हात टाकावा. हातातली वस्तू उघड उघड द्यावी घ्यावी, कीं ज्यायोगे अस्पृश्यास शिवून घेण्याची नि नागरिकांना त्यांना शिवताना वारंवार बघण्याची सवय लागावी. हळूहळू लोकांची मने वळवून काही पालख्यांच्या मिरवणुकीत नि दिंड्यांत अस्पृश्यांस जागा मिळू लागली. काही हिंदुसंघटनाभिमानी दुकानदारांनी आपल्या दुकानांच्या पायऱ्यांवर उभे राहू दिले. काहींनी नंतर इतरांप्रमाणे त्यांच्या हातात स्वहस्ते सामान देण्याचा, दुरून न टाकण्याचा परिपाठ पाडला.'

## शाळांतील आंदोलन

अस्पृश्यतेच्या मुळावर घाव घालणारे दुसरे आंदोलन शाळेतील मुलांत सरमिसळ बसण्याची सवय लावणे. सर्व जिल्ह्यांत अस्पृश्य मुले वेगवेगळी बसत. कोठेतरी कोपऱ्यात त्यांनी बसावे, त्यांच्या पाट्या पेन्सिलींना मास्तरही शिवत नसत. या आंदोलनाचेही सावर-

(५)
१४८।१४३

करांनी वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'काही मास्तर त्या मुलांना मारावयाचे तरी छडी फेकून मारीत. दोन चार अपवाद सोडले तर कुठेही सरमिसळ मुले बसविण्याचे नावही काढण्याची सोय नव्हती. स्वत: रत्नागिरीत व मालवणला एकही शाळा सरमिसळ नसे. सरकारी एक अर्धी–कच्ची आज्ञा मुलांत भेदभाव न करण्याची १९२३ सनची होती, पण तिला स्कूल बोर्डानेही कुठल्या टाचणीला टोचून टाकली होती ती सापडणेही कठीण गेले. अशा स्थितीत हिंदुसभेने तो प्रश्न सन १९२५ त हाती घेतला. दापोली, खेड, चिपळूण, देवरूख, संगमेश्वर, खारेपाटण, देवगड, मालवण प्रभृति यच्चावत मोठमोठ्या नगरांतून दौऱ्यावर दौरे काढून, व्याख्यानांची झोड उठवून, लोकमत वळवून, अनेक शाळांतून मुले सरमिसळ बसविली. रत्नागिरी नगरीत तर प्रत्येक शाळेचे प्रकरण स्वतंत्र लढवावे लागले. या कामी वाणी–ब्राह्मण वर्गापेक्षाही मोठा त्रासदायक विरोध मराठा, कुळवाडी भंडारी प्रभृति अशिक्षित नि वृत्तपत्रीय वाचनाच्या अभावी ज्यांना हिंदू राष्ट्राच्या संघटित आकांक्षांची आच अशी लागलेलीच नव्हती, त्या वर्गाचाच जिल्हाभर गावोगावी झाला.

कोतवडे, फोंडा, कणकवली, शिपोशी, कांदळगाव, आडिवरे प्रभृति साठ सत्तर गावी संप, विरोध, मारामाऱ्या, प्रसंगी जाळपोळ यांची नुसती धुमश्चक्री उडाली. स्कूल बोर्ड डगमगले. जिल्हा–बोर्डाने तर १९२९ त सरमिसळ बसविणे अवश्य नसावे म्हणून विरुद्ध ठराव केला. पण हिंदुसभेने चिकाटी सोडली नाही इकडे लोकमत वळवीत, तिकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांकड नि विधिमंडळापर्यंत सारखी चळवळ चालवली. त्यातही ज्यांच्या मुलांसाठी ही धडपड ते अस्पृश्यच मुले धाडण्यास सिद्ध नसत. भीतीने काही, पण पुष्कळसे भीती नव्हती तिथेही मुले शाळत धाडीनात, कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्वच कळना. आईबापांस तीनतीन रुपये पगार देऊन, पाट्यापेन्सिली फुकट देऊन, कपडे देऊन, महार, चांभार, भंगी मुले शाळांतून बळबळ बसवावी लागत. पावसाळ्यात त्यांनी म्हणावे, 'छत्र्या द्या शाळेत मुले धाडतो.' त्याप्रमाणे सभने छत्र्या द्याव्या, त्या हातात पडल्या की, लगेच त्या अस्पृश्य मुलांनी गुंगारा द्यावा.

पण हळूहळू त्यांतही शिक्षणाची बरीचशी आवड उत्पन्न झाली. मालवण, रत्नागिरी प्रभृति ठिकाणी त्याच्या मोठमोठ्या परिषदा सभा भरविल्या. हजारो रुपयांचा व्यय नि सात वर्षे सारखी चळ-

वळ करता करता शेवटी रत्नागिरी नगरातील नव्हे, तर जिल्हाभर बहुतेक शाळा सरमिसळ बसू लागल्या. सरकारी आज्ञाही निःशंक भाषेत 'सरमिसळ बसवा' म्हणून कडकपणाच्या निघाल्या. स्कूल–बोर्डेही धीटपणे त्या वर्तवू लागले. हिंदुसभेने प्रत्येक गाव टिप्पून टिप्पून वरचेवर पाहण्या केल्या. चोरून मारून–अनेक शाळांतून मुले निराळीच बसत, पण प्रतिवृत्त तेवढे वर खोटेच धाडीत की सर-मिसळ मुले बसतात. ते सर्व प्रकार उघडकीस आणून आणून काही मास्तरांना दंड करविले, दोन–चार शाळा बंद झाल्या. अशा अनेक उपायांनी शेवटी शाळांतून आज अस्पृश्यता उखडली गेली आहे.

मुले जिल्हाभर सरमिसळ आहेत. पुढील पिढींची अस्पृश्यतेची भावना लहानपणाच्या सवयीनेच नष्ट झाल्यामुळे शाळांतून मुले सर-मिसळ बसविण्यात अस्पृश्यतेच्या मुळावरच कुऱ्हाड पडली आहे. शाळातून मुले सरमिसळ बसविल्याने एका बाजूस अस्पृश्याचे शिक्षण नि राहणी सुधारून ती उन्नत होतात नि दुसऱ्या बाजूस अस्पृश्यातील अनेक विद्यार्थी आपल्या बरोबरीने व प्रसंगी अधिक बुद्धिमान नि चलाख असू शकतात, या अनुभवाने स्पृश्यांचा खोटा अहंकार नाहीसा होतो. लहानपणच्या समतेच्या सोबतीने शिवाशिवीची नि विटाळाची जाणीव उखडली जाते. यासाठी अस्पृश्यता-निवारणाच्या सर्व साध-नात शाळातून मुले सरमिसळ बसविण्याचे साधन हे फार परिणाम-कारक आहे.

जिल्हा दंडाधिकाऱ्याने शाळांतील बदललेली परिस्थिती स्वतः पाहून पुढील शेरा लिहून ठेवला. 'अस्पृश्य मुलांना इतरांबरोबर सर-मिसळ बसू देण्यात येत आहे आणि त्याबाबत कोणताही दुष्ट भेदभाव न होता त्यांना शिक्षण देण्यात येत आहे. हा श्री. सावरकर यांच्या व्याख्यानांनी घडवून आणलेला सुपरिणाम असावा.'

## संमिश्र उत्सव व हळदीकुंकू

६० वर्षांपूर्वीच्या काळात सार्वजनिक गणेश व हनुमंत उत्सवांत हरिजनांना प्रवेश नसे. सावरकर रत्नागिरीस पोहोचल्यावर महिन्या-भरात हनुमान उत्सव आला. सावरकर शिरगाव येथे होते. सावर-करांना उत्सवाचे निमंत्रण गेले पण त्यांनी अट घातली महार-चांभा-रांना बोलवाल तर येईन. दिंडी काढली ती सरमिसळ. त्या उत्सवा-तेसाठी प्रथम 'तुम्ही आम्ही सकल हिंदु बंधू' हे गीत लिहिले. पुढे हिंदूचे एकतागीत म्हणून ओळखले जाऊ लागले.

नाही. सावरकरांचा योजनांपेक्षा, शब्दापेक्षा नेहमीच प्रत्यक्ष कार्यावर भर असे. त्यांचे म्हणणे असे की, नुसत्या योजनांचा आणि शब्दांचा आम्हांस अगदी तिटकारा आला आहे. त्याच त्या योजना नि तेच ते शास्त्रार्थ चघळत बसण्यात तीन पिढ्या गेल्या. रोटीबंदी का तोडावी नि कशी तोडावी या विषयाची नुसती शाब्दिक चर्चा करणाऱ्या पाचशे लेखांपेक्षा, पूर्वास्पृश्यांसुद्धा सरमिसळ पंगतीत जेवून प्रत्यक्ष नि प्रगटपणे तोडून टाकणारे पाच जणांचे एक सहभोजन अधिक महत्त्वाचे आहे.

सावरकरांनी श्री. अनंतराव गद्रे यांच्या झुणकाभाकर सत्यनारायण व सहभोजन संघ यांची भलावण केली व झुणकाभाकर सहभोजन संघ ही एक प्रवृत्ती आहे असे सांगितले. अनंतराव गद्रे ही समाजक्रांतीच्या रत्नागिरीत पेटलेल्या होमकुंडातून उडालेली पहिली ठिणगी आहे व त्यांनी सहभोजनामागे असलेल्या तत्त्वाचा महाराष्ट्रात सर्वत्र प्रसार केला आहे असा त्यांचा गौरव एक लेखात केला आहे.

(जात्युच्छेदक निबंध पान–२७८)

१३ सप्टेंबर १९३० या दिवशी रत्नागिरीस पहिले सहभोजन झाले अशी आठवण त्यावेळी सावरकरांबरोबर असणारे श्री. मो. वि. दामले यांनी आपल्या 'सावरकर–स्मृति' पुस्तकात (पान ३०) सांगितली आहे. या समारंभामुळे महाराष्ट्रभर खूप खळबळ उडाली. कोणाच्या घरी जागा मिळेना, सहभोजनाचे अन्न शिजविण्यासाठी स्वयंपाकी मिळेना, शेवटी झापाच्या नाटकगृहात सहभोजन उरकण्यात आले. इतकेच काय सहभोजनात राहिलेले अन्न भिकारीसुद्धा सुरुवातीस घेत नसत.

पतितपावन मंदिरात हिंदु गणेशोत्सव झाला त्यावेळी (२१ सप्टेंबर १९३१) स्त्रियांचे पहिले सहभोजन झाले. त्यासाठी वर्ष–दीडवर्षे प्रयत्न करावे लागले. तेव्हा कोठे २०-२५ पूर्वास्पृश्य स्त्रिया आणि ३०-३५ सुविद्य स्त्रियांचे सहभोजन शक्य झाले.

तसेच सावरकरांनी शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी सहभोजने घडवून आणावीत असे प्रयत्न केले. डिसेंबर १९३५ नंतर एका वर्षात महाराष्ट्रात व भारतात झालेल्या सहभोजनांची यादी 'सावरकरांनी १९३६ मध्ये प्रसृत केली होती. त्यात राजस्थान, मध्यप्रदेश, सिंध आणि महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या सहभोजनांची माहिती

दिलेली आहे. रोटीबंदी तोडणारी जात्युच्छेदक सहभोजनांची मोठी चळवळ सावरकरांनी या काळात केली. आज सहभोजनात समाजसुधारणेचा एक कार्यक्रम होऊ शकतो यावर विश्वास बसणार नाही, पण ५५ वर्षांपूर्वी निराळ्या जातींच्या माणसांबरोबर एका पंक्तीत बसून जेवणे हेही 'क्रांतिकारक' समजले जाई.

## मंदिरप्रवेश

सावरकरांनी १९२६ पासून हरिजनांना देवळात प्रवेश करू देण्याचा प्रश्न हाती घेतला. प्रथम गणपत्युत्सवासाठी एक पूर्वास्पृश्यांचा मेळा काढला. त्यात महार–चांभार–भंग्यांची मुले होती. प्रथम अंगणात उभे राहून ते भजने म्हणत. दोन वर्षांनी हा मेळा अंगणातून पायरीपर्यंत पोचला. १९२९ मध्ये हा अखिल हिंदू मेळा झाला व मंदिराच्या सभामंडपात त्यांचे कार्यक्रम होऊ लागले.

१९२९ च्या नोव्हेंबरमध्ये विठोबाच्या देवळात हरिजनांना प्रवेश देण्यासंबंधी विचार करण्यासाठी सभा भरली होती. या सभेचे उत्तम वर्णन डॉ. धनंजय कीर यांनी सावरकर चरित्रात केले आहे. त्यात म्हटले आहे, 'सभा शांततेने पार पडावी म्हणून खास आदेशानुसार जिल्हा दंडाधिकारी बंदोबस्त ठेवण्यासाठी सभास्थानावर जातीने हजर राहिला होता. ही अत्यंत महत्त्वपूर्ण सभा सुरू झाली. सावरकरांनी आपली बाजू इतक्या बिनतोड युक्तिवादाने पटवून दिली की, विरोधकांच्या मनात वावरणाऱ्या सर्व शंका–कुशंका आणि कचरट्या कल्पना पार वितळून गेल्या.

सावरकरांच्या आवेश नि सामर्थ्यशील भाषणाने स्वतः दंडाधिकारीही इतका प्रभावित झाला की आपण कोणत्या भूमिकेत सभेला उपस्थित राहिलो आहोत हे साफ विसरून तो उभा राहिला आणि उद्गारला, 'आता याहून कसली व कोणाची खात्री पटवून द्यावयाची शिल्लक उरली आहे ?' कोणीही पुढे आला नाही. सावरकरांचा तो अजोड विजय होता. मावळता विरोध नि कानठळ्या बसविणारा जयजयकार या वातावरणात एकेक पाऊल पुढे टाकीत, कृतज्ञ भावाने 'एक देव, एक देश, एक आशा, एक जाती, एक जीव, एक भाषा' याचे यशोगीत सुरेल स्वरात गात गात अस्पृश्यांनी विठोबाच्या मंदिरात प्रवेश केला. देवळात भरलेल्या त्या भरगच्च सभेने भावनापूर्ण अंतःकरणाने नि भक्तिपूर्ण दृष्टीने हिंदुस्थानच्या इतिहासात अशा तऱ्हेचे प्रथमच घडून आलेले ते ऐतिहासिक महत्त्वाचे दृश्य

१४१।८४१

पाहिले. युगानुयुगे दुःख सोशीत आलेले ते जीव, गीत गात गात पुढे चाललेल्या आपल्या मुलांच्या मागोमाग जेव्हा मंदिराची एकएक पायरी चढू लागले तेव्हा त्यांचे हृदय भरून आले होते आणि डोळ्यांत तेज चमकू लागले होते. या प्रसंगानिमित्त सावरकरांनी खास गीत लिहिले होते. त्यात अखेरीस म्हटले होते.

हे सुतक युगांचे फिटले ॥ हो ॥
विधिलिखित विटाळही फिटले ॥ हो ॥
जन्माचे भांडण मिटलें ॥ हो ॥
शत्रूंचे जाळे तुटले ॥ हो ॥
आम्ही शतकांचे दास । आज सहकारी ॥
आभार जाहले भारी ॥

(स्वातंत्र्यवीर सावरकर–डॉ. कीर (पान १९५–१९६)

असे सावरकरांनी ५ वर्षांत घडवून आणलेल्या सामाजिक स्थित्यंतराचे प्रात्यक्षिक पाहावयास मिळालें.

## पतितपावन मंदिर

याच काळात सर्व हिंदूंना ज्यात प्रवेश मिळेल असे एखादे देऊळ बांधण्याची कल्पना निघाली. अर्थात यासाठी पैसा हवा होता. रत्नागिरीतील दानशूर गृहस्थ श्रीमंत भागोजीशेट कीर यांना सावरकरांनी विचारले, कीरांची स्वहस्ते शिवपूजा बांधण्याची इच्छा होती. पण ते जातीने भंडारी असल्याने शिवलिंगाला सनातनी मंडळी शिवूच देत नसत. ते सावरकरांना कीरशेटजींनी सांगताच सावरकर त्यांना म्हणाले, 'आपणांला शिवपूजा बांधू न देण्यात सनातनी लोकांनी अन्याय केला आहे यात शंका नाही, पण सनातन्यांच्या अन्यायामुळे आपण ज्या सात्त्विक आनंदाला मुकला होता त्याच आनंदाला आपले पूर्वास्पृश्य बांधव आज शेकडो वर्षे मुकले आहेत त्याचे काय ? आपण सवर्ण असल्याने देवळात जाऊन देवदर्शन तरी घेऊ शकता पण त्यालाही अस्पृश्यांना बंदी आहे. आपण धनाढ्य असल्याने एक शिवमंदिर बांधू शकता. पण त्या हीन-दीन अस्पृश्यांचे काय ? त्यांच्यासाठी त्यांना स्वहस्ते देवमूर्तीची पूजा करता येईल असे एखादे मंदिर बांधून दिले तर सनातन्यांवरील आपला राग मी सार्थ समजेन.' कीरशेटजी या युक्तिवादाने गहिवरले व सर्व हिंदूंना प्रवेश व पूजास्वातंत्र्य देणारे एक मंदिर बांधून देण्याचे मान्य केले व १० मार्च १९२९ ला या मंदिराचा कोनशिला समारंभ

श्रीमत शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते करण्यात आला. या मंदिरात श्रीविष्णु–लक्ष्मीच्या मूर्ती असाव्यात व तेथे कोणाही हिंदूला प्रवेश द्यावा व देवालयाचा पुजारीही कोणत्याही जातीचा असावा असे ठरविण्यात आले.

सावरकरांनी पतितपावन मंदिरासंबंधी केसरीत लेख लिहून (दि. २१ फेब्रुवारी १९३१) त्यात त्यामागची कल्पना स्पष्ट करून सांगितली. सावरकरांनी म्हटले होते. सध्या अगदी फारच थोड्या देवळांत पूर्वास्पृश्य बंधूंस येऊ दिले जाते. पण येथेदेखील अस्पृश्यता बाहेर ठेवून ते आत जाऊ शकत नाहीत. तर त्याचे जन्मजात अस्पृश्यतेचे लोढणे गळ्यात बांधूनच त्यांना कोपऱ्यात बसविले जात. तेथेही कोणाला त्याला शिवता येत नाही. पतितपावन मंदिरात पूर्वास्पृश्य इतर सवर्ण हिंदूंबरोबर भजनपूजन श्रवण आदी प्रसंगी सरमिसळपणे वावरतील व देवाच्या गाभाऱ्यात जाऊनही स्वहस्ते पूजा करू शकतील.' हे स्पष्ट करून सावरकरांनी लिहिले होते की या देवळात कोणालाही ग्रंथाचे वाचन करण्याचा व वेदोक्त व पुराणोक्त अशी पूजा करण्याचा अधिकार देण्यात येईल. 'हिंदूंमधील सर्व रूढी व भेदभाव यांचा उच्छेद करणारे हे अखिल हिंदुधर्म केन्द्र व्हावे अशी सावरकरांची इच्छा होती. २१ फेब्रुवारी १९३१ लाच या मंदिरात मूर्तीची स्थापना झाली. काशीहून, नाशिकहून शास्त्री आले होते. पण त्या वेळीही ब्राह्मणांनी श्री. भागोजीशेट कीर हे जातीने भंडारी असल्याने त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही असे सांगून अडविले, तेव्हा सावरकरांनी त्यांना निग्रहपूर्वक सांगितले, 'जो जो हिंदू त्याला त्याला वेदोक्ताचा समान अधिकार असलाच पाहिजे. मग तो महार असो किंवा महाराज असो.' पण सावरकरांनी आपला आग्रह सोडला नाही व शास्त्रींना सांगितले, 'मी याही परिस्थितीत समारंभ पार पाडीन– पण आमच्या नव्या हिंदू स्मृतीच्या आधारे. कोणी अडवू म्हणेल तर ते कदापि घडणार नाही. वेळच आली तर इथे मराठे. महार, चांभार, भंडारी, ब्राह्मण, भंगी अखिल हिंदू दाटलेला आहे, त्या शतावधी धर्मबंधूंसह, आम्हीही देवमूर्ती अनंत हस्ते उचलून ' जय देवा' असे गर्जून स्थापणार. हाच आमचा विधी, 'हिंदु धर्म की जय' चे हजारो कंठातून निघणारे जयघोष हाच आमचा वेदघोष नि 'भावेहि विद्यते देवो 'हाच आमचा शास्त्राधार'. सावरकरांचे हे निर्वाणीचे उद्‌गार होते. शेवटी मसूरकरांच्या आश्रमातील गणेशशास्त्री मोडक

यांनी श्री. भागोजीशेट यांच्या हस्ते वेदोक्त विधीने दि. २२ फेब्रुवारी १९३१ ला नियोजित वेळेस मूर्ति स्थापना केली.

ह्रा समारंभ म्हणजे सावरकरांच्या समाजसुधारणा कार्याची रत्ना' गिरीच्या जनतेने दिलेली पावती होती. महाराष्ट्रातून अनेक सामाजिक नेते या समारंभासाठी आले होते. दि. २३ फब्रुवारीस जात्युच्छेदक सहभोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. पण त्याला विरोध झाला. सावरकरांना विरोधाची सवय झाली होती. रूढीभंजन किती कठीण आहे हे त्यांना माहीत होते. शेवटी सर्व जातींच्या हिंदूंना एकत्र बसवून सहभोजन झाले. त्यात पुढारलेले, मागासलेले, सुशिक्षित, अशिक्षित सर्व प्रकारचे हिंदू होते. ६०० हिंदू जेवणास होते. रत्नागिरीतील प्रकट असे हे तिसरे व महाराष्ट्रातील पहिले सहभोजन होते.

## समाजक्रांतीचे रणशिंग

पतितपावनमंदिर हे हिंदुत्वाचे तीर्थक्षेत्र झाले. रत्नागिरी नवकाशी झाली. पतितपावन मंदिराच्या स्थापनेचे वर्णन रत्नागिरीच्या 'बलवंत' साप्ताहिकाने 'सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले' असे केले. 'सत्यशोधक' साप्ताहिकाने सावरकरांचे वर्णन 'संघटनाचार्य' असे केले. समाज आपण होऊन ज्या ध्येयास पोचायला पन्नास वर्षे लागतील ते पाच वर्षांत सावरकरांनी आपल्या अलोट साहसाने, प्रभावाने घडवून आणले. पतितपावन मंदिर लोकरूढ करण्यासाठी अनेक उपाय सावरकरांनी योजले. ते महारांचेच देऊळ न होता अखिल हिंदुमंदिर व्हावे अशी खटपट केली. तेथे प्रत्यही भजन होऊ लागले. आषाढी–कार्तिकी एकादशी आदी गावातील सर्व जातींचे लोक एकत्र हिंदुभजने होऊ लागली. जेथे बहिष्कारामुळे देवळात केवळ खांब उरतील असे भाकित करण्यात आले होते, तेथे अनेक भजनी संघ येऊ लागले.

## जात्युच्छेदक विविध उपक्रम

याखेरीज सावरकरांनी जात्युच्छेदक असे अनेक लहानमोठे पण वैशिष्टचपूर्ण उपक्रम केले. एका अखिल हिंदू गणेशोत्सवात भंगी गृहस्थाचे कीर्तन योजिले होते. श्रोत्यांत ब्राह्मणादी उच्च समजल्या गेलेल्या जातींचे लोक होते. कीर्तनाच्या वेळी भंगीबुवांच्या गळ्यात एका उच्च वर्णीयाने हार घातला. त्याच वेळी कीर्तनानंतर एका महार जातीतील मुलाने गीतेचा पंधरावा अध्याय शुद्ध उच्चारात व अस्खलितपणे म्हणून दाखविला. या दोन्ही घटनांनी सवर्ण हिंदूंमध्ये खळबळ उडाली होती. या भंगीबुवाचा व त्या मुलाचा गाभाऱ्यात प्रवेश

झाला. या प्रसंगाला महाराष्ट्रातील मराठी–इंग्रजी पत्रांनी प्रसिद्धी दिली व त्या भंगीबुवाची छायाचित्रेही देण्यात आली.

पूर्वास्पृश्य मुलांना शाळेत सरमिसळ बसू देण्याचे आंदोलन तर यशस्वी झालेच. 'तू जन्माचाच पतित आहेस' असे सांगणारा लहान मुलांचा जन्मापासून समाजाकडून होणारा छळ थांबला इतकेच नव्हे तर पूर्वास्पृश्य शिक्षक नेमण्यात येऊ लागले.

रत्नागिरीच्या वास्तव्यात सावरकरांना भेटण्यासाठी अनेक राजकीय, सामाजिक नेते, साहित्यिक येत असत. सेनापती बापट सावरकरांचे सहकारी. ते रत्नागिरीस गेले असता त्यांच्यासह सावरकरांनी महारवाड्यात जाऊन केरू महार यांच्या घरी भोजन व त्याच्या स्मरणार्थ एक सहभोजन आयोजिले. अशा तऱ्हेने जातपात तोडणारे अनेक उपक्रम सावरकर करीत असत.

## सामाजिक बहिष्काराचे शस्त्र

पण या रूढीभंजनाच्या कार्यात सामाजिक प्रतिकार होत होता. १९२९ च्या रत्नागिरी हिंदुसभेच्या प्रतिवृत्तात याची माहिती देण्यात आली आहे. त्या प्रतिवृत्तात म्हटले आहे. 'प्रत्येक जातीत इष्टमित्रातले कार्यउत्सव म्हटला की ह्या मंडळीची सहभोजनाची पंगत बसे. अर्थातच प्रत्येक जातीत खळबळ उडून राहिली असून आतून बहिष्कार पडू लागले. पण त्यास भटजी मंडळींनी प्रकट चळवळीचे रूप देण्यासाठी कंबर कसली. ब्राह्मणांपैकी जे सहभोजनी तिकडे भटांनी जाऊ नये व सहभोजन अब्राह्मणाकडे जाऊ नये. म्हणून भटजींच्या अंतस्थ सभेत कडक ठराव झाला. आणि संघटित बहिष्कारास तोंड द्यावे लाग. केव्हातरी रूढीचा असा विरोध व्हावयाचा हे सुधारक पक्ष जाणून होता. त्याचा त्यांना उद्वेगही वाटत नव्हता. बॅ. सावरकरांचे सूत्रच मुळी हे की सुधारकांना जसा सुधारणेचा अधिकार– तसाच समाजाला बहिष्काराचा अधिकार. भटांवाचून धर्मकृत्ये करावी हा मार्ग कित्येकांनी चोखाळला. दैवज्ञ वाणी, मराठ्यांपैकी काही प्रसिद्ध कुटुंबे आपल्या घरी वेदोक्त कृत्य करील तोच भट बोलावू असा नवाच सदाग्रह करून तसे न करणाऱ्या जुन्या भटजींना आपण होऊन निरोप देत कोकणभर रत्नागिरी बाटली ही एकच ओरड झाली. कारण घरोघर एकतर कोणी सहभोजक तरी होता किंवा सहभोजकासंग उघडपणे जवलेला तरी होता. या गडबडीत पुष्कळ कुटुंबांत गृहकलह झाले काहींच्या आप्तेष्टांनी एकमेकांकडे मुले माणसे धाड-

९, ८

(८)

१५२।१५३

णेही बंद केले. काही ठिकाणी लग्ने मोडली.' (रत्नागिरी हिंदुसभेचे प्रतिवृत्त (१९२९, ३०, ३२) खंड दुसरा पान ७६, ७७) पण सावरकर आणि त्यांचे अनुयायी पश्चात्ताप करीनात, मग प्रायश्चित्त तर दूरच राहिले. प्रायश्चित्त म्हणून महारांच्या हातचा चहा मागवण्याचा उपक्रम मात्र आठ दहा महिने चालू होता.

## अस्पृश्यतेच्या पुतळ्याचे दहन

फेब्रुवारी १९३३ साली कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे सावरकरांच्या निमंत्रणावरून रत्नागिरीस गेले होते. महाशिवरात्रीच्या दिवशी कर्मवीर शिंदे आणि राजभोज आदी मंडळींनी हरिजनवस्तीत स्वतः हिंडून पाहणी केली. तेव्हा सावरकरांनी केलेल्या कामाची त्यांना कल्पना आली. नुसती अस्पृश्यताच नव्हे तर जन्मजात जातिभेदाच्या निर्मूलनाचे कार्य सावरकरांनी चालविले होते. दुपारी अस्पृश्यतेच्या रूढीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. त्या वेळी सावरकर म्हणाले, 'आता ज्या जन्मजात जातिभेदाच्या मुळावरच सामाजिक क्रांतीची कुऱ्हाड तुम्ही तुमच्यापुरती घालीत आहात–निदान रत्नागिरीच्या हिंदूंत शेकडा ९० वर तरुण प्रत्यक्ष सहभोजनास भाग घेणारे आहेत. म्हणून तुम्हांस अस्पृश्यतेचा हा पुतळा जाळून त्या दुष्ट रूढीचा रत्नागिरीपुरता तरी मृत्यूदिन पाळण्याचा तुम्हांस पूर्ण अधिकार आहे.' दहनानंतर प्रचंड मिरवणूक निघाली. रत्नागिरीत समक्ष फिरत कर्मवीर शिंदे यांनी साववकरांचे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य त्या दिवशी पाहिले होते. या समारंभाचे समारोपाचे भाषण त्यांनी केले. त्या वेळी ते म्हणाले, 'रत्नागिरीतील सामाजिक मतपरिवर्तनाची मी बारीक रीतीने जी पाहणी केली तीवरून ती खरोखरच अपूर्व आहे.

'सामाजिक सुधारणेचे जे कार्य मी जन्मभर करीत आलो त्यावरून ते किती कठीण, किचकट. मीदेखील अधूनमधून निरुत्साही होतो. असे हे किचकट कार्य अवघ्या सात वर्षांत रत्नागिरी जिल्ह्यात अगदी रेल्वे, टेलिफोन केंद्र न पाहिलेल्या सोवळ्यांच्या बालेकिल्ल्यात तुम्ही हजारो लोक जन्मजात अस्पृश्यतेचे उच्चाटन करून थांबला नाही तर सहपूजन, सहभोजन असे सारे सामाजिक व्यवहार प्रकटपणे करीत असताना मी पाहत आहे. याचा मला इतका आनंद झाला आहे की हे दिवस पाहण्यास मी जगलो हे ठीक झाले असे मला वाटते. मी कुणाचा भाट होऊ इच्छित नाही, पण ज्या स्वातंत्र्यवीराने आपल्या

अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षांत ही अपूर्व सामाजिक क्रांती घडवून आणली त्या बॅ. सावरकरांचा किती गौरव करू असे मला झाले आहे. त्यांनी चालविलेली ही सामाजिक क्रांतीची चळवळ यशस्वी झालेली पाहून मी इतका प्रसन्न झालो आहे की देवाने माझे उरलेले आयुष्य त्यासच द्यावे. कारण माझे अपुरे राहिलेले हेतू पुरवील तर हा वीरच पुरवील असे मला वाटते. १९०८ पासून कर्मवीर शिंदे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करत होते हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे.

सावरकरांनी रत्नागिरीत केलेल्या सामाजिक क्रांतीला कर्मवीर शिंदे यांनी दिलेले प्रशस्तिपत्र अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. एक तर कर्मवीर शिंदे हे हिंदुत्ववादी नव्हते. त्यामुळे त्यांनी केलेल्या प्रशस्तीला महत्त्व आहे. कर्मवीर शिंदे यांना सामाजिक विचारवंत व कार्यकर्ते म्हणून महाराष्ट्रात स्थान आहे. त्यांनी केलेले सावरकरांचे मूल्यमापन अधिक वस्तुनिष्ठ, सामाजिक अनुभवांवर आधारलेले असल्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण सावरकरांच्या हिंदुत्ववादी विचारामुळे त्यांच्याशी त्याबाबत सहमत नसलेल्या लोकांनी त्यांची उपेक्षाच केली व सावरकरांच्या हिंदुत्ववादी अनुयायांनीही त्यांचा पुरोगामी विचार आत्मसात केला नाही. त्यामुळे सावरकरांची प्रतिमा एकांगीच राहिली– कडवा व आक्रमक मनोवृत्तीचा हिंदुनेता एवढीच त्यांची ओळख राहिली. पण हिंदुसमाजाला आधुनिक करू इच्छिणारा प्रयत्नवादी सामाजिक विचारवंत व समाजसुधारक म्हणून त्यांची प्रतिमा १९३७ नंतर भारतीय जनतेपुढे आलाच नाही.

## समाजसंघटकांचा आदर्श

म्हणून सावरकरांच्या १९२४–३७ या काळात रत्नागिरी जिल्ह्यात केलेल्या विचारप्रवर्तनाला, लोकजागृती, लोकसंपर्क, संघटन व आंदोलनाला भारताच्या इतिहासात मौलिक महत्त्व आहे. गांधीजींचे आफ्रिकेतील आंदोलन किंवा दांडी मार्च यांना जितके गांधी आंदोलनाचा नमुना (मॉडेल) म्हणून महत्त्व आहे. तेच सावरकरांच्या रत्नागिरीतील कार्यास दिले पाहिजे व त्या दृष्टिकोनातून त्याचा अभ्यास व संशोधन झाले पाहिजे. म्हणूनच सावरकरही कर्मवीर शिंदे यांनी केलेल्या मूल्यमापनास महत्त्व देत व शेवटपर्यंत त्यांची आठवण काढीत.

## साहित्याचे माध्यम

सावरकर हे प्रतिभासंपन्न सर्जनशील लेखक व कवी होते. त्यांच्या लेखणीला व वाणीला सरस्वतीचे वरदान होते. तारुण्यात राज्यक्रांती नि स्वातंत्र्य या ध्येयांनी भारावून जाऊन त्यांनी लेखन केले. ज्यांना राष्ट्राचे भवितव्य घडवावयाचे असते त्यांना स्फूर्तीसाठी इतिहासाकडे वळावे लागतेच. पण ज्याला समाजसुधारणा करावयाची असते त्यालाही समाजाचा इतिहास, त्याचे मानसशास्त्र यांचा अभ्यास करावा लागतो. सावरकरांनी असा सूक्ष्म अभ्यास केला. हिंदूंचे धर्मग्रंथ, मनुस्मृती इत्यादी त्यांनी वाचलेच.पण कुराण, बायबल व त्यांचा धार्मिक इतिहासही अभ्यासला. सावरकरांची बौद्धिक कक्षा केवळ हिंदुत्वापुरती नव्हती. दृष्टीही बुद्धिवादी व चिकित्सक होती. म्हणून सावरकरांचे वाङमय केवळ हिंदूंचा गौरव करणारे नाही, तें आत्मचिकित्सा करणारेही आहे. सावरकरांची मनुःस्मृतीवर रत्नागिरी, चिपळूण, मालवण आदी गावी जी व्याख्याने झाली ती सावरकरांच्या सत्यशोधक व शास्त्रीय दृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. दुर्दैवाने ती आता उपलब्ध नाहीत. अशा अनेक विषयांवरचे मौलिक विवेचन त्या काळात सावरकरांनी केले होते. व्रते आणि वैकल्ये या विषयांवर सावरकर बोलले होते. या सर्वांवरून केवळ एकांतिक वृत्तीने अभ्यास करण्याची वृत्ती नव्हती. अर्थात दीर्घ चिंतनानंतर, अभ्यासान्ती सावरकरांनी जे निष्कर्ष काढले होते, जे समाजापुढे त्यांना मांडावयाचे होते, तेच त्यांनी आपल्या सामाजिक निबंधांत, नाटकांत किंवा काव्यातही मांडले आहेत.

## प्रचारकी शैली

अर्थात सावरकरांची शैली प्रचारकी आहे. वाचकाच्या मनावर एखादा सिद्धांत ठसविण्यासाठी ते युक्तिवाद, उपहास, विनोद या सर्वांचा कल्पकतेने उपयोग करतात. शब्दांची आरास करतात. विषय घोळवून सांगतात. एखादेच वाक्य मधे मर्म उकलणारे असते. त्यामुळे तत्त्वज्ञानावरील प्रबंध वा विवेचन असे त्यांच्या लेखनाचे स्वरूप नाही. पहिली गोष्ट लक्षात ठेवावयास हवी, ते लोकप्रिय नियतकालिकांतून केलेले लेखन आहे. त्यात प्रतिभाविलास आहे. युक्तिवादही आहे, विरोधकावर कुरघोडी करण्याची आकांक्षा आहे. ही सर्व बंधने सावरकरसाहित्यावर पडतात. त्यामुळे सावरकरांच्या विचारांचा पूर्ण परिचय त्यावरून होत नाही.

५

## सर्जनशील साहित्य

या काळात 'उःशाप' नाटक किंवा 'गोमांतक' काव्य आदी सामाजिक दृष्टचा महत्त्वाचे ललित साहित्य सावरकरांनी लिहिले. त्यातही कथानकाच्या भोवती स्वतःचा विचारच गुंफला. उदा. गोमांतक काव्य ख्रिस्ती धर्मप्रसाराचे जुलुमी प्रयत्न सांगते. धर्मांतर व शुद्धी याविषयींची सावरकरांची भूमिका त्यातील पात्राद्वारे ते मांडतात. 'गोमांतक' काव्यात शुद्धीमागची तात्त्विक भूमिका सावरकरांनी मांडली आहे. धर्माचे प्रमुख लक्षण समाजाची धारणा करण हे सांगून जातीचा अभ्युदय तोच देशकालानुरूप समाजधर्म होय असे स्पष्ट निवेदन करतात व त्या काव्यातच दुसऱ्या एका ठिकाणी 'या जगात हिंदू, यहूदी आणि पारशी या तीनच जाती आहेत की ज्या चिरंतन बहिष्कार हाच धर्म समजतात आणि साहजिकच या तीन जातींच्या मांसाचे लचके तोडून इस्लामी पंथ वाढला आहे. कारण इस्लाम बलवान असताना जरी त्यांनी ख्रिश्चनांना बाटवून मुसलमान केले तरी पुन्हा ख्रिस्ती बलवान होताच त्यांनी त्यांच्या त्या पूर्वीच्या पतित बांधवांनाच नव्हे तर मदांध मुसलमानांनाही बळाने ख्रिश्चन बनविले. इस्लाम बळाने स्पेन व पोर्तुगाललाही इस्लामी धर्माची दीक्षा दिली होती. सावरकरांनी सामाजिक इतिहासाचा एक भाग गोमांतकमध्ये सांगितला आहे. त्यांचे 'उःशाप' तर अस्पृश्यतानिवारण व धर्मांतर या प्रश्नाची नाटचद्वारा मांडणी करण्यासाठीच सावरकरांनी लिहिले. त्यातही हिंदुत्वाची चर्चा आहे. महारांच्या धर्मांतराच्या प्रश्नाचा उल्लेख आहे. हिंदू राहूनही अस्पृश्यता घालवता येईल हे सावरकरांचे सूत्र होते. त्याचा पुनरुच्चार एका पात्राच्या तोंडून सावरकर करतात. किसन त्यात म्हणतो, 'दिल्लीच्या मयुरासनावर बसण्यासाठीही मी हिंदुत्वाचा त्याग करणार नाही. अस्पृश्यतेचा छळ सोशीन, हिंदूंच्या रूढीच्या हत्तीखाली चिरडून मरेन पण हिंदू म्हणून मरेन. मीही हिंदू महारच राहणार, हिंदू म्हणूनच जगणार, हिंदू म्हणूनच मरणार, सावरकरांच्या सर्व ललित वाङमयात हीच हेतुप्रधानता आहे. फक्त माध्यम म्हणून—काव्य, नाटच यांचा वापर केला आहे.

## सावरकरांची भाषणे

सावरकरांनी या तेरा वर्षांत सर्व रत्नागिरीत इतक्या विविध विषयांवर भाषणे केली ती जर एकत्र झाली असती तर तो एक सामाजिक ज्ञानकोशच झाला असता. इतिहासातील घटना रंगवून

सांगणे हा तर सावरकरांचा आवडीचा भाग होता. सावरकरांवर राजकारणात भाग न घेण्याचे बंधन' असल्याने त्याचे गुरू श्री. शि. म. परांजपे यांच्या उपहासगर्भ शैलीचा ते आश्रय घेत. सामाजिक विषय मांडताना युक्तिवाद, इतिहासातील चपखल उदाहरणे, बुद्धिवादी दृष्टीकोन, पण भावनेचा शिडकावा असलेली सावरकरांची भाषणे म्हणजे लोकशिक्षणाचा प्रयोग होता. 'भंडाऱ्यांचे पूर्वकालीन सागरसामर्थ्य नि संघटन' श्रीकृष्ण चरित्र, व्रते आणि वैकल्ये, 'ब्रह्म आणि माया यांचा भौतिक परिभाषेतील अर्थ' इत्यादी विविध विषयांवर सावरकरांनी भाषणे केली. तसेच रत्नागिरी येथे त्या वेळी परीक्षाकेंद्र होते. अस्पृश्यतानिवारण, स्वदेशी आदी विषय विद्यार्थ्यांना सावरकरांनी समजावून दिले.

व्यायामशाळा चालवून व्यायामाची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न केले. रत्नागिरीस व्यायामशाळेचे जेव्हा उद्‌घाटन झाले त्या वेळी व्यायामाचे अनेक प्रकार दाखविण्यात आले. लोकांना आश्चर्यचकित करून सोडणारी गोष्ट म्हणजे स्वतः सावरकर चड्डी घालून कुस्तीच्या आखाड्यात उतरले. मल्लखांबावर पहिली उडी त्यांनी मारली. पुढ ही व्यायामशाळा नगरपालिकेने ताब्यात घेतली व आज ती चालू आहे.

## स्वदेशीचा प्रचार

सावरकरांनी रत्नागिरीतील वास्तव्यात स्वदेशीचा प्रसार हा एक विधायक कार्यक्रम ठेवला होता. हा प्रचार करण्यापूर्वी स्वयंसेवकांना घरोघरी पाठवून लोक साबण, साखर, कापड, काचसामान आदींपैकी कोणत्या वस्तू स्वदेशी वापरतात व स्वदेशी मिळणाऱ्या इतर वस्तू लोक का वापरत नाही याची पाहणी सावरकरांनी करविली. स्वदेशी वस्तू लोकांनी वापराव्यात म्हणून स्वयंसेवकांच्या बरोबर सावरकर स्वतः स्वदेशी वस्तूची हातगाडी गावातून फिरवत असत. प्रसिद्ध गांधीवादी नेते श्री. आप्पा पटवर्धन त्यांच्याबरोबर असत तसेच अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यक्रमातही श्री. पटवर्धन सहभागी होत असत.

## पुरोगामी हिंदुत्वाचे विचारपीठ

सावरकरांनी रत्नागिरी जिल्ह्यात केलेल्या सामाजिक चळवळी, त्याचे तेथे व इतरत्रच्या हिंदुसमाजावर झालेले परिणाम, सावर-

करांनी केलेली लोकजागृती, लोकसंघटन, त्यांची कार्यपद्धती, त्यांच्या व्यक्तित्वाचा, विद्वत्तेचा अनुभव हा खरा सामाजिक संशोधनाचा विषय आहे. पण सावरकरांच्या या कार्याचा असा अभ्यास अद्यापि झालेला नाही. श्री. बाळाराव सावरकरांनी लिहिलेले सावरकर चरित्रातील 'रत्नागिरी पर्व' हा एक त्या काळातील सावरकरांच्या हालचालीचे चित्रण करणारा अत्यंत उपयुक्त असा संदर्भ ग्रंथ आहे.

सावरकर १९३७ नंतर हिंदुत्वाचे व अखंड भारताचे राजकारण करू लागले. १९३८ ते १९४८ चा कालखंड त्यादृष्टीने महत्त्वाचा होता. त्यामुळे हिंदुत्वाच्या सामाजिक चळवळीकडे दुर्लक्ष झाले. सावरकरांची पुरोगामी संकल्पना, त्यांचे बुद्धिवादी सामाजिक विचार यांचा प्रबोधनासाठी उपयोग करण्यात आला नाही. सावरकरांचा पुरोगामी, विज्ञानवादी हिंदुविचार हा अनुयायांनी उपेक्षिला व विरोधकांना त्यांच्या राजकीय हिंदुत्वाचे वावडे असल्यामुळे पुरोगामी सामाजिक हिंदुत्वाची संकल्पना राजकीय अस्पृश्यतेमुळे विचारातही घेतली नाही. स्वत: सावरकरांनी आपला सामाजिक विचार पद्धतशीरपणे ग्रंथबद्ध केला नाही. त्यामुळे सावरकरांचे सामाजिक कार्य आतापर्यंत झालेल्या सर्व समाजसुधारकांपेक्षा वेगळे व मूलगामी असूनही त्यांचे सामाजिक मूल्यमापन झालेच नाही. सावरकरांनी उपस्थित केलेले अनेक प्रश्न व त्यांनी त्याची दिलेली उतरे आजही मार्गदर्शक ठरतील अशी आहेत. सावरकर तत्त्वद्रष्टे व भविष्यद्रष्टे होते यात शंका नाही. पण या द्रष्टेपणाला पुढे जनसंपर्क माध्यमाची जोड नव्हती. त्यामुळे हिंदुत्वाचा एकांतिक व आक्रमक विचार करणारा नेता एवढीच त्यांची ओळख देशाला झाला. याच काळात मार्क्सवादी विचारसरणीचे विचारपीठ निर्माण झाले पण पुरोगामी हिंदुत्वाचे विचारपीठ निर्माण झाले नाही हीच खरी शोकांतिका आहे.

(या प्रकरणात स्वातंत्र्यवीर सावरकर–डॉ. धनंजय कीर, हिंदुसमाजसंरक्षक वीर सावरकर, रत्नागिरी पर्व (लेखक–बाळाराव सावरकर), स्वा. सावरकरांच्या सहवासात–भाग १ व २ (लेखक–आ. ग. साळवी), सावरकर स्मृती (लेखक मो. वि. दामले) या पुस्तकांचा संदर्भासाठी उपयोग केला आहे.)

१५८१५९

# १. पुरोगामी हिंदुत्वाचा चिरंतन बीजविचार

सावरकरांच्या सामाजिक विचारांचे भवितव्य काय ? सावरकर स्वत: एकदा म्हणाले होते, 'मी समुद्रात उडी टाकली हे लोक विसरले तरी चालेल पण माझे सामाजिक विचार त्यांनी विसरू नये. (लेखकाशी १९६३ मध्ये झालेली चर्चा). १९५५ मध्ये रत्नागिरी येथे पतितपावन मंदिराच्या रौप्यमहोत्सवात बोलताना सावरकरांनी सांगितले होते, 'राजकीय क्रांतीने स्वातंत्र्य हस्तगत करून घेता येते. तथापि ते जागृत व एकजिनसी समाज असल्याशिवाय चिरकाल टिकविणे अशक्यप्राय आहे हे जाणून लोकधुरीणांचे सतत लक्ष राहिले पाहिजे. कोणत्याही स्वरूपाच्या घातक बेड्या समाजपुरुषाच्या पायात पुन्हा अडकणार नाहीत याचीही काळजी घेतली पाहिजे.'

## भारताचे राष्ट्रीकरण

गेली ३५ वर्षे भारताच्या पुनर्रचनेचे प्रयत्न चालू आहेत. पण नेत्यांची भर फक्त राजकीय अंगावर आहे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी, एकजिनसी राष्ट्रीय समाज निर्माण व्हावयास पाहिजे. या बहुभाषी व बहुधर्मीय समाजातून एकजिनसी समाज निर्माण कसा करावयाचा हा आपल्यापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुत्वाची उपेक्षा करून किंवा त्याला विरोध करून आपल्याला एकजिनसी समाज कसा निर्माण करता येईल ? हिंदुत्वाविना या देशाचे राष्ट्रीयत्व सिद्ध करता येईल काय ? या देशातील धार्मिक अल्पसंख्याकांसाठी हिंदूंच्या अधिकाराचा, भावनांचा विचारही न करणे योग्य आहे काय ? म्हणून राष्ट्रीय समाजनिर्मितीसाठी हिंदुत्वाची संघटना व पुनर्घटना आवश्यक आहे. येथेच सावरकरांचा सामाजिक विचार आवश्यक ठरतो. सावरकर हे ऐहिक हिंदुत्वाचे दार्शनिक होते. 'जन्मना जायते हिंदु:' हेच सावरकरांना अभिप्रेत असलेल्या सामा-

जिक क्रांतीचे पहिले सूत्र आहे. हिंदू संघटनाचा तो महामंत्र आहे. भाषा, जात, प्रदेश यांना गौणत्व देऊन हिंदू म्हणून सर्वांना एका सूत्रात बांधणे ही महत्त्वाकांक्षा काही क्षुल्लक नाही. तीच एक सामाजिक क्रांती आहे. असा हिंदुत्वाचा अभिमान असलेला हिंदू निर्माण करणे हेच सावरकरांचे सामाजिक ध्येय होते. येथे समाज धारण करणारा तो धर्म सावरकरांना अभिप्रेत होता. सावरकरांना अध्यात्माचे आकर्षण नाही. सामाजिक धर्मबंधुत्वाचे आहे. सावरकर धर्माचा सामाजिक उपयोग करतात. धर्माचे सामाजिक बंधन भाषा, प्रदेश, जात यांच्या पलीकडे जाणारे आहे. म्हणून हे धर्मबंधुत्व सावरकरांच्या सामाजिक विचारांचे प्राणभूत तत्त्व आहे. ते कालातीत आहे, म्हणून ते कालमृत होणार नाही. सारांश धर्मबंधुत्व हे दुसरे सूत्र. तिसरे सूत्र पितृभू व पुण्यभू यांच्यावरील निष्ठा. यालाच सावरकर भारतभूमिका म्हणतात. ही भारतनिष्ठा वादातीत आहे. कालसापेक्ष नाही. चौथे सूत्र जात्युच्छेदक सामाजिक समता असलेली समाजरचना. या चार सूत्रांच्या आधारे सर्व हिंदुसमाज संघटित करता येईल. म्हणून सावरकरांचा सामाजिक विचार हिंदूंच्या संघटनेसाठी व पुनर्घटनेसाठी वापरणे हे राष्ट्र एकात्म करण्याच्या व एकजिनसी राष्ट्रनिर्मितीच्या कामी प्रेरक व उपयुक्त ठरणार आहे.

## विज्ञाननिष्ठेचे सूत्र

सावरकरांच्या सामाजिक पुनर्रचनेमध्ये हिंदूंनी ऐहिक समृद्धीसाठी भौतिक सामर्थ्य वाढविण्यासाठी धर्मग्रंथाचा आधार न घेता, शास्त्राधार न शोधत बसता निःशंकपणे विज्ञानवादी झाले पाहिजे हा धरलेला आग्रह हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सावरकरांचा विज्ञानवाद हिंदु राष्ट्रापुरता मर्यादित नसून मुसलमान, ख्रिस्ती आदी सर्वांनी सामाजिक रूढींचा, धर्मभोळेपणाचा उच्छेद करून विज्ञानवादी झाले पाहिजे, असे स्पष्टपणे त्यांनी म्हटले आहे. सावरकरांची वृत्ती मूलग्राही होती. धार्मिक दृष्टिकोन टाकून इहवादी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारल्याविना भारत आधुनिक होणार नाही हा सावरकरांचा अभिप्राय आहे. आज जगातील सर्व पुढारलेली राष्ट्रे स्वहितासाठी विज्ञान वापरीत आहेत. भारत अंटार्टिकावर स्वतःचा ध्वज रोवून संशोधन करतो आहे. याचा अर्थ भारताने राष्ट्र म्हणून विज्ञानसंशोधनात स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. पण वैज्ञानिक संशोधनाइतके समाजाने वैज्ञानिक व इहवादी दृष्टिकोन

१६०।१६१

स्वीकारणे महत्त्वाचे आहे. सर्व राष्ट्र मनाने आधुनिक झाले पाहिजे. यासाठी सावरकरांचा विज्ञानविचार उपयुक्त ठरणार आहे. सावरकरांचे विज्ञाननिष्ठ निबंधही हे राष्ट्रीय समाजाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. राष्ट्रीय दृष्टचा इहवाद व विज्ञानवाद स्वीकारून सामाजिक पुनर्रचनेचे प्रयत्न झाले पाहिजेत. ५० वर्षांपूर्वी सावरकरांनी हे विचार मांडले होते. ते मुख्यतः हिंदूंसाठी मांडले असले तरी त्याचे राष्ट्रीय मूल्य त्यामुळे कमी होत नाही. त्यांना संकुचित म्हणून प्रतिगामी ठरविता येणार नाही. पुरोगामी हिंदुसमाज भारताच्या नवनिर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे. हा पुरोगामी हिंदू समाज आधुनिक व विज्ञानवादी आणि सावरकरांच्या वर उल्लेखिलेल्या चार सूत्रांच्या आधारे पुनर्घटित झाला तर भारताचे राष्ट्रीय उत्थान लवकर व योग्य मार्गाने होईल.

## हिंदुत्वाचे संवर्धन

भारतात आज जे कोटयवधी अहिंदू आहेत त्यांना सामील केल्याविना आपल्या राज्यघटनेत कल्पिलेला एकजिनसी समाज निर्माण होणार नाही हेही राष्ट्रीय व सामाजिक सत्य आहे. लोकमान्य टिळकांनी उदारता व न्याय्यबुद्धी यांच्या आधारे हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडविला पाहिजे असे म्हटले होते. सावरकर तार्किक दृष्टया हिंदुत्ववर्धनासाठी शक, हूणांप्रमाणे सध्या असलेल्या धार्मिक अल्पसंख्याकांना हिंदुत्वात सामील करून घेतले पाहिजे हे मानतात, पण ते करण्याचा मार्ग सुचवीत नाहीत. ऐतिहासिक दृष्टया हिंदुत्वाने विविध वंशांना समाहित करून घेतलेले आहे व 'हिंदू' या दोन अक्षरांत अगस्तीच्या ओंजळीत जसा महासागर तसे तीस कोटी लोकांचे राष्ट्रचे राष्ट्र सामावले आहे असे सावरकरांनी म्हटले आहे. नेमका ह्याच संमीलित राष्ट्रनिर्मितीचा प्रश्न आज भारतापुढे आहे. पण हे साध्य आक्रमक किंवा संघर्षवादी दृष्टिकोन स्वीकारून साधता येईल का ? सावरकरांचे या विषयाचे सारे चिंतन व प्रतिपादन हिंदुहिताच्या दृष्टीने झालेले आहे. हिंदुत्ववर्धनापेक्षा हिंदुत्वरक्षणासाठी केलेले आहे. सावरकरांचा सामाजिक विचार भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविण्यास उपयुक्त ठरणार नाही. या ठिकाणी सावरकरांचे समकालीन ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांचा समाजशास्त्रीय, पण हिंदुत्ववादी विचार आजच्या देशाच्या परिस्थितीत उपयुक्त ठरणार आहे, म्हणून त्याची सारांश रूपाने येथे मांडणी केली आहे.

# डॉ. केतकरांचा हिंदुत्वविचार

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर आणि सावरकर: दोघेही हिंदुत्ववादी होते. ते समकालीन होते. सावरकर रत्नागिरी येथे असताना त्यांची भेटही झाली. डॉ. केतकरांचा हिंदुत्वविचार हा समाजशास्त्रीय सिद्धांतावर आधारलेला होता. सावरकरांना हिंदुत्वाची प्रचीती अंदमानमध्ये आली. त्यांच्या शुद्धिकार्याला प्रारंभ झाला हे आपण पाहिलेच आहे. केतकरांचे हिंदुत्वविषयक विचार मांडणारे ग्रंथ आणि हे ग्रंथ अनुक्रमे १९०९ व १९११ साली प्रसिद्ध झाले. या दोन विचारवंतांचा विचारविनिमय झाला होता पण परस्परांवर परिणाम झाला होता काय हा अनुमानाचा प्रश्न आहे; पण या दोघांचा हिंदुत्वविचार स्वतंत्र होता असेच म्हटले पाहिजे.

एकतर केतकरांच्या मते 'हिंदू' हा शब्द परकी. हा शब्द मुसलमानी स्वारीपूर्वीच्या संस्कृत ग्रंथांत वापरण्यात आलेला नाही. (प्रस्तावना खंड, ज्ञानकोश पान ६६). या उलट सावरकरांनी हिंदू या शब्दाची व्युत्पत्ती ऋग्वेदापर्यंत नेऊन भिडविली आहे. ऋग्वेदात आपल्या राष्ट्रास 'सप्तसिंधु' असे म्हणत असे सावरकरांनी 'हिंदुत्व' या त्यांच्या प्रबंधात म्हटले आहे.

केतकरांनी हिंदुसमाजघटनेचा इतिहास सांगताना म्हटले आहे की मूळच्या विविध वंशीय टोळ्यांमधून बहुसंख्य जाती जन्मास आल्या व परस्पर जवळ राहण्यामुळे जातिसंस्था असलेला हिंदुसमाज तयार झाला. परस्पर जवळिकीने जगास आत्मसदृश करण्याची हिंदुपद्धती वाखाणण्यासारखी आहे. हिंदुसंस्कृती जी उदयास आली ती अनेक घटकांच्या आचारविचारांच्या दीर्घकाळ चाललेल्या तडजोडीतून उदयास आली. 'हिंदु' नावाच्या समूहात जे लोक अंतर्भूत झालेले आहेत ते लोक निरनिराळ्या वंशांतील आहेत आणि त्यांच्या संस्कृतीही स्वभावतः निराळ्या आहेत. आर्य लोकांनंतर मंगोलियन लोक आले. ते बहुधा कमीअधिक रानटी लोकच होते. तेव्हा त्यांनी आपली स्वतंत्र संस्कृती न स्थापिता येथील आर्य संस्कृतीचाच प्रामुख्याने स्वीकार केला. पूर्वभारतात आर्य व मंगोलियन परंपरा एकमेकांत मिसळून गेल्या आहेत व दक्षिणेत आर्य व द्रविड संस्कृतीचे मिश्रण आहे. या सर्व वंशांची जी संस्कृती आहे ती आता हिंदू नावाने संबोधली जाते. बाहेरून आलेल्या जेते लोकांनी देशाची संस्कृती स्वीकारण्याची उदाहरणे आपल्या इतिहासात आहेत

ती शक व हूण यांची होत. हे लोक अगदी हिंदुसमाजात मिसळून गेले होते.

केतकरांनी अल्पसंख्य असलेल्या बाह्य समाजांचा प्रश्नही चर्चिला आहे. ते म्हणतात की मुसलमान व ख्रिस्ती हे संप्रदाय आहेत. त्यांचे परंपरागत आचार, चालीरीती तत्त्वतः भिन्न आहेत. केतकरांचे मत असे आहे की हिंदुस्थानात आपल्या प्रयत्नाने एक सर्वसामान्य संस्कृती आपण करू शकलो तर आपल्या देशात कोणताही लोकसमूह असू नये की ज्याला आपल्या उद्दिष्ट संस्कृतीच्या गोटात आणता येणार नाही. भारताचे राष्ट्रीकरण करावयाचे असेल तर या देशात जे निरनिराळे समाज, त्या सर्वांत सामान्य असे काय आहे किंवा सर्वांतच नाही असे काय आहे ते शोधून काढून त्याचा सामान्य संस्कृती निर्माण करण्यास उपयोग करावयाचा असतो.

पण केतकर हेही बजावतात की राष्ट्रीकरण किंवा एकसंस्कृतीकरण साम्यमूलक नसून दंडमूलक आहे. जो समाज अधिक बलवान त्याची अधिक अंगे टिकतात. म्हणजे नव्या संस्कृतीत पूर्वसंस्कृतीची जी अंगे शिल्लक राहतील ती या संग्राह्य वाढीमुळे टिकून राहतील.

हे राष्ट्रीकरण व्हावयाचे असेल तर एका समाजास संग्राहक व्हावे लागेल व दुसऱ्या समाजाने संग्राह्य झाले पाहिजे.

## हिंदुत्वाचे व्यापक स्वरूप

हिंदू लोकांची संस्कृती झाली याचे कारण हिंदुस्थानच्या बौद्धिक इतिहासात उदारमतवादाचे प्राबल्य वारंवार झालेले दिसून येते. उदारमतवाद हा संघसाधक आहे. उदारमतवाद आणि राष्ट्रधर्म यामध एक तादृश्य आहे ते हे की आजच्यापेक्षा निराळी स्थिती दोहोंसही हवी आहे. आपली संस्कृती व परंपरागत आचार आणि आपलेच कायदे गृहीत धरून त्यात फेरफार करीत जाणे आणि हिंदुत्वाचे क्षेत्र अधिकाधिक विस्तृत करीत जाणे व त्याबरोबर स्वत्वाबद्दलचा अभिमानपण दृढ ठेवणे हा राष्ट्रधर्म होय. हिंदू या नावाची व्याप्ती अधिक वाढवून त्यात अधिक लोक घेणे हा राष्ट्रधर्म होय.

आपणांस करावयाचे कार्य येणेप्रमाणे होईल :

१) सर्व जगाशी व्यवहारास जुळतील असे हिंदूंचे आचार बनविणे.

२) हिंदू संस्कृती म्हणजे आपल्या भाषा व आपले पैतृक वाङ्मय यांविषयी अभिमान उत्पन्न करणे.

३) हिंदू समाजाचे सदस्यत्व इतरांस उपलब्ध करून देणे एवढेच नव्हे तर ते सदस्यत्व हितावह होईल असा प्रयत्न करणे.

४) हिंदू समाजातील लोकांत एकरूपता आणण्याचा प्रयत्न करणे आणि त्यासाठी उच्चनीचपणाच्या सामाजिक कल्पनांस आळा घालणे.

५) समाजात कार्यकर्त्या संस्था निर्माण करून समाजाची शक्ती वाढविणे.

केतकरांनी हिंदुत्व ही पारमार्थिक कल्पना नाही हे स्पष्टपणे म्हटले आहे. हिंदुत्व हे उपासनामूलक नाही आणि विशिष्ट मतांचा संप्रदाय घेऊन झालेले नाही असेही केतकरांचे मत आहे. हिंदू समाजास एकत्र आणतील अशा कोणत्या गोष्टी आहेत याचाही विचार केला पाहिजे. हिंदुसमाजाचे स्वरूप बदलणार हे गेल्या १०० वर्षांत घडलेल्या बदलावरून स्पष्ट दिसून येते. हिंदू समाजव्यवस्थेतील सर्वांत मोठा दोष म्हणजे रूढीकरणाची कल्पना हा होय. हिंदू समाजात परस्परांपासून विभक्त अशा तीन हजारांहून अधिक जाती व त्याहीपेक्षा अधिक पोटजाती आहेत.

या सर्व जाती एकत्र मिसळून एक समाज होणे हे आपले ध्येय असेल तर ते साध्य होण्यासाठी आपल्यात समाजभावना जागृत झाली पाहिजे तसेच आपल्यास जी भावना हवी आहे ती भूमिविषयक भावना होय. हिंदुस्थान हे माझे राष्ट्र, हिंदुस्थान हा माझा मायदेश अशी मनापासून राष्ट्रभक्ती भारतीयांत उत्पन्न झाली पाहिजे. याप्रमाणे हिंदुत्वाची पुनर्घटना करणे याचा अर्थ हिंदू या भावनेच्या ऐवजी लोकांच्या ठिकाणी भारतीय ही बुद्धी उत्पन्न करणे किंवा हिंदू संस्कृतीचे रूपांतर भारतीय राष्ट्रधर्मात घडवून आणणे हा होय.' (डॉ. श्री. व्यं. केतकर, ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, यावरून संकलित– पुनर्मुद्रित आवृत्ती पाने ३७९–४०५).

सारांश, डॉ. केतकर व सावरकर यांच्या हिंदुत्वविचारांचा तौलनिक अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला केतकरांचा हिंदुत्वविचार प्रादेशिक वाटतो तर सावरकरांचा हिंदुत्वविचार वांशिक वाटतो. असा अभ्यास करण्याचा प्रयत्न डॉ. द. न. गोखले यांनी केला आहे. 'दोन हिंदुत्ववादी विचारवंत, ज्ञानकोशकार केतकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर' या लेखात डॉ. गोखले म्हणतात, ' हिंदुत्वाचा विचार जेव्हा राष्ट्रीयत्वाशी जोडला जातो तेव्हाच त्याला ' हिंदुत्ववाद' असे नाव मिळत असावे. केतकरांनी आणि सावरकरांनी हिंदुत्वाची आणि

९३४।९३५

राष्ट्रीयत्वाची सांगड घातली ती काहीशा भिन्न मार्गांनी घातली. हिंदुत्वाची पुनर्रचना करताना जगातील शक्तींच्या दिशेने लागलेले प्रवाह जगदैक्याच्या दिशेने चाललेले आहेत आणि जगदैक्यात जर अनेक मानव समूह एका सदृश संस्कृतीखाली नि एक सांघिक शासनसत्तेखाली यावयाचे तर ते मानवसमूह प्रदेशवार घडलेले असणार असे ते म्हणत होते. शिवाय आधुनिक जगात प्रादेशिक राष्ट्रवाद ही एक बलवान शक्ती आहे असे त्यांना वाटत होते. तेव्हा जगदैक्याशी सुसंगत राहणाऱ्या प्रादेशिक राष्ट्रवादाचे म्हणजेच 'हिंदी' राष्ट्रवादाचे निशाण त्यांनी उचलून धरले. आयुष्याच्या पूर्वार्धात सावरकरांचा हिंदुत्वविचार हा •वांशिक हिंदू राष्ट्रवादाच्या पायरीपर्यंत पोहोचला नव्हता आणि त्याची वृत्ती केतकरांच्या प्रादेशिक हिंदू राष्ट्रवादाशी मिळती जुळती होती. पण पुढे भारतीय जीवनप्रवाहात केव्हाही न मिसळण्याची नि स्वतःचा सवता सुभा कायम ठेवण्याची मुसलमानांची कडवी आणि आक्रमक वृत्ती जेव्हा त्यांच्या प्रत्ययास आली तेव्हा हिंदू हेच स्वयमेव राष्ट्र आहे, मुसलमानादिक समाज म्हणजे हिंदूंच्या देशातील अल्पसंख्य जमाती आहेत असा पुकारा मुसलमानांना धुतकारून ते करू लागले.' (पौरुष सांगली) सावरकर विशेषांक १९७९).

याचा अर्थ सावरकर मुसलमानांचा विचार केवळ अल्पसंख्य म्हणून करीत होते व समान हिंदी राज्याचे नागरिक म्हणून त्यांना अधिकार देऊ पाहत होते. हिंदुत्वावर आधारलेल्या भारतीय राष्ट्रवादाचा विचार सावरकरांच्या मार्गाने सुटणार की केतकरांच्या विचारांचा त्यासाठी अधिक उपयोग होईल असा प्रश्न त्यातून उत्पन्न होतो.

हिंदुत्ववादाचे व हिंदू राष्ट्रवादाचे तिसरे प्रवक्ते श्री. माधवराव गोळवलकर यांची हिंदु–मुस्लीम ऐक्याबद्दलची विचारसरणीही हिंदुत्व भवितव्याचा विचार करताना महत्त्वाची ठरते. श्री. गोळवलकर यांनी हिंदु–मुस्लीम प्रश्नाबद्दल जे विचार मांडले होते ते आध्यात्मिक दृष्टिकोणावर आधारलेले होते. त्यांचे म्हणणे असे की हिंदु–मुसलमानांचे पूर्वज एकच होते, हे या दोघांनी लक्षात ठेवले पाहिजे. तसेच आपापल्या धर्माचे पालन दोघांनी केले पाहिजे. राष्ट्रहित बाजूला सारून कोणीही हक्क व विशेषाधिकार मागता कामा नयेत. हिंदूंनीही असे करता कामा नये पण एखादी जमात जर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व मानू लागली तर ती राज्यांतर्गत राज्य निर्माण करीत आहे

असे करणे मात्र सहन करणे अशक्य आहे. हा प्रश्न हिंदू व मुसलमान यांच्यापुरता मर्यादित नाही. अल्पसंख्य म्हणून विशेषाधिकार प्रत्येक जमातीला दिले तर समाजाचा सर्वनाश ओढवेल. किंबहुना आपण तिकडेच चाललो आहोत. (श्री. गुरुजींची डॉ. सइफुद्दीन जिलानी यांच्याशी झालेली चर्चा– सुरुचि प्रकाशनाची पुस्तिका)· उपासना पंथांची विविधता मान्य करणारा हिंदुराष्ट्रवाद हे गोळवलकरांच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र होते.

रॉय निरीश्वरवादी होते. परंपरावादी नव्हते. १९४६ साली त्यांनी डेहराडून येथे जी भारतीय प्रबोधन संस्था स्थापन केली तिच्या उद्देश-पत्रिकेत पुढील कलमे होती. प्राचीन भारतीय विचार व ज्ञान यांचा बौद्धिक व सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी उपयोग व्हावा म्हणून त्यांचे रक्षण करणे, भारतीय परंपरेत जे अस्सल व अविनाशी आहे त्याचा शोध घेणे, आधुनिक ज्ञान व अनुभव ही ध्यानात घेऊन जुन्या मूल्यांचे पुन्हा मूल्यांकन करणे, भविष्यकाळ घडविण्यासाठी स्फूर्ती मिळावी म्हणून भारताच्या भूतकाळाचा अभ्यास करणे इत्यादी बाबींचा या उद्देशपत्रिकेत समावेश होता. यात हिंदुत्वाचा प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी भारताचा भूतकाळ हिंदूंनीच घडविला होता येथील प्राचीन परंपरा आर्य म्हणजे हिंदूच होती. अशा परंपरेचा अभ्यास भविष्यकाळ घडविण्यासाठी अवश्यक आहे असे श्री. मानवेन्द्र-नाथ रॉय यांच्यासारख्या निधर्मी नास्तिकाला वाटणे हे महत्त्वाचे आहे. भारताच्या सांस्कृतिक प्रबोधनाचा हा गाभाच आहे.

## भौतिक नीतिविचार

भारतीय समाजाचा तिसरा महत्त्वाचा प्रश्न सामाजिक नीतीचा आहे. आज जो सार्वत्रिक अधःपात झालेला दिसत आहे त्यातून वर निघण्याचा मार्ग धार्मिक पुनरुज्जीवन हा आहे की भौतिक नीति-विचार या देशाचे नियमन करू शकेल हा भारताचाच नव्हे तर जगाचा आजचा प्रश्न आहे. धर्माचे पुनरुज्जीवन नीतीसाठी करावे असे म्हणणारा धर्मातीत सुधारकांचा एक वर्ग आहे. पण सावरकर जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख या उपयुक्ततावादी नीतीवर विश्वास ठेवणारे होते. आज भारतात निधर्मी नैतिकता की धर्मनिष्ठ नीती हा प्रश्न आहे. शास्त्रीय व वैज्ञानिक अधिष्ठान देऊन यक्तिक व सामाजिक नैतिकता निर्माण करणे शक्य आहे का? धर्मग्रंथ किंवा अध्यात्म यांचा समाजाच्या पुनर्रचनेसाठी आधार न

१३३।१३७

घेता व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात नीतिमूल्ये निर्माण करता येऊ शकतात व अधिकांचे अधिक सुख हा उपयुक्ततावाद्यांचा निकष लावून हे नीतिनियम करणे शक्य आहे, असे सावरकरांचे मत होते. लोकमान्य टिळकांनी लिहिलेल्या 'गीतारहस्या' विषयी आपले मत लिहिताना सावरकरांनी केसरीत (४ ऑगस्ट १९२५ च्या अंकात) याविषयी चर्चा केलेली आढळते. या लेखात सावरकर म्हणतात, 'नीतीची पराकाष्ठा सर्वभूतहितरतत्व आहे हेच गीतेचे रहस्यकारांनी नीतिसर्वस्व ठरविलेले आहे. आणि उपयुक्ततावादाचा हाच सिद्धांत आहे की, ज्यायोगे फार अधिकांत अधिकांचे सुख वा हित साधले जाईल ते कर्म विहित होय. त्यातही 'सर्वभूतहितरतत्व' या शब्दांतील सर्वभूत या पदाचा अर्थ आपण करू लागलो तर आपणांस अंती उपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचाच आश्रय करावा लागतो. कारण सर्वत्र एकच अविच्छिन्न आणि अविच्छेद्य असे सघन ब्रह्मच भरलेले आहे, हे जरी सत्य असले आणि ही उपपत्ती उपयुक्ततावादाशी, साम्यबुद्धीच्या मताशी ती आहे याहून अधिक विरोधी होऊच शकत नाही– तथापि एकदा ब्रह्मसृष्टीतून मायासृष्टीत पाय टाकला की तेथे भेदाभेद उपयुक्त होतो आणि म्हणूनच नीती–अनीतीचा प्रश्न उद्‌भवतो. ब्रह्मसृष्टीच माझा आत्मा तोच दुसऱ्याचा हे वाक्यदेखील भ्रमपूर्ण ठरणारे आहे. तेथे हे काहीच न लगे.' पण आत्मैक्यबुद्धीने का होईना पण एकदा साम्यांच्या आकाशातून आणि वैषम्यांच्या स्थिर पण जड भूमीवर उतरलो म्हणजे तेथे सर्वभूतहितरतत्व याचा अर्थ अक्षरशः सर्व भूतांचे हित असा होणे अशक्य होते.

भारतासारख्या बहुधर्मी देशात धार्मिक शिक्षण देऊन किंवा अध्यात्मनिष्ठ आचरणाने नैतिकता निर्माण करणे विवाद्य ठरते. नैतिकतेची व्याख्या थोडक्यात करावयाची झाल्यास असे म्हणता येईल की नीतिमूल्ये समाजातील सर्व व्यक्तींच्या आचरणाचे नियम असतात. स्वार्थासाठी दुसऱ्याचे हित धोक्यात आणण्याचे वर्तन करण्याची प्रवृत्ती त्या नीतिमूल्यांमुळे नियंत्रित करता येते. नैतिक दृष्टचा समाजाचे नियमन करणारी मूल्यरचना ही बुद्धिनिष्ठ व शास्त्रीय तत्त्वज्ञानाच्या आधारे करणे शक्य आहे, असा सावरकरांच्या विवेचनाचा निष्कर्ष आहे. नैतिक आचरण हे मानवाच्या सुखी व संघर्षहीन जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे हे बुद्धिनिष्ठ तत्त्वज्ञानाने समाजाला पटवून देता येईल. त्यासाठी अध्यात्मनिष्ठ तत्त्वज्ञानाची गरज

होता. सावरकरांना नुसत्या तत्त्वचिंतनाचा कंटाळा होता, ते मूळ विचारवंत असले तरी प्रत्यक्ष कृती त्यांना अधिक प्रिय होती. म्हणून त्यांच्या विचारातही कृतीची प्रेरणा देण्याची शक्ती होती. य: क्रियावान स पंडित:' हे सुभाषित सावरकरांना पूर्णपणे लागू पडते.

## शोकांतिका, पण कोणाची ?

सावरकरांविषयी आस्था व आत्मीयता असलेले टीकाकार सावरकरांचे आयुष्य ही एका शोकांतिका आहे असे म्हणतात. या टीकेला सावरकरांनीच उत्तर दिले होते. ते म्हणाले होते, ' काही लोक म्हणतात माझे जीवन विफल आहे. त्यांना काही कळत नाही. माझ्यासारखे सफल जीवन फार थोड्यांच्या वाट्याला येते. तरुणपणी मी सर्व सोडून ह्या खडतर मार्गावर इतर पुष्कळांच्या समवेत पाऊल टाकले, त्यावेळी मला स्वतंत्र भारत 'याचि देही याची डोळा' पहायला मिळेल ही आशा कुठे होती ? माझ्या बरोबरीचे लोक पारतंत्र्यातच जग सोडून गेले. काही तुरुंगात झिजून गेले. मला पन्नास वर्षांची शिक्षा झाली. मी बहुतेक तुरुंगातच मरेन ही धास्ती मला होती. मी सुटलो. देश स्वतंत्र झाला. आज मी स्वतंत्र भारताचा नागरिक आहे. मला सरकारदरबारी मान नाही हे खरे आहे. पण आम्ही ज्यावेळी प्राण पणास लावले त्या वेळी आम्ही दैवाशी सौदा केलेला नव्हता की त्या त्यागाबद्दल आम्हाला सरकारी मान मिळाले पाहिजेत. मला माहीत आहे दिल्लीच्या दरबारात मला पट्टेवाल्याची जागाही मिळावयाची नाही. तरीही मी आज संतुष्ट आहे. तृप्त आहे-कारण माझा देश स्वतंत्र आहे मी स्वतंत्र आहे. (पुणे येथील अभिनव भारताच्या सांगता समारंभातील भाषण, १९५२).

अशाच तऱ्हेचे विचार सावरकरांनी पुढ ८० वर्षं पुरी झाली त्या वेळच्या समारंभात काढले होते. सावरकर १९५७ मध्ये दिल्लीला गेले तेव्हा राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसादांची आधी ठरलेली भेट घेतली नाही, पण एकदा राष्ट्रपती भवनावर आपला झेंडा फडकताना पाहू दे, अशी इच्छा नंतर व्यक्त केली सावरकरांच्या मातील तळमळीची यावरून कल्पना येते.

तेव्हा सावरकरांच्या आयुष्यातील एक ध्येय, भारताचे स्वातंत्र्य साध्य झाले याचे त्यांना नितांत समाधान होते. सावरकरांचे दुसरे ध्येय हिंदूंचे पुनरुत्थान. स्वातंत्र्यवीर म्हणण्यापेक्षा हिंदू संघटक म्हणून आपलें वर्णन केलेले त्यांना जास्त आवडे. हिंदू प्रबोधनाचे तत्त्वचिंतक,

१९७३।१९८

हिंदु अहंतेचे सूक्तकार व रक्षक, जन्मता जायते हिंदुः या ध्येयवादाचे निर्माते व विज्ञानवादी पुरोगामी हिंदुत्वाचे प्रचारक, या सर्व भूमिका सावरकरांनी १९२४ ते १९६६ या काळात केल्या. तेच त्यांचे जीवन-कार्य झाले. हिंदुत्ववादावर अनन्य निष्ठा हे सावरकरांचे वैशिष्टय होते. आता हिंदू प्रबोधन होत आहे. तेव्हा सावरकरांचा पुरोगामी हिंदुविचार हिंदु समाजाला स्वीकारावा लागेलच.

सामाजिक क्रांती ही अशा मूल्यवान जीवनाची आहुती घेत असते. मृत्यू आणि प्रतिकूल परिस्थिती हे आयुष्यभर सावरकरांचे सहचारी होते. प्रा. भाटे एकदा म्हणाले होते की सर्वगुणसंपन्न अशा या पुरुषाला यशाचा तुरा खोचण्यास नियती विसरली. पण आत्मार्प-णाची, हौतात्म्याची आकांक्षा बाळगणारे, स्वार्थ जाळून कृतार्थ झालेले सावरकरांचे जीवन होते. त्यामुळे त्यांना कधीच वैफल्याने ग्रासले नाही. सावरकरांचे तथाकथित अपयश ही हिंदू समाजाची शोकां-तिका आहे. नष्ट होण्यातच बीजाचे सार्थक असते. सावरकर विचा-रही बीजविचार होता. त्याची रोपे आता येत आहेत. अजून वृक्ष व्हावयाचा आहे. जन्मजात जातिभेद न मानणारा विज्ञानवादी हिंदू समाज हे त्यांचे स्वप्न होते. त्याचा वारसा त्यांनी पुढच्या पिढयांना दिला आणि आत्मार्पण करून सावरकर चिरंजीव झाले.

## चिरंतन संदर्भ

आज स्वतंत्र भारताच्या प्रश्नांच्या संदर्भात जेव्हा गांधीजी किंवा सावरकर यांच्या तत्त्वज्ञानांचा पुनर्विचार होईल तेव्हा गांधीजींना जसे कोणालाही टाळता येणार नाही, तसेच आपल्याला आधुनिक राष्ट्र म्हणून आजच्या स्पर्धायुक्त जगात पुढे यावयाचे असेल तर आधुनिकीकरणाचा बुद्धिनिष्ठ, झुंझार पुरस्कर्ता म्हणून सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ समाजधर्माचा स्वीकार भारताला करावाच लागेल. जपानने आपल्या राष्ट्रीय जीवनाचे योजनाबद्ध आधुनिकीकरण करून अवघ्या ७५–८० वर्षात आपल्या राष्ट्राचा कायापालट केला, एव-ढेच नव्हे तर आपला भावपिंडही बदलला. भारताच्या भावपिंडाचे आधुनिकीकरण केल्याविना भारताची सर्वांगीण प्रगती होणार नाही. केवळ नवी उपकरणे वापरून मनुष्य आधुनिक होत नाही. विज्ञान-निष्ठा, बुद्धिगम्य समाजव्यवहार इत्यादी आधुनिकीकरणाची मूल्ये आत्मसात केल्यावरच समाज आधुनिक होतो.

सावरकरांची सामाजिक दृष्टी शास्त्रपूत होती, समाजसंस्थाही

तशी शास्त्रपूत असावी हा त्यांचा आग्रह होता. म्हणून सावरकरांचा विचार हा भारताच्या राष्ट्रीय मनांचे आधुनिकीकरण करण्याची ताकद असलेला विचार म्हणून नव्या पिढीने अभ्यासला पाहिजे. सावरकरांचा विचार हा केवळ शास्त्रपूतच नव्हता, तर क्रियाशील होता. ते कर्ते सुधारक होते. समाजाची उपेक्षा, समाजाची निंदा स्वतःला योग्य वाटणाऱ्या विचारासाठी जो सहन करू शकतो त्याचाच आदर्श समाजापुढे असला पाहिजे.

स्वतः सावरकर म्हणत असत की, 'कर्तव्य म्हणून ज्या सुधारकांना समाजाच्या भावना दुखवाव्या लागतात, त्यांनी समाजाचा रागही काही काळ सोसणे कर्तव्यच आहे.' सावरकरांनी समाजाचा राग आनंदाने पत्करला होता. सावरकर या स्वातंत्र्यासाठी आत्माहुति देणाऱ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणूनच शेवटपर्यंत अशरण वृत्तीने, स्वाभिमानाने जगले. असा ज्वलंत देशभक्तीचा, अशरण वृत्तीचा, प्रखर बुद्धिवादी, प्रक्षोभक विचारवंत आणि कर्ता सुधारक म्हणूनच सावरकरांचा आदर्श सतत पुढे ठेवावा लागेल. तत्त्वे स्वतः कधीच लढत नाहीत, त्या तत्त्वांनी भारावून जाऊन जीवन जगणारी, मृत्यूच्या हातात हात घालून जीवनाची वाटचाल करणारी तत्त्वज्ञानाची सगुण प्रतीके समाजाला स्फूर्ती देत असतात. सावरकर हे अशा बुद्धिनिष्ठ समाजसुधारणावादाचे सगुण प्रतीक होते. म्हणूनच त्यांचा विसर पडता कामा नये.

## सिद्धांत वाणी

सावरकरांचे असे मूल्यमापन करताना हे ध्यानी ठेवले पाहिजे की सावरकरांची वाणी ही मंत्रवाणी होती, ती सिद्धांतवाणी होती. त्यांच्या काळात जे प्रश्न उपस्थित झाले त्या संदर्भात अभिनिवेशाने आपल्या लखलखत्या खड्गासारख्या वाणीने आणि तितक्याच धारदार लेखणीने त्यांनी आपले विचार मांडले. त्यामुळे अनेक व्यक्ती, सांप्रदायिक, रूढ मार्गाने पाहणारे भगत दुखावले गेले. सुधारणेचा सुधारकाने १०० टक्के आग्रह धरावा ही सावरकरांची भूमिका होती. त्यामुळे त्यांना बहुसंख्येने अनुयायी मिळणे शक्य नव्हते. कारण वैचारिक तडजोड त्यांना माहिती नव्हती. लोकानुरंजनाचे राजकारण आणि लोकप्रियतेचे धोरण ठवून लोकसंग्रह करणे त्यांना जमले नाही त्यांचा तो स्वभाव नव्हता. भविष्यदर्शी नेत्रांना दिसेल ते सांगणे हाच त्यांचा बाणा होता. १९५२ साली पुण्याच्या सभेत सिंधुमुक्तीची

१७५।१७६

घोषणा सावरकरांनी केली. तेव्हा ते स्वप्नरंजनच वाटले. पण १९७१ मध्ये सिंधू जरी नाही तरी इच्छामति मुक्त केली ती भारतीय सैन्यानेच. इतिहासांचे चक्र थांबलेले नाही, थांबणार नाही. सावरकरांना भविष्याचा हा वेध लागत असे आणि म्हणून ते तळमळून बोलत.

## राष्ट्रकारण आणि समाजकारण

सावरकर आणि इतर समाज सुधारक यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहे. त्यांचे समाजकारण हा राष्ट्रकारणाचाच आवश्यक भाग होता. सावरकरांनी राजकारणांत जे वाद उपस्थित केले, जे राजकीय विचार मांडले त्यात भारत हे समर्थ राष्ट्र व्हावे, भारताचा राष्ट्रीय अभ्युदय व्हावा हीच मुख्य चिंता होती. तेच त्यांचे राष्ट्रकारण होते. भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांनी जे सांगितले त्यात नवजात स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी हे राष्ट्र समर्थ व्हावे व जगातील अग्रेसर राष्ट्र व्हावे हीच मुख्य सूत्रे होती. पारतंत्र्यात स्वातंत्र्याचा आणि स्वातंत्र्यात सामर्थ्याचा राष्ट्रीय सुसज्जतेचाच त्यांना ध्यास होता. म्हणून स्वातंत्र्य मिळताच, भारत स्वतंत्र राष्ट्र म्हणून जन्मदात्या पित्याच्या तळमळीने ते सरकारला, समाजाला, तरुणांना विनवीत होते, 'राष्ट्राच्या चतुःसीमा निश्चित करा, सीमारक्षणासाठी आधुनिक सेना व शस्त्रास्त्रे निर्माण करा, राजकीय भोळसटपणा टाका, तुमची समृद्धीही संरक्षणाविना शेजारील 'राष्ट्रात असूया निर्माण करील, जगातील सत्तास्पर्धेचे बड्या राष्ट्रांचे क्रूर खेळ ध्यानी घेऊन परराष्ट्रीय धोरण ठरवा.' हे सर्व नवजात राष्ट्राच्या कल्याणाचे मार्गदर्शक मंत्र होते आणि सावरकर ते वेळोवेळी सांगत होते. अशा राष्ट्रीय सूक्तकाराचा व दार्शनिकाचा विचार त्याच्या काळात तो किती यशस्वी झाला यावर तपासणे किंवा त्या विचाराचे मूल्यमापन करणे हे मुळातच चुकीचे आहे. बुद्धिवादाला व वस्तुनिष्ठेला धरून नाही. सावरकरांना नुसत्या शाब्दिक काथ्याकुटीचा, शुष्क व क्रियाशून्य पांडित्याचा तिरस्कार होता. ते क्रियावादी होते. क्रिया व विचार यांची सांगड घालणारी प्रचारपद्धती हे त्यांच्या राजकीय जीवनाचे सूत्र होते. विचारामागे प्रचंड समुदाय उभा करणें, सामाजिक शक्ती उभी करणे त्यांना आयुष्यात जमले नाही. पण सर्वच महापुरुषांना ते जमतेच असे नाही. त्यासाठी जी सार्वजनिक जीवनात तडजोड करावी लागते ती सावरकरांनी कधीही केली नाही. म्हणूनच ते एकाकी राहिले. त्यांचा मोठा संप्रदाय झाला नाही. पण तरीही त्यांच्या विचा-

नाही हा या विचारसरणीचा गाभा आहे. सावरकर अशा विचार-सरणीच्या जवळचे आहेत. सावरकरांच्या 'विश्वाचा देव आणि मानवाचा देव' या लेखात जी विचारसरणी त्यांनी मांडली आहे त्यात मनुष्याचे सर्व ऐहिक व्यवहार हे नीती, रीती व निर्बंध हे त्यास या जगात हितप्रद आहे की नाहीत या प्रत्यक्षनिष्ठ कसोटीवरच ठरविले पाहिजेत व पाळले पाहिजेत हा त्यांचा मुख्य विचार आहे. म्हणून सावरकरांचा दृष्टिकोण हा निधर्मी नैतिकतेच्या अधिक जवळचा आहे. टिळकांनी 'गीतारहस्यात' सांगितलेला आध्यात्मिक मानवतावाद आणि बुद्धिनिष्ठ, इहवादी, उपयुक्ततावादी नीती मानणारा मानवतावाद हे समाजाच्या पुनरंचनेचे दोन पर्याय कल्पिले तर सावरकर हे बुद्धिनिष्ठ मानवतावादाला जवळचे आहेत. सावरकरांचा हा भौतिक नीतिविचार आजही मार्गदर्शक ठरणारा आहे.

भारताचे राष्ट्रीकरण हे हिंदुत्ववादाला मिळालेले आव्हान आहे हे आपण पाहिले. भारताला सामाजिक नीती नाही असे म्हटले जाते. तेव्हा निधर्मी नीती की धर्मनिष्ठ नीती हा भारताचा दुसरा प्रश्न. या दोन्ही प्रश्नांविषयी विचार करताना उपयुक्त ठरणारा सावरकर-विचार काय आहे याचाही थोडक्यात विचार केला.ही दोन्ही आव्हाने हिंदुत्वाला आहेत. तशीच आणखी दोन आव्हाने हिंदुत्वाला आहेत. एक इस्लामी पुनरुज्जीवनवादाचे व दुसरे कम्युनिझमचे.

## इस्लामी पुनरुज्जीवनवाद

इस्लाम नुसता धार्मिक संप्रदाय नसून मानवी समाजाच्या रचनेचे सिद्धांत त्यात आहेत व त्या सिद्धांतांचे पुनरुज्जीवन करण्याची आज गरज आहे हा विचार इस्लामी राष्ट्रात आज प्रबळ होत आहे व जगात ज्या राष्ट्रात मुसलमान आहेत तेथे या विचारप्रणालीचा प्रसार करण्याचा संकल्प केलेले मुस्लीम नेते आज निर्माण झाले आहेत. त्यामुळे पाश्चिमात्य राजकीय संस्कृतीला या इस्लामी संस्कृतीचे आव्हान जसे निर्माण झाले आहे तसेच ते आव्हान हिंदू संस्कृतीलाही आहे. तुर्कस्थान, सौदी अरेबिया व इतर अरब राष्ट्रे, पाकिस्तान, इराण, रशिया, मलेशिया, बांगलादेश आदि देशात इस्लामी पुनरुज्जीवनवाद प्रबळ होत आहे. भारतातील मुसलमानांसही या आंतरराष्ट्रीय इस्लामचे आकर्षण वाटू लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ख्रिश्चन मिशनरी व इस्लामी पुनरुज्जीवनवादी या दोहोंचे आव्हान हिंदुत्वाला स्वीकारावे लागणार आहे. हिंदुत्ववादी चळवळीचा विचार

२६१।१७०

करताना इस्लामी पुनरुज्जीवनवादाचा विचार करावा लागेल. बलिष्ठ अल्पसंख्य म्हणून मुसलमान गठ्ठा मतशक्तीचा आधार घेऊन भारतातील राजकारणावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा धोका निर्माण झाला आहे.

सावरकरांचा हिंदुत्व विचार हा जसा विज्ञाननिष्ठ व पुरोगामी होता तसा तो अस्तित्ववादी होता हे लक्षात ठेवले पाहिजे. धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरेल हा त्यांनी दिलेला इशारा किंवा हिंदूंचे संख्याबळ हेही आवश्यक आहे हा त्यांनी सांगितलेला सिद्धांत त्यांच्या हिंदू अस्तित्ववादाचा निदर्शक आहे. सावरकरांचा विचार हा समाजाला आध्यात्मिक वा बौद्धिक गुंगी आणणारा नाही. तो खडबडून जागे करणारा विचार आहे. म्हणूनच सावरकर जागल्यासारखे वाटतात. आसामचा प्रश्न आज निर्माण झाला असला तरी सावरकरांच्या भविष्यदर्शी नेत्रांना आसाममधील हिंदूंवर येणारे संकट १९४१ साली दिसले होते.त्यांनी १३ जुलै १९४१ या दिवशी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले होते, हिंदुस्थानमधील हिंदू समाजाचे विशेषत: आसाममधील एका भयानक अरिष्टांकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

आसाम प्रांताला मुसलमान बहुसंख्याक प्रांताचे रूप देऊन तेथे हिंदूंचे जिणे अशक्य करून सोडण्याची कारवाई चालू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बंगाल आणि इतर प्रांत यांमधील मुसलमानांची संख्या वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. त्याला बरेच यशही आले आहे. त्यासाठी आसाम विधिमंडळाने भूविकास निबंध संमत केला आहे. बाहेरच्या प्रांतातून घुसणारी मुसलमानाची टोळधाड थांबविण्यासाठी हिंदुमहासभेने सतत विरोध चालविला असतानाही त्यावेळी अधिकारावर असलेल्या कांग्रेस मंत्रिमंडळाने हे आसामचे मुसलमानीकरण थांबविण्यास नकार दिला. सावरकरांनी या पत्रकाच्या शेवटी म्हटले आहे आसामी हिंदूंनी दृढपणे संघटित होऊन संग्रामासाठी उभे राहावे.

सावरकरांच्या दूरदर्शी विचारप्रणालीत हिंदुत्व संरक्षणाला अग्रस्थान होते. सावरकर सैन्यवादी आहेत असे एका मराठी पत्रकाराने लिहिले तेव्हा सावरकर म्हणाले होते, 'स्वारी सैन्याची होते, पंडितांची नाही.' हाच रोखठोकपणा व व्यवहारी सावधपणा हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष होता. आज इस्लामी पुनरुज्जीवनवाद आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करीत असताना सावरकरांनी मांड-

लेल्या हिंदुत्व–संरक्षक विचारांची देशाला पुन्हा आठवण करून देणार आहे. सावरकरांच्या काव्यातील एक ओळ या ठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी आहे, 'गंगाचि आटता गंगास्नान कैसे घडे.' सावरकरांनी स्पष्टपणे म्हटले आहे की हिंदुस्थानचाच नव्हे तर हिंदी राष्ट्राच्या जीवनगंगेचा मुख्य ओघ हिंदू जाती हा आहे. हिंदू जाती हेच हिंदुस्थानी राष्ट्रगंगेचे मुख्य जीवन होते–आहे–राहील. (श्रद्धानंद २–६–२७) तेव्हा हिंदुजातीचे अस्तित्व हा सावरकरांच्या चिंतनाचा नित्य विषय होता. तिच्या अस्तित्वासाठी सावरकर–विचार संजीवनीसारखा उपयोगी पडणारा आहे. सावरकर १९४१ साली म्हणाले होते, हिंदूंनो, मी बोलतो ते तुम्ही मान्य करा किंवा न करा. पण त्या बोलण्याबद्दल मला शाप तरी देऊ नका.' ही आर्तवाणी एका भविष्यवेत्त्याची होती.

## कम्युनिझमचा धोका

कम्युनिझम हा नास्तिकांचा धर्म आहे. त्याचा धोकाही भारताला आहे. पण विचारप्रणाली म्हणून नव्हे तर एका महासत्तेचा आधार असलेला विचार म्हणून. सावरकरांना स्वतःला रशियाने जीवनक्रांती घडवून आणली असे वाटत होते. रशियाने कमावलेले सामर्थ्य, त्याने केलेली वैज्ञानिक प्रगती याचे त्यांना आकर्षण होते. रशियाने धर्मग्रंथ टाकून विज्ञानग्रंथावर आपली समाजरचना केली याचे स्वागत त्यांनी केले होते. एकेकाळी रशियाचा वस्तुपाठच त्यांनी समाजापुढे ठेवला होता. मार्क्सची भौतिक दृष्टी सावरकरांना मान्य होती. पण हिंदूधर्म हे मार्क्सवादाला उत्तर असू शकत नाही असे सावरकर म्हणाले होते. याचा अर्थ धर्माच्या आधारावर समाजाची पुनर्घटना करण्याने मार्क्सवादाला वा कम्युनिझमला उत्तर देता येणार नाही

कम्युनिझम हे शोषणमुक्त वर्गहीन समाजाचे स्वप्न पहाणारे तत्त्वज्ञान आहे. मार्क्सचे काही अंदाज चुकले आहेत. राष्ट्रवाद, धर्म, संस्कृती, जातिभेद या संकल्पनांनी मार्क्सवादाला आव्हान दिले आहे ' व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तींचे स्वातंत्र्य आदि लोकशाही मूल्ये ही आर्थिक रचनेच्या समतावादी तत्त्वज्ञानालाही स्वीकारावी लागतात हेच कम्युनिस्ट राष्ट्रांतील चळवळीवरून सिद्ध होत आहे. मार्क्सवादाची क्रांतिक्षमता आज कमी झाली असली तरी दरिद्री व शोषित जनतेला आकर्षित करण्याची त्याची ताकद कमी झालेली नाही. पण मानवेंद्रनाथ रॉय म्हणतात त्याप्रमाणे 'अर्थ हा एकच

१७११९७

ग्रंथसंग्रहालय ठाणे
२९९८
ना. क्र. २३९८१
निबंध २८१९१८३
शाखा

पुरुषार्थ ही कल्पना आता बुडवली पाहिजे. अर्थप्रधान मानव गुलाम तरी असतो किंवा गुलामांचा धर्म असतो हे आता अनुभवाने सिद्ध झाले आहे. तसेच दरिद्री जनतेच्या मुक्तीसाठी निर्माण झालेली सत्ता लष्करशाही निर्माण करते किंवा सत्ताधाऱ्यांचा गट लोकशाहीची सत्तायंत्रणा ताब्यात ठेवतो. सत्तेचे एक स्वतंत्र मानसशास्त्र असते.

हा सगळा अनुभव लक्षात घेऊन भारताला नवरचनेचा मार्ग शोधला पाहिजे. नवरचनेचे हे आव्हान हिंदुत्ववाद्यांनी समजून घेतलें पाहिजें व त्याला उत्तर शोधले पाहिजे. हिंदू जातीचे अस्तित्व केवळ ख्रिश्चन–मुसलमानांना हतप्रभ करण्यावर अवलंबून नाही. शोषणमुक्ती, दलित, वनवासी व स्त्रिया यांना सामाजिक व आर्थिक न्याय हिंदुत्ववाद देऊ शकतो की नाही, त्यासाठी कोणती समाजव्यवस्था मी निर्माण करू शकतो, यावर, हिंदुत्ववादाचे यापुढील यश अवलंबून आहे. सावरकर विचार या दृष्टीने मार्गदर्शन करण्यास अपुरा आहे. त्याची सैद्धांतिक चौकट पुरोगामी नवरचनेच्या आड येणारी नाही. पण त्यांना आराखडा सांगणारीही नाही. प्रत्येक राजकीय–सामाजिक विचार ज्या परिस्थितीत जन्मतो तिचे त्याच्यावर बंधन असते.

हिंदु समाजाला जीवन–मरणाच्या संघर्षास सिद्ध राहावे लागणार आहे हे सावरकरांनी आपल्या भविष्यदर्शी प्रज्ञेने १९२४ सालीच हेरले होते. त्यामुळे हिंदुत्वाचे संरक्षण, संवर्धन व पुनर्घटना ही तीन ध्येये सावरकरांनी १९२४ सालीच ठरविली व त्यासाठी आपलें सर्वस्व अर्पण केले. बुद्धी, वाणी, लेखणी व कार्यशक्ती यांचा वापर या तीन ध्येयांसाठीच सावरकरांनी केला. यामुळे त्यांच्या जीवनाला अपरिहार्यपणे एकांगीपणा आला. गूढतत्त्वचिंतन, प्रबंधलेखन यांची उत्तम क्षमता असलेल्या त्यांच्या व्यक्तित्वातील प्रचारक प्रभावी ठरला. पुरोगामी हिंदुत्व हा सावरकरांचा ध्यास होता. आपणास फार दूरचे दिसते, आपण भविष्यद्रष्टे व मंत्रद्रष्टें आहोत आणि आपणास हिंदू समाजाला जागृत करण्याचे कार्य करावयाचे आहे अशी त्यांच्या मनाची खात्री झालेली होती. म्हणून लेखणीसुद्धा लाठीसारखी त्यांनी वापरली. साहित्यिकांना मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून सांगितले, ‘ लेखण्या मोडा आणि बंदुकी हातात घ्या.’ सुनीतापेक्षा शस्त्रावर अधिक प्रेम करणारा तो महाकवी

रांचे मूल्य कमी होत नाही. कारण असे वैचारिक नेते, स्वार्थ जाळून कृतार्थ करणारे सामाजिक नेते हेच 'धर्मसंस्थापनेचे नर' होतात. सावरकरही असे विज्ञानयुगाचा, बुद्धिवादाचा, मूलगामी समाजपरिवर्तनाचा युगधर्म प्रचारणारे, त्याच्या संस्थापनेसाठी आयुष्यभर झुंजणारे, 'धर्मसंस्थापनेचे नर' होते. म्हणून सावरकरांच्या सामाजिक विचारांचा पुनर्विचार व सखोल अभ्यास झाला पाहिजे. त्यांनी ज्या सामाजिक चळवळी सुरू केल्या त्यांचा वारसा पुढे तरुणांनी चालविला पाहिजे. भारताला आज जी सर्वांगीण क्रांती हवी आहे तिची मूलतत्त्वे, आगरकर, म. फुले, सावरकर, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या सामाजिक विचारवंतांच्या विचारसंपदेत आढळतील. ती वेचून, ती तपासून आपले सामाजिक परिवर्तनाचे तत्त्वज्ञान आता तयार झाले पाहिजे. असे क्रांतीचे सामाजिक तत्त्वज्ञान असल्याविना क्रांती परिवर्तन घडवणार नाही, क्रांती म्हणजे केवळ सत्तांतर नव्हे हे ध्यानी ठेवले पाहिजे.

(समाप्त)

REFBK-0023981